# ‘पुणे शहरातील शैक्षणिक विकासात महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे योगदान’

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

तात्त्विक व सामाजिक शास्त्रे विद्याशाखांतर्गत

इतिहास विषयातील विद्यावाचस्पती (पीएच्. डी.) पदवीसाठी
सादर केलेला शोधप्रबंध

संशोधक

श्री. ज्ञानेश्वर आनंदराव दाते

मार्गदर्शक

डॉ. स्वाती काळभोर
सी. के. गोयल महाविद्यालय,दापोडी, पुणे.

संशोधन केंद्र
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

एप्रिल २०१७

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या तात्त्विक व सामाजिक शास्त्रे विद्याशाखांतर्गत इतिहास या विषयातील विद्यावाचस्पती (पीएच्.डी) या पदवीसाठी श्री. ज्ञानेश्वर आनंदराव दाते यांनी 'पुणे शहरातील शैक्षणिक विकासात महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे योगदान' या विषयावरील शोध प्रबंधाचे काम माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले आहे.

सदर शोधप्रबंधामध्ये त्यांनी नमूद केलेली माहिती व संशोधनात्मक विधाने ही माझ्या माहितीप्रमाणे बरोबर आहे. हे संशोधन पूर्णपणे नवीन असून, प्रस्तुत प्रबंध यापूर्वी कोणत्याही विद्यापीठात अन्य परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

ठिकाण :- पुणे | मार्गदर्शक

दिनांक :- एप्रिल २०१७ | डॉ. स्वाती काळभोर

## प्रतिज्ञापत्र

मी श्री. ज्ञानेश्वर आनंदराव दाते, प्रतिज्ञापूर्वक जाहीर करतो की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या तात्त्विक व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा अंतर्गत इतिहास या विषयातील विद्यावाचस्पती (पीएच्.डी) या पदवीसाठी सादर केलेला 'पुणे शहरातील शैक्षणिक विकासात महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे योगदान' या विषयावरील माझा शोधप्रबंध असून तो इतर कोणत्याही विद्यापीठात, कोणत्याही पदवीसाठी सादर केलेला नाही.

ठिकाण :- पुणे — श्री. ज्ञानेश्वर आनंदराव दाते

दिनांक :- एप्रिल २०१७.

# ऋणनिर्देश

एकोणिसावे शतक जसे प्रबोधनाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे तसे ते शैक्षणिक विकासाच्या दृष्टीने देखिल तेवढेच उल्लेखनीय ठरलेले आहे. आधुनिकतेची मूल्य महाराष्ट्रातील समाजसुधारकांनी आत्मसात केलेली होती. या प्रक्रियेत पुणे शहर आघाडीवर होते. पुणे या बौध्दिक राजधानीत महात्मा व सावित्रीबाई फुले या दाम्पत्यांनी शिक्षणाचा पाया घातला. त्याचा विकास पुढे महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी, शिक्षण प्रसारक मंडळी, डेक्कन एज्युकेशन सोसायटी, महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था अशा शैक्षणिक संस्थांनी घडवून आणला.

पुणे शहरातील सर्वांत जुनी स्थापन झालेली शैक्षणिक संस्था म्हणजे 'पूना नेटिव्ह इन्टिट्युशन' ही आहे. याच संस्थेचे पुढे 'महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी' असे नामकरण झाले. संस्थेच्या स्थापनेत व विस्तारात वामनराव भावे, लक्ष्मणराव इंदापूरकर व विनायकराव जालनापूरकर ह्यांचे उल्लेखनीय योगदान आहे. पुढे देखील पदाधिकाऱ्यांनी संस्थेच्या शाखांचा विस्तार तेवढ्याच गतीने घडवून आणलेला आहे.

या प्रबंधाची मांडणी करत असताना वेळोवळी बहुमोल मार्गदर्शन करणाऱ्या माझ्या गुरूवर्या, मार्गदर्शिका आदरणीय डॉ. स्वाती काळभोर यांच्या सहकार्यामुळे हे संशोधन पूर्ण होऊ शकले त्यांचा मी ऋणी आहे. याशिवाय महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या मुख्य कार्यालयातील व संस्थेच्या विविध विद्यालय व महाविद्यालयामधील महत्त्वाची कागदपत्रे उपलब्ध करून दिल्याबद्दल संचालक, सचिव, मुख्याध्यापक, शिक्षक या सर्वांचा मी ऋणी आहे.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे डीन डॉ. बी. डी. कुलकर्णी, इतिहास विभाग प्रमुख डॉ. नलिनी वाघमारे व सहाय्यक प्राध्यापक डॉ. स्वराली कुलकर्णी यांचा मी ऋणी आहे.

पुणे शहरातील इतर शैक्षणिक संस्थांचे पदाधिकारी, शिक्षक व इतर कर्मचारी यांनी त्यांच्या संस्थेच्या संदर्भातील साहित्य उपलब्ध करून दिले त्या बद्दल त्यांचा मी ऋणी आहे. तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथील जयकर ग्रंथालय, विश्रामबागवाड्यातील शासकीय ग्रंथालय, पुणे नगर वाचन मंदिर ग्रंथालय, पुणे, केसरी - मराठा ग्रंथालय, पुणे, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथालय इत्यादी ग्रंथालयातील दुर्मिळ ग्रंथ, नियतकालिक वेळोवेळी उपलब्ध करून दिले त्याबद्दल तेथील सर्व ग्रंथपाल व इतर कर्मचारी वर्ग या सर्वांचा मी ऋणी आहे. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांनी आपल्या मुलाखतीमधून जी माहिती दिली आहे, त्याबद्दल त्यांचा मी ऋणी आहे. त्यामध्ये संस्थेचे सचिव श्री. विनायक शुक्ला, भावे हायस्कुलचे शिक्षक श्री. वा. कुलकर्णी सर व इतर स्नेहींचा मी ऋणी आहे.

पुणे विद्यार्थी गृहाचे माजी चेअरमन श्री. कृष्णाजी शिरकांडे, संशोधनाची प्रेरणा देणारे स्व. डॉ. एन. एस तांबोळी, वाघोली येथील भारतीय जैन संघटना महाविद्यालयातील इतिहास विभाग प्रमुख व संशोधक डॉ. भूषण फडतरे व माझे वडील, आई, पत्नी, मुले व माझे मित्र सुहास नाईक या सर्वांचे संशोधनाबद्दल प्रोत्साहन व बहुमोल सहकार्य लाभले, या सर्वांचा मी ऋण व्यक्त करतो.

श्री. पांडुरंग पवार यांनी संपूर्ण प्रबंधाचे मुद्रितशोधन वेळेत करून दिले त्यांचाही मी ऋणी आहे. सौ. रेवती मॅडम यांनी वेळेत व्यवस्थित डी.टी.पी. करून दिले त्यांचाही मी ऋणी आहे. याशिवाय ज्या ज्ञात-अज्ञात संस्था, व्यक्ती यांचा नामोल्लेख करणे राहून गेले आहे अशा सर्वांचा मी ऋणी आहे.

ठिकाण :- पुणे — संशोधक

दिनांक :- २७ एप्रिल २०१७ — श्री. ज्ञानेश्वर आनंदराव दाते

# अनुक्रमणिका


| प्रकरण क्रमांक | शीर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| ❖ | प्रमाणपत्र | एक |
| ❖ | प्रतिज्ञापत्र | दोन |
| ❖ | ऋणनिर्देश | तीन |
| १ | प्रस्तावना | १ ते १७ |
| २ | पुण्यातील शैक्षणिक संस्थांचा विकास | १८ ते ५२ |
| ३ | महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी शिक्षण संस्थेची वाटचाल | ५३ ते ८६ |
| ४ | महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या पूर्व प्राथमिक ते माध्यमिक विद्यालयांची वाटचाल | ८७ ते १२४ |
| ५ | उच्च माध्यामिक, पदवी, पदव्युत्तर महाविद्यालये व व्यावसायिक महाविद्यालये | १२५ ते १६६ |
| ६ | महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे उल्लेखनीय उपक्रम व योगदान | १६७ ते १९८ |
| ७ | उपसंहार | १९९ ते २१० |
| ❖ | निवडक संदर्भ सूची | २११ ते २१४ |
| ❖ | परिशिष्टे | २१५ ते २३६ |
| ❖ | सर्व्हे मुलाखत फॉर्म | २३७ ते २४३ |

# प्रकरण १

# प्रस्तावना

१.१ ब्रिटिशकालीन भारतातील शिक्षणपद्धतीचा आढावा :

१.२ भारतीय समाज सुधारकांचे शैक्षणिक कार्य :

१.३ राष्ट्रीय शिक्षणाची पार्श्वभूमी :

१.४ राष्ट्रीय शिक्षणाचा अर्थ :

१.५ राष्ट्रीय शिक्षणाची वैशिष्ट्ये :

१.६ राष्ट्रीय शिक्षणाची सुरूवात :

१.७ पुणे शहरातील शिक्षणाच्या संदर्भातील ब्रिटीशांचे धोरण :

१.८ विषय निवडीमागची पार्श्वभूमी :

१.९ पूर्व संशोधनाचा आढावा :

१.१० संशोधनाचे शीर्षक व संशोधनाची गृहीतके :

१.११ संशोधनाची उद्दिष्टे :

१.१२ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :

१.१३ सर्वेक्षण पद्धत :

१.१४ प्रबंधांचा आराखडा :

## प्रस्तावना

मानव हा विकसनशील प्राणी असून तो बुध्दिमान आहे. त्याच्या सर्वांगीण विकासासाठी विविध गोष्टींची आवश्यकता असते. मानवाच्या सर्वांगीण विकासाचा विचार करता त्याच्या शारीरिक, बौद्धिक व सामाजिक विकासाचा विचार प्रथम करावा लागतो. मानव आणि मानवेतर प्राण्यांमध्ये विचार करण्याची शक्ती हा मूलभूत फरक आहे. विचार करण्याच्या शक्तीमुळेच मानवाचा मानवेतर प्राण्यांच्या तुलनेत मोठा विकास झाला आहे. मानवाच्या शारीरिक विकासासाठी अन्न, वस्त्र आणि निवारा याची प्रामुख्याने गरज असते. या मूलभूत गरजांच्या पूर्ततेतूनच मानवाचे जीवन सुसह्य होते. मानवाच्या सामाजिक विकासासाठी गतीशील विचारांची गरज असते. मानव हा इतर प्राण्यांपेक्षा वेगळा व श्रेष्ठ ठरतो तो त्याच्या बुद्धिमत्तेमुळेच. बुद्धिमत्तेलाच अनुसरून फ्रान्सिस बेकन यांनी इतिहासाची केलेली व्याख्या अधिक समर्पक आहे. ती म्हणजे 'इतिहास ही मानवाला सूज्ञ बनविणारी ज्ञान शाखा आहे.' यावरून मानव जरी महत्त्वाचा असला तरी त्याची विचार करण्याची प्रक्रिया ही अधिक महत्त्वाची आहे.

भारतीय समाजाचा विचार करता इंग्रज भारतात येण्यापूर्वी शिक्षणाचा अधिकार हा उच्चवर्णियांनाच होता. शुद्रांना व स्त्रियांना शिक्षण घेण्याचा अधिकार नव्हता. त्यामुळे शिक्षण हे ठरावीक वर्गाची मक्तेदारी बनले होते. सर्वसामान्य लोक शिक्षणाच्या परिघात नव्हते. ज्ञानाची केंद्रे बंदिस्त झाल्यामुळे बहुसंख्य समाज नव्या, आधुनिक विचारांपासून दूर राहिला होता. तत्कालीन शिक्षणव्यवस्थेचे स्वरूप म्हणजे धर्मग्रंथांचे वाचन करणे, किरकोळ हिशेबी आकडेमोड करणे एवढेच होते. त्यामुळे या शिक्षण पद्धतीत कर्मकांड, अंधश्रद्धा, जातीभेद अशा स्वरुपाचे दोष होते. 'वर्णव्यवस्था' आणि 'जातीव्यवस्था' कार्यान्वित होती. संपूर्ण समाज ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र या चार वर्णात विभागला होता. तत्कालीन समाजव्यवस्था ही धर्माला प्राधान्य देणारी व जातीव्यवस्था बाळगणारी होती. वर्णव्यवस्था व जातीयता यांच्या प्रचंड प्रभावामुळे ज्ञानक्षेत्रात विषमता निर्माण झाली.

ब्रिटिशांच्या आगमनापूर्वी भारतीय समाजव्यवस्था 'पुरुषप्रधान' स्वरुपाची व स्त्रियांवर अन्याय, अत्याचार करणारी होती. पुरुषप्रधान मानसिकतेमुळे स्त्रियांच्या शोषणाकडे व्यवस्थेचे दुर्लक्ष होत होते. स्त्रियांना शिक्षणाचा हक्क अधिकार नव्हता. सर्वसामान्य स्त्रीने चूल आणि मूल या पलीकडे कर्तृत्त्व गाजविणे हीन समजले जाई. धर्मग्रंथांच्या आधारे स्त्रियांवर अगणित बंधने घालण्यात आली होती. स्त्रियांच्या कर्तृत्त्वाला कोणत्याही प्रकारचा वाव नव्हता. स्त्रियांना शिक्षणाचा हक्क नाकारण्यात

आल्यामुळे त्यांच्या विकासाला कोणत्याही प्रकारची चालना मिळत नव्हती. 'मनुस्मृती'सारख्या ग्रंथांनी स्त्रीला जाचक नियमांनी बंदिस्त केले होते. स्त्रियांची सामाजिक परिस्थिती अतिशय दयनीय स्वरुपाची होती. विचार करणे, स्वतंत्र विचार मांडणे हे तिच्यासाठी निषिद्ध मानले जात होते. स्त्रीने शाळेत जाऊन शिक्षण घेण्याचा प्रयत्न करणे ही वाईट गोष्ट मानली जात असे. त्यामुळेच भारतीय समाजाचा विकास कुंठित झाला होता. पारंपरिक शिक्षणपद्धतीत व्यक्तीला रोजगार उपलब्ध करून देण्याची क्षमता नव्हती. 'विज्ञाननिष्ठा', 'स्त्रीपुरुष समानता', 'व्यक्तिस्वातंत्र्य', 'बुद्धिवाद' ही मूल्ये या शिक्षण पद्धतीत रुजली नव्हती. त्यामुळे भारतीय समाजात खऱ्या अर्थाने परिवर्तन घडवून आणण्याची क्षमता पारंपरिक शिक्षणात नव्हती.[१]

## १.१ ब्रिटिशकालीन भारतातील शिक्षणपद्धतीचा आढावा :

भारतातील शिक्षणपद्धतीचा आढावा घेत असताना इंग्रज राजवटीत शिक्षणपद्धती समजून घेणे आवश्यक ठरते. सन १६५९ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीच्या संचालकांनी व्यापाराबरोबर ख्रिश्चन धर्मप्रसार करण्याचे ठरविले. मिशनऱ्यांच्या धर्मप्रसारामुळे जे गरीब लोक आहेत, त्यांच्यासाठी शाळा सुरु करण्याचे ठरले. मिशनऱ्यांनी सुरु केलेल्या शाळांना 'चॅरिटी ट्रस्ट' म्हणतात. सन १७५७ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीने प्लासीची लढाई जिंकून भारतात सत्ता संपादन केली. ईस्ट इंडिया कंपनीच्या काळात ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या शाळा सुरु करण्यामागे एक वेगळा उद्देश होता. तो म्हणजे ''इंग्रजी शिक्षण देऊन राज्यकारभारासाठी आवश्यक असा कारकूनांचा वर्ग निर्माण करावा व पाश्चात्त्य शिक्षणाचा गौरव करणारा वर्ग तयार व्हावा, आपल्या व्यापारास गिऱ्हाईक मिळवून द्यावे, विलायती वस्तूंची निवड आवड निर्माण करणारा वर्ग निर्माण करावा, या हेतुने १७८१ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीने इंग्रजी शिक्षणाची सुरुवात केली.''[२] थोडक्यात भारतीय लोक रंगाने, रूपाने व रक्ताने भारतीय राहतील पण त्यांच्या आवडी निवडीने मात्र ते पाश्चिमात्य बनतील अशीच त्यांची शिक्षण व्यवस्था होती.

भारतात आपली सत्ता टिकून राहवी या उद्देशाने वॉरन हेस्टींगने सन १७८१ साली कलकत्ता येथे मदरसा नावाची शिक्षण संस्था स्थापन केली. पुढे २ फेब्रुवारी १८३५ साली लॉर्ड मेकॉलेचा मसुदा प्रसिद्ध झाला. ब्रिटिशांचे शैक्षणिक धोरण कसे होते हे या मसुद्यानुसार स्पष्ट होते. या मसुद्यानुसार भारतीय लोकांना इंग्रजी भाषेतून पाश्चिमात्य विद्यांचे शिक्षण द्यावे व विज्ञानाचे शिक्षण द्यावे अशी शिफारस करण्यात आली. त्यामुळेच मेकॉले यांना भारतीय शिक्षण विकासाच्या मार्गावरील दीप असे म्हटले जाते. पुढे १८ जुलै १८५४ मध्ये चार्ल्स वूड याने आपला शिक्षणविषयक

खलिता सादर केला. तोच चार्लस वूडचा खलिता म्हणून प्रसिध्द आहे. त्यातूनच सन १८५७ साली मुंबई, मद्रास, कलकत्ता येथे शैक्षणिक विद्यापीठाची स्थापना झाली. वूडचा खलिता हा शैक्षणिक विकासाच्या वाटचालीतील मैलाचा दगड मानला जातो. त्यामुळे शैक्षणिक प्रसारास गती मिळाली आणि सरकारी विभागात शिक्षण खाते सुरु झाले. म्हणजेच वूडच्या खलित्यानुसार भारतात महत्त्वाचे शैक्षणिक बदल घडून आले. विद्यापीठांची स्थापना होणे हा भारतातील शिक्षण क्षेत्रातील एक महत्त्वाचा टप्पा होता.

भारतीय समाजातील शैक्षणिक विकासाच्या संदर्भात या तीनही विद्यापीठांचा महत्त्वाचा वाटा होता. भारतीय समाजाला नवी दृष्टी देण्यात या विद्यापीठांनी महत्त्वाचे योगदान दिले होते. वूडच्या खलित्याने या विद्यापीठांची स्थापना झाली म्हणूनच वूडचा खलिता भारतीय शैक्षणिक विकासाच्या दृष्टिने महत्त्वाचा आहे.

सन १८५७ च्या उठावानंतर ईस्ट इंडिया कंपनीची भारतातील सत्ता संपुष्टात येऊन प्रत्यक्ष ब्रिटिश पार्लमेंटची सत्ता प्रस्थापित झाली. या उठावाने कंपनी सरकारची सत्ता संपुष्टात आली. भारतातील सारी सत्तासूत्रे ब्रिटिश पार्लमेंटच्या हाती गेली. गव्हर्नर जनरल लॉर्ड रिपन यांनी ३ फेब्रुवारी १८८२ रोजी भारतीय शिक्षणाचा आयोग स्थापन केला. आयोगाचे अध्यक्ष विल्यम हंटर हे होते. हा आयोग भारतीयांना विविध स्तरावरच्या शिक्षणाचा विचार करणारा पहिला आयोग होता. त्यामुळे या आयोगाने खाजगी शिक्षणसंस्था स्थापन करण्यास उत्तेजन दिले. हंटर आयोगाची महत्त्वपूर्णता यासाठी आहे की, या आयोगाने भारतातील विविध महत्त्वाच्या व्यक्तिंच्या साक्षी नोंदवून घेतल्या. शिक्षणासंबंधी भारतीयांच्या भावना जाणून घेतल्या. एकूणच लॉर्ड रिपनचे भारतीय शिक्षण व्यवस्थेसंदर्भातील धोरण हे ‘उदारमतवादी’ होते.

पुढे ११ मार्च १९०४ रोजी लॉर्ड कर्झन याने आपले शिक्षणविषयक धोरण जाहीर केले. त्याने शिक्षण विभागात महासंचालक पदाची निर्मिती केली. त्याचबरोबर १९०४ मध्येच भारतीय विद्यापीठ कायदा मंजूर झाला. परदेशात भारतीयांना तंत्रविज्ञानाचे शिक्षण देण्यासाठी शिष्यवृत्ती सुरु केली. सन १८९३ ते १९५६ या काळात पुढील चार प्रकारच्या शाळा अस्तित्वात होत्या.

१. मिशनऱ्यांनी चालविलेल्या शाळा.

२. ब्रिटिश अधिकाऱ्यांनी चालविलेल्या शाळा.

३. भारतीयांनी चालविलेल्या खाजगी शाळा.

४. जुन्या पद्धतीच्या पाठशाळा.

मिशनऱ्यांनी चालविलेल्या शाळांतून विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जात होते. त्याचबरोबर ख्रिश्चन धर्मप्रसाराचेही काम होत असे. शैक्षणिक कार्यासह सामाजिक व आरोग्यविषयक कार्य होत असे. या सामाजिक कार्याला धर्मप्रसाराचा संदर्भ असे. ब्रिटिश अधिकारीही शाळा चालवित असत. या शाळांतून शैक्षणिक कार्य केले जाई. भारतीय लोकही आपल्या पातळीवर खाजगी शाळा चालवित असत. त्याचबरोबर भारतात जुन्या पारंपरिक पद्धतीच्या पाठशाळा होत्या. या शाळांतून धार्मिक व पारंपारिक शिक्षण दिले जात असे. उपरोक्त चार प्रकारच्या शाळांतून भारतामध्ये शिक्षण देण्याचे कार्य होत होते.

## १.२ भारतीय समाज सुधारकांचे शैक्षणिक कार्य :

शिक्षण हे प्रबोधनाचे व परिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे. समाजाला अज्ञानातून बाहेर काढण्यासाठी शिक्षण हे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे भारतीय जनतेला शिक्षण दिले पाहिजे, शिक्षणातूनच समाजाची प्रगती होऊ शकते असे भारतातील अनेक समाजसुधारकांना वाटत होते. यात राजाराममोहन रॉय यांनी ब्राम्हो समाजामार्फत कार्य केले. आर्य समाज व प्रार्थना समाजामार्फतही शैक्षणिक कार्य हाती घेण्यात आले. स्वामी विवेकानंदांनी कलकत्ता येथे रामकृष्ण मिशनची स्थापना १८९६ मध्ये केली. याद्वारे त्यांनी राष्ट्रीय शिक्षणाचा पाया घातला. भारतीय समाजाला अज्ञानातून बाहेर काढण्यासाठी शैक्षणिक काम उभारणे आवश्यक आहे ह्या चळवळीच्या धुरिणांना माहीत होते. त्यामुळेच त्यांनी शैक्षणिक कार्याकडे जाणीवपूर्वक लक्ष देऊन विविध संस्थांच्या माध्यमातून कामास प्रारंभ केला. शिक्षणाची कवाडे सर्व समाजाला खुली करून देणे हे आवश्यक आहे हे तत्कालीन समाजसुधारकांनी ओळखले होते. त्यावेळची सामाजिक परिस्थिती लक्षात घेता शिक्षणप्रसाराची भूमिका मांडणे हे सुद्धा अतिशय धाडसाचे होते. अशा काळात हजारो वर्षे चालत आलेल्या पारंपरिक व्यवस्थेला आव्हान देऊन शिक्षणाचा प्रसार करण्याची भूमिका घेणाऱ्या समाजसुधारकांच्या कार्याची महत्त्वपूर्णता आपल्या लक्षात येते.

या सर्व समाजसुधारकांमध्ये भारतातील विविध भागातील समाजसुधारकांचा समावेश होतो. महाराष्ट्रातही या काळात प्रबोधनाच्या चळवळी होत होत्या. विविध नियतकालिके व वृत्तपत्रांच्या माध्यमातून जनतेचे प्रबोधन केले जात होते. विविध संस्थांच्या माध्यमातून शिक्षण, समाजसुधारणा या क्षेत्रात प्रत्यक्ष काम केले जात होते. यामध्ये महात्मा फुले यांचे योगदान महत्त्वाचे आहे. १ जानेवारी १८४८ रोजी त्यांनी पुण्यात पहिली मुलींची शाळा काढली, १८५३ साली अस्पृश्यांसाठी शाळा सुरु केली. सन १८८२ ला हंटर आयोगासमोर त्यांनी साक्ष दिली. भारतीय शिक्षणव्यवस्थेतील

मूलगामी बदल करण्याबाबत भूमिका घेतली. ब्राम्हण पंतोजीऐवजी बहुजन समाजातील शिक्षकांची नियुक्ती करावी. अशा प्रकारच्या त्यांनी मागण्या केल्या. १२ वर्षापर्यंतच्या मुलांना प्राथमिक शिक्षण सक्तीचे असावे. ही सुद्धा मागणी हंटर आयोगासमोर केली. मुलींसाठी, अस्पृश्यांसाठी त्यांनी केलेले हे कार्य अतिशय महत्त्वाचे होते. धार्मिक व सामाजिक व्यवस्थेने शिक्षणापासून वंचित ठेवलेल्या या मोठ्या समूहासाठी शिक्षण उपलब्ध करून देण्याचा हा प्रयत्न अत्यंत क्रांतिकारी स्वरूपाचा होता. ज्या धर्मव्यवस्थेने दलित, स्त्रिया व उपेक्षित समूहाला शिक्षणाचा हक्क नाकारला होता त्या व्यवस्थेविरुद्ध सर्वच पातळ्यांवरचा संघर्ष करून महात्मा फुले एक मोठे सामाजिक बदलाचे काम केले. बहुजन समाजाच्या अप्रगतीचे मूळ कारण त्यांच्या अज्ञानातच आहे, अशी मांडणी करत बहुजनांच्या शैक्षणिक विकासासाठी त्यांनी खूप मोठे काम केले. पुणे शहर व परिसरात त्यांनी केलेल्या शैक्षणिक विकासाच्या प्रयत्नांना खूप महत्त्व आहे. आधुनिक भारताच्या इतिहासात महात्मा फुले यांचे शैक्षणिक कार्य दुर्लक्षून चालत नाही.[३]

महर्षी धोंडो केशव कर्वे यांनीही शिक्षणासंबंधी मोठे काम केले आहे. विशेषत: स्त्री शिक्षणाच्या संदर्भात त्यांचे योगदान अनन्यसाधारण आहे. ४ मार्च १९०७ रोजी त्यांनी हिंगणे येथे मुलींची शाळा काढली. त्यानंतर ३ जून १९१६ रोजी स्वतंत्र महिला विद्यापीठ स्थापन केले. महाराष्ट्राबाहेर १९०१ मध्ये रवींद्रनाथ टागोर यांनी शांतिनिकेतनची स्थापना केली. त्याचेच रूपांतर पुढे विश्वभारती या आंतरराष्ट्रीय विद्यापीठात झाले. या दरम्यान महाराष्ट्रातही वेगवेगळ्या ठिकाणी शैक्षणिक काम सुरूच होते. १ जानेवारी १९८० रोजी पुण्यात विष्णूशास्त्री चिपळूणकर, गोपाळ कृष्ण गोखले, बाळ गंगाधर टिळक यांनी 'डेक्कन एज्युकेशन सोसायटी' या संस्थेची स्थापना केली.[४]

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रात शैक्षणिक कार्याला मोठ्या प्रमाणावर सुरूवात झाली. विविध शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून शिक्षणाच्या प्रवाहातून बाजूला असलेल्यांसाठी काम सुरू झाले. भारतातील शैक्षणिक क्षेत्राच्या बदलांचा व विकासाचा आढावा घेत असताना महाराज सयाजीराव गायकवाड व कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक कार्याचा विचार करावाच लागतो. त्याचबरोबर राजर्षी शाहू महाराज यांच्याही क्रांतिकारी कार्याला विचारात घ्यावे लागते. सयाजीराव गायकवाड व शाहू महाराज यांनी आपल्या संस्थानात मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याचा कायदा केला. ज्या गावात शाळाबाह्य मुले असतील त्या गावातील तलाठी व तत्सम अधिकाऱ्यांना जबाबदार ठरवून त्यांना शिक्षा देण्याची भूमिका शाहू महाराजांनी घेतली होती. विविध जातीधर्मांच्या मुलांसाठी वसतिगृहांची स्थापना व एकूण बजेटपैकी ७% रक्कम शिक्षणावर खर्च

करण्याचा त्यांचा निर्णय अतिशय दूरगामी परिणाम करणारा होता. शाहू महाराज व सयाजीराव गायकवाड यांचे शिक्षणासंदर्भातील कार्य अतिशय महत्त्वाचे होते. कर्मवीर भाऊराव पाटील यांनीही १९०७ पासून शैक्षणिक कार्यास प्रारंभ केला होता. पुढे १९१९ मध्ये रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून महाराष्ट्रात भरीव असे शैक्षणिक काम केले. तथापी सन १७५७ मध्ये पुणे नगरपालिकेची स्थापना झाली. पुढील काळात नगरपालिकेने पुण्यातील गंजपेठ, घोरपडीपेठ, गुलटेकडी, भवानीपेठ व नानापेठ या पाच पेठांतून सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण सुरू केले.

## १.३ राष्ट्रीय शिक्षणाची पार्श्वभूमी :

सन १९०५ मध्ये लॉर्ड कर्झनने 'फोडा आणि राज्य करा' या नीतीचा अवलंब करून दोन धर्मात फूट पाडण्याचा प्रयत्न केला. हिंदू-मुस्लिमांमध्ये फूट पाडून आपला राजकीय फायदा करून घेण्याचे षडयंत्र कर्झनने केले. कर्झनच्या या धोरणाचा भारतीय जनतेने मोठ्या प्रमाणावर निषेध केला. जनमत प्रक्षुब्ध झाले. त्यातूनच वंगभंग या आंदोलनाची निर्मिती झाली. लोकमान्य टिळकांनी स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या चतु:सूत्रीचा वापर सुरू केला. अशा वातावरणातच कलकत्ता येथे २६ डिसेंबर १९०६ रोजी राष्ट्रीय सभेचे अधिवेशन दादाभाई नौरोजी यांच्या अध्यक्षतेखाली भरले. त्यावेळी दादाभाईंनी अध्यक्षपदावरून स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार आणि राष्ट्रीय शिक्षण या चतु:सूत्रीचा ठराव पास केला. या ठरावाने जुन्या आणि नव्या पिढीने एकत्र कार्य केले पाहिजे. या कार्यात राष्ट्रीय शिक्षणावर भर देण्याचा संदेश दिलेला होता.[५]

भारतीय स्वातंत्र्यलढ्यात या चतु:सूत्रीच्या ठरावाला विशेष महत्त्व आहे. 'प्रत्येकाने स्वदेशी वस्तू वापरावी, परदेशी मालावर बहिष्कार घालावा याबरोबरच राष्ट्रीय शिक्षणाचा समावेश करण्यात आला.'[६] तरूण मुलांना शिक्षण देण्याकरिता राष्ट्रीय शिक्षण शासकीय संस्थेत मिळत नाही. मातृभाषेला शिक्षणात महत्त्वाचे स्थान नाही. औद्योगिक शिक्षणाकडे सरकार दुर्लक्ष करते. त्यामुळे शिक्षण संपल्यावर ते विद्यार्थी पदवी घेऊन बाहेर पडतात. ते नि:सत्त्व होऊन शिक्षणाकडे दुर्लक्ष करतात. हे शिक्षण सर्जनशील नाही. पाश्चिमात्य देशांप्रमाणे यातून स्वावलंबनाची, स्वतंत्र विचारांची क्षमता प्राप्त होत नाही. केवळ सरकारच्या कारभारासाठी नोकरवर्ग निर्माण करण्यासाठी हे शिक्षण उपयुक्त ठरते. अशा प्रकारचा आक्षेप राजकीय नेत्यांनी घेतला. देशातील राजकीय असंतोषाचे कारण शिक्षण आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी लोकांनी आपल्या मुलांचे शिक्षण राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या शाळेतच केले पाहिजे. अशा प्रकारचा संदेश राष्ट्रीय सभेने लोकांना दिलेला होता.

## १.४ राष्ट्रीय शिक्षणाचा अर्थ :

भारतीय संस्कृती व प्राचीन मूल्यांवर आधारित असलेली शिक्षण प्रणाली म्हणजे 'राष्ट्रीय शिक्षण' होय. लोकमान्य टिळकांनी राष्ट्रीय शिक्षणाबाबत केलेल्या व्याख्या समजून घेणे आवश्यक ठरते. कारण त्यांनी केलेल्या व्याख्यांतून राष्ट्रीय शिक्षणाची संकल्पना नेमकेपणाने लक्षात येते. टिळकांनी केलेल्या राष्ट्रीय शिक्षणाच्या व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत.

१. आपण कोण आहोत? आपली स्थिती काय?पुढच्या पिढीने काय करावे? आपल्या देशाची कामगिरी काय? याबाबत राष्ट्रीय शिक्षण ओळख करून देते.

२. राष्ट्रीय शिक्षण हे राष्ट्राला काय पाहिजे? राष्ट्राची प्रतिष्ठा, संपत्ती तसेच राष्ट्राचे वैभव कसे वाढेल? राष्ट्राची छाप इतरांवर कशी पडेल? ते शिकवते.

३. राष्ट्रीय शिक्षण देश ओळखण्यास शिकविते.

४. 'मी राष्ट्रासाठी देखील मरण्यास तयार आहे.' ही देश प्रेमी विचारधारा राष्ट्रातील तरूणांमध्ये उत्पन्न झाली पाहिजे ही भावना ज्या शिक्षणामध्ये निर्माण होते ते शिक्षण म्हणजे 'राष्ट्रीय शिक्षण' होय.

५. राष्ट्राची सर्व बाजूंनी उन्नती करणारे आणि राष्ट्रीयत्वाची ओळख करून देणारे ते राष्ट्रीय शिक्षण होय. राष्ट्रीय मत बदलणे व राष्ट्रामधील लोकात राष्ट्रीय भावना उत्पन्न करणे हे शिक्षणाचे कार्य आहे. राष्ट्राबद्दल स्वदेशाबद्दल प्रेम उत्पन्न करणे म्हणजे हे राष्ट्रीय शिक्षण होय.

थोडक्यात लोकमान्य टिळकांचा राष्ट्रीय शिक्षणाबाबतचा दृष्टिकोन अतिशय व्यापक दूरदृष्टिचा प्रेरणा देणारा, बुद्धि सामर्थ्य वाढविणारा, वाङ्मय व इतिहासाचा अभ्यास करणारा,देशाला राजकीय, सामाजिक व औद्योगिकदृष्ट्या समर्थ करणारा होता.

## १.५ राष्ट्रीय शिक्षणाची वैशिष्ट्ये :

१. भारतीय शिक्षणपद्धतीवर संपूर्णपणे भारतीयांचे नियंत्रण असणे.

२. भारतीय शिक्षणातून देशप्रेमाची भावना निर्माण करणे.

३. भारतीय शिक्षणाद्वारे भारतीय परंपरा व संस्कृतीबद्दल अस्मिता जागृत करणे.

४. जीवन आणि शिक्षण यांचा परस्परसंबंध प्रस्थापित करून व्यावसायिक शिक्षणावर भर देणे.

५. भारतातील शिक्षणावर इंग्रजांचे वर्चस्व राहू नये. मातृभाषेतून शिक्षण द्यावे.

६. राष्ट्रीय अस्मिता जोपासणे.

७. भारतीयांच्या आवश्यकता पूर्ण करणारे शिक्षण हवे.

८. पाश्चिमात्य ज्ञानाची प्राप्ती करणे.

आपण पाश्चात्त्य, ज्ञानविज्ञानाकडे दुर्लक्ष करून फक्त भारतीय विद्येला प्रोत्साहन देत राहिलो तर तो आपला मूर्खपणा ठरेल म्हणून पाश्चात्त्य ज्ञानविज्ञानाचेही शिक्षण देण्यात यावे असा विचार लाला लजपतराय यांनी मांडला. राष्ट्रीय शिक्षणाचे प्रणेते म्हणून लोकमान्य टिळक, स्वामी विवेकानंद, पंडित मदनमोहन मालवीय, महात्मा गांधी, लाला लजपतराय, महात्मा ज्योतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज, महर्षी धोंडा केशव कर्वे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इ. महापुरुषांना ओळखले जाते.

## १.६ राष्ट्रीय शिक्षणाची सुरूवात :

राष्ट्रीय शिक्षणाच्या चळवळीमधील पहिला अविष्कार पुणे जिल्ह्यातील तळेगाव दाभाडे येथे उमटला. दिनांक १ जून १९०६ रोजी तळेगाव दाभाडे येथे समर्थ विद्यालय सुरू झाले. या विद्यालयाचे संस्थापक प्रो. विष्णु गोविंद विजापूरकर होते. त्यांच्या मते, '' विद्यार्थ्यांना केवळ नोकरीसाठी शिक्षण न देता त्यांना स्वतंत्र वृत्तीचे शिक्षण देऊन त्यांच्या माध्यमातून राष्ट्राची अधिकाधिक प्रगती कशी होईल याकडे अधिक लक्ष दिले पाहिजे.''[७] हे विद्यालय स्थापन करण्याचे प्रमुख तीन उद्देश होते.

१. शिक्षणात आपल्या मताप्रमाणे सुधारणा करण्यासाठी संस्था सरकारी नियंत्रणापासून दूर ठेवणे, मातृभाषेतून शिक्षण देणे.

२. बौद्धिक शिक्षणास, औद्योगिक शिक्षणाची जोड देणे, संस्थेतील विद्यार्थ्यांची वसतिगृहात राहण्याची सोय करून विद्यार्थ्यांना गुरू सानिध्याचा लाभ करून देणे.

३. विद्यार्थ्यांना आपल्या धार्मिक आचारांची व संस्कृतीची माहिती करून देऊन त्यांच्या मनात त्याबद्दल अभिमान निर्माण होईल असे शिक्षण देणे.

४. मुलांची शरीर प्रकृती सुदृढ व्हावी यासाठी सकस आहार व शारीरिक शिक्षणाची सोय करणे.

आपण आखलेले शिक्षणक्रम आपल्या पद्धतीने शिकवण्याकरता समर्थ विद्यालयाने क्रमिक पुस्तके तयार करण्याची योजना राबवून मराठी, बीजगणित, संस्कृत प्रवेश अशी पुस्तके प्रकाशित केली. त्याकाळी देशात राजकीय असंतोष वाढत असल्यामुळे राष्ट्रीय शिक्षण हे एक स्वातंत्र्य प्राप्तीचे साधन होय असे शिक्षक व पालकांना वाटत होते. नेमक्या याच कारणासाठी सरकारने राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या शाळा बेकायदेशीर ठरवून त्या बंद पाडल्या. यामागे सरकारचा स्वार्थ होता. राष्ट्रीय

शिक्षणातून भारतातील तरूण पिढीच्या मनात देशप्रेमाची जाणीव प्रखरपणे निर्माण होईल व त्यामुळे आपल्या सत्तेला धोका उत्पन्न होईल अशी सरकारची भूमिका होती. त्यामुळेच ब्रिटिश सरकारने राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या शाळा बंद पाडल्या. शाळा चालकांवर नोटिसा बजावून त्यातील काहीजणांना तुरुंगात टाकले. समर्थ विद्यालयाप्रमाणेच महाराष्ट्रात चिंचवड येथे अनाथ विद्यार्थीगृह पाठशाळा, सातारा येथील राष्ट्रीय पाठशाळा, येवले येथील टिळक विद्यालय, अमंळनेर येथील राष्ट्रीय विद्यालय, नागपूर येथील शिवाजी राष्ट्रीय पाठशाळा व टिळक राष्ट्रीय विद्यालय, यवतमाळ येथील राष्ट्रीय पाठशाळा, खिरोदा येथील राष्ट्रीय पाठशाळा, खामगाव येथील टिळक राष्ट्रीय पाठशाळा, रत्नागिरी येथील राष्ट्रीय पाठशाळा व पुण्यातील महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी अशा अनेक शैक्षणिक संस्थांनी राष्ट्रीय शिक्षण देण्यासाठी भरीव योगदान दिलेले आहे. यासर्व संस्थांचे संस्थाचालक हे राष्ट्रीय विचाराने भरावलेले होते.[८]

## १.७ पुणे शहरातील शिक्षणाच्या संदर्भातील ब्रिटीशांचे धोरण :

ब्रिटिशांचे धोरण येथील शिक्षणाच्या संदर्भात सकारात्मक होते हे शिक्षण विभागाने सार्वजनिक विभागाला दिलेल्या दिनांक २० मार्च १८७६ चे पत्र क्रमांक N. 196 CW – 531 of 1876 च्या पत्राव्दारे स्पष्ट होते. त्यानुसार पुण्यातील शाळांना सभागृह बांधण्यासाठी शिक्षण विभागाने ४७९ रू. आनुदान मंजुर केले व उरलेली सर्व रक्कम सार्वजनिक बांधकाम विभागाने मंजुर करून व ती रक्कम फर्निचर व ग्रंथालय यांच्या खर्चातून वर्ग करावी.[९]

दिनांक १३ डिसेंबर १८७६ च्या शिक्षण विभागाच्या आदेशानुसार पुण्यातील प्रादेशिक शाळांना किरकोळ व आयत्या वेळेच्या खर्चासाठी १०१७ रू. देण्याचे ठरले. पुणे शहरातील सन १८७६ - ७७ च्या स्थानिक अंदाजपत्रानुसार मुख्यध्यापक व शिक्षक मिळून वरील खर्च कसा करावयाचा हे ठरवायचे आहे. १०१७ रू. रक्कमेपैकी ६३५ रू. शिक्षण विभाग मंजुर करणार व ४३२ रू. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून वर्ग करावे.[१०] वरील दोन्ही संदर्भावरून असे दिसून येते की, शैक्षणिक दृष्ट्या शाळांना आर्थिक कमतरता पडू नये ह्याची दक्षता ब्रिटीश सरकार घेत होते. याचाच अर्थ असा होतो की ब्रिटीश साकार पुण्यातील शिक्षणाविषयी सकारात्मक होते.

## १.८ विषय निवडीमागची पार्श्वभूमी :

प्रस्तुत विषय संशोधनासाठी निवडण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीला १५० वर्षे पूर्ण झाली असून ही संस्था महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्राला नवा आयाम देणारी

आहे. प्रस्तुत संस्थेचे कार्यही महत्त्वपूर्ण आहे. समाजसेवेची व उदरनिर्वाहाची सांगड घालत एक खाजगी शिकवणी वर्ग सुरू होता. या शिकवणीच्या वर्गाची एक विशाल संस्था 'महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी' या नावाने उभी राहते ही गोष्ट अतिशय महत्त्वाची आहे. त्याचप्रमाणे अभ्यासकांनाही अभ्यास करण्यास प्रवृत्त करणारी आहे. सामाजिक भावनेतून निर्माण झालेली ही संस्था पुण्याच्या आणि महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्रातील महत्त्वपूर्ण शिक्षण संस्था आहे. सातत्याने समाजहिताची भूमिका घेऊन वाटचाल करणाऱ्या या संस्थेतून शिकलेले विद्यार्थी उच्चस्थानापर्यंत पोहचले आहेत. अनेक विद्यार्थी उच्चपदावरून निवृत्त झालेले आहे. देशातील ज्ञान, विज्ञानाबरोबर सामाजिक, राजकीय साहित्यिक सांस्कृतिक क्षेत्रात संस्थेच्या विद्यार्थ्यांनी मोठे योगदान दिले आहे. देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योतर काळातील सामाजिक चळवळीत संस्थेच्या विद्यार्थ्यांचे योगदान मोठे आहे. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचा महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्रावर एक मोठा प्रभाव आहे.

संस्थेची ध्येयधोरणे, उद्दिष्टे, संस्थेची तत्त्वे, संस्थेची कार्यपद्धती व संस्थेच्या संस्थापकांची दूरदृष्टी व संस्थेचे त्या त्या काळी योग्य व कुशल व्यवस्थापन करणाऱ्या संचालकांचा दृष्टिकोन या सर्व बाबींचा अभ्यास करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे प्रस्तुत संस्था विकासात क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांचा या संस्थेशी संबंध तपासण्याची आवश्यकता आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात तरूणांच्या मनावर स्वातंत्र्यप्रेमाचे धडे या संस्थेच्या माध्यमातून बिंबवण्यात आले आहेत. या तरूणांच्या समर्पित जीवनवृत्तीच्या त्यागाचा समाजाला, देशाला कशा प्रकारे उपयोग झाला आहे याची माहिती मिळविणे हे सुद्धा आवश्यक आहे. या दृष्टिनेही अभ्यास व्हावा यासाठी या विषयाच्या निवडीचा विचार करण्यात आला आहे.

'महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी' ही नावाजलेली व पुण्याच्या शैक्षणिक वर्तुळातील महत्त्वाची संस्था आहे. महाराष्ट्राच्या आणि देशाच्या शैक्षणिक क्षेत्रात स्वतंत्र छाप पाडणारी संस्था आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीत समाजातील सर्व स्तरातील विद्यार्थी शिक्षण घेत होते का? उच्चवर्णीय समाज सोडून समाजातील तळागाळातील लोकांसाठी काही उपक्रम राबविले आहेत का? याची माहितीही आवश्यक आहे. त्यादृष्टिने अभ्यास करणेही महत्त्वाचे आहे. १५० वर्षे पूर्ण झालेल्या राज्याच्या शिक्षणक्षेत्रात स्वतंत्र प्रतिमा असलेल्या या संस्थेच्या कार्याचा आढावा घेऊन त्यातील बारकावे तपासण्याची आवश्यकता आहे. या संस्थेच्या अनुषंगाने संशोधन होणे आवश्यकच

आहे त्या दृष्टिने संस्थांच्या कार्याचा मागोवा घेण्याची आवश्यकता आहे. उपरोक्त बाबी लक्षात घेऊन प्रस्तुत विषय संशोधनासाठी निवडलेला आहे.

## १.९ पूर्व संशोधनाचा आढावा :

प्रस्तुत विषयावर आजपर्यंत कोणीही संशोधन केलेले नाही. इतर शैक्षणिक संस्थेच्या बाबतीत काही संशोधने झालेली आहेत. उदा. पी. जी. देवरे आणि कल्पना पाटील या अभ्यासकांनी 'मराठा विद्याप्रसारक समाजाने केलेली प्रगती' या विषयावर अभ्यास केला आहे. प्रस्तुत संशोधकाने यापूर्वी 'पुणे विद्यार्थी गृहाने केलेल्या शैक्षणिक प्रगतीची वाटचाल' या विषयावर संशोधन केले आहे तर डॉ. स्वाती काळभोर यांनी एम. फील पदवीसाठी 'सेवासदन संस्थेचे स्त्रीशिक्षणातील योगदान' या विषयावर संशोधन केले आहे. या अभ्यासकांचा अभ्यास डोळ्यासमोर ठेवून प्रस्तुत विषयाचा अभ्यास करण्यात येणार आहे. 'महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी' या संस्थेची स्थापना खाजगी शिकवणीतून झालेली असली तरी या संस्थेचा व्याप नंतरच्या काळात खूप मोठा झाला. संस्थेचा विस्तार झाला. स्वातंत्र्य आंदोलन सामाजिक चळवळीतील योगदान खूप महत्त्वाचे आहे. संस्थेचे वार्षिक अहवाल दस्तऐवज, मिनिट्स, संस्थेची घटना, स्मरणिका, काही मूळ कागदपत्रे, संस्थेच्या संदर्भातील तत्कालीन वृत्तपत्रातील लेखन या विषयाच्या संदर्भात उपलब्ध आहे.

सामाजिक बांधिलकी जोपासत, सामाजिक सेवा व्रतस्थपणे अंगीकारत संस्थेने आपली १५० वर्षांची वाटचाल योग्य रीतीने प्रवाहित केली आहे. या वाटचालीमध्ये काळाला अनुसरून संस्थेने अनेक शैक्षणिक महत्त्वपूर्ण असे बदल केले. या बदलांचा उपयोग जसा विद्यार्थ्यांना झाला त्याच प्रकारे राष्ट्र उभारणीमध्ये हे बदल महत्त्वाचे ठरले आहे.

'महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी' एक आदर्श शैक्षणिक संस्था म्हणून नावारूपास आली. कारण संस्थेने शिक्षणासोबत विद्यार्थ्यांवर सामाजिक समतोल राखणारी एकतेचे, राष्ट्रीयतेचे, स्वातंत्र्य, समता, बंधुतेचे संस्कार केले आहेत. या संस्थेच्या माध्यमातून अनेक सामाजिक जाणिवा जागृत झाल्या आहेत. दुष्काळग्रस्तांसाठी मदत, भूकंपग्रस्तांचे पुनर्वसन, गरीब विद्यार्थी दत्तक योजना अशा अनेक योजना संस्थेने आपली बांधिलकी जोपासली आहे. विद्यार्थ्यांना पर्यावरण पूरक जीवन जगण्यासाठी सवय लागावी म्हणून संस्थेने शालेय पातळीवर मोठे प्रयत्न केले आहे. यामध्ये प्लॅस्टिकचा पुनर्वापर कापडी वस्तूंचा वापर, टाकाऊ पासून टिकाऊ, नैसर्गिक रंगाची निर्मिती, रसायन विरहित शेती इ. उपक्रम राबवले याचा मोठा फायदा आज समाजाला झाला आहे.

संस्कारित पिढी घडवण्याचे ध्येय संस्थेने अंगीकारल्यामुळे जातीय सलोखा, सामाजिक ऐक्य, राष्ट्रीय बांधिलकी, समाजसेवा या घटकांचा परीस्पर्श झाल्यामुळे संस्थेच्या विद्यार्थ्यांच्या माध्यमातून एक आदर्श एकसंघ समाज निर्माण करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केलेला आहे.

'महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी'मध्ये आजपर्यंत अनेक विद्यार्थ्यांनी शिक्षण घेतले आहे. या विद्यार्थ्यांना माजी विद्यार्थी संघटनेच्या माध्यमातून व्यापक व्यासपीठ निर्माण करून दिले पाहिजे. तसेच या विद्यार्थ्यांचा उपयोग नैसर्गिक आपत्ती सारख्या ठिकाणी करता येऊ शकेल. त्यासाठी म.ए.सो. या संस्थेने पुढाकार घेतला. 'महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी'च्या शैक्षणिक संकुलामध्ये आपल्याला शिक्षण घेता यावे अशी अनेकांची इच्छा असते. परंतु मर्यादित प्रवेश संख्येमुळे अनेकांना या संस्थेत शिक्षण घेता येत नाही तरीदेखील अशा विद्यार्थ्यांना संस्थेबद्दल आदर असतो. या विद्यार्थ्यांना शैक्षणिक अभ्यासक्रमास प्रवेश न देताही म.ए.सो. परिवारात सहभागी करून घेण्यासाठी संस्थेचे वृत्तपत्र, पाक्षिक, त्रैमासिक किंवा विद्यापीठाच्या धर्तीवर एखादे आकाशवाणी केंद्र सुरू करण्याचे प्रयत्न आहेत. खेळ, कला, क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमांच्या स्पर्धा आयोजित करून संस्थेने विद्यार्थ्यांना संधी निर्माण करून दिली.

## १.१० संशोधनाचे शीर्षक व संशोधनाची गृहीतके :

संशोधनाचा विषय : ''पुण्यातील शैक्षणिक विकासात महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे योगदान'' हा आहे. तर त्याचा गृहीतके पुढील आहेत.

१. पुणे शहरात शैक्षणिक संस्थांचा विकास झालेला आहे.

२. पुण्यातील शैक्षणिक संस्थांनी महाराष्ट्र व देशाच्या विकासात महत्त्वाचे योगदान दिले आहे.

३. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी ही पुण्यातील महत्त्वाची शिक्षणसंस्था आहे.

४. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने बदलत्या परिस्थितीला अनुसरून व्यावसायिक शिक्षण सुरू केले आहे.

५. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात भरीव योगदान दिले आहे.

६. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी या संस्थेचे व संस्थेच्या माजी विद्यार्थ्यांचे देशाच्या जडणघडणीत मोठे योगदान आहे.

७. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी या संस्थेत शिक्षण घेऊन अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या बुध्दिचा वापर पुन्हा या संस्थेच्या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी केलेला आहे.

## १.११ संशोधनाची उद्दिष्टे :

१. पुण्यामध्ये झालेल्या शैक्षणिक विकासाचा आढावा घेणे.

२. सर्व जाती धर्माच्या लोकांच्या शैक्षणिक विकासासाठी स्थापन झालेल्या इतर शैक्षणिक संस्थांचा आढावा घेणे.

३. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी या संस्थेच्या स्थापनेचा हेतू जाणून घेणे.

४. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी या संस्थेची उद्दिष्टे अभ्यासणे.

५. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या वाटचालीची व कार्यपद्धतीची माहिती घेणे.

६. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या विद्यालयांचे मूल्यमापन करणे.

७. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या विकासाचे समीक्षण करणे.

## १.१२ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :

प्रस्तुत संशोधनाच्या व्याप्तीमध्ये पुणे शहरातील शैक्षणिक संस्थांचा आढावा घेण्यात येणार आहे. 'महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी' या संस्थेच्या अंतर्गत पूर्व प्राथमिक ते उच्च माध्यमिक इंग्रजी व मराठी माध्यमांतील सर्व शाखांमधील शाळा, पदवी व पदव्युत्तर सर्व शाखांचे महाविद्यालये, व्यावसायिक शिक्षण देणारी पदवी व पदव्युत्तर महाविद्यालये, कम्युनिटी कॉलेज, व्यक्तिमत्त्व विकास केंद्रे, करिअर एक्सलंस वसतिगृहे, शिक्षण प्रबोधिनी या सर्व विभागांचा समावेश होणार आहे. इ.स. १८६० ते २०१० या कालावधीपर्यंत संशोधनाची व्याप्ती राहणार आहे.

प्रस्तुत संशोधनाची मर्यादा म्हणजे या संशोधन विषयाशी संबंधीत लिखाण झालेली नाही. त्यामुळे संशोधनासाठी केवळ संस्थेमधील प्रकाशित व अप्रकाशित साहित्य अभ्यासण्यात आले.

प्रस्तुत संशोधनासाठी वापरलेली पद्धत:

१. संदर्भ साहित्य व ग्रंथ अभ्यासणे.

२. या साहित्यामधून अन्वयार्थ लावणे.

## १.१३ सर्वेक्षण पद्धत :

वर्तमान अवस्था, सद्यस्थिती, भूतकाळातील प्रगती यांच्या अभ्यासासाठी जी पद्धती वापरली जाते ती सर्वेक्षण पद्धती होय. प्रचलित पद्धतीत दृष्टिकोन वाटचाल, परिणाम याचा अभ्यास होतो. प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण पद्धती वापरण्यात येणार असून तिच्या अंतर्गत मुलाखती, पद्धती व प्रश्नावली पद्धतीचा समावेश करण्यात येणार आहे. कारण या पद्धतीचा प्रामुख्याने वापर

भूतकाळातील इतिहास जाणून घेण्यासाठी व वर्तमानकाळातील सद्यस्थितीचा अभ्यास करण्यासाठी केला जातो. प्रचलित पद्धत, दृष्टिकोन, वाटचाल यांचाही अभ्यास या पद्धतीत होतो.

प्रश्नावली पद्धतीत संशोधकाला कमी वेळेत, कमी खर्चात जास्त व्यक्तिंची मने विचार, समस्या जाणून घेता येतात.

मुलाखत पद्धतीत मर्यादित किंवा महत्त्वाच्या व्यक्तिंची मते अनुभव, भावना, विचार प्रत्यक्षपणे जाणून घेता येतात.

## १.१४ प्रबंधांचा आराखडा :

**प्रस्तुत शोध प्रबंधासाठी प्रकरण निहाय आराखडा खालीलप्रमाणे :**

**प्रकरण पहिले - प्रस्तावना**

सदर प्रकरणामध्ये स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील महाराष्ट्राच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेऊन समाजसुधारकांच्या शैक्षणिक कार्याचा मागोवा घेण्यात येणार आहे. तसेच राष्ट्रीय शिक्षणाची पार्श्वभूमी, राष्ट्रीय शिक्षणाचा अर्थ, राष्ट्रीय शिक्षणाचे वैशिष्ट्य, राष्ट्रीय शिक्षणाची सुरूवात व महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीची स्थापना यासह संशोधनाची गृहीतके, उद्दिष्टे, व्याप्ती, मर्यादा, हेतू, शीर्षक, संशोधन पद्धती इत्सदींवर मांडणी प्रस्तुत करण्यात येणार आहे.

**प्रकरण दुसरे - पुण्यातील शैक्षणिक संस्थेचा विकास**

या प्रकरणातील पुणे शहरातील  शैक्षणिक संस्थांची माहिती, त्यांचा विकास वाटचाल याची माहिती देण्यात येणार आहे. स्त्रिया, अल्पसंख्यांक, मूकबधीर व बहुजन समाजाच्या विकासासाठी शैक्षणिक कार्य करणाऱ्या शैक्षणिक संस्थांचे कार्यात्मक पैलू पडताळून पाहण्यात येणार आहे. तसेच पुणे शहरातील शैक्षणिक कार्यक्रमामध्ये त्यांचे योगदान अभ्यासणार आहोत.

**प्रकरण तिसरे - महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी या शिक्षण संस्थेची वाटचाल**

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी ही संस्था स्थापन करण्यामागची पार्श्वभूमी, भूमिका, हेतू, संस्थेची उद्दीष्टे, यांची माहिती या प्रकरणात घेण्यात येणार आहे. तसेच संस्थेच्या  विस्ताराची माहिती घेऊन संस्थेच्या विकासाचे विविध टप्पे अभ्यासण्यात येणार आहे.

**प्रकरण चौथे - महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या पूर्व प्राथमिक ते माध्यमिक विद्यालयांची वाटचाल**

प्रस्तुत प्रकरणात महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या १८६० ते २०१० पर्यंत स्थापन झालेल्या पूर्व प्राथमिक ते माध्यमिक विद्यालयांची वाटचाल अभ्यासण्यात येणार आहे. म्हणजे या प्रकरणात महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी मुलांचे विद्यालय १८६० ते महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी

पूर्व प्राथमिक शाळा सावेडी २००५ या दरम्यानच्या विद्यालयांची स्थापना त्याचा समाजाला झालेला फायदा, हेतू, याचा तपशील प्रस्तुत प्रकरणात मांडण्यात येणार आहे.

**प्रकरण पाचवे - उच्च माध्यमिक, पदवी, पदव्युत्तर महाविद्यालय व व्यावसायिक महाविद्यालय**

प्रस्तुत प्रकरणात महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या उच्च माध्यमिक विद्यालयांच्या स्थापनेचे उद्देश, पदवी, पदव्युत्तर महाविद्यालय व व्यावसायिक महाविद्यालय या सर्वांद्वारे शैक्षणिक प्रगती, त्यांचे समाज बांधणी मधील योगदान इ. लेखाजोखा मांडण्यात येणार आहे.

**प्रकरण सहावे - महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे उल्लेखनीय उपक्रम व योगदान**

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने कोणकोणते सामाजिक उपक्रम राबवले, शिक्षणासोबत क्रीडा, वसतिगृह, करीअर, एक्सलन्स इ. उपक्रमांची माहिती प्रस्तुत प्रकरणात घेण्यात येणार आहे. तसेच माजी विद्यार्थ्यांचा देशाला व समाजाला कोणता उपयोग झाला याची माहिती प्रस्तुत प्रकरणात घेण्यात येणार आहे.

**प्रकरण सातवे - उपसंहार**

संशोधकाने प्रस्तुत विषयाचे संशोधन पूर्ण केल्यानंतर प्रस्तुत शोधनावरून संशोधक उपसंहार मांडणार आहे व काही शिफारशी देखील सुचवणार आहे.

## संदर्भ आणि टिपा


१. कोठेकर, डॉ. शांता, **इतिहास : तंत्र आणि तत्त्वज्ञान**, नागपूर, २००५, पृ. २.

२. शेख गफूर, **आधुनिक भारताचा इतिहास**, अरूण प्रकाशन, नांदेड, २००७, पृ. ९७.

३. कित्ता, पृ. १२०.

४. जाधव मोहन, **भारतीय शिक्षणाचा विकास**, मुद्रक- जयभारत, २००१, पृ. १२०.

५. जावडेकर, आचार्य शं. द., **आधुनिक भारत**, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९७९, पृ. २९५.

६. जोशी तर्कतार्थ लक्ष्मणशास्त्री (संपा.), **मराठी विश्वकोश**, खंड १२, महाराष्ट्र राज्य साहित्य मंडळ, मुंबई, १९८५, पृ. २४१.

७. फडतरे भूषण गोविंद, **भारतीय स्वातंत्र्यलढ्यात पुणे जिल्ह्याचे योगदान** (इ. स. १९२० - १९४७), डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २०१३, पृ. ३९.

८. पाटील गंगाधर, **भारतीय शिक्षणाचा इतिहास व समस्या**, स्वरूप प्रकाशन, पुणे, १९९९, पृ. १४३.

9. Mumbai Archives, **Education Department**, Volum No. 22, 1876, p. M.121.

10. कित्ता, p. M.307.


***************

## प्रकरण २

# पुण्यातील शैक्षणिक संस्थांचा विकास

२.१ पुण्यातील शैक्षणिक संस्थांच्या स्थापनेपूर्वीची पार्श्वभूमी :

२.१.१ शिक्षण प्रसारक मंडळी (१८८०) :

२.१.२ डेक्कन एज्युकेशन सोसायटी (१८८४) :

२.१.३ महाराष्ट्र गर्ल्स एज्युकेशन सोसायटी (१८८४) :

२.१.४ महाराष्ट्र गर्ल्स एज्युकेशन सोसायटी (१८८४) :

२.१.५ शारदा सदन (१८८९) :

२.१.६ अनाथ बालिकाश्रम (१८९९) :

२.१.७ अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद (१९०७) :

२.१.८ दी डिप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटी ऑफ इंडिया (१९०८) :

२.१.९ पुणे सेवासदन सोसायटी (१९०९) :

२.१.१० पुणे विद्यार्थी गृह (१९०९) :

२.१.११ श्री शिवाजी मराठा सोसायटी पुणे (१९१८) :

२.१.१२ दी ऑल इंडिया शिवाजी मेमोरिअल सोसायटी (१९२१) :

२.१.१३ टिळक महाराष्ट्र विद्यापीठ (१९२१) :

२.१.१४ विद्या प्रसारिणी सभा (१९२२) :

२.१.१५ रास्तापेठ एज्युकेशन सोसायटी (१९२७) :

२.१.१६ मॉडर्न एज्युकेशन सोसायटी (१९३२) :

२.१.१७ प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी (१९३४) :

२.१.१८ न्यू एज्युकेशन सोसायटी (१९३४) :

२.१.१९ पुणे विद्यापीठ (१९४९) :

२.१.२० भारती विद्यापीठ (१९६४) :

२.१.२१ एम. आय. टी (महाराष्ट्र इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी ) (१९८३) :

२.१.२२ बी. जे. मेडिकल कॉलेज :

२.१.२३ हरिजन विद्यार्थी सहायक मंडळ :

२.१.२४ लक्ष्मणराव आपटे प्रशाला :

२.१.२५ हुतात्मा राजगुरु विद्यालय :

२.१.२६ शेतकी महाविद्यालय :

**प्रस्तावना :**

पुणे शहराला शिक्षणाच्या दृष्टीने अत्यंत सशक्त परंपरा लाभली आहे. पुणे हे विद्येचे माहेरघर, महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी म्हणून भारतातच नव्हे तर जगात ओळखले जाते. कारण येथील आगरकर, चिपळूणकर, रानडे, गोखले, टिळक असे विद्‌वान येथे होऊन गेलेले आहेत. त्यांच्या बौध्दिक कार्यामुळेच भारताच्या पश्चिमेकडील बौध्दिक राजधानी म्हणून पुणे शहराचा उल्लेख केला जातो. अनेक परकीय अभ्यासकांनी पुणे शहरातील शिक्षणाबद्दल गौरवपूर्ण उद्‌गार काढले आहेत. त्याचे उदाहरण म्हणजे, इंग्लंडच्या ऑक्सफर्ड विद्यापीठाचे संस्कृत विभागाचे प्रमुख प्रा. गोत्ब्रीच हे संस्कृतचा अभ्यास करण्यासाठी काही वर्षे पुण्यात राहिलेले होते. 'पुणे हे जसे एक औद्योगिक शहर आहे. तसेच ते जुन्या अध्ययन परंपरेचे ते एक केंद्र आहे. म्हणूनच आम्ही पुण्याला ऑक्सफर्ड केंब्रिजच समजतो.'[१] पुणे शहराच्या विकासातील महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या योगदानाचा अभ्यास करीत असताना पुण्यातील इतर शैक्षणिक संस्थांचा विकास व त्यांची वाटचाल यांचा मागोवा घेणे आवश्यक आहे. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी ही पुण्यातील ख्यातकीर्त व महत्त्वाची शिक्षण संस्था आहे. त्याच बरोबरीने पुण्यामध्ये इतरही शिक्षण संस्था आहेत की त्यांच्या माध्यमातूनही शैक्षणिक क्षेत्रात भरीव काम उभे राहिले आहे. अशा महत्त्वाच्या संस्थांच्या विकासाची वाटचाल समजून घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत प्रकरणात करण्यात आला आहे.

एकोणिसाव्या शतकापासूनच पुण्यात शैक्षणिक कार्याला प्रारंभ झाल्याचे दिसून येते. संपूर्ण देशपातळीवर विचार करता पुण्याची शैक्षणिक कार्यातील वाटचाल ही प्रभावी व राष्ट्रीय पातळीवर दखल घेण्यायोग्य ठरली आहे. महात्मा ज्योतीराव फुले व सावित्रीबाई फुले यांनी केलेले शैक्षणिक कार्य हे ऐतिहासिक व क्रांतिकारी स्वरुपाचेच होते. तेव्हापासूनची ही परंपरा अधिकाधिक समृद्ध करण्याचे काम, पुणे शहरातील शिक्षण संस्थांनी केले आहे. वर्तमानकाळाचा विचार करता पुण्यामध्ये विविध ज्ञानशाखांचे शिक्षण देणाऱ्या संस्था आहेत. त्यामुळे पुणे शहराचा संपूर्ण देशात शिक्षण क्षेत्रात एक लौकिक निर्माण झाला आहे. केवळ महाराष्ट्र राज्यातूनच नव्हे तर संपूर्ण देशातून आणि परदेशातूनही पुण्यात मोठ्या संख्येने विद्यार्थी येत आहेत. पुण्यातील शिक्षण संस्थांनी घेतलेल्या भूमिकांमुळे आणि केलेल्या कार्यामुळे पुण्याची शैक्षणिक परंपरा वाढीस लागली आहे. पुण्यातील शिक्षणसंस्थांनी केलेले काम निश्चितच महत्त्वाचे आहे.

पुण्यातील शैक्षणिक संस्थांचा विकास या अनुषंगाने विचार करताना पुण्यात महत्त्वाच्या असणाऱ्या संस्थांचा विकासात्मक आढावा घेणे आवश्यक आहे. अशा संस्थांमध्ये मुख्यत्त्वेकरून

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीसह श्री शिवाजी मराठा सोसायटी, महाराष्ट्र गर्ल्स एज्युकेशन सोसायटी, कँप एज्युकेशन सोसायटी, पूना कॉलेज, डेक्कन कॉलेज, मॉडर्न एज्युकेशन सोसायटी, शिक्षण प्रसारक मंडळी डेक्कन एज्युकेशन सोसायटी, शारदासदन, महिला विद्यापीठ, रयत शिक्षण संस्था यांचा समावेश होतो. उपरोक्त संस्थांनी पुण्याच्या शैक्षणिक विकासात मोलाची भूमिका बजावली आहे. यामध्ये बहुजन समाजाच्या शैक्षणिक विकासासाठी या संस्थांनी योगदान दिले आहे. स्त्रियांच्या विकासासाठी, अल्पसंख्यांक समाजाच्या विकासासाठी कार्य करून या संस्थांनी शिक्षण क्षेत्रात आपला ठसा उमटविला आहे.

पुणे शहरातील अशा महत्त्वाच्या शैक्षणिक संस्थांची माहिती या प्रकरणात मांडण्यात येणार असून त्यांच्या शैक्षणिक कार्याचा आढावा घेण्यात येणार आहे.

## २.१ पुण्यातील शैक्षणिक संस्थांच्या स्थापनेपूर्वीची पार्श्वभूमी :

मध्ययुगीन कालावधीमध्ये शिक्षण हे केवळ उच्चवर्णीयांना घेता येत होते. त्यामध्ये पुरूष अग्रेसर होते पण स्त्रिया मात्र वंचित होत्या. ब्रिटिशांच्या आगमनाने भारतीयांमध्ये आधुनिक विचारांची सुरुवात झाली व शिक्षणाविषयी लोकांच्या मनात आस्था निर्माण झाली. परंतु या आधीच्या कालखंडात महिलांसह अस्पृश्यांनी शिक्षण घेणे हा गुन्हा आहे असे समजले जात होते. ज्या ज्या जातींना शिक्षणाचा हक्क होता त्यांना देखील चाकोरीबध्द शिक्षण दिले जात असे. पुणे शहराचा विचार करता पुण्यामध्ये ब्राह्मण ही जात शिक्षणामध्ये आघाडीवर होती. त्यासोबत सरदार सरंजामदार यांच्या कुटुंबातील मुलांना शिक्षण घेता येत असे. या कालावधीमध्ये शिकवले जाणारे विषयदेखील वैशिष्ट्यपूर्ण असत. अक्षरलेखन, वाचन, धार्मिक ग्रंथांचे अध्ययन, ज्योतिषशास्त्र, युद्धनीती, गणित, तत्त्वज्ञान यांसारखे शिक्षण शिक्षणकेंद्रांमधून दिले जात असे.

ब्रिटिशांच्या आगमनाने भारतीय शैक्षणिक क्षेत्रात जसे महत्त्वपूर्ण बदल झाले तसेच बदल पुणे शहराचा विचार करता झाल्याचे आपल्या निदर्शनास येते. ब्रिटिशांच्या उदारमतवादी धोरणाचा परिणाम पुणे शहरातील शैक्षणिक वातावरणावर झाला. सर्व जाती धर्माच्या लोकांना शिक्षण दिले जावे अशी मागणी सर्व समाजघटकांतून जोर धरु लागली. अर्थात या शैक्षणिक वातावरणनिर्मितीला समर्थकांचा पाठिंबा होता. तसा विरोधकांचा आवाजही यामागे होता हे प्रामुख्याने लक्षात घेतले पाहिजे. एकंदरीत या पार्श्वभूमीवर अनेक शैक्षणिक संस्थांची स्थापना पुण्यामध्ये होऊ लागली. समाजविकासासह राष्ट्र उन्नतीसाठी या संस्थांनी स्वत:ला वाहून घेतले. परंतु त्या अगोदर देखील

वेद, पुराण, स्मृती अध्ययन करणाऱ्या, धार्मिक शिक्षण देणाऱ्या अनेक केंद्रांमधून ही शिक्षण व्यवस्था सुरु केल्याचे आपणास दिसते.

### २.१.१ शिक्षण प्रसारक मंडळी (१८८०) :

शिक्षण प्रसारक मंडळी पुण्यातील अत्यंत महत्त्वाची व ख्यातकीर्त शिक्षणसंस्था आहे. न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना सन १८८० साली झाली. यानंतर तीन वर्षांनी म्हणजे १ जानेवारी १८८३ रोजी शिक्षण प्रसारक मंडळीच्या 'नूतन मराठी विद्यालयाची' स्थापना करण्यात आली. विष्णूशास्त्री चिपळूणकर यांचे स्मारक म्हणूनच ही शाळा निघाली.[२]

विष्णूशास्त्री चिपळूणकरांनी 'निबंधमाले'च्या माध्यमातून राष्ट्रीय विचारांच्या जाणिवा निर्माण करण्याचे काम हाती घेतले होते. सन १८८५ साली निबंधमालेची सुरुवात झाली असली तरी चिपळूणकरांनी विचारप्रसाराचे काम आधीपासूनच सुरु केले होते. न्यू इंग्लिश स्कूल हा त्याचाच एक भाग होता. त्यांच्या विचारांचा त्यावेळच्या तरुण पिढीवर मोठा परिणाम झाला होता. शिक्षण प्रसारक मंडळीचे संस्थापक रा. गो. देव, दा. सं. करंबळेकर, रा. भि. कुलकर्णी, कृ. ब. डोंगरे यांच्यावरही चिपळूणकरांच्या विचारांचा प्रभाव पडला. हे चौघेही ट्रेनिंग कॉलेजचे विद्यार्थी होते. सरकारी नोकरी न करता देशसेवा करायची असे त्यांनी ठरविले होते. या विचारातूनच त्यांनी नूतन मराठी विद्यालयाची स्थापना केली. 'स्वावलंबन करुन लोकांना आवडेल असे कायद्याचे शिक्षण मुलांना देऊन देशसेवेचा एक अल्पसा भार यथाशक्ती वाहण्याचा हेतू' या संस्थापकांच्या मनात होता.[३]

नूतन मराठी विद्यालयाच्या स्थापनेनंतर संस्थेला स्थिर रुप देण्यासाठी एक मंडळी स्थापन करण्यात आली. मराठी पाया भक्कम करण्यासाठी हे नूतन मराठी विद्यालय काढण्याचे मुख्य उद्दिष्ट होते. त्यामुळे मंडळीचे नाव 'मराठी शिक्षण प्रसारक मंडळी' असे ठेवण्यात आले. परंतु पुढे या मंडळीच्या वतीने महाविद्यालय काढण्याचा विचार पुढे आला. म्हणून 'मराठी शिक्षण प्रसारक मंडळी' या नावातील 'मराठी' हा शब्द काढून 'शिक्षण प्रसारक मंडळी' हे नाव कायम करण्यात आले. १९१६ साली मंडळीने 'न्यू पूना कॉलेज' स्थापन केले. हे कॉलेज म्हणजे आताचे सर परशूरामभाऊ कॉलेज होय. त्याचबरोबर टिळक प्रशिक्षण महाविद्यालय, विविध माध्यमिक, प्राथमिक व शिशुशाळा यांचा मोठ्या प्रमाणावर विस्तार केला. पुण्यासह पुण्याबाहेरही संस्थेचा विस्तार करण्यात आला.

राष्ट्रीय शिक्षणाच्या दृष्टीने स्थापन करण्यात आलेली व पुण्यासह बाहेरही विस्तारित झालेली ध्येयवादातून निर्माण झालेली एक अग्रणी शिक्षण संस्था म्हणून शिक्षण प्रसारक मंडळीचा उल्लेख करणे आवश्यक आहे.

## २.१.२ डेक्कन एज्युकेशन सोसायटी (१८८४) :

ज्या काळात राष्ट्रीय शिक्षणाची अवश्यकता होती, त्या काळात पुण्यासह संपूर्ण देशातील शिक्षण प्रसाराच्या प्रारंभीच्या काळात पुण्यामध्ये काही महत्त्वाच्या शिक्षण संस्था स्थापन झाल्या. त्यामध्ये डेक्कन एज्युकेशन सोसायटीचा समावेश होतो. राष्ट्रीय शिक्षणाच्या विचाराने या संस्थेची स्थापना झाली. प्रथम शाळेची स्थापना आणि नंतर शिक्षणसंस्थेची स्थापना असे या संस्थेच्या बाबतीत घडले आहे.

दिनांक १ जानेवारी १८८० रोजी बाळ गंगाधर टिळक, गोपाळ गणेश आगरकर आणि महादेव बल्लाळ नामजोशी यांच्या सहकार्याने विष्णूशास्त्री चिपळूणकर यांनी 'न्यू इंग्लिश स्कूल' सुरु केले. शाळेच्या स्थापनेनंतर चार वर्षांनी म्हणजे इ. स. १८८४ मध्ये 'डेक्कन एज्युकेशन सोसायटी' या संस्थेची स्थापना झाली.[४]

टिळक, आगरकर आणि चिपळूणकर हे तिघेही त्या काळामध्ये आपापल्या क्षेत्रात आघाडीवर राहून काम करत होते. टिळक राजकारणात सक्रिय झाले, आगरकर सामाजिक सुधारणा व वृत्तपत्रसृष्टीत तर चिपळूणकरही निबंधमालेच्या माध्यमातून सक्रिय झाले. म्हणजे हे तिघेही आपापल्या क्षेत्राचे नेतृत्त्व करीत होते. अशा धेयवेड्या माणसांनी ही संस्था स्थापन केली होती. स्वायत्त लोकशिक्षणाशिवाय आपल्या पतित देशाचे भौतिक व नैतिक पुनरुज्जीवन होणार नाही अशा या तिघांचाही विचार होता. लोकमान्य टिळकांनी तर आपल्या चतु:सूत्रीमध्ये स्वदेशी, स्वराज्य, बहिष्काराबरोबरच राष्ट्रीय शिक्षणाला महत्त्व दिले होते. न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना ही महाराष्ट्राच्या व देशाच्या राजकीय शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्राला कलाटणी देणारी घटना होती. स्वदेशी, बहिष्कार आणि राष्ट्रीय शिक्षण ही स्वराज्याचा हेतू साध्य करण्यासाठी स्वावलंबनाची साधने आहेत असे मत लोकमान्य टिळक सातत्याने मांडत होते. या शाळेच्या माध्यमातून हाच विचार पुढे नेण्याचा प्रयत्न झाला.

डेक्कन एज्युकेशन सोसायटीने सुरु केलेल्या फर्ग्युसन कॉलेजचे उद्‌घाटन २ जानेवारी १८८५ रोजी झाले. या दोन्ही संस्थांत शिक्षण घेण्यासाठी भारतातील सर्वच प्रांतातून विद्यार्थी येऊ लागले. संस्थेचा व्याप व विस्तार वाढत जाऊ लागला. सन १९८२ साली हंटर कमिशनने संपूर्ण

देशातील मान्यवरांच्या शिक्षणाच्या अनुषंगाने साक्षी नोंदविल्या होत्या. त्याच हंटर कमिशनचे प्रमुख डॉ. विल्यम हंटर यांनी असे गौरवोद्‌गार काढले की, 'या शाळेचा उत्कर्ष पाहत मी असे खात्रीने म्हणू शकतो की, हिच्या तोडीची एकही शाळा मला हिंदुस्थानात इतरत्र दिसून आली नाही.'[५]

वरील विवेचनावरुन हे स्पष्ट होते की, डेक्कन एज्युकेशन सोसायटी राष्ट्रीय शिक्षण देण्याच्या हेतुने स्थापन करण्यात आली होती. अल्पावधीत या संस्थेने चांगले कार्य करुन देशभर लौकिक कमविला. त्यामुळेच संपूर्ण देशातील विविध प्रांतातून विद्यार्थी शिक्षणासाठी या संस्थेकडे आकृष्ट झाले. या संस्थेची चांगलीच प्रगती झाली. एकूणच डेक्कन एज्युकेशन सोसायटी ही पुण्यातील अत्यंत महत्त्वाची अशी संस्था आहे. महाराष्ट्राच्या व देशाच्या इतिहासातील एक महत्त्वाची घटना म्हणून या संस्थेच्या स्थापनेकडे पाहवे लागेल. कारण डेक्कन एज्युकेशन सोसायटी या संस्थेच्या स्थापनेचा कार्याचा प्रभाव व परिणाम त्यानंतरच्या परिस्थितीवर पडल्याचे स्पष्टपणे जाणवते.

### २.१.३ महाराष्ट्र गर्ल्स एज्युकेशन सोसायटी (१८८४) :

पुणे शहरात मुलींच्या शिक्षणासाठी १ जानेवारी १८४८ रोजी महात्मा ज्योतिबा फुले यांनी पहिली मुलींची शाळा सुरु केली.[६] स्त्रीशिक्षणाचा तोच ध्यास घेऊन महाराष्ट्र गर्ल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना करण्यात आली. डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर आणि न्या. म. गो. रानडे यांच्यासारख्या द्रष्ट्या सुधारकांनी १८८४ मध्ये हुजुरपागेची म्हणजेच महाराष्ट्र गर्ल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली.

सन १८८४ च्या दरम्यान मुंबई इलाख्यात मुलींसाठी प्राथमिक शिक्षण देणाऱ्या संस्था होत्या, परंतु माध्यमिक शिक्षण देणारे एकही हायस्कूल नव्हते. माध्यमिक शिक्षणाच्या दृष्टीने संपूर्ण मुंबई इलाख्यात ही फार मोठी उणीव होती. त्यामुळे मिशनरी शाळेचा एकमेव पर्याय उपलब्ध होता. त्यामुळे मुलींना मिशनरी शाळेमध्ये पाठवण्यास सर्वसामान्य लोक तयार नसत.[७] त्यामुळे प्राथमिक शिक्षणाच्या पुढे त्या काळातील मुलींचे शिक्षण बंद होत होते. अशा काळात स्त्री शिक्षणाची गरज ओळखणारे, स्त्रियांच्या शिक्षणाचे महत्त्व जाणणारे अनेक समाजसुधारक पुढे आले. 'स्त्री शिक्षण' हे ध्येय ठेवून त्यांनी हुजुरपागेची स्थापना केली.

दिनांक २९ सप्टेंबर १८८४ रोजी, 'हायस्कूल फॉर नेटीव्ह गर्ल्स' या संस्थेचा उद्‌घाटन समारंभ हिराबागेत झाला. कोलकत्याच्या बेथुन स्कूलनंतर भारतातील हे दुसरेच स्कूल होते.[८] यावरून या संस्थेचे महत्त्व लक्षात येते. सर विल्यम वेडरबर्न, न्या. म. गो. रानडे, रा. गो.

भांडारकर, शंकर पांडुरंग  पंडित यांच्या पुढाकारातून ही संस्था निर्माण झाली. आज या संस्थेने शतकोत्तर रौप्यमहोत्सव पूर्ण केला आहे. सुमारे सव्वाशे वर्षांपूर्वीची सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक वास्तवता लक्षात घेतली तर या संस्थेची स्थापना ही किती महत्त्वपूर्ण घटना होती हे समजून येते. त्या काळात या संस्थेच्या संस्थापकांना प्रचंड विरोध व त्रास सहन करावा लागला. मुलींच्या शिक्षणासाठी प्रयत्न करणाऱ्या महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांना जसा त्रास व विरोध झाला तसाच त्रास आणि विरोध या संस्थेच्या संस्थापकांनाही झाला. विरोधातले लोकमत, सरकारी अनास्था, मंदगतीने चाललेली स्त्रीशिक्षणाची वाटचाल अशा संकटांना तोंड देत सव्वाशे वर्षांपूर्वी मुलींच्या शिक्षणासाठी संस्थात्मक पातळीवर प्रयत्न करणे म्हणजे धाडसी पाऊल होते. महाराष्ट्र गर्ल्स एज्युकेशन सोसायटी या  संस्थेच्या पहिल्या व्यवस्थापक कमिटीत रा. ब. पंडित हे सचिव तर रा. ब. नारायणभाई दांडेकर हे सहसचिव होते. न्या. म. गो. रानडे, रा. ब. नूलकर, सी. वि. पटवर्धन, सरदार पुरंदरे, सुलेमान अब्दुल वाहिद, वामन आबाजी मोडक हे सभासद होते. नंतरच्या काळात इंदूरचे राजे शिवाजी महाराज होळकर, बडोद्याचे राजे सयाजीराव गायकवाड यांनी या संस्थेचे अध्यक्षपद भूषविले.

इ. स. १८८७ मध्ये संस्थेचे 'महाराष्ट्र फिमेल एज्युकेशन सोसायटी' असे नामकरण झाले. कालांतराने हे नाव बदलून 'महाराष्ट्र गर्ल्स एज्युकेशन सोसायटी' असे नाव देण्यात आले. हुजुरपागेत सर्वच जातीधर्माच्या विद्यार्थिनी शिकत होत्या. १९१९ पासून मराठीतून शिक्षण दिले जाऊ लागले. पारंपरिक अभ्यासक्रमासह नीतीशिक्षण, 'बालिकादर्श' मासिकाचे संपादन सुरू झाले. बालिका वस्तू भांडार, वनिता समाज, गर्ल गाईड, सुसज्ज ग्रंथालय, स्वराज्यसभा यासारखे विविध उपक्रम आजतागायत राबविले जात आहेत. हुजुरपागेच्या विद्यार्थिनींनी विविध क्षेत्रात मोठे स्थान निर्माण केले आहे. प्रसिद्ध साहित्यिका अरुणा ढेरे, चित्रपट निर्मात्या स्मिता तळवलकर, अभिनेत्री रिमा लागू, शांता शेळके, सरोजिनी वैद्य, योगिनी जोगळेकर यांच्यासह अनेक प्रसिद्ध गायिका, नृत्यांगना, राष्ट्रीय खेळाडू या हुजूरपागेच्या विद्यार्थिनी आहेत.

महाराष्ट्र गर्ल्स एज्युकेशन सोसायटीने आपले कार्य विस्तारले आहे. कात्रज येथे शिशुरंजनपासून ज्युनिअर कॉलेजपर्यंत शिक्षण देणारी शाखा सुरु करण्यात आली आहे. सन २००१ पासून खास विद्यार्थिनींसाठी हुजुरपागा महिला वाणिज्य महाविद्यालय सुरु केले आहे. या महाविद्यालयामार्फत बी.बी.ए., बी.सी.ए., बी.बी.एम. हे अभ्यासक्रमही सुरु करण्यात आले आहेत. आज संस्थेच्या विविध विभागामध्ये सुमारे ७००० विद्यार्थिनी शिक्षण घेत आहेत.

१२५ वर्षांपूर्वी स्थापन झालेली ही संस्था पुण्यातील एक महत्त्वाची संस्था आहे. हे वरील विवेचनावरून लक्षात येते. जुनी व पुण्याच्या शैक्षणिक वर्तुळातील प्रभावी कार्य करणारी संस्था म्हणून महाराष्ट्र गर्ल्स एज्युकेशन सोसायटीचा लौकिक आहे.

## २.१.४ कॅम्प एज्युकेशन सोसायटी (१८८५) :

कॅम्प एज्युकेशन सोसायटीची स्थापना मागासवर्गीय व दलित यांच्या उन्नतीसाठी करण्यात आली होती. पुण्याच्या लष्कर भागातील मराठी भाषिक नसलेल्या मंडळींनी ही संस्था स्थापन केली होती. या संस्थेची स्थापना १८८५ साली झाली. सन १८८५ च्या दरम्यान पुणे शहराच्या पूर्व भागातील लष्कर विभागात पारशी व ख्रिश्चन मिशनरींच्या इंग्रजी माध्यमांच्या शाळा जास्त प्रमाणात होत्या. परंतु बहुजन समाजातील सर्वसामान्य विद्यार्थ्यांसाठी मराठी माध्यमाची एकही शाळा नव्हती. शाळेची गरज ओळखूनच या भागातील समाजसुधारक व विचारवंतांनी एकत्र येऊन कॅम्प भागात दि. १ ऑक्टोबर १८८५ मध्ये 'कॅम्प एज्युकेशन सोसायटी'ची स्थापना केली. संस्थेची स्थापना करण्यात राजन्ना लिंगू पोलास, बाळकृष्ण मोटाडू, गंगारामबुवा म्हस्के यांचे उल्लेखनीय योगदान आहे. या कार्याला थोर समाजसुधारक महात्मा ज्योतिराव फुले यांचे मार्गदर्शन व आशीर्वाद लाभले.[९] या सोसायटीला पुण्यातीलच नव्हे तर संपूर्ण देशातील अस्पृश्यांच्या शिक्षणाचा पाया घालणारे थोर समाजक्रांतिकारक महात्मा ज्योतिराव फुले यांचे मार्गदर्शन लाभले ही विशेष बाब आहे. पुढे १९०० साली कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या जागेत माध्यमिक शाळा सुरु झाली. याच वर्षी सरकार दरबारी शाळेची नोंदणी होऊन पूर्ण अनुदान प्राप्त झाले.

कॅम्प हायस्कूल हे कॅम्प एज्युकेशन सोसायटीकडून चालविले जात होते. कॅम्प हायस्कूलचा आणि आचार्य अत्रेंचा निकटचा संबंध होता. सन १९२२ ते १९३९ अशी १७ वर्षे आचार्य अत्रे या हायस्कूलचे मुख्याध्यापक होते. शिक्षण क्षेत्रातील नवनवीन प्रयोग करुन आचार्य अत्र्यांनी संस्थेचा लौकिक वाढविला. शाळेला ते आपली कर्मभूमी मानत. शाळेत शिकणाऱ्या सर्वधर्मीय मुलांमध्ये ते खूप रमले होते. या शाळेविषयी आचार्य अत्रे म्हणतात, ''मुलांना शिकविता शिकविता मीच शहाणा होत गेलो. माझ्यातल्या साहित्यिकाची जडणघडण येथेच झाली. कॅम्प एज्युकेशनची ही शाळा म्हणजे सर्व धर्म समभावाची कार्यशाळाच आहे.''[१०] आचार्य अत्रे यांनी शाळेची गुणवत्ता सुधारण्यासाठी खूप प्रयत्न केले. विद्यार्थ्यांना शिकविणारा शिक्षकवर्ग तयार करण्यासाठी संस्थेत बी. टी. क्लासेस सुरु केले.रास्ता पेठ येथे धनराजगिरजी हायस्कूल सुरु केले. या काळात आर. के. नायडू हे अध्यक्ष होते.

कॅम्प एज्युकेशन सोसायटीची भूमिका ही उपेक्षित वर्गातील विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याची होती. त्यामुळेच मुलांच्या शिक्षणाबरोबरच मुलींच्या शिक्षणाचीही गरज ओळखून संस्थेने सोलापूर बाजार येथे तीन मजली इमारत बांधून 'कन्याशाळा' सुरू केली. या इमारतीचे उद्‌घाटन महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण व वेणूताई चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले होते.

१२५ वर्षांची परंपरा असलेल्या कॅम्प एज्युकेशन सोसायटीचा सध्या मोठ्या प्रमाणावर विस्तार झाला आहे. ६ प्राथमिक शाळा, ६ माध्यमिक शाळा, ४ कनिष्ठ महाविद्यालये, बॅचलर ऑफ कॉम्प्युटर सायन्स (B. C. S.), बॅचलर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन (B. B. A.), मास्टर ऑफ कॉम्प्युटर सायन्स (M. C. S.) अशा व्यावसायिक शिक्षणाची सुविधा उपलब्ध असणारे वरिष्ठ महाविद्यालय संस्था चालवते. तसेच मास्टर इन कॉम्प्युटर मॅनेंजमेंट (M. C. M.), मास्टर इन बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन (M. B. A.) हा अभ्यासक्रम निगडी प्राधिकरणाच्या डॉ. अरविंद तेलंग शैक्षणिक संकुलात सुरु करण्यात आला आहे. याच ठिकाणी औद्योगिक प्रशिक्षण केंद्र कार्यान्वित आहे. संस्थेच्या सर्व शाखांमधून सध्या १५००० पेक्षा जास्त विद्यार्थी - विद्यार्थिनी शिक्षण घेत आहेत. संस्थेत शिक्षण घेणारे बहुसंख्य विद्यार्थी हे लष्कर भागातील कष्टकरी व आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या तसेच औद्योगिक क्षेत्रातील कामगार कुटुंबातील आहेत ही विशेष बाब आहे. अशा वर्गातील विद्यार्थ्यांना ज्ञान देण्याचे महत्त्वाचे कार्य संस्थेच्या माध्यमातून सुरु आहे.

सन १८८५ साली स्थापन झालेल्या कॅम्प एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षपदी सध्या प्राचार्य अमरसिंह राणे, उपाध्यक्षपदी बबनराव पवार, जवाहरलाल बोथरा हे आहेत. तर कार्याध्यक्ष म्हणून वालचंद संचेती, मानद सचिव म्हणून मोहिनी अरविंद तेलंग, मानद खजिनदार म्हणून वसंतराव पवार हे काम पाहत आहेत. या संस्थेच्या माजी विद्यार्थ्यांमध्ये अनेक यशस्वी व कर्तृत्ववान व्यक्तिंचा समावेश आहे. अहमदाबाद कोर्टाचे न्यायाधीश जयाभाई पटेल, आय.ए.एस. पंडित रणदिवे, बॅ. सी. बी. आगरवाल, राजकारणात ठसा उमटविलेले उल्हास पवार, माजी मंत्री रमेशदादा बागवे ही काही प्रमुख नावे आहेत.

कॅम्प एज्युकेशन सोसायटी संदर्भात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अत्यंत महत्त्वपूर्ण प्रतिक्रिया दिली आहे. सन १९३१-३२ मध्ये त्यांनी संस्थेविषयी असे उद्‌गार काढले होते की, 'प्रत्येक वर्गात मागासलेल्या आणि अस्पृश्य वर्गातील मुलांचे प्रमाण आमच्या लक्षात आले. या अशिक्षित व उपेक्षित वर्गाचे लक्ष शिक्षणाकडे वेधून घेणे ही संस्थेची कामगिरी फारच अभिमानास्पद

आहे. या शाळेसारख्या संस्था आपल्या देशात फारच थोड्या आहेत आणि म्हणून या संस्थेचा नामनिर्देश प्रामुख्याने करणे आम्हास इष्ट वाटते.'[११] डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेली ही प्रतिक्रिया निश्चितच संस्थेचा गौरव करणारी असून संस्थेच्या कार्याचे महत्त्व अधोरेखित करणारी आहे.

### २.१.५ शारदा सदन (१८८९) :

एकोणीसाव्या शतकातील महाराष्ट्राची सामाजिक स्थिती आपण समजून घेतली तर त्या काळातील स्त्रियांची दु:ख स्थिती आपल्या लक्षात येते. शिक्षणबंदी, बालविवाह, केशवपन अशा विविध अन्यायी आणि अमानुष रुढी परंपरांच्या माध्यमातून स्त्रियांचे शोषण करण्यात येत होते. स्त्रीला माणूस म्हणून वागविणे हे दुर्मीळ होते. अशा काळात विधवा पुनर्विवाह, विधवा शिक्षण या क्षेत्रात विधायक काम उभे करणे हे खूपच धाडसाचे व महत्त्वाचे होते. विधवांच्या शिक्षणाची निकड लक्षात घेऊन पंडिता रमाबाई यांनी इ. स. १८८९ मध्ये शारदा सदनची स्थापना केली. तत्पूर्वी सन १८८२ मध्ये पंडिता रमाबाईच्या पुढाकारातून आर्य महिला समाजाची स्थापना झालेली होती. पुढे त्यांनी स्थापन केलेल्या व पुणे शहरात स्थलांतर केलेल्या शारदा सदनमधील बालविधवा गोदुताई जोशी यांच्यासोबत महर्षी धोंडो केशव कर्वे यांचा विवाह झाला. पुढे त्या आनंदीबाई किंवा बाया कर्वे या नावाने परिचित झालेल्या आहेत.[१२]

शारदासदनची 'इंदुप्रकाश'सारख्या वृत्तपत्रांमध्ये जाहीर निवेदन करुन विद्यार्थिनी, अभ्यासक्रमाविषयी माहिती दिली. साधारणत: मराठी, गुजराथी, इंग्रजी, संस्कृत भाषा, गणित, विज्ञान शिवाय नीतीशिक्षण आणि धंदेशिक्षण म्हणून शिवणकाम, कशिदा, लोकरीचे काम, चित्रलेखन, मातीकाम, नक्षीकाम इत्यादींचे शिक्षण दिले जात होते. यांचा समावेश होता. अतिशय 'दूरदर्शीपणे' मुलींसाठी काढलेली ही भारतातील पहिलीच शाळा असावी.[१३] हे मत योग्य आहे. कारण मुलींच्या सामाजिक परिस्थितीचे पूर्ण अवलोकन करून त्यांच्यासाठी साधारण शिक्षणाबरोबरच धंदेवाईक शिक्षणाचीही व्यवस्था पंडिता रमाबाईंनी सुरू केली होती. शारदासदनची सुरुवात मुंबईतून झाली. पण या संस्थेचे स्थलांतर पुणे येथे झाले. तेव्हापासून या संस्थेच्या कार्यात गती मिळत गेली.

पंडिता रमाबाईनी जरी ख्रिस्ती धर्म स्वीकारला असला तरी त्या धर्मप्रसार मात्र करत नव्हत्या हे त्यांचे वैशिष्ट्ये होते. परंतु शारदासदनमधील काही विद्यार्थिनींनी ख्रिस्ती धर्म स्वीकारल्यानंतर सल्लागार मंडळाचे अध्यक्ष व सभासदांनी संस्थेतील सहभाग कमी केला होता. त्यानंतर ही संस्था इ. स. १८९३ मध्ये बंद पडली. पुढे रमाबाईंनी शारदासदन केडगावला

स्थलांतरित केले. पुण्यासारख्या सनातनी व परंपराप्रिय शहरात विधवांच्या उन्नतीसाठी त्यांना शिक्षित करण्याचे ध्येय बाळगून पंडिता रमाबाईंनी स्थापन केलेली 'शारदासदन' ही संस्था सामाजिक परिवर्तनासाठी व विधवांच्या स्थितीत बदल घडवून आणण्यासाठी प्रयत्नशील होती.

शारदासदन या शैक्षणिक संस्थेमुळे स्त्रियांमध्ये, विधवांमध्ये आर्थिक उन्नती घडून आल्याचे दिसते म्हणजेच आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी त्यांच्यामध्ये आर्थिक स्वावलंबन निर्माण करण्यासाठी या संस्थेची महत्त्वाची भूमिका असल्याचे दिसते. शारदासदन या संस्थेची स्थापना झाली तेव्हा महिलांना स्वातंत्र्य द्यावे अशा दृष्टिकोनातून पाहिले जात नसे. तो काळ स्त्री-पुरुष समानतेचा नव्हता. परंतु स्त्री-पुरुष समानतेची ही दृष्टी निर्माण करण्यात शारदासदन या संस्थेने मोलाची भूमिका निभावली. या संस्थेच्या शिरपेचातील मानाचा तुरा म्हणजे ही शाळा पंडिता रमाबाई यांच्यामुळे इतिहास प्रसिद्ध आहेच, परंतु या शाळेपासून प्रेरणा घेऊन पुढे अनेक शाळांनी संस्थेतील अर्थार्जनाचे प्रयोग आपल्या शाळेत राबवले व या संस्थेविषयी कृतज्ञता व्यक्त केली. म्हणून ही संस्था केवळ पाठ्यपुस्तकांचे शिक्षण देणारी नव्हे तर जीवनशिक्षण देणारी संस्था आहे असे वर्णन करणे योग्य होईल.

### २.१.६ अनाथ बालिकाश्रम (१८९९) :

दिनांक १ जानेवारी १८९९ रोजी अनाथ बालिकाश्रमाच्या मंडळीची सुरुवात झाली. त्यानंतर सुमारे अडीच वर्षांनी सदाशिव पेठेत आश्रम सुरु झाला. सुरुवातीला केवळ एकच विधवा या आश्रमात होती. हळूहळू ही संस्था वाढत गेली. या अनाथ बालिकाश्रमाच्या माध्यमातून महर्षी धोंडो केशव उर्फ अण्णासाहेब कर्वे यांनी स्त्रियांच्या शिक्षणाला अधिक गती देण्याचे काम केले. सन १८९३ साली त्यांनी 'विधवा विवाहोत्तेजक मंडळी' स्थापन केली होती. त्यानंतर अनाथ बालिकाश्रम स्थापन करुन स्त्रीशिक्षणाच्या कार्यात पुढचे पाऊल टाकले.

अत्यंत अडचणीतून सुरु झालेली ही संस्था पुढे चांगलीच नावारुपाला आली. आर्थिक चणचणीशी सामना करत अण्णासाहेब कर्वेंनी ही संस्था वाढविली. पार्वतीबाई आठवले व काशीबाई देवधर यांच्या सहकार्याने संस्थेचा विस्तार केला व नावलौकिक वाढविला. अनाथ बालिकाश्रम सुस्थित होण्यापूर्वी बनूताई देशपांडे, आनंदीबाई मराठे, दुर्गाबाई किर्लोस्कर या तीन स्त्रियांची अनाथ बालिकाश्रमाला मोलाची मदत झाली. या आश्रमाला महात्मा गांधी, बाबू अरविंद घोष, विरेश लिंगम पंतलू, लाला लजपतराय, सरोजिनी नायडू आदी मान्यवर मंडळींनी आश्रमाला भेट देऊन तेथील विधायक कार्याबद्दल गौरवोद्‌गार काढले होते.

पंडिता रमाबाई यांनी विधवांच्या शिक्षणासाठी शारदासदनची स्थापना केली होती. त्यावेळी अण्णासाहेब कर्वे पुनर्विवाहीत पत्नी आनंदीबाई कर्वे या त्यांच्या पहिल्या पतीच्या निधनानंतर शारदासदनमध्ये शिक्षण घेत होत्या. तेथील विधवांच्या शिक्षणाची माहिती घेऊन अण्णासाहेब कर्वे यांनी पुणे शहराजवळील हिंगणे येथे अनाथ बालिकाश्रम सुरु केला. या आश्रमात प्रवेश घेण्यासाठी महाराष्ट्रासह वऱ्हाड, मध्यप्रांत, मध्यहिंदुस्तान, गुजरात या भागातूनही मुली येत असत. शिवाय मराठी मातृभाषा नसणाऱ्याही कित्येक विद्यार्थिनी मद्रास, म्हैसूर, मंगळूर, राजमहेंद्री या ठिकाणांहून आश्रमात येऊ लागल्या होत्या.

एका विधवेच्या व्यवस्थेपासून या आश्रमला प्रारंभ झाला होता. या आश्रमात पंधरा सोळा वर्षांत सुमारे पंचावन्न पुनर्विवाह झाले.[१४] हिंदूंच्या ज्या जातींमध्ये विधवाविवाह रुढ नाही. त्या जातीतील अल्पवयस्क विधवांना शिक्षण देऊन त्यांची मने सुशिक्षित करुन त्यांना स्वावलंबी होता येईल असे साधन त्यांना मिळवून देणे व आपले आयुष्य सत्कारणी लावता येईल असा विश्वास त्यांच्यामध्ये उत्पन्न करणे हा आश्रमाचा उद्देश होता. हा उद्देश निश्चितच सफल झाला. परंतु या विधवांच्यासह आश्रमात त्यांच्या बहिणी अथवा मुली येत. त्यांच्या शिक्षणासाठी अण्णासाहेब कर्वे यांनी १९०७ साली महिला विद्यालयाची स्थापना केली. महिला विद्यालय सहा विद्यार्थीनींसह सुरु झाले. मुलींच्या शिक्षणासाठी हे विद्यालय स्थापन करुन अण्णासाहेब कर्वे यांनी आणखी एक पुढचे पाऊल उचलले. महिला विद्यालयाच्या स्थापनेच्या वेळी अस्तित्वात असणाऱ्या हुजुरपागा, फिमेल हायस्कूल, फिमेल ट्रेनिंग कॉलेज यांच्याबरोबरीने स्त्रियांच्या शिक्षणासाठी हे विद्यालय स्थापन करण्यात आले. अनाथ बालिकाश्रमात येणाऱ्या विधवा विद्यार्थिनींच्या शिक्षणाची सोय करण्यासाठी शाळा काढण्याची गरज निर्माण झाली ही गरज महिला विद्यालयाच्या माध्यमातून पूर्ण केली.

दिनांक ४ मार्च १९०७ रोजी लाकडी पूलाजवळच्या डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या ताब्यातील जुन्या व पडक्या पण प्रशस्त वाड्यात सहा विद्यार्थिनींना घेऊन महिला विद्यालयाला सुरुवात केली. दिनांक ६ मार्च १९०७ च्या 'ज्ञानप्रकाश'च्या अंकात अण्णासाहेब कर्वे यांनी संस्थेच्या स्थापनेमागील उद्देश स्पष्ट करण्यासाठी स्वत:च्या सहीने एक लेख लिहिला. त्यात त्यांनी 'गृहिणीपदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या त्याच्या योगाने मनावर पूर्णपणे ठसतील व ज्याच्या योगाने समाजविषयक कर्तव्यांविषयी चांगली ओळख होऊ शकेल, असे शिक्षण देऊन आपल्या समाजात काही सुशिक्षित स्त्रिया तयार करण्याचा प्रयत्न करणे, मुलांप्रमाणेच मुलींच्या ही ब्रह्मचर्यव्रताची मुदत आठ वर्षांच्या वयानंतर पुढे बारा वर्षांची व्हावी, त्यांच्या विवाहकाळाची मर्यादा वीस वर्षावर यावी हे

अंतिम साध्य शक्य होण्यासाठी प्रयत्न करणे.'[१५] हे हेतू साध्य करण्यासाठी महर्षी धोंडो केशव कर्वे शेवट पर्यंत प्रयत्न करत राहिले. आरंभीच्या काळात जरी अण्णासाहेबांचे कार्य ब्राह्मण स्त्रीवर्गापुरते मर्यादित होते तरी पुढील काळात मात्र त्यांनी आपल्या अनाथ बालिकाश्रमाची व कन्याविद्यालयाच्या वसतिगृहाच्या माध्यमातून सर्व जातींच्या स्त्रियांसाठी काम केल्याचे दिसून येते.

स्त्रियांनी केवळ माध्यमिक शिक्षण घेऊन न थांबता उच्च शिक्षणही घेतले पाहिजे. या विचारातून त्यांच्या मनात महिला विद्यापीठाची कल्पना आकारास आली. १९ जानेवारी १९१६ रोजी पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमध्ये आश्रमाच्या व्यवस्थापक मंडळींची सभा भरली. त्यावेळी व्यवस्थांपकांखेरीज इतरही काही लोक उपस्थित होते. यावेळी ॲनी बेझंट मदतीचा चेक देऊन महिला विद्यापीठास केवळ महाराष्ट्रासाठी न काढता संपूर्ण देशासाठी काढावे असे सुचविले. त्यानुसार अण्णासाहेब कर्वे यांनी 'महिला विद्यापीठ' काढण्याचे निश्चित केले. कर्वे यांचा मानस समजल्यानंतर त्यांना रवींद्रनाथ टागोर यांनी विशेष उत्तेजनपर असे पत्र लिहिले. त्याचबरोबर शेफिल्ड युनिव्हर्सिटीचे व्हाइस चॅन्सलर डॉ. एच. ए. एल. फिशर, सी. एफ. ॲन्ड्रयुज यांनीही कर्व्यांचे पत्राद्वारे कौतुक केले. लोकमान्य टिळकांनी मात्र विद्यापीठाबाबत प्रतिकूल प्रतिक्रिया दिली होती. ''हल्लीच्या शिक्षणाने आम्ही जसे संशयवादी बनलो आहोत. तशा स्त्रिया बनतील व आमच्या गृहसौख्याचा नाश होईल''.[१६] असा लोकमान्य टिळकांचा अभिप्राय होता.

महात्मा गांधीजींनी मात्र कर्व्यांच्या कार्याला पाठिंबा दिला व दरसाल दहा रुपये देऊन मतदार होण्याचेही कबूल केले. सिनेट मेंबर व सिनेट मतदार यांबाबतची सर्व तांत्रिक प्रक्रिया महर्षी कर्वेंनी कष्टपूर्वक पूर्ण केली. यासाठी त्यांना अनेकांचे सहकार्य मिळाले. सर रामकृष्ण भांडारकर व रँग्लर परांजपे यांची अनुक्रमे चॅन्सलर व व्हाईस चॅन्सरल या जागी निवड झाली. ३ जून १९१६ रोजी महिला विद्यापीठाचा जन्म झाला. १९२० मध्ये सर विठ्ठलदास ठाकरसी यांनी मोठी देणगी देण्याचे कबूल केल्यानंतर विद्यापीठाला 'श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ' असे नाव देण्यात आले. प्रपंचशास्त्र, आरोग्यशास्त्र, वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र, शरीररचना शास्त्र, इंद्रिय विज्ञान शास्त्र, मानसशास्त्र व मुलांच्या मनोव्यापारांची मीमांसा या विषयाची मूलतत्त्वे हा या विद्यापीठाच्या अभ्यासक्रमातील महत्त्वाचा भाग होता. इंग्लिशला दिलेले फाजील महत्त्व व मातृभाषेची हेळसांड हा आपल्या शिक्षणपद्धतीतील महत्त्वाचा दोष होता. त्यामुळे देशी भाषांना प्राधान्य देण्याचे महिला विद्यापीठाने ठरविले.

एकंदरीत अनाथ बालिकाश्रम, महिला विद्यालय, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ असा अण्णासाहेब कर्व्यांच्या शैक्षणिक कार्याचा प्रवास झालेला आहे. पुणे शहराच्या अनुषंगाने विचार करता या तीनही संस्थांनी पुण्यासह महाराष्ट्र व देशाच्या शैक्षणिक क्षेत्रात आमुलाग्र व महत्त्वाचे कार्य केले असून शैक्षणिक विकासाला चालना दिली आहे.

## २.१.७ अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद (१९०७) :

अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेची स्थापना १९०७ साली झाली. शिक्षणाच्या अभिवृद्धीद्वारा व्यापक व प्रभावी सामाजिक उन्नतीचे कार्य करण्याचा उदात्त हेतू परिषदेच्या स्थापनेमागचा होता.[१७] बाबुराव जेधे यांच्या प्रभावाने परिषदेच्या शिक्षणाच्या कार्यासाठी महाराष्ट्र शासनाकडून पुण्यात पर्वती रमणा नजीकची प्रशस्त जागा परिषदेला मिळाली होती. आज त्याच जागेत श्री शाहू मंदिर महाविद्यालय, विधी महाविद्यालय, कर्मवीर भाऊसाहेब हिरे हायस्कूल व जेधे मोरे वसतिगृह संस्था अस्तित्वात आल्या आहेत.

अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेचा अभ्यास केल्यानंतर या संस्थेविषयी बरीच अप्रकाशित माहिती मिळालेली आहे. या संस्थेच्या एकूणच कार्यावर छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, महाराज सयाजीराव गायकवाड, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारकार्याचा प्रभाव आहे. दि. ३० व ३१ डिसेंबर १९०७ रोजी अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेचे पहिले अधिवेशन ३० व ३१ डिसेंबर १९०७ रोजी धारवाड येथे भरले व त्या अधिवेशनातच परिषदेची स्थापना झाली.[१८]

राजर्षी शाहू महाराजांचे शिक्षण कर्नाटकातील धारवाड येथे झाले होते. त्याच धारवाड शहरात परिषदेचे अधिवेशन संपन्न होत होते. याच अधिवेशनात परिषदेची स्थापना होणे हा चांगला योगायोग होता. परिषदेच्या निर्मितीमागे महात्मा फुले यांच्या सामाजिक व शैक्षणिक विचारांची प्रेरणा होती. त्यामुळेच ही संस्था म्हणजे महाराष्ट्राच्या शैक्षणिक, सामाजिक व राजकीय परिवर्तनाला गतिमान करणारी चळवळ होती. 'समाजातील शेवटच्या घटकापर्यंत शिक्षण' हा परिषदेच्या विचारांचा केंद्रबिंदू होता वा आजही आहे. पंजाबराव देशमुख, कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांनी परिषदेला मोठे योगदान दिले आहे. बाबूरावजी जेधे यांच्यामुळे परिषदेला महाराष्ट्र शासनाकडून पर्वती रमण्याजवळ ६७ एकर जमीन मिळाली. यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचा सहभाग होता. 'उत्तिष्ठत जाग्रत, प्राप्यवराञ्नि बोधत व संघ शक्ति कलौ युगे' हे संस्थेचे बोधवाक्य आहे.[१९]

परिषदेला छत्रपती शाहू महाराज, महाराजा सयाजीराव गायकवाड, माधवराव शिंदे यांनी वैचारिक मार्गदर्शन व आर्थिक मदत दिली आहे. ब्रिटिशांच्या भारतातील आगमनानंतर बहुजन समाजात शैक्षणिक, सामाजिक व राजकीय जागृती निर्माण झाली. सन १८७३ साली महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. दयानंद सरस्वती यांनी १८७५ साली आर्य समाजाची स्थापना केली. राष्ट्रीय सभेची स्थापना १८८५ मध्ये झाली. या सर्व घडामोडींचा प्रभाव समाजमनावर होत होता. त्यातूनच बहुजन समाजाच्या प्रबोधनाची व शैक्षणिक विकासाची वाट निर्माण होत होती. अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेची स्थापना ही त्याचाच एक भाग होता. महात्मा फुले यांच्या क्रांतिकारी विचारांमुळे मुलींचे व मागासवर्गीयांचे शिक्षण, अस्पृश्यांच्या समस्या, स्त्रियांच्या समस्या महाराष्ट्राच्या विचार विश्वाच्या केंद्रस्थानी आल्या. महात्मा फुले यांच्या या विचारांनी प्रेरित होऊनच अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेची स्थापना झाली आहे.

सन १८९३ मध्ये संपूर्ण भारतात प्रथम प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्याचा कायदा निर्माण करणाऱ्या महाराज सयाजीराव गायकवाड यांनीही संस्थेच्या विकासात महत्त्वाचा वाटा उचलला आहे. १९०७ साली धारवाड येथे भरलेल्या पहिल्या अधिवेशनाचे अध्यक्ष सासेराव जाधव यांनी अध्यक्षीय भाषणात महात्मा फुले यांच्या कार्याचा गौरवपूर्वक उल्लेख केला होता. याच अधिवेशनात सौ. चंद्राबाई पवार या स्त्रीने वाचलेल्या निबंधात, पुरुष व स्त्री ही संसाररुपी रथाची दोन चक्रे आहेत.[२०] अशी मांडणी करण्यात आली होती. यातून महात्मा फुले, शाहू महाराजांच्या समतावादी विचारांचे दर्शन घडते.

शाहू महाराजांच्या नंतर बाळासाहेब देसाई, भास्करराव जाधव, पंढरीनाथ पाटील, भाई माधवराव बागल, केशवराव जेधे, काकासाहेब वाघ व अण्णासाहेब पाटील यांनी परिवर्तनाच्या व सामाजिक बांधिलकीच्या भूमिकेतून संस्थेच्या विकासात सक्रिय सहभाग नोंदविला.

इ. स. १९६० साली श्री शाहू मंदिर महाविद्यालय सुरु करून परिषदेला संस्थात्मक स्वरुप देण्यात आले. तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी या महाविद्यालयाच्या कोनशीलाचे अनावरण केले. या महाविद्यालयाच्या स्थापनेनंतर कर्मवीर भाऊसाहेब हिरे विद्यालय, देशभक्त जेधे-मोरे वसतिगृह, यशवंतराव चव्हाण विधी महाविद्यालय, श्री शाहू मंदिर कनिष्ठ महाविद्यालय, राजर्षी शाहू महाराज विद्यार्थी वसतिगृह, श्री.नामदेवराव सुर्यवंशी औद्योगिक प्रशिक्षण केंद्र पुणे, राजर्षी शाहू महाराज क्रीडा संकूल अशा शाखा व स्वतंत्र इमारती झाल्या आहेत.

वसंतदादा पाटील, बाळासाहेब देसाई, शरद पवार यांच्यासारख्या दिग्गज नेत्यांनी परिषदेचे अध्यक्षस्थान भूषविले आहे. एक विशिष्ट अशी परिवर्तनाची वैचारिक बांधिलकी स्वीकारून संस्थेची वाटचाल सुरु आहे. अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेची स्थापना हीच मुळात महात्मा फुल्यांच्या सत्यशोधकी विचारांतून झाली आहे ही उल्लेखनीय व विशेष बाब आहे. त्यामुळे परिषदेच्या माध्यमातून चालविल्या जाणाऱ्या शाळा, महाविद्यालयातून उपेक्षित, बहुजनांचा विकास ही भूमिका घेतली जाते. महात्मा फुले यांच्या समतावादी विचारांची छाप या संस्थेच्या कामातून स्पष्टपणे जाणवते. परिषदेच्या पहिल्या अधिवेशनात चंद्राबाई पवार यांनी वाचलेला निबंध, त्यात केलेली मांडणी यावरून समतेच्या विचारांची दिशा स्पष्ट होते. पहिल्या अधिवेशनाच्या आयोजनात सत्यशोधकी कार्यकर्त्यांचा पुढाकार, अधिवेशनासाठी छत्रपती शाहू महाराजांनी केलेली आर्थिक मदत या गोष्टी परिषदेच्या हेतू व भूमिकेत समजून घेण्यासाठी पूरकच आहेत. महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या अखिल भारतीय मराठी शिक्षण परिषदेतील सहभाग हा नोंद घेण्यासारखा आहे.

एकूणच एकोणिसाव्या शतकातील ब्रिटिशांच्या उदयानंतरच्या घडामोडी, ब्राह्मणी वर्चस्व यातून बहुजन व उपेक्षित समाजाची, स्त्रियांची झालेली गळचेपी या साऱ्यांना एक विधायक प्रतिक्रिया म्हणजे अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेची स्थापना होय. वर्णवर्चस्व, सामाजिक विषमता, तत्कालीन शैक्षणिक अप्रगती याला छेद देण्यासाठी व बहुजन उपेक्षित समाजासाठी शैक्षणिक प्रबोधन करण्यासाठी अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेची स्थापना झाली. शतक पूर्ण केलेली ही संस्था आजही बहुजनांच्या कल्याणासाठी झटणारी अग्रणी संस्था म्हणून ओळखली जाते.

### २.१.८ दी डिप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटी ऑफ इंडिया (१९०८) :

पुणे शहरात मागासवर्गीय समाजाच्या शिक्षणासाठी ध्येयवादी वृत्तीतून अनेक शिक्षणसंस्था सुरु करण्यात आल्या आहेत. अशा संस्थांच्या किंवा अशा स्वरुपाच्या  कार्याची परंपरा सन १९४८ मध्ये महात्मा फुले यांनी काढलेल्या शाळेपर्यंत नेता येते. महात्मा फुले यांनी मागासवर्गीय, उपेक्षित वर्गाच्या कल्याणासाठी शिक्षणाचे काम हाती घेतले होते. अशाच ध्येयवादी वृत्तीने, अतिशय तळमळीने स्थापन करण्यात आलेली संस्था म्हणजे 'डिप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटी ऑफ इंडिया' ही होय या संस्थेची स्थापना इ. स. १९०८ मध्ये महर्षी वि. रा. शिंदे यांनी स्थापना केली.

या संस्थेचे उपेक्षितांच्या शैक्षणिक विकासात महत्त्वाचे योगदान आहे. संस्थेचे संस्थापक महर्षी वि. रा. तथा अण्णासाहेब शिंदे हे सामाजिक आंदोलनात व चळवळीत आघाडीवर होते.

'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न' हा संशोधनात्मक ग्रंथ अत्यंत कष्टपूर्वक लिहून त्यांनी अस्पृश्यतेच्या प्रश्नाची आंतरराष्ट्रीय पातळीवर चर्चा घडवून आणली.

संस्थेने प्रारंभी एकच शाळा सुरु केली होती. पुढे इ. स. १९०९ मध्ये गंज पेठेत रात्रशाळा व मंगळवार पेठेत रात्रशाळा व प्राथमिक शाळा सुरु करण्यात आल्या. संस्थेच्या पहिल्या वाढदिवसाच्या समारंभात पुण्याच्या शैक्षणिक इतिहासात पहिल्यांदा ब्राह्मण, मराठा, महार, मांग, चांभार व भंगी या समाजांचे लोक एकाच स्टेजवर एकत्रित आल्याचा समाधानपूर्वक उल्लेख संस्थेच्या महर्षी वि. रा. शिंदे यांच्या जन्मशताब्दी वर्षात प्रसिद्ध करण्यात आलेल्या स्मरणिकेत करण्यात आला आहे.[२१] पुढे सन १९३४ मध्ये संस्थेने मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरिता कॉलेज व वसतिगृह सुरू केले. त्याचबरोबर प्राथमिक शाळा, अहिल्याश्रम मुलींची शाळा व रात्रशाळा संस्थेने चालू केल्या होत्या.

'दी डिप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटी ऑफ इंडिया' या संस्थेची १९३४ साली महात्मा गांधींनी व १९५२ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पाहणी करून समाधान व्यक्त केले होते.[२२] डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा गांधी यांच्यासारख्या मागासवर्गीयांच्या उन्नतीसाठी झटणाऱ्या दोन महापुरुषांनी सोसायटीच्या कार्याबद्दल समाधान व्यक्त केल्याची ही नोंद अतिशय महत्त्वाची आहे.

शिक्षणाला गती देणे, सामाजिक दुर्बलता नाहीशी करणे, विद्यार्थ्यांना व्यवसायिक शिक्षण देणे आणि उदारधर्माची तत्त्वे सांगून विद्यार्थ्यांना संस्कारित करणे या उद्दिष्टांनुसार संस्थेचे कार्य चालू आहे. महर्षी वि. रा. तथा अण्णासाहेब कर्वे यांनी अस्पृश्योध्दारासाठी काम केले आहे. मागासवर्गीयांच्या प्रगतीसाठी शिक्षण अत्यंत आवश्यक आहे त्यामुळे मागासवर्गीयांच्या शिक्षणासाठी भरपूर प्रयत्न झाले पाहिजेत असे अण्णासाहेब शिंदे यांना वाटत होते. म्हणूनच त्यांनी डिप्रेस्ड क्लासेस मिशनच्या माध्यमातून मागासवर्गीयांच्या शिक्षणासाठी प्रयत्न केले. त्यांचे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामध्ये काही मुद्यांवर मतभेद असले तरी संस्थेच्या कामाबाबत मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाधान व्यक्त केले होते.

## २.१.९ पुणे सेवासदन सोसायटी (१९०९) :

स्त्रियांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी इ. स. १९०९ मध्ये पुणे सेवासदन सोसायटीची स्थापना करण्यात आली. न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांच्या पत्नी रमाबाई रानडे यांच्या कार्यातून ही संस्था उभी राहिली. रमाबाई रानडे यांनी १९०९ साली 'हिंदू लेडीज क्लब'ची स्थापना केली. परस्पर स्नेहभाव वृद्धिंगत करणे, सामाजिक कर्तव्याची जाणीव करुन देणे, स्त्रियांच्या निसर्गदत्त सेवापरायण वृत्तीला सार्वजनिक हिताची जोड देणे, परोपकाराची, दयाधर्माची कामे करण्यास प्रवृत्त करणे असे

उद्देश प्रस्तुत क्लबची स्थापना करण्यामागे होते. याच उद्देशातून सेवासदन चा जन्म झाला.[२३] थोडक्यात स्त्रियांना शिक्षण देऊन त्यांच्यात सार्वजनिक बांधिलकी निर्माण करण्याची भूमिका 'सेवासदन'ने घेतली होती. सार्वजनिक हितासाठी स्त्रीशिक्षणाचा उपयोग करण्याची उद्दिष्टे सेवासदनने ठेवली असल्याचे दिसून येते.

शिवणकाम, भरतकाम, खेळणी, कागदकाम या शिक्षणाबरोबरच पारिचारिका शिक्षणाची सोयही सेवासदनने स्त्रियांसाठी केली होती. त्याचबरोबर अध्यापक विद्यालयाची स्थापनाही करण्यात आली होती. रमाबाई रानडे यांच्या या शैक्षणिक कार्याला गोपाळ कृष्ण तथा बाबासाहेब देवधर यांची चांगली साथ मिळाली. संस्थेने स्त्रियांसाठी वसतिगृह काढून मुलींना व प्रौढ स्त्रियांना मोठा आधार दिला होता.

पुणे सेवासदन सोसायटीने मुली व प्रौढ स्त्रियांच्या शिक्षणासाठी केलेले कार्य निश्चितच महत्त्वाचे होते. पुण्याच्या शिक्षणक्षेत्रातील लौकिकात भर टाकण्याचे काम या संस्थेने केले. स्त्रियांमधील नैसर्गिक असणाऱ्या बुध्दिचा वापर सर्व समाजाला व्हावा असा या संस्थेचा स्त्रियांना शिक्षण देण्यामागचा उद्देश सध्याच्या शिक्षणपद्धतीच्या अनुषंगानेही अत्यंत महत्त्वाचा आहे. सेवासदनाच्या माध्यमातून अनेक गरीब होतकरु गरजू स्त्रियांना शैक्षणिक लाभ करण्याच्या हेतुने सेवासदन सोसायटीची स्थापना करण्यात आली होती. भरतकाम, शिवणकाम, खेळणी, कागदकाम चे शिक्षण विद्यार्थिनींना देण्यामागे उद्देश होता की स्त्रियांना स्वावलंबन लाभावे त्यांना आर्थिक स्थैर्य प्राप्त व्हावे. विसाव्या शतकाच्या सुरुवातीस अनेक स्त्रियांना लहानपणी शाळेत जाता आले नव्हते. परंतु त्यांना शिक्षण घेण्याची जिद्द होती, काही नवीन शिक्षण घेण्यास त्या स्त्रिया उत्सुक होत्या अशा स्त्रियांच्या शैक्षणिक जडणघडणीमध्ये पुणे सेवासदनचे योगदान निश्चितच कौतुकास्पद आहे. अनेक प्रकारच्या शिक्षणामुळे महिलांमध्ये आत्मसन्मान जागृत झाले, अनेक स्त्रियांना आर्थिक स्थैर्यता प्राप्त झाली. आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी झालेल्या स्त्रियांना आपल्या कुटुंबासाठी हातभार लावता आला.

न्या. महादेव गोविंद रानडे यांच्या भक्कम पाठिंब्यामुळे रमाबाई रानडे यांना शैक्षणिक व्याप वाढवता आला. अनेक स्त्रियांना यामध्ये सहभागी करून घेण्यात आले. स्वातंत्र्यपूर्व काळात एवढ्या मोठ्या प्रमाणात दूरदृष्टीचे शिक्षण देऊन स्त्रियांना खंबीर बनवण्यासाठीचा रमाबाई रानडे यांनी पुणे सेवासदनच्या माध्यमातून केलेला प्रयत्न महत्त्वाचा आहे.

## २.१.१० पुणे विद्यार्थी गृह (१९०९) :

पुणे विद्यार्थीगृहाच्या स्थापनेचा इतिहास आपण समजून घेतला तर स्वातंत्र्यपूर्व काळात शिक्षणप्रसाराच्या ध्येयाने एक मूलभूत स्वरुपाचे काम पुण्यात किती मोठ्या प्रमाणावर व विविधांगाने सुरु होते याची अमूल्य माहिती मिळते. महात्मा ज्योतिराव फुले यांनी शिक्षणाच्या क्षेत्रात संपूर्ण देशपातळीवरील व जगाला प्रेरणा देणारी क्रांती केली ती पुणे शहरातूनच केली होती. त्यामुळे त्यांच्या शैक्षणिक कार्याचा प्रभाव पुण्यात असणे किंवा वाटणे या स्वाभाविक गोष्टी होत्या. महात्मा फुले यांनी समाजातील प्रथा लोकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे काम केले की ज्यांना येथील धर्मव्यवस्थेने शिक्षणापासून वंचित ठेवले होते. समाजातील दुर्लक्षित घटकांना शिक्षण देण्यासाठी महात्मा फुले यांच्या प्रेरणेतून व राष्ट्रीय शिक्षणाच्या प्रेरणेतून ज्या शिक्षण संस्था स्थापन झाल्या त्यामध्ये पुणे विद्यार्थी गृहाचे स्थान अत्यंत वरचे आहे.

एकोणिसाव्या शतकातील शैक्षणिक क्रांतीमुळे पुण्याचे नाव शैक्षणिक क्षेत्रात लौकिकप्राप्त ठरले होते. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रातून विविध भागातील विद्यार्थी शिक्षणाच्या महत्त्वकांक्षेने पुण्यात येत असत. गरीब परंतु लायक व होतकरु विद्यार्थ्यांना शिक्षण मिळावे या उद्देशाने त्यांच्या शिक्षणाची सोय करण्यासाठी पुणे विद्यार्थी गृह (पूर्वीचे नाव -पुणे अनाथ विद्यार्थी गृह) या संस्थेची स्थापना १२ मे १९०९ रोजी झाली. ही संस्था स्थापन करण्यात दिवाण बहादूर गोडबोले, बाळूकाका कानिटकर, तात्यासाहेब पटवर्धन व नानासाहेब परूळेकर यासर्वांचा प्रमुख सहभाग होता.

दादासाहेब केतकर हे 'पुणे विद्यार्थी गृह' या संस्थेचे संस्थापक होत. डॉ. ग. श्री. खैर, बाबासाहेब गांगल यांच्यासारखे सेवाभावी आजीव सदस्य या संस्थेच्या उभारणीत कष्ट घेत होते. कोणत्याही गरीब परंतु शिक्षणाची महत्त्वाकांक्षा असलेल्या विद्यार्थ्याला कोणत्याही परिस्थितीत शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी पुणे विद्यार्थी गृहाची स्थापना झाली होती. म्हणजेच संस्थेच्या स्थापनेचा उद्देशच अत्यंत उदात्त व विधायक अशा स्वरुपाचा आहे.

संस्थेचे संस्थापक दादासाहेब केतकर हे स्वदेशी चळवळीतील एक धडाडीचे कार्यकर्ते होते. यवतमाळ येथील शाळेत शिक्षक म्हणून काम करताना तेथे ते हरिकिशोर या नावाच्या स्वदेशी वर्तमानपत्राचे संपादक झाले. पुढे १९०९ मध्ये पुण्यातील 'न्यू इंग्लिश स्कूल' मध्ये त्यांनी नोकरी स्वीकारली. नंतर पुणे अनाथ विद्यार्थी गृहाचे व्यवस्थापक पद सांभाळले. पुढे १९१४ मध्ये विद्यार्थ्यांना राष्ट्रीय शिक्षण देण्याच्या उद्देशाने बाळूकाका कानिटकर यांच्या सहकार्याने 'पुणे विद्यार्थी गृह' या पाठशाळेची स्थापना झाली. तांत्रिक व औद्योगिक शिक्षणाचा प्रथम प्रयत्न याच शाळेच्या

माध्यमातून घालण्यात आला. सरकारच्या रोषास बळी न पडता संचालकांनी यशस्वीपणे ही राष्ट्रीय शाळा चालवली. या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना सरकारी शाळेत प्रवेश मिळण्यास अडचण येणार नाही. मॅट्रीक होण्याचा व पुढे कॉलेजात जाण्याचा मार्ग बंद होणार नाही याची काळजी संस्थेने घेतली.[२४] सन १९१७ साली संस्थेने पटवर्धनांनी देणगी दिलेल्या वाड्यात स्थलांतर केले.

या संस्थेला तत्कालीन अनेक मान्यवर राष्ट्रीय नेत्यांनी भेटी दिल्या होत्या, यामध्ये महात्मा गांधी, लोकमान्य टिळक यांचा समावेश होता. टिळकांनी संस्थेच्या कार्याचे कौतुक करुन देशाचे भावी नेते तयार करण्याचा आशावाद व्यक्त केला होता. अनाथ विद्यार्थ्यांची जोपासना करण्याचे हे महान कार्य आहे. या कार्यास लोकाश्रय मिळावा अशी इच्छाही त्यांनी व्यक्त केली होती. त्याचबरोबर सुभाषचंद्र बोस, स्व. वि. दा. सावरकर, पं. मदनमोहन मालवीय, सी. व्ही. रमण, साने गुरुजी यांनी संस्थेस भेटी देऊन समाधान व्यक्त केले होते. गांधीजींच्या असहकार आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर बाळूकाका कानिटकर व दादासाहेब केतकर यांच्यात मतभेद झाले. बाळूकाकांनी स्वावलंबन राष्ट्रीय शाळा चिंचवड येथे सुरू केली. दादासाहेबांच्या कार्यात नानासाहेब परुळेकर व अण्णासाहेब खैर यांची मोलाची मदत झाली. १९२१ मध्ये पुण्यात महाराष्ट्र विद्यालयाची स्थापना करण्यात आली.

संस्थेचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रारंभापासूनच औद्योगिक व व्यावसायिक शिक्षण सुरु केले होते. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाबरोबरच शारीरिक तंदुरुस्तीवरही भर देण्यात आला होता. सुतारकाम, लोहारकाम, मातीकाम यांचेही शिक्षण विद्यार्थ्यांना दिले जाई. नानासाहेब परुळेकर हे संस्थेचे माजी विद्यार्थी नंतर दादासाहेबांच्या पुणे अनाथ विद्यार्थी गृहाच्या कामातील सहकारी झाले होते. दादासाहेबांच्या सल्ल्याप्रमाणेच त्यांनी 'सकाळ' वृत्तपत्राची स्थापना केली. नाशिकमध्येही पुणे अनाथ विद्यार्थी गृहाची शाखा सुरु करण्यात आली. स्वातंत्र्यपूर्व काळात शासनाच्या निधीशिवाय औद्योगिक शिक्षण देणारी ही पहिलीच संस्था होती.

दिनांक १२ मे १९५९ रोजी संस्थेला ५० वर्षे पूर्ण झाली. १९६९ ला हिरकमहोत्सव संपन्न झाला. त्यावेळी नानासाहेब परुळेकर यांनी एक भूमिका मांडली. या संस्थेचे सर्व विद्यार्थी त्याग, निर्मल जीवन, सदाचारी व बुध्दिमान आहेत. अशा विद्यार्थ्यांना अनाथ म्हणणे योग्य नाही. त्यामुळे 'अनाथ' हा शब्द संस्थेच्या नावातून काढावा. सर्वांचेच मत लक्षात घेऊन संस्थेच्या कार्यकारी मंडळाने संस्थेच्या नावातील 'अनाथ' शब्द वगळून 'पुणे विद्यार्थी गृह' हे नाव स्वीकारले.[२५] तेव्हापासून अनाथ पुणे विद्यार्थी गृह ऐवजी पुणे विद्यार्थी गृह या नावाने ही संस्था परिचित झाली.

संस्थेचा विस्तार नंतरच्या काळात वाढतच गेला. संस्थेच्या एकूण पाच शाखा असून एकंदर ३९ विविध विभाग आहेत. सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मिळून सुमारे १२०० कर्मचारी वर्ग आहे. तर संस्थेच्या विविध शैक्षणिक विभागांमध्ये सुमारे १७००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.[२६] नाशिक व पुणे-मुंबईतील शाखांचा कारभार अतिशय उत्तम रीतीने सुरु आहे.

एकंदरीत पुण्यातील गरीब व होतकरु विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी सुरु करण्यात आलेली ही संस्था १०० वर्षे पूर्ण करुन तेवढ्याच कार्यक्षमतेने विद्यार्थी हिताची भूमिका घेऊन यशस्वीपणे वाटचाल करीत आहे. पुण्याच्या शैक्षणिक विकासात या संस्थेचे योगदान महत्त्वाचेच आहे.

## २.१.११ श्री शिवाजी मराठा सोसायटी पुणे (१९१८) :

'शिक्षणातून समाजोध्दार' या विचारातून पुणे शहरात मराठा समाजाच्या तीन शिक्षण संस्थांनी शिक्षण प्रसाराचे कार्य केले आहे. इ. स. १९१८ साली प्राचार्य बा. ग. तथा बाबुराव जगताप यांनी मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शाळा सुरु करुन शिक्षण प्रसाराला आरंभ केला होता. तत्पूर्वी त्यांनी मराठा भ्रातृमंडळ मार्फत प्रौढ शिक्षणाचेही कार्य सुरु केले होते. पुढे बाबुराव जगताप, बाबुराव जेधे, बाबुराव घोलप यांनी एकत्र येऊन श्री शिवाजी मराठा सोसायटीची स्थापना केली.

बहुजन समाजाच्या उन्नतीसाठी प्रयत्न करणे, राष्ट्रीय कर्तव्य पार पाडण्यास मराठा समाजास समर्थ करणे इ. उद्दिष्टे या सोसायटीने दृष्टीपुढे ठेवली होती.[२७] या संस्थेची उद्दिष्टे समजून घेतली. मराठा बहुजन समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी शैक्षणिक काम करण्याची भूमिका आपल्या लक्षात येते. सध्या या सोसायटीच्या अध्यक्षपदी श्रीमंत छत्रपती शाहू महाराज (कोल्हापूर) हे आहेत. उपाध्यक्ष म्हणून सोपानराव दिनकरराव जगताप (पुणे) ऑनररी सेक्रेटरी म्हणून शशिकांत शंकरराव सुतार (पुणे) तर ऑनररी सेक्रेटरी म्हणून सौ. कमल ज्ञानराज व्यवहारे (पुणे) हे काम पाहत आहेत. खजिनदारपदी श्री. प्र. दी. उर्फ आबासाहेब शिंदे, नियामक मंडळाच्या अध्यक्षपदी सुरेश विश्वनाथ खैरे, कारभारी मंडळाच्या अध्यक्षपदी साहेबराव राजाराम जाधव हे आहेत.

'श्री शिवाजी मराठा सोसायटी' पुणे या संस्थेच्या वतीने हायस्कूल, ज्युनिअर कॉलेज, प्रायमरी स्कूल, अध्यापक विद्यालय, महाविद्यालय, विधी महाविद्यालय, बालमंदिर, मराठा वसतिगृह, इंग्लिश मिडिअम स्कूल अशा १७ शाखा कार्यरत आहेत. या १७ शाखांमध्ये १२३४९ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. ५४८ शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी काम करीत आहेत.[२८]

श्री शिवाजी मराठा सोसायटी पुणे ही संस्था सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट नंबर XXI सन १८६० प्रमाणे दि. १०.६.१९२१ रोजी रजिस्टर झाली आहे. तर बॉम्बे पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९५० (BOM XXI 1950) प्रमाणे दिनांक १०.१०.१९५२ रोजी रजिस्टर झाली आहे.[२९] छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने स्थापन झालेल्या या संस्थेने पुण्यातील शैक्षणिक क्षेत्रात महत्त्वाचे योगदान दिले आहे. बहुजन समाजाच्या उन्नतीसाठी राष्ट्रकार्यासाठी शिक्षणाच्या माध्यमातून योगदान देण्यासाठी संस्थेची स्थापना करण्यात आली होती. आज १७ शाखांच्या मार्फत या संस्थेचा अत्यंत चांगला कारभार सुरु आहे. पुण्याच्या शिक्षण क्षेत्रातील एक महत्त्वाची संस्था असा लौकिक या संस्थेने जपला आहे.

## २.१.१२ दी ऑल इंडिया शिवाजी मेमोरिअल सोसायटी (१९२१) :

छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मृतींना भव्य सभागृहाच्या माध्यमातून चिरंतन बनवावे, त्यांचा भव्य पुतळा उभारावा या उद्देशाने सन १९२१ मध्ये 'दी ऑल इंडिया श्री शिवाजी मेमोरिअल सोसायटी' स्थापन करण्यात आली.[३०] संस्थेने केलेल्या संकल्पाप्रमाणे १६ जून १९२९ रोजी शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे उद्‌घाटन झाले. १९३१ मध्ये 'श्री शिवाजी स्मारक सभागृह' बांधण्याचा संकल्पही सत्यात उतरला.

पुढे या वास्तुत लष्करी शिक्षण देणारी शाळा असावी असा विचार करुन सोसायटीने १९३३ साली 'श्री शिवाजी प्रिपरेटरी मिलिटरी स्कूल' ही वसतिगृह युक्त शाळा सुरु केली. इ. स. १९३४ साली शाळेला पुण्यातील मुळा-मुठेच्या संगमाजवळ पंचवीस एकर जागा उपलब्ध झाली. बौद्धिक अभ्यासक्रमाबरोबरच अश्वारोहण, पोहणे, नौकानयन, विविध परदेशी खेळ यांची सुविधा शाळेत करण्यात आली. पुण्याच्या खडकवासला येथील 'राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी' (एन.डी.ए.) मध्ये अधिकाधिक मुलांनी प्रवेश घ्यावा व त्या दृष्टीने त्यांची तयारी करुन घ्यावी हा दृष्टिकोन या शाळेने सतत ठेवला आहे.

या संस्थेच्या वतीने AICTE मान्यताप्राप्त इंजिनिअरिंग महाविद्यालय सुरु असून या महाविद्यालयात केमिकल, सिव्हील, कॉम्प्युटर, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक, मेकॅनिकल, प्रॉडक्शन अशा प्रकारच्या ज्ञानशाखांद्वारे शिक्षण दिले जाते. 'AISSMS College of Engineering Pune' या नावाने स्थापन झालेले हे महाविद्यालय अल्पावधीतच नावारुपास आले आहे. तसेच या

संस्थेच्या वतीने व्यवस्थापन शास्त्र औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल मॅनेंजमेंट, माहिती तंत्रज्ञान अशा प्रकारचे शिक्षण दिले जाते.

श्री शिवाजी प्रिपरेटरी मिलिटरी स्कूल (१९२१) :

इ. स. १९२१ साली स्थापन झालेल्या 'दी ऑल इंडिया श्री शिवाजी मेमोरिअल सोसायटी' या संस्थेचा विस्तार व कार्य या विषयी प्रस्तुत प्रकरणात विवेचन करण्यात आले आहे. या संस्थेने स्थापनेच्या वेळी संकल्प केल्याप्रमाणे १६ जून १९२८ रोजी शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे उद्‌घाटन केले व १९३१ साली 'श्री शिवाजी स्मारक सभागृह' बांधण्याची कल्पनाही साकार केली. पुढे या वास्तूतच १९२३ साली 'श्री शिवाजी प्रिपरेटरी मिलिटरी स्कूल' ही वसतिगृहयुक्त शाळा सुरु करण्यात आली. लष्करी शिक्षण देण्याच्या उपक्रमामुळे या शाळेने पुण्यासह संपूर्ण राज्यात आपले वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण केले आहे. या शाळेत शिक्षण घेतलेले अनेक विद्यार्थ्यांनी वैद्यकीय, अभियांत्रिकी, व्यापार उद्योग, कृषी, शिक्षण आणि विशेषत: संरक्षण खात्यात यशस्वी झाले आहेत.

सन १९३३ साली या शाळेचे रीतसर उद्‌घाटन झाले. १९३३ च्या सप्टेंबर महिन्यात मुंबई विद्यापीठाने या शाळेला मान्यता दिली. पुढे १९३४ च्या सप्टेंबर महिन्यात या संस्थेने २५ एकराची जागा ताब्यात घेऊन लष्करी शिक्षण देण्याची फार मोठी सोय करुन दिली. मुळा-मुठा नदीच्या संगमावर असणारी ही शाळा पुण्याच्या शैक्षणिक लौकिकात भर टाकणारी ठरली आहे. वास्तविक 'दी ऑल इंडिया श्री शिवाजी मेमोरिअल सोसायटी' या संस्थेविषयी आपण माहिती घेतली आहे. परंतु याच संस्थेच्या श्री शिवाजी प्रिपरेटरी मिलिटरी स्कूल या शाळेविषयी स्वतंत्र व विस्ताराने मांडणी करण्याचे कारण हेच आहे की या शाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना लष्करी शिक्षण देण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली. त्यामुळे लष्करी शिक्षणाच्या दृष्टीने विचार करता या शाळेचे योगदान निश्चितच मोठे आहे. म्हणून या शाळेविषयी प्रस्तुत ठिकाणी विस्ताराने मांडणी करण्याचे ठरविले आहे. सन १९४० साली माध्यमिक शाळेला जोडून प्राथमिक शाळेच वर्ग भरण्यास सुरुवात झाली. प्राचार्य मि. सॅडलियर यांच्या काळात शैक्षणिक निकाल उत्तम लागत असल्याचे पाहून मुंबई सरकारने शाळेला तीन शिष्यवृत्या जाहीर केल्या.

कोल्हापूरचे छत्रपती राजाराम महाराज यांनी या शाळेची धुरा सांभाळली होती. सामाजिक आणि राष्ट्रीय उभारणीत या शाळेने महत्त्वाचे योगदान दिले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या संख्येत भर पडत आहे. पारंपरिक शिक्षणाबरोबरच क्रीडा व लष्करी शिक्षणाला महत्त्व मिळत असल्याने या

शाळेतील विद्यार्थी हुशार आहेत. कला व इतर गुणांना वाव देण्यासाठी या शाळेत विशेष प्रयत्न केले जातात. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण करण्यासाठी ही शाळा सातत्याने प्रयत्नशील असते.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने कार्यरत असणारी ही शाळा त्यांच्याच विचारांचा संस्कार मुलांवर करण्याचा प्रयत्न करत आहे. शिवाजी महाराजांनी आयुष्यभर ज्या मूल्यांची पाठराखण केली त्या स्वातंत्र्य, समता, बंधुता, सहिष्णुता व धर्मनिरपेक्षता या मूल्यांची प्रस्थापना विद्यार्थ्यांच्या मनामध्ये व्हावी हा हेतू ठेवून ही शाळा कार्यरत आहे. शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेच्या माध्यमातून जे लोककल्याणकारी राज्याचे स्वप्न पाहिले होते त्याच स्वप्नाच्या पूर्ततेसाठी जबाबदार, देशप्रेमी नागरिक घडविणारी ही शाळा आहे. सन १९३१ साली या संस्थेचे अध्यक्ष असणारे छत्रपती राजाराम महाराज या शाळेविषयी, 'ही शाळा म्हणजे आमच्या घराण्यातील अत्यंत आदरणीय पुण्य पुरुषाचे चिरंतन स्मारक होय.'[३१] असे गौरवोद्‌गार काढले होते. म्हणजेच छत्रपती शिवाजी महाराजांसारख्या एका युगप्रवर्तक महापुरुषाच्या विचार व कार्याचा आदर्श घेऊन वाटचाल करणारी ही शाळा आहे, हे स्पष्ट होते.

### २.१.१३ टिळक महाराष्ट्र विद्यापीठ (१९२१) :

राष्ट्रीय शिक्षणाची भूमिका घेऊन शिक्षणाचे कार्य करणारी पुण्यातील आणखी एक महत्त्वाची शिक्षण संस्था म्हणजे 'टिळक महाराष्ट्र विद्यापीठ' होय. या संस्थेने केवळ महाराष्ट्रापुरतेच नाही तर संपूर्ण देशपातळीवर आपल्या शैक्षणिक कार्याचा ठसा उमटविला आहे. लोकमान्य टिळकांचे स्मारक म्हणून या संस्थेला टिळक महाराष्ट्र विद्यापीठ असे नाव देण्यात आले आहे.[३२] सन १९२१ साली पुण्यात स्थापन झालेली ही शिक्षण संस्था पुण्यातील एक अग्रणी शिक्षण संस्था मानली जाते व पुढे याच संस्थेचे खाजगी विद्यापीठात रूपांतर झाले.

वाङ्मयशास्त्र, स्थापत्य, व्यापार, आयुर्वेद, ललितकला इ. विविध शिक्षणशाखांचे अध्ययन व अध्यापनाची व्यवस्था या संस्थेने केली आहे. 'संस्कृत भाषेला महत्त्वाचे स्थान द्यावयाचे, संस्कृत विषयाच्या विविध स्तरावरील परीक्षांचे संपूर्ण आयोजन करायचे, विद्यापीठाचे माध्यम मराठी भाषा ठेवावयाचे, वैदिक संशोधनात्मक कार्य हाती घ्यावयाचे इ. उद्दिष्टे संस्थेने ठेवली होती.[३३] याशिवाय भारतीय वारशाचे संवर्धन करणाऱ्या अभ्यासक्रमाखेरीज विद्यापीठाने सामाजिक गरजांच्या अनुषंगाने मॅनेजमेंट, कॉम्प्युटर सायन्स, हॉटेल मॅनेजमेंट, मास कम्युनिकेशन, ॲनिमेशन, समाजकार्य, नर्सिंग व फिजिओथेरपी या क्षेत्रातही भरीव योगदान दिले आहे.[३४]

महात्मा गांधीजींनी पुकारलेल्या असहकार चळवळीत टिळक विद्यापीठाच्या १२५ पेक्षा अधिक शिक्षकांनी आणि ८०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी भाग घेतल्याची नोंद आढळते. त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे या विद्यापीठात इस्लामपूरचे आचार्य शं. द. जावडेकर (इतिहास, राज्यशास्त्र), महाडचे आचार्य स. ज. भागवत ( तत्त्वज्ञान) व सांगलीचे आचार्य वि. प्र. लिमये (वाङ्‌मय) इत्यादी अध्यापकांनी आपल्या विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेमाचे धडे गिरविलेले होते. त्यामुळे शिक्षणाबरोबरच राष्ट्रीय आंदोलनाशी देखील टिळक महाराष्ट्र विद्यापीठाची जवळीकता निर्माण झालेली होती.[३५] अर्थात तिला सर्वस्वी लोकमान्य टिळकांची प्रेरणा लाभलेली होती.

### २.१.१४ विद्या प्रसारिणी सभा (१९२२) :

'विद्या प्रसारिणी सभा' या संस्थेची स्थापना सन १९२२ मध्ये करण्यात आली.[३६] शैक्षणिकदृष्ट्या दुर्लक्षित, अल्पशिक्षित अशा पुण्याच्या शैक्षणिक प्रवाहात आणण्यासाठी ही संस्था स्थापन करण्यात आली. संस्थेच्या स्थापनेमध्ये श्री. गो. चि. अनगळ यांचा विशेष पुढाकार होता. या संस्थेची शाळा रविवार पेठेतल्या फडके वाड्यात स्थापना झाली तेव्हा शाळेचा आर्थिक प्रश्न सोडवण्यासाठी श्री. अनगळ यांनी संस्थेला ५०० रु. देणगी दिली व अनेक लोकांना त्यांने शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले त्यामुळे या कालावधीत अनेक लोकांनी विद्या प्रसारिणी सभा या संस्थेला अनेकांनी अर्थसहाय्य देऊन मदत केली.

श्री. गो. चि. अनगळ यांनी संस्था स्थापन करत असताना हेच ध्येय ठेवले होते की, पुण्याच्या पूर्व भागातील शैक्षणिक गरजा पूर्ण झाल्या पाहिजेत. या भागातील विद्यार्थ्यांना शिक्षण घेता आले पाहिजे. शैक्षणिक दुर्लक्षित, अल्पशिक्षित विद्यार्थ्यांना शिक्षण घेता आले पाहिजे. ही शैक्षणिक उद्दिष्टे समोर ठेवल्याने अनंत संकटावर मात करत विद्या प्रसारिणी सभा या संस्थेला पूर्व भागातील विद्यार्थ्यांना शिक्षण देता आले. स्वातंत्र्यपूर्व कालावधीमध्ये सुरु झालेली ही शिक्षणसंस्था विद्यार्थ्यांना राष्ट्रीय शिक्षण देखील देत असे. विद्यार्थ्यांमध्ये प्रज्वल राष्ट्राभिमान जागृत करून एक आदर्श चारित्र्यसंपन्न युवा पिढी घडवण्यासाठी संस्थेच्या माध्यमातून झालेले प्रयत्न कौतुकास्पद ठरतात.

अनेक उपेक्षित, अल्पशिक्षित व शैक्षणिकदृष्ट्या दुर्लक्षित अशा अनेक विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवाहात जाणण्यासाठी या संस्थेने जसे मोठे प्रयत्न केले तसे जाणीवपूर्वक विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देऊन पुण्यातील अनेक विद्यार्थ्यांना या संस्थेने घडवलेले आहे. यामध्ये अर्थतज्ज्ञ कै. शरद केळकर, स्थापत्य विशारद म्हणून देशभर मान्यता पावलेले कै. अप्पासाहेब जोशी यांच्यासह अनेकांचा यामध्ये समावेश आहे.

## २.१.१५ रास्तापेठ एज्युकेशन सोसायटी (१९२७) :

स्वातंत्र्यपूर्व कालखंडातच पुणे एक शैक्षणिक केंद्र म्हणून नावारुपास आले. अनेक शैक्षणिक संस्था पुण्यात स्थापन होऊ लागल्या. अशाच प्रकारे पुण्याच्या पूर्व भागातील आणखी एक महत्त्वाची शैक्षणिक संस्था म्हणून रास्ता पेठ एज्युकेशन सोसायटीचा निर्देश करता येतो. पुणे शहरातील एका मोठ्या लोकवस्तीचे उपनगर म्हणून रास्तापेठ ओळखली जात असे. त्यामुळे या भागात बालवयातील मुलांची संख्या देखील अधिक होती. परंतु शाळा मात्र नव्हती. म्हणूनच या भागातील विद्यार्थ्यांना शालेय शिक्षण मिळावे व तेही रास्ता पेठ या भागातच एखादी शैक्षणिक संस्था असावी या भावनेतून 'रेव्हरंड सावरकर, कर्नाटकी, मुदलियार, रावसाहेब दीक्षित यांनी पुढाकार घेऊन १९२७ साली या संस्थेची स्थापना केली.'[३७]

संस्था स्थापन झाली तेव्हा केवळ प्राथमिक दर्जाचे शिक्षण दिले जात असे. कालांतराने मात्र विद्यार्थ्यांची वाढती गरज लक्षात घेऊन, म्हणजेच प्राथमिक शाळेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना माध्यमिक शाळेतील शिक्षण घेण्यासाठी अन्य ठिकाणी जावे लागत असे. यामुळे पुढे माध्यमिक शाळा देखील सुरु करण्यात आली. या माध्यमिक शाळेच्या माध्यमातून रास्तापेठ भागातील विद्यार्थ्यांना माध्यमिक शाळेतील शिक्षण मिळू लागले. रास्ता पेठ म्हणजे खरेतर कष्टकरी, नोकरदार व कर्मचाऱ्यांना बहुसंख्य भाग. त्यामुळे अनेक मुलांना दिवसभर शाळेमध्ये हजर राहता येत नसे. त्यामुळे संस्थेने या विद्यार्थ्यांना देखील शैक्षणिक प्रवाहात सामील करून घेण्यासाठी रात्रशाळा सुरु केली. रात्रशाळा काढल्याचा मोठा फायदा या भागातील विद्यार्थ्यांना झाला. विद्यार्थी दिवसभर आपल्या कामात व्यस्त असत तर कुटुंबाला हातभार लावण्यासाठी या मुलांची दिवसभर धडपड सुरु असे. मात्र सायंकाळी हे सर्व विद्यार्थी रात्रशाळेत जाऊन शिक्षण घेत असत. रास्ता पेठेतील अनेक विद्यार्थ्यांनी या शाळेचा उपयोग करून घेतला व आपले शिक्षण पूर्ण केले. यावरून असे म्हणता येईल की, जे शिक्षणापासून वंचित राहतात अशा विद्यार्थ्यांसाठी रास्ता पेठ एज्युकेशन सोसायटी या शैक्षणिक संस्थेने केलेले शैक्षणिक कार्य उल्लेखनीय तर आहेच, परंतु पुण्याच्या शैक्षणिक विकासामध्ये समृद्धता बहाल करणारे आहे.

## २.१.१६ मॉडर्न एज्युकेशन सोसायटी (१९३२) :

पुण्यातील एक महत्त्वाची शिक्षणसंस्था म्हणून मॉडर्न एज्युकेशन सोसायटीचा निर्देश केला जातो. पुणे शहराच्या पूर्व भागातील लष्कर परिसरात कार्यक्षेत्र असलेली ही संस्था महाविद्यालयीन व पदव्युत्तर शिक्षण देणारी संस्था आहे. सन १९३२ साली ही संस्था स्थापन झाली. या संस्थेच्या स्थापनेत सर माणकेजी मेहता, प्रो. डी. डी. कपडीया, श्री. ए. बी. सेठना, रावबहादूर आर. के. नायडू, सरदार मुदलियार या व्यक्तिंचा सहभाग होता. प्रो. व्ही. के जोग यांचेही या संस्थेच्या उभारणीत मोठे सहकार्य लाभले. या संस्थेच्या माध्यमातून सुरु करण्यात आलेल्या नवरोजी वाडिया कॉलेज, सर खुस्रो वाडिया टेक्निकल इन्स्टिटयूट आणि नेस वाडिया कॉलेज ऑफ कॉमर्स या तीनही शाखा चांगल्या प्रकारे कार्यरत आहेत.

## २.१.१७ प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी (१९३४) :

शिस्तबद्ध व दर्जेदार शिक्षण देण्याच्या ध्येयवादाने कार्यरत असणारी पुण्यातील एक महत्त्वाची शिक्षणसंस्था म्हणजे प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी. या संस्थेची स्थापना सन १९३४ साली झाली. शंकरराव कानिटकर यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक या संस्थेची स्थापना केली. मॉडर्न हायस्कूल या नावाने ख्यातकीर्त असलेल्या मुलांच्या व मुलींच्या या शाळांनी शैक्षणिक दर्जा कायम ठेवला आहे. माध्यमिक शिक्षणाच्या बाबतीत अभिनव प्रयोग करुन पाहण्यासाठी 'प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी'ची स्थापना करण्यात आली. संस्थेच्या मॉडर्न कॉलेजनेही साहित्य, विज्ञान व वाणिज्य शाखांमध्ये आपले वैशिष्ट्यपूर्ण नाव संपादन केले आहे. गणेशखिंड भागात पोलीसांच्या पाल्यांना शिकवण्याच्या हेतूने त्या भागात संस्थेच्या कार्याचा विस्तार झाला आहे.

'प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या सध्या ४८ शाखा आहेत.[३८] शिशु विद्यामंदिर, गर्ल्स हायस्कूल, प्राथमिक शाळा, इंग्रजी माध्यम शाळा, करिअर गायडन्स सेंटर, शिक्षिका प्रशिक्षण विद्यालय, विधी महाविद्यालय, फार्मसी कॉलेज, शिक्षणशास्त्र कॉलेज, वाणिज्य महाविद्यालय असा संस्थेचा मोठा विस्तार आहे. सध्या या संस्थेच्या कार्याध्यक्षपदी डॉ. गजानन एकबोटे हे असून उपाध्यक्षपदी बाबा चव्हाण, सचिवपदी जगदीश चिंचोरे, सहसचिव कांबळे व शरद इनामदार यांची नियुक्ती आहे. ज्येष्ठ समाजवादी नेते व विचारवंत ग. प्र. प्रधान हे या शाळेचे माजी विद्यार्थी आहेत. शाळेच्या अनेक विद्यार्थ्यांनी आपापल्या क्षेत्रात भरीव असे योगदान देऊन शाळेची कीर्ती वाढविली आहे. माजी क्रिकेटपटू हेमंत दाणी, पायलट ऑफिसर ठोसर, माजी आमदार शा. दा. मोरे, प्राचार्य

मा. य. वैद्य, चित्रकार प्रताप मुळीक, आय.ए.एस. अधिकारी देवरे, गोवा विद्यापीठाचे माजी कुलगुरु पद्माकर दुभाषी, आय.ए.एस. अधिकारी पु. स. पाळंदे हे या संस्थेचे माजी विद्यार्थी आहेत. त्याचबरोबर ज्येष्ठ साहित्यिक अनिल अवचट, हे सुद्धा मॉडर्न हायस्कूलचे माजी विद्यार्थी आहेत.

### २.१.१८ न्यू एज्युकेशन सोसायटी (१९३४) :

न्यू एज्युकेशन सोसायटी या संस्थेच्या माध्यमातून आगरकर हायस्कूलची स्थापना करण्यात आली होती. सन १९३४ साली स्थापन झालेल्या या हायस्कूलचे उद्‌घाटन मराठी साहित्यिक आचार्य अत्रे यांच्या हस्ते करण्यात आले होते. पुण्याच्या पूर्व भागातील मुलींसाठी ही शाळा सुरु करण्यात आली होती. यावेळी बोलताना आचार्य अत्रे म्हणाले होते, 'न्यू एज्युकेशन सोसायटीचे शैक्षणिक कार्य देदिप्यमान आहे. त्यामुळे आगरकर हायस्कूल नवभारताच्या निर्मितीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावेल असा मला विश्वास आहे.'[३९] या शाळेमुळे पूर्व भागातील मुलींची शैक्षणिक सोय झाली. सुधा जोशी, मालती कानेटकर, सुप्रिया वैद्य, गौरी देशपांडे यांच्यासारख्या विविध क्षेत्रातील नामांकित विद्यार्थिनी या शाळेने घडवल्या, हे या शाळेचे यश समजले पाहिजे.

### २.१.१९ पुणे विद्यापीठ (१९४९) :

संपूर्ण देशाचा विचार करता पुणे शहराला शिक्षणाची एक प्रदीर्घ व सशक्त अशी परंपरा मिळाली आहे. याच परंपरेला अधिक व्यापक करण्याचे काम पुणे विद्यापीठाच्या माध्यमातून झाले आहे. सन १९४८ च्या विद्यापीठ कायद्यानुसार 'पुणे विद्यापीठ' स्थापन करण्याचा निर्णय तत्कालीन मुंबई सरकारने घेऊन १० फेब्रुवारी १९४९ रोजी प्रत्यक्षात स्थापना केली.[४०] स्थापनेच्या वेळी बारा जिल्ह्यांचे कार्यक्षेत्र असलेल्या या विद्यापीठाची वाटचाल देशपातळीवर उल्लेखनीय ठरली आहे.

आर्ट्स व फाईन आर्ट्स, शास्त्र, वाणिज्य, कायदा, मेडिसिन ॲन्ड फार्मसी, आयुर्वेद आणि युनानी, होमिओपॅथिक मेडिसिन, अभियांत्रिकी, मुद्रण, वास्तुशास्त्र आणि शिक्षणशास्त्र इ. विद्याशाखांचा कारभार पुणे विद्यापीठात सुरु आहे. आजच्या काळाचा विचार करता पुणे विद्यापीठाने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर आपला लौकिक निर्माण केला आहे. अध्ययन, संशोधन व विस्तार या तीनही बाबतीत पुणे विद्यापीठाने आपल्या ५० वर्षांच्या कालखंडात, उत्कृष्ट प्रगती केल्याचे दिसून येते. पुणे विद्यापीठाचे आतापर्यंत ज्यांनी ज्यांनी कुलगुरुपद भूषविले त्या सर्वांचीच

आंतरराष्ट्रीय पातळीवर एक स्वतंत्र ओळख असल्याचे स्पष्ट होते. ही या विद्यापीठाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे.

### २.१.२० भारती विद्यापीठ (१९६४) :

सन १९६४ साली पतंगराव कदम यांनी स्थापन केलेले भारती विद्यापीठ पुण्याच्या शिक्षण क्षेत्रात आपली स्वतंत्र ओळख निर्माण करून वाटचाल करीत आहे. 'भारतातील विशेषत: महाराष्ट्रातील शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक क्षेत्रात आमूलाग्र व वैचारिक जागृती घडवून आणण्याच्या दृष्टीने भारती विद्यापीठाची स्थापना करण्यात आली आहे. कायदा, वैद्यकीय, अभियांत्रिकी अशा विविध अभ्यासक्रमांची सुविधा भारती विद्यापीठाने करुन दिलेली आहे.

### २.१.२१ एम. आय. टी (महाराष्ट्र इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी ) (१९८३) :

एम.आय.टी. या नावाने अभियांत्रिकी क्षेत्रात काम करणारी उल्लेखनीय व मान्यवर संस्था आहे. या संस्थेची स्थापना १९८३ मध्ये प्रा. विश्वनाथ कराड यांनी केली. कोथरुड परिसरात असणारी ही संस्था झपाट्याने विस्तारत आहे. विविध शैक्षणिक प्रकल्पांच्या माध्यमातून एम.आय.टी. ने महत्त्वाची कामगिरी बजावली आहे. पूर्व प्राथमिक शाळेच्या क्षेत्रातही या संस्थेने पाऊल टाकले आहे. एम.आय.टी. चा लौकिक महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेरही आहे.

### २.१.२२ बी. जे. मेडिकल कॉलेज :

सव्वाशे वर्षांपूर्वी ससून हॉस्पिटलची स्थापना करण्यात आली होती. या हॉस्पिटलला जोडून १९४६ साली बी. जे. मेडिकल कॉलेजची स्थापना करण्यात आली. या हॉस्पिटलचे व्यवस्थापन महाराष्ट्र शासनाकडून करण्यात येते. एम.बी.बी.एस. अभ्यासक्रमासाठी २०० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. तर पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी ३० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. नवीन इमारत व अत्याधुनिक उपकरणे यांची व्यवस्था करण्यात आली आहे. याच महाविद्यालयाने गेल्या शतकभरात पश्चिम महाराष्ट्र व कर्नाटक प्रदेशाला डॉक्टरांच्या अनेक पिढ्या पुरविल्या आहेत.[४१] या विधानातून बी. जे. मेडिकल कॉलेजचे वैद्यकीय शिक्षणातील योगदान लक्षात येते.

### २.१.२३ हरिजन विद्यार्थी सहायक मंडळ :

पुणे शहराच्या पश्चिम भागातील ही एक महत्त्वाची संस्था आहे. मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी ही संस्था कार्यरत आहे. या संस्थेच्या वतीने अशोक विद्यालयाची स्थापना इ. स. १९६६ मध्ये करण्यात आली आहे.

### २.१.२४ लक्ष्मणराव आपटे प्रशाला :

पुण्यातील ही एक वेगळेपण जपणारी शाळा आहे. इतर शाळांनी नाकारलेल्या मुलांची आणि आर्थिक व बौद्धिक मागास असलेल्या विद्यार्थ्यांची ही शाळा आहे. शिशुवर्ग ते कनिष्ठ महाविद्यालयापर्यंतचे वर्ग या शाळेत आहेत. 'शाळा सोडणाऱ्यांची शाळा' किंवा 'जे निराधार ते आमचे आधार' अशी या शाळेबद्दलची प्रतिमा आहे.

### २.१.२५ हुतात्मा राजगुरु विद्यालय :

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्थापन केलेली रयत शिक्षण संस्था ही बहुजन उपेक्षितांच्या शैक्षणिक विकासासाठी कार्यरत असलेली एक अग्रणी संस्था म्हणून ओळखली जाते. याच संस्थेच्या वतीने हुतात्मा राजगुरु विद्यालय, गरीब, कष्टकरी वर्गातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी चालविले जाते.

### २.१.२६ शेतकी महाविद्यालय :

पुण्यात शेतकी महाविद्यालयाची स्थापना सन १९०७ मध्ये करण्यात आली. सरकारतर्फे चालविण्यात येणारे व कृषी शास्त्राचा अभ्यास करणारे हे विद्यालय आहे. या विद्यालयात संपूर्ण आशिया खंडातून विद्यार्थी शिक्षण घेण्यासाठी येत असतात. शेतीविषयक गरजा पुरविण्यासह शेतीविषयक संशोधन, अध्यापन करणे असे विविध कार्य या महाविद्यालयात करण्यात येते.

शेतीसारख्या विषयात अध्ययनाची सुविधा असणारे व संशोधनात चालना देणारे महाविद्यालय म्हणून या महाविद्यालयाची ओळख महत्त्वाची आहे. याबरोबरच मूकबधिर मुलांसाठी काम करणारे 'विनयकुमार रूईया मूकबधीर विद्यालय' हे एक महत्त्वाचे विद्यालय आहे. या विद्यालयाची स्थापना १९५३ साली करण्यात आली आहे. अपंग विद्यार्थ्यांसाठी काम करणारी उल्लेखनीय संस्था म्हणून 'कामायनी' या संस्थेचा निर्देश करावा लागेल. सन १९६४ साली सिंधुताई जोशी यांनी या संस्थेची स्थापना केली.

विश्वकर्मा इंजिनिअरिंग कॉलेज, ज्ञानेश्वर विद्यापीठ तसेच युद्धशास्त्र, सैनिकीकरण व शस्त्रास्त्रे या क्षेत्रातही स्वतंत्र अभ्यास करण्यासाठी व विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी स्थापन करण्यात आलेली 'राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी' सिम्बॉयसिस, पारशी समाजातील लोकांनी १८९३ साली स्थापन केलेली 'सरदार दस्तुर स्कूल' मुस्लिम समाजाच्या व्यवस्थापनाखाली सुरु असलेली 'गुरु नानक हायस्कूल' या संस्थांचाही आवर्जून उल्लेख करणे गरजेचे आहे. या सर्व संस्थांबरोबरच

पुण्यातील एक जुनी नावाजलेली, प्रथितयश अशी संस्था म्हणून महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचा उल्लेख करणे क्रमप्राप्त ठरते. प्रस्तुत संशोधन हे याच संस्थेच्या वाटचालीच्या, विकासाच्या अनुषंगाने असल्याने या प्रकरणात महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या संदर्भात मांडणी केलेली नाही. संशोधनाच्या पुढील भागात या संस्थेविषयीचा सखोल अभ्यास मांडण्यात येणार आहे.

**समारोप :**

पुणे शहरातील शैक्षणिक संस्थांचा विकास व त्यांचे स्वरुप याची प्रस्तुत प्रकरणात चर्चा केली आहे. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी या शिक्षण संस्थेचा अभ्यास करण्यात येणार आहे. त्यामुळे पुण्यातील शिक्षण संस्थांचा अभ्यास व त्यांच्या शैक्षणिक विकासाचा मागोवा घेणे आवश्यक होते. पुण्यातील शैक्षणिक शिक्षण संस्थांच्या विकासाची सांगोपांग चर्चा केल्यानंतर पुणे शहराचे महाराष्ट्राच्या व देशाच्या शैक्षणिक विश्वातील महत्त्वाचे स्थान अधोरेखित होते. पुणे शहरातील विविध शिक्षण संस्थांनी देशाच्या शिक्षण क्षेत्रातील उमटविलेला ठसा किती महत्त्वाचा व देशाच्या जडणघडणीसाठी आवश्यक होता हे सिद्ध होते.

पुण्यातील शिक्षण संस्थांना एकोणिसाव्या शतकातील परिवर्तनाच्या विचाराची परंपरा लाभली आहे. महात्मा ज्योतिराव फुले व सावित्रीबाई फुले यांच्या विचारकार्याने दलित, शोषित, कष्टकरी बहुजन समाजाला शिक्षण देण्यासाठी काही संस्था सहेतुक निर्माण करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने महाराष्ट्र गर्ल्स एज्युकेशन सोसायटी, शारदासदन, अनाथ बालिकाश्रम, पुणे सेवासदन सोसायटी या स्त्रियांच्या शिक्षणाच्या विकासासाठी कार्यरत असणाऱ्या संस्थांचा समावेश होतो.

ब्रिटिशांच्या आगमनानंतर बदलत्या सामाजिक परिस्थितीचे भान ठेवून राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या संस्थांच्या माध्यमातून शैक्षणिक क्षेत्रात पायाभूत कार्य करण्यात आले आहे. देशाला दिशा देणारे व संपूर्ण देशासाठी पथदर्शक अशा स्वरूपाचे हे काम होते. अशा संस्थांमध्ये महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, पुणे विद्यार्थी गृह, डेक्कन एज्युकेशन सोसायटी या संस्था आहेत. राष्ट्रप्रेमाने भारलेले तरुण तयार करुन देशाच्या, समाजाच्या विकासात त्यांनी महत्त्वाचे योगदान द्यावे यासाठी त्यांच्यावर योग्य ते संस्कार करणाऱ्या पुढील संस्था आहेत. शिक्षण प्रसारक मंडळी, विद्या प्रसारिणी सभा, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, मॉडर्न एज्युकेशन सोसायटी अशा विविध संस्थांनी शैक्षणिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण कार्याची नोंद केली आहे.

महात्मा फुले यांच्या सत्यशोधकी विचारांची ऊर्जा घेऊन स्त्रिया, श्रमिक, गरीब व बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासाठी अत्यंत समर्पित भावनेने काही संस्था निर्माण झाल्या.

त्यांनी बहुजनांच्या शिक्षणासाठी सातत्यपूर्ण वाटचाल केली आहे. अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद, दी ऑल इंडिया, शिवाजी मेमोरिअल सोसायटी, श्री शिवाजी मराठा सोसायटी, पुणे या संस्थांचा उल्लेख करावा लागतो.

महात्मा फुले यांच्या परिवर्तनाच्या विचारसूत्राचा आदर्श घेत दलित, अस्पृश्य व मागासवर्गीयांसाठीही विशेषत्वाने शिक्षण संस्था निर्माण झाल्या. त्यामध्ये डिप्रेस्ड क्लासेस मिशन, कॅम्प एज्युकेशन सोसायटी, रास्तापेठ एज्युकेशन सोसायटी, हरिजन विद्यार्थी सहायक मंडळ या संस्थांचा समावेश होतो.

लष्करी शिक्षण देण्यासाठी शिवाजी प्रिपरेटरी स्कूल, एनडीए या संस्थांची स्थापना झालेली आहे. अपंग व मूकबधिर यांच्यासाठी कामायनी, विनयकुमार रुईया मूकबधिर विद्यालय यांसारख्या संस्था आहेत. वैद्यकीय शिक्षण देण्यासाठी बी. जे. मेडिकल कॉलेजसह विविध कॉलेज, इंजिनिअरिंग शिक्षणासाठी एमआयटी, ज्ञानेश्वर विद्यापीठ व इतर संस्थांची स्थापना झाली आहे. कृषी अभ्यासासाठी शेतकी कॉलेज कार्यरत आहेत. राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार उच्च विद्यापिठीय शिक्षणासाठी पुणे विद्यापीठाची स्थापना झाली आहे. उपरिनिर्दिष्ट सर्वच संस्थांची वाटचाल प्रगतिपथावर सुरु आहे. सामाजिक भान ठेवून या संस्थांची वाटचाल सुरु आहे. या संस्थांची स्थापना एका विशिष्ट भूमिकेतून झाल्यामुळे ध्येयवादी वृत्तीने या संस्थांचे व्यवस्थापन चालते. या संस्थांच्या माजी विद्यार्थ्यांची नावे पाहिली तर प्रत्येक क्षेत्रात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर आपापल्या क्षेत्रात आघाडीवर असल्याचे दिसून येते. यावरून या संस्था आपले उद्दिष्ट गाठण्यात यशस्वी ठरल्याचे दिसून येते.

बदलत्या काळानुसार नव्या आव्हानांना तोंड देण्यासाठी या संस्थांनी कामाचा व्याप वाढविला आहे. नव्या परिस्थितीला सामोरे जाताना नवे बदल स्वीकारुन आपली वाटचाल सुरु ठेवली आहे. नव्या शिक्षण संस्थांची स्थापना झाली आहे. त्यामुळे पुणे शहर हे देशातील महत्त्वाचे शैक्षणिक केंद्र म्हणून विकास व मान्यता पावले आहे. म्हणून देशविदेशातील विद्यार्थ्यांची शिक्षणासाठी पुण्यालाच पसंती मिळत आहे. ही बाब पुणे शहराच्या शैक्षणिक वाटचालीचे वेगळेपण व महत्त्व अधोरेखित करणारी आहे.

## संदर्भ आणि टिपा


१. मंजूळ वा. ल., परदेशी विद्यार्थी व अभ्यासकांच्या नजरेतून पुणे आणि पुणेकर, टिकेकर अरूण (संपा.), **शहर पुणे - एका सांस्कृतिक संचिताचा मागोवा**, निळूभाऊ लिमये फौंडेशन, पुणे, २०००, पृ. ५६६.

२. कित्ता, पृ. १९०.

३. कित्ता, पृ. २१६.

४. जोशी आर. पी., **स्मृतीग्रंथ शतक महोत्सव स्मरणिका**, विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे, २००९, पृ. १५०.

५. निकुंभे रमेश, **महात्मा फुलेंचे शैक्षणिक कार्य**, शब्दवेध प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९९८, पृ. १७.

६. बापट जयश्री, **सामा**, लेख, *हुजुरपागा १२५ वर्षांची झाली*, पुणे, २००९, पृ. ४.

७. कित्ता, पृ. ४

८. खिलारे कैलास(संपा), **शतकोत्तर रजतरंग,** वालचंद संचेती, पुणे, २०१२, पृ. २९.

९. कित्ता, पृ. २९.

१०. कांबळे वा. ना., **आठवणीतले बाबासाहेब**, अमेय प्रकाशन, पुणे, २००६, पृ. ५६.

११. महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था गाथा शतकाची, **गौरव ग्रंथ**, पुणे, २००८, पृ. ६.

१२. खोले विलास, **महर्षी धोंडो केशव कर्वे**, श्री गंधर्व प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २०१३, पृ. ८६.

१३. अरूण टिकेकर ( संपा.), **शहर पुणे**, खंड २, निळुभाऊ लिमये फौंडेशन, पुणे, २०००, पृ. २१८.

१४. **ज्ञानप्रकाश**, दि. ६ मार्च १९९०, पृ. ४.

१५. खोले विलास, पूर्वोक्त, पृ. ११८.

१६. अरूण टिकेकर ( संपा.), पूर्वोक्त, पृ. २२४.

१७. अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद शतक महोत्सवी वर्ष, **स्मरणिका**, प्रस्तावना, पुणे, २००७.

१८. कित्ता, प्रस्तावना.

१९. निकुंभे रमेश, पूर्वोक्त, पृ. ५१.

२०. काळे सोपान, **अहिल्याश्रम वारसा व वाटचाल**, संस्कार प्रकाशन, पुणे, २००१, पृ. ८७.

२१. अरूण टिकेकर ( संपा.), पूर्वोक्त, पृ. २२१.

२२. कित्ता, पृ. २१९.

२३. कुलकर्णी बा. ना., **दादा केतकर, प्रस्तावना**, पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे, २००२.

२४. जोशी आर. पी., पूर्वोक्त, **पृ.** ११६.

२५. कित्ता, पृ. ७०.

२६. अरूण टिकेकर ( संपा.), पूर्वोक्त, पृ. २२४.

२७. श्री शिवाजी मराठा सोसायटी, **१५ वा वार्षिक अहवाल**, पुणे, २०१२-१३, पृ. ९.

२८. सहाय्यक संस्था निबंधक यांचे नूतनीकरण **प्रमाणपत्र**, दि. २२.७.२००२.

२९. **माहिती पत्रक**, शिवाजी मेमोरीअल सोसायटी, पुणे, १९९९, पृ. २.

३०. कुलकर्णी बा. ना., पूर्वोक्त, पृ. २४.

३१. टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, **माहिती पुस्तिका**, पुणे, पृ. ४.

३२. अरूण टिकेकर ( संपा.), पूर्वोक्त, पृ. २१७.

३३. टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, **विशेष पुरवणी**, पुणे, २०१५-२०१६, पृ. २.

३४. भट चिं. वा., माझ्या शाळेविषयी, **दै. सकाळ**, दि. १२ जून १९९३, पृ. ५.

३५.फडतरे भूषण गोविंद, **स्वातंत्र्यलढ्याचे पाईक**, अथर्व प्रकाशन, पुणे, २०१५,पृ.१८८.

३६. अरूण टिकेकर ( संपा.), पूर्वोक्त, पृ. १५०.

३७. कित्ता.

३८. एकबोटे गजानन (संपा), मॉडर्न हायस्कूल, **अमृत स्मरणिका**, प्रस्तावना, पुणे, २००५.

३९. बापट माधव, **आचार्य**, भारत प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९८१, पृ. ४७.

४०. दीक्षीत राजा, **पुणे विद्यापीठाचा इतिहास**, पुणे विद्यापीठ मुद्रणालय, प्रथमावृत्ती, १९९९, पृ.४५.

४१. अरूण टिकेकर ( संपा.), पूर्वोक्त, पृ. २२८.

**************

## प्रकरण ३

# महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी शिक्षण संस्थेची वाटचाल

३.१ महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या स्थापनेपूर्वीची परिस्थिती :

३.२ महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीची स्थापना :

३.३ राष्ट्रीय शिक्षण देणारी पहिली शाळा :

३.४ वासुदेव बळवंत फडके संस्थेचे पहिले कार्यवाह :

३.५ महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीची वाटचाल :

३.६ संस्थेचा कार्यविस्तार :

३.७ संस्थेचे नेतृत्त्व :

३.७.१ सर जमशेटजी जीजीभॉय बॅरोनेट :

३.७.२ श्रीमंत बाबासाहेब घोरपडे :

३.७.३ श्रीमंत बाबासाहेब पंडित पंतसचिव :

३.७.४ श्रीमंत सर मालोजीराव नाईक - निंबाळकर :

३.७.५ न्यायमूर्ती यज्ञेश्वर वासुदेव दीक्षित :

३.७.६ पद्मभूषण डॉ. आबासाहेब गरवारे :

३.७.७ डॉ. पां. वा. सुखात्मे :

३.७.८ डॉ. वि. ग. भिडे :

३.७.९ पद्मभूषण डॉ. वसंत गोवारीकर :

३.७.१० संस्था आणि नेतृत्व यांच्या समन्वयामधून विकास :

**प्रस्तावना :**

'महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी' ही केवळ पुणे शहरातीलच नव्हेतर महाराष्ट्रातील एक अग्रगण्य शिक्षण संस्था आहे. या शिक्षण संस्थेची स्थापना इ.स.१८७४ मध्ये झाली. पुढे दिनांक १९ नोव्हेंबर १९८७ रोजी ही संस्था कायद्याने रजिस्टर झाली.[१] महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने गेली दीडशे वर्षे ज्ञानाच्या क्षेत्रात आपला वेगळा ठसा उमटविला आहे. या शिक्षण संस्थेच्या माध्यमातून कित्येक पिढ्यांची जडणघडण झाली. विविध क्षेत्रात या संस्थेच्या विद्यार्थ्यांनी आपले कर्तृत्व सिद्ध केले. या विद्यार्थ्यांच्या जडण घडणीत महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचा वाटा महत्त्वाचा आहे. या संस्थेचे अनेक माजी विद्यार्थी आपापल्या क्षेत्रात आज महत्त्वाच्या पदावर विराजमान झाले आहेत. त्यांनी स्वीकारलेल्या क्षेत्रात त्यांची एक स्वतंत्र व वेगळी ओळख आहे. यामध्ये महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचा वाटा महत्त्वाचा आहे. साहित्य, समाज, कला, संस्कृती, क्रीडा, अर्थ, राजकारण व उद्योग या सर्वच क्षेत्रांमध्ये या संस्थेचे माजी विद्यार्थी चमकले आहेत.

महाराष्ट्राच्या शैक्षणिक वातावरणाला विधायक वळण देण्याच्या दृष्टीने या संस्थेचे योगदान अनन्यसाधारण आहे. मोठ्या प्रतिकूल परिस्थितीत देखील संस्थेने आपली वाटचाल सुरू ठेवत विद्यार्थ्यांना अखंड ज्ञानदान देण्याची परंपरा जोपासली आहे. विद्यार्थ्यांच्या ज्ञानाला व हिताला प्राधान्य दिल्यामुळे संस्थेला आपल्या मार्गक्रमणातील प्रवास सुकर करता आला आहे व प्रवासाच्या आधारेच संस्था महाराष्ट्र राज्यांमध्ये अल्पावधीत नावारूपास आली आहे.

पूर्व प्राथमिक दर्जाच्या शिक्षणापासून ते उच्च माध्यमिक दर्जाच्या शिक्षणापर्यंतचे शिक्षण महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून दिले जात आहे. संस्थेच्या वाटचालीचा हा आलेख निश्चितच नेत्रदीपक अशा स्वरुपाचा आहे. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात हे ठरावीक वर्गाला देणारे शिक्षण सार्वत्रिक करण्याचे व सर्वसमावेशक करण्याचे कार्य महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी या शैक्षणिक संस्थेने केले आहे.

'महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी'ची वाटचाल शतकोत्तर सुवर्ण महोत्सवाकडे होत असताना ही गोष्ट ध्यानात ठेवली पाहिजे की, संस्थेची यशस्वी वाटचाल झालेली असताना ती एकाकी व एकांती अशा स्वरूपात झालेली नाही तर समाजातील अनेक घटकांना सोबत घेऊन संस्थेने आपली वाटचाल यशस्वी केली आहे. याचाच अर्थ असा की, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीची वाटचाल यशस्वी होणे

म्हणजे महाराष्ट्राची शैक्षणिक व सामाजिक वाटचाल ही प्रगतीच्या दिशेने जात आहे. अनेक छोट्या - मोठ्या आव्हानांना सामोरे जात महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने आपली वाटचाल सुरू केली. त्यामुळे ही संस्था राज्यातील नामांकित शैक्षणिक संस्था म्हणून ओळखली जाते. योग्य व उत्तम कर्मचारी आणि मोठ्या विश्वासाने संस्थेमध्ये दाखल होणारे विद्यार्थी व त्या सर्वांचे पालक, हितचिंतक या सर्वांमुळे संस्था आज नावारूपास आली आहे.

प्रस्तुत प्रकरणात 'महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी' या संस्थेची वाटचाल स्पष्ट करून या संस्थेच्या कार्याचे मूल्यमापन केलेले आहे. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी ही शिक्षणसंस्था कोणत्या परिस्थितीत स्थापन झाली. या संस्थेच्या स्थापनेमागील उद्देश, संस्थेचा विकास व वाटचाल या अनुषंगाने या प्रकरणात मांडणी करण्यात आली आहे. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी या शिक्षण संस्थेच्या प्रारंभापासून इतिहास या प्रकरणात मांडण्यात आला आहे.

## ३.१ महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या स्थापनेपूर्वीची परिस्थिती :

संपूर्ण भारतीयांमध्ये एक ब्रिटिश विरोधी वातावरण बनलेले होते. सन १८५७ च्या उठावाने तर अखिल भारतीय बंडामध्ये रूपांतर झाले होते. खरेतर हे शिपायांचे बंड नव्हते तर भारतीयांच्या स्वातंत्र्याचा रणसंग्राम होता. एकूणच भारतीयांच्या मनात ब्रिटिशंच्या विरोधात एक संतापाची, चिड आणणारी भावना निर्माण झाली होती. याच दरम्यान भारतामध्ये मुंबई, मद्रास व कलकत्ता अशा तीन ठिकाणी विद्यापीठांची स्थापना करण्यात आली होती.[२] महाराष्ट्रामध्ये महात्मा ज्योतीराव फूले यांनी आपले शैक्षणिक कार्य सुरू केले होते. अशा पार्श्वभूमीवर भारतीयांमध्ये शिक्षणाविषयी आस्था निर्माण करण्याचे कार्य अनेकजण करत होते.

ब्रिटिश सरकारदेखील भारतीयांच्या शिक्षणाबाबत गंभीर होते पण यामागे ब्रिटिशांचा स्वार्थी हेतू होता. आपल्याला पूरक धोरणांनी प्रभावी अमंलबजावणी व्हावी, विविध कार्यालयामधून आवश्यक असणाऱ्या प्रशिक्षित मनुष्यबळाची निर्मिती व्हावी यासाठी ब्रिटिश भारतीयांच्या शिक्षणाचा आग्रह धरत होते. परंतु काहीही असले तरी भारतीयांसाठी शैक्षणिक पार्श्वभूमी तयार होत होती हे यामध्ये महत्त्वाचे आहे.

## ३.२ महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीची स्थापना :

'महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी'ही पूर्वीची 'पूना नेटीव्ह इन्स्टिटयूशन' ही शिक्षण संस्था शिक्षणाचा प्रसार करण्याच्या हेतुने स्थापन करण्यात आलेली पुण्यातील आद्य शिक्षण संस्था आहे.या संस्थेची स्थापना ही मूळातच सर्व जातीधर्मातील मुलामुलींना अल्प खर्चात शिक्षणाचा लाभ करुन देण्याच्या मुख्यहेतुने करण्यात आलेली आहे. सन १८६० मध्ये रा.रा. ना. रा. महागावकर यांनी आपल्या मालकीची शाळा स्थापन केली. पुढे या शाळेच्या स्थापनेनंतर तिचे संवर्धन अनेक व्यक्तींनी केले. १८७४ पर्यंत ही शाळा सुरू होती. त्यानंतर रा.रा. वामनराव प्रभाकर भावे व रा.रा. ल. ना. इंदापूरकर यांनी ती शाळा आपल्याकडे चालविण्यास घेतली.[३] ती शाळा रजिस्टर करण्यात आली. पुढे इ.स. १८८४ मध्ये त्यांनी शाळेचे खाजगी स्वरुप पालटून तिचे सार्वजनिक शिक्षण संस्थेत रूपांतर केले. इ.स. १८६० मध्ये सुरू झालेल्या या खाजगी शाळेचे इ.स. १८८४ मध्ये 'दी पूना नेटिव्ह इन्स्टिटयूशन' या सार्वजनिक संस्थेत रुपांतर झाले.[४] दिनांक २७ ऑगस्ट १९२२ या दिवशी 'दी पूना नेटिव्ह इन्स्टिटयूशन असोसिएशन'या संस्थेला 'महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी', पुणे हे नामाविधान प्राप्त झाले.

सन १८६० च्या दरम्यान शिक्षणाविषयी आस्था दाखवणाऱ्या अनेक व्यक्ती पुणे शहरामध्ये कार्यरत होत्या. शिक्षणाविषयी चर्चा घडवून शैक्षणिक पार्श्वभूमी निर्माण करण्यासाठी ही मंडळी सदैव धडपडत असत. पुण्यामध्ये शैक्षणिक प्रबोधन निर्माण करण्याचे कार्य देखील यामंडळींनी केले होते. यामध्ये माधवराव चितळे, श्री. नातू, बाबा गोखले यांच्यासह अनेक मंडळींचा सहभाग असे. वारंवार शैक्षणिक विकासासाठी चर्चा करणे, बैठका आयोजित करणे अशा स्वरुपाचे प्राथमिक कार्य ही मडळी करत असत. या बैठकीच्या माध्यमातून पुण्यातील शिक्षण विकासावर कोणत्या कार्यात्मक पद्धतीने ठसा उमटवता येईल यासाठी प्रत्यक्ष निर्णय घेतले जात. शाळा सुरु करण्यासाठी, शिक्षणाची पार्श्वभूमी तयार करण्यासाठी आर्थिक घटक महत्त्वाचा असे. आर्थिक प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत असत. बाहेरून मदत न मिळाल्याने अक्षरश: वैयक्तिकरीत्या पैसा जमा करुन खासगी शाळा सुरु करण्याचे त्यांनी ठरवले. या घटना पुणे शहरातील शैक्षणिक इतिहासाच्या दृष्टिकोनातून महत्त्वाच्या ठरतात.

संस्था स्थापनेचा कालावधी हा स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील होता व या काळात अशा प्रकारचा दूरदृष्टीचा विचार केल्यामुळे भविष्यात संस्था नावारुपास आल्याचे आपणास पहावयास मिळते. संस्थेची स्थापना करण्याचा हा विचार खऱ्या अर्थाने महाराष्ट्रात  आधुनिक कालखंड अवतरल्याची साक्ष देणाराही ठरतो. त्यामुळे महाराष्ट्राच्या सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रावर परिणामकारक अशा स्वरुपाच्या या घटना ठरल्या आहेत असे म्हणावे लागेल. पुण्यातील अनेकांना देखील या घटना अनपेक्षित व नवख्या स्वरुपातील वाटत होत्या. त्यामुळे काहींनी शाळा स्थापन करण्याच्या कृतीबाबत गैरसमज पसरविले. जाणीवपूर्वक शाळा स्थापन होऊ नयेत यासाठी प्रयत्न करण्यात आले. कारण जुनाट व बुरसटलेल्या विचारांची मानसिकता बदलायला लोक तयार नव्हते. परंतु शाळेच्या स्थापनेने या विचारांना तिलांजली मिळाल्याचे आपणास पहावयास मिळते.

पुणे हे विद्येचे माहेरघर मानले जाते. पुण्याचा आणि ज्ञानाचा तसा जवळचा संबंध आहे. मराठेशाहीच्या उत्तर इतिहासात पुणे हे जसे राजकारणाचे केंद्र होते तसेच विद्येचेही केंद्र होते. या काळात विद्येस उत्तेजन मिळावे म्हणून पेशव्यांकडून पंडितांना लक्षावधी रुपये दक्षिणा देण्यात येत असे. उपेक्षित, बहुजन समाज व स्त्रियांच्या शिक्षणासाठी पुण्यातच महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी केलेले कार्य अतुलनीय स्वरूपाचे आहे. या काळात इंग्रजांनी पाश्चात्त्य शिक्षण प्रसारासाठी अनेक संस्था स्थापन केल्या होत्या. इ.स. १८५५ साली शाळा खाते स्थापन झाले आणि इंग्रजी शिक्षणाची वाढ सुरु झाली. इंग्रजी शिक्षण हे राजमान्यता मिळवून देणारे शिक्षण असल्यामुळे आणि या शिक्षणामुळे उदरनिर्वाहाची सुविधा होत असल्यामुळे इंग्रजी शिक्षणाकडे लोकांचा कल वाढला आणि त्याच काळात खाजगी वर्ग सुरु झाले.

सन १८६० मध्ये ना. रा. महागावकर व अन्य शिक्षणप्रेमी व्यक्तींनी खाजगी स्वरुपात शाळेचे वर्ग सुरु केले होते.[५] हे वर्ग त्यांनी पुष्कळ दिवस चालविले होते. त्यानंतर हे खाजगी स्वरुपातले शाळेचे वर्ग त्यांनी श्री. महादेव बाळकृष्ण चितळे हे चालवित असलेल्या नेटीव्ह इन्स्टिट्यूशनला सामील केले. महादेव चितळे देवासला गेल्यामुळे त्यांचे वर्गही मोडकळीस आले होते. त्याचदरम्यान श्री. नातू व श्री बाबा गोखले असेच आपल्या व्यक्तिगत पातळीवर खाजगी वर्ग चालवित होते. त्यावेळी वासुदेव बळवंत फडके, लक्ष्मणराव इंदापूरकर व वामनराव भावे या तिघांनी शाळेची पुनर्रचना केली त्यावेळच्या राजकीय आणि सामाजिक परिस्थितीत आपल्या मुलांना उत्तमशिक्षण देण्यासाठी 'दी पूना नेटिव्ह इन्स्टिट्यूशन'ची स्थापना केली. या संस्थेच्या

स्थापनेच्यावेळी कार्यरत असणाऱ्या बहुतांश शाळा या फक्त पुस्तकी ज्ञान देणाऱ्या होत्या. वर्षानुवर्षे लोकांना झालेल्या अन्यायाची जाणीव निर्माण करुन अन्यायाविरुद्ध पेटून उठण्यासाठी या शाळा कुचकामी होत्या. म्हणूनच स्वदेशप्रेमाचे आणि स्वराज्यभक्तीचे वारे विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होईल अशा शिक्षणाची व्यवस्था निर्माण करणे वासुदेव बळवंत फडके यांनी मनावर घेतले. त्यादृष्टीने राष्ट्रीयवृत्तीच्या शिक्षणासाठी या तिघांनी मिळून स्थापन केलेली ही पहिली बिनसरकारी शाळा आहे.[६] म्हणजेच तत्कालिन परिस्थितीचा विचार करता त्या काळात देशप्रेमी, सामाजिक भान असलेल्या विद्यार्थ्यांची पिढी घडविणाऱ्या शाळांचा उदय झाला.

## ३.३ राष्ट्रीय शिक्षण देणारी पहिली शाळा :

स्वातंत्र्यपूर्व कालखंडात पुण्यातील शिक्षण विकासाला महत्त्वाचे योगदान देणाऱ्या शाळांमध्ये व संस्थांमध्ये चिपळूणकर, टिळक व आगरकर यांनी स्थापन केलेल्या न्यू इंग्लिश स्कूल व डेक्कन एज्युकेशन सोसायटी यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. परंतु या संस्थेच्या स्थापनेपूर्वी सहा वर्ष आधी जुन्या तापकीर गल्लीत किबे वाड्यात सुरु झालेली महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीची ही शाळा राष्ट्रीय शिक्षण देणारी पहिली शाळा ठरते. कारण या शाळेमधून प्रखर राष्ट्रनिष्ठा असलेले शिक्षण सर्वप्रथम दिले जात असे. म्हणजेच देशप्रेमाने भारावलेले विद्यार्थी या शाळेमधून निर्माण केले जात. त्यांच्यामध्ये राष्ट्र ही संकल्पना रुजविली जात असे, त्यांच्यामध्ये राष्ट्रीय एकात्मतेचे विचार रुजवले जात असत. संस्था स्थापन करताना देशोन्नती व राष्ट्रप्रेम हे दोन प्रमुख उद्देश असल्याने संस्थेनी पहिली शाळा सुरू झाल्यापासून शाळेमधून अशा प्रकारचे शिक्षण देण्याचे कार्य सुरु झाल्याचे दिसते. राष्ट्रीय शिक्षण दिले जात असल्याने या शाळेचे कार्य प्रारंभी अनेकांना संशयास्पदरीत्या असल्याचे वाटले, परंतु कालांतराने अनेकांना राष्ट्रीय शिक्षणाची खात्री पटल्यानंतर शाळेला सहकार्य करणाऱ्यांचे प्रमाण वाढू लागले.

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीची सुरूवातीची किबे वाड्यातील शाळा राष्ट्रीय शिक्षण देणारी पहिली शाळा ठरल्याने एकूणच महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या नाव लौकिकात भर पडल्याचे दिसते. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी च्या वाटचालीत या शाळेमधून दिले जाणारे राष्ट्रीय शिक्षण हा विषय अतिशय महत्त्वाचा ठरला आहे. महत्त्वपूर्ण आशयामुळे महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी या

संस्थेला दिल्या गेलेल्या राष्ट्रीय शिक्षणाचा अभिमान वाटतो. संस्थेसह सर्वांना अभिमानास्पद वाटावी अशाच स्वरुपाची ही घटना आहे, असे म्हटले पाहिजे.

## ३.४ वासुदेव बळवंत फडके संस्थेचे पहिले कार्यवाह :

वासुदेव बळवंत फडके हे मूळातच त्या काळात राष्ट्राभिमानाने भारावलेले तरुण होते. त्यांच्यामधील जाज्वल्य देशाभिमान अनेकांना माहीत होता. यावेळी पुण्यामध्ये शिक्षण विकासासाठी भारावलेले अनेक तरुण होते. यामध्ये महादेव बाळकृष्ण चितळे, श्री. नातू, बाबा गोखले, लक्ष्मणराव इंदापूरकर, वामनराव भावे इत्यादींच्या संपर्कात वासुदेव बळवंत फडके आले व त्यांनी महादेव चितळे यांनी स्थापन केलेल्या शाळेची पुर्नरचना केली. या शाळेत अनेक विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, त्यांच्यामध्ये देशप्रेम वाढीस लागावे व राष्ट्राभिमानी तरुण निर्माण व्हावेत यासाठी वासुदेव बळवंत फडके यांनी या शाळेची जबाबदारी स्वीकारण्याचे ठरविले. वासुदेव बळवंत फडके हे अशा रीतीने संस्थेचे पहिले कार्यवाह व कोषाध्यक्ष झाले. वासुदेव बळवंत फडके यांनी संस्थात्मक पातळीवरची ही जबाबदारी स्वीकारल्यानंतर महाराष्ट्र एज्युकेशन  सोसायटी या संस्थेला आकार देण्याचे कार्य केले. संस्थेचा व्याप वाढवण्यास सुरुवात केली.

वासुदेव बळवंत फडके संस्थेचे कोषाध्यक्ष व कार्यवाह असतानाच्या कालखंडात संस्थेची गुणात्मक वाढ जोरकसपणे झाल्याचे आपणास दिसते. वासुदेव बळवंत फडके यांच्या कार्यकाळात राष्ट्राकडे एका व्यापक दृष्टिकोनातून पहाण्यास सुरवात केली. राष्ट्रीय एकात्मता, राष्ट्रीय अभियान या मूल्यांवर आधारित शिक्षणाने वेग घेतला. खडतर अशा आर्थिक परिस्थितीतून मार्गक्रमण करत असताना वासुदेव बळवंत फडके यांनी कोषाध्यक्षाच्या कार्यकालात आर्थिक घडी बसवली. योग्यप्रकारची आर्थिक धोरणे राबवून संस्थेच्या आर्थिक समस्या कमी करण्यात काही अंशी त्यांना यश मिळाले. यावरुन असे म्हणता येईल की, वासुदेव बळवंत फडके यांनी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे कार्यवाह व कोषाध्यक्ष म्हणून योग्यप्रकारे जबाबदारी सांभाळली. शाळांची उणीव होती. ही उणीव भरुन काढणे समग्र देशहिताच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे व आवश्यक होते. वासुदेव बळवंत फडके यांनी ही गोष्ट नेमकेपणाने ओळखली व या संस्थेची स्थापना आपल्या

सहकाऱ्यांसमवेत केली. स्थापना करताना देशहित, देशप्रेम प्रखर राष्ट्रनिष्ठा असलेल्या विद्यार्थ्यांना निर्माण करणारी संस्था असली पाहिजे ही भूमिका घेतली व संस्थेची स्थापना केली.

## ३.५ महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीची वाटचाल :

'महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी'ही शिक्षण संस्था महाराष्ट्रातील अग्रगण्य शिक्षण संस्था मानली जाते. दीडशे वर्षांची परंपरा असणारी ही संस्था राष्ट्रीय विचार, देशप्रेम व सामाजिक बांधिलकी विद्यार्थ्यांमध्ये देणारी संस्था होती. दि. २४ सप्टेंबर १८७४ रोजी वामनराव भावे यांनी ही स्वतंत्र शाळा काढली. हे भावे मॅट्रीक्युलेशन परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर मि. बोमन यांच्या फ्री चर्च मिशन हायस्कूलमध्ये काही थोडे दिवस शिक्षक म्हणून होते. परंतु तेथील धार्मिक वातावरण त्यांना मानवले नाही. त्याचप्रमाणे त्यांना स्वतंत्र महत्त्वाकांक्षा असल्यामुळे तसेच, 'इंग्रजी शाळा उत्तमतऱ्हेने चालवायची तर त्याला साहेबच पाहिजे'[७] ही त्या वेळची समजूत दूर करण्याकरिता 'नेटिव्ह लोक' सुध्दा संस्था उत्तम चालवू शकतात हे दाखविण्याकरिता त्यांनी स्वतंत्र शाळा काढण्याचा विचार केला. दी पूना नेटिव्ह इन्स्टिट्यूशन ही संस्था लोक शिक्षणाचे पवित्र कार्य करण्यास कार्यरत झाली. 'दी पूना नेटिव्ह इन्स्टिट्यूशन'या नावाने सुरु झालेल्या या संस्थेची वाटचाल आपण पाहणार आहोत. हीच संस्था पुढे महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी या नावाने ओळखली जावू लागली. पुढे संस्थेचा व्याप व विस्तार खूप वाढला. संस्थेने नेत्रदीपक प्रगती केली.

वासुदेव बळवंत फडके यांनी सेक्रेटरी पदाची जबाबदारी घेऊन संस्थेच्या कार्यास सुरुवात केली.[८] परंतु वासुदेव बळवंत फडके यांचे बंडखोर विचार व राष्ट्रीय शिक्षणाचे उद्दिष्टे लोकांना माहीत असल्यामुळे ठरावीक चाकोरीतून जाणारे लोक शाळेकडे सावधगिरीने पाहू लागले. लोकांमध्ये गैरसमज वाढू लागला. हा गैरसमज दूर करण्यासाठी दिनांक ४ नोव्हेंबर १८७४ रोजीच्या 'ज्ञानचक्षू' या वृत्तपत्रात 'जाहिरात' या मथळ्याखाली एक प्रकटन प्रसिध्द केले. ते पुढीलप्रमाणे,

**जाहिरात :**

''संस्कृत, लॅटिन, पार्शियन आणि मराठी यापैकी एक व दुसरी इंग्रजी, मेट्रीक्युलेशनच्या परीक्षेपर्यंत शिकणाऱ्या मुलांकरिता या शाळेत मोठे अनुभवी शिक्षक असून बहुत काळापर्यंत सुरक्षित चालावी व ज्या शाळेचे तिमाही रिपोर्टावरुन लोकांची खात्री व्हावी व मुलांचे अभ्यासाकडे लक्ष आहे किंवा नाही, आईबापाच्या सल्लयाशिवाय मुले घरी विनाकारण राहतात की काय व धडा करितात

किंवा नाही वैगेरेबद्दलची तजवीज या शाळेत चांगले प्रकारचे ठेविली आहे. हल्ली ही शाळा जुने तापकीर गल्लीत किवे यांच्या वाड्यात आहे. कित्येक मास्तर लोक मुलांस नाना प्रकार सांगून या शाळेत जाऊ नये म्हणून त्यांचे मनावर ठसे उठवित आहेत. परंतु हे त्यांचे करणे बरोबर नाही.''[९]

वासुदेव बळवंत फडके यांच्या या प्रकटनावरुन असे दिसून येते की पूना नेटिव्ह इन्स्टिटयूशनच्या या शाळेबद्दल काही लोक गैरसमज पसरवित होते. काही शिक्षक तर मुलांना या शाळेत जाऊ नये म्हणून दबाव टाकीत होते. याचा अर्थ असा की या शाळेला अडचणी निर्माण करण्यात काही मंडळींना स्वारस्य होते. ही शाळा विकसित होऊ नये, या शाळेत विद्यार्थ्यांनी जाऊ नये यासाठी काही मंडळी मुद्दामहून प्रयत्न करीत होती असे दिसून येते. काही संस्थेची वाटचाल अभ्यासताना प्रारंभीच्या काळात संस्थेला किती अडचणी सहन कराव्या लागल्या असतील हे या उदाहरणावरुन स्पष्ट होते. शाळेविषयी गैरसमज पसरविणाऱ्यांविरुद्ध वासुदेव बळवंत फडके यांनी प्रतिक्रिया या 'ज्ञानचक्षू' मासिकातील प्रकटनाद्वारे दिली आहे. या प्रकटनात शाळेची स्थिती स्पष्ट करुन या शाळेत मुलांनी जाऊ नये असे सांगणाऱ्या शिक्षकांनी असे करणे बरोबर नाही हे वासुदेव बळवंत फडके यांना सांगावे लागले आहे.

वासुदेव बळवंत फडके यांनी नंतरच्या काळात क्रांतिकार्यात वाहून घेतले. संस्थेच्या वाटचालीसाठी परिस्थिती अतिशय प्रतिकूल होती. अशा प्रतिकूल परिस्थितीत वा. प्र. भावे व ल. न. इंदापूरकर यांनी परिश्रमपूर्वक ही शाळा नावारुपाला आली. त्या काळात संस्थेने पुण्यातील शिक्षणक्षेत्राची गरज लक्षात घेऊन 'महाराष्ट्र कॉलेज' या नावाने महाविद्यालय स्थापन केले. या महाविद्यालयात काळकर्ते शि. म. परांजपे कार्यरत होते. ब्रिटिश राजवटीत अत्यंत प्रखर देशाभिमानी असलेले शि. म. परांजपे महाविद्यालयात असल्याने शासनाची वक्रदृष्टी महाविद्यालयाकडे वळली व महाविद्यालय बंद करावे लागले.

दी पूना नेटिव्ह इन्स्टिटयूशनच्या वाटचालीतला महत्त्वाचा टप्पा म्हणजे शाळेला सरकार मान्यता मिळविण्याचा होता. अतिशय चिकाटीने व निश्चयी वृत्तीने भावे यांनी न डगमगता रामचंद्र निलकंठ गोडबोले यांच्या मदतीने काही ट्यूपिल टीचर्स तयार करुन शाळेचे काम पुढे नेले. पालकांची सहानुभूती मिळविली. १८८०-८१ च्या सरकारी रिपोर्टप्रमाणे फ्री चर्च मिशन हायस्कूलमध्ये त्या वेळेस एकूण २१२ विद्यार्थी होते.[१०] तर भावे यांच्या शाळेत २१३ विद्यार्थी होते. सन १८८० या वर्षीच चिपळूणकर, टिळक व आगरकर यांनी 'न्यू इंग्लिश स्कूलची' स्थापना केली.

वेगळी संस्था काढण्याऐवजी या संस्थेतच चिपळूणकरांनी कार्य करावे असा प्रयत्न झाला पण तो सफल झाला नाही. सरकारी अधिकाऱ्यांच्या सहानुभूती मिळवण्याच्या मुद्द्यावरुन भावे व चिपळूणकर यांच्यात मतभेद होते. परंतु या शाळेच्या व न्यू इंग्लिश स्कूलच्या ध्येयात तफावत नव्हती.

वामनराव भावे यांच्याकडून सरकार मान्यता मिळवण्यासाठी अनेक मोठे प्रयत्न सुरु होते. यासाठी त्यांनी अनेकदा सरकारला अर्ज व विनंत्या केल्या. शाळा सर्वसमावेशक धोरण राबवते, शाळेला लोकांचा पाठिंबा आहे हे दाखवण्यासाठी पुण्यातील अनेक प्रतिष्ठित लोकांना सोबत घेतले व शाळेसाठी सरकारी मदत मिळवण्यासाठी प्रयत्न केला. परंतू डायरेक्टर ऑफ पब्लीक इंन्सट्रक्शन यांनी दि. 13.9.1881 - No – 2249 of 1881 -81 च्या लेखी पत्रव्दारे सरकारजवळ खाजगी शाळांना मदत देण्यास पैसे नाहीत असे कळविले.[११] श्री. भावे यांच्या प्रयत्नामुळे शाळेच्या आर्थिक मदतीसाठीचा प्रस्ताव किमान सरकार दरबारी पोहचला असे म्हणावे लागेल.

आपल्या प्रयत्नांना यश आले नाही तरी वामनराव भावे निराश न होता नियमितपणे प्रयत्न करत असत. भावे यांच्या प्रयत्नामुळे एक मात्र झाले, ते म्हणजे त्यांच्या सहकाऱ्यांमध्ये कमालीचा उत्साह वाढला. भावे यांचे सहकारी मोठ्या उत्साहाने मोठ्या उमेदीने पुन्हा कार्यरत होऊ लागले दरम्यान ब्रिटिश देखील शिक्षणाला प्रोत्साहन देऊ लागले देशातील अनेक शाळांना आर्थिक सवलती दिल्या जाऊ लागल्या. शैक्षणिक योजना जाहीर केल्या जाऊ लागल्या. अशाच प्रकारच्या शैक्षणिक योजनांचा व आर्थिक सवलतींचा लाभ आपल्या शाळेला मिळावा ही धारणा मात्र भावे यांनी सदैव जागृत ठेवली.

वामनराव भावे यांच्या सततच्या प्रयत्नामुळे, वारंवार करत असलेल्या अर्ज विनंत्यांमुळे शाळेच्या दरवर्षी तपासण्या केल्या जात. या शाळेला शासकीय अनुदान मिळावे यासाठी सरकारकडे शिफारस केली जात असे. परंतु ब्रिटिश सरकारचे शैक्षणिक धोरण हे ब्रिटिश धार्जीणे होते तर महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी म्हणजे पूर्वाश्रमीची दी पूना नेटीव्ह इन्स्टिटट्यूट ही संस्था ब्रिटिशांच्या दृष्टिकोनातून संशयास्पद अशा रीतीने चालत होती. राष्ट्राभिमानी व हिंदुस्थानप्रेमी लोकांचा प्रतिसाद या संस्थेला मिळत होता. ब्रिटिशांचे तर स्पष्ट धोरण होते. अशा संस्थाना कोणत्याही प्रकारची मदत करु नये. त्यामुळे सरकारी ग्रँट मिळण्याचा प्रश्नच नव्हता. त्यामुळे अनेक प्रयत्न करुन देखील या

शाळेला ग्रँट मिळाली नाही. पण असे असले तरी समाजातील अनेक दानशूर लोकांनी या संस्थेला मदत दिल्यामुळे काही प्रमाणात तरी आर्थिक अडचण सुटण्यास मदत झाली होती.

दिनांक १५ सप्टेंबर १८७० रोजी तर डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शनचे श्री. चॅटफिल्ड यांनी 'खाजगी शाळांना देण्यासाठी सरकार जवळ पैसे नाहीत' असे स्पष्ट कळविले असेल. तरीसुद्धा भावे यांचे प्रयत्न सुरुच होते. १८८० मध्येच सर्दन आर्मी कमांडचे मुख्य जनरल लॉर्ड मार्क केर यांनी शाळेस भेट दिली. यानंतर त्यांनी सरकारकडे शिफारस केली. त्या शिफारशीनुसार ६ डिसेंबर १८८१ रोजी शाळा रजिस्टर झाली.[१२] दिनांक २ डिसेंबर १८८० रोजी तात्कालिन व्हाइसरॉय लॉर्ड रिपन यांच्याकडून शाळेला ५० रुपयांची देणगी आली. ४ ऑगस्ट १८८१ रोजी मि. जी. एफ. शेफर्ड कमिशनर यांनी शाळेस अचानक भेट दिली. ३१ ऑगस्ट १८८१ रोजी एज्यु. मि. वॅडिंग्टन यांनी शाळेला भेट दिली. लॉर्ड मार्ककेर यांच्या शिफारशीपासून सरकारी अधिकाऱ्यांची संस्थेकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलल्याचे दिसून येते.

सन १८८२ साली १२४८ रु. ग्रँट संस्थेला मिळाली त्यामुळे अनेक वर्षापासून वामनराव भावे अनुदानात संदर्भात जो पाठपुरावा करत होते त्याला यश आले होते. सन १८८३ पर्यंत पुणे शहर म्यु. कमिटीची वार्षिक ग्रँट दरमहा १५ रूपये प्रमाणे मिळत असे. म्यु. कमिशनर (सभासद) रा. रा. व्यंकटराव रामचंद्र यांनी २९-१०-१८८२ रोजी शाळेस भेट दिली. शाळेची तपासणी केली. त्यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे १८८३ पासून म्यु. कमिटीकडून दर महिना ३० रूपये इतकी ग्रँट मिळू लागली. रा.रा. व्यंकटराव रामचंद्र यांनी त्यावेळी पुढीलप्रमाणे शिफारस केली होती.

a) " I beg. therefore, to propose that the number of free studentships attached to the Poona Native Institution be increased from 15 to 30 as recommended by the Managing Committee for the following reasons : It has been in good working order and has been very useful to the public especially to paupers U. "

b) " An admirable boarding establishment is attached to the school. A gymnasium is also provided for physical development etc."[13]

यावरुन असे म्हणता येईल की, व्यंकटराव रामचंद्र यांनी शाळेच्या विकासासाठी अतिशय महत्त्वाची शिफारस करुन एक नवा प्रघात सुरु केला. तत्पूर्वी १८८१ ला शाळा रजिस्टर झाली व खऱ्या अर्थाने १८८२ पासून शाळेला कमी अधिक प्रमाणात शासकीय कोट्यातून सवलती मिळू लागल्या.

सन १८८१ ते १८८२ या कालावधीत वामनराव भावे यांनी केलेल्या प्रयत्नामुळे अनेक शैक्षणिक शासकीय समित्यांचे लक्ष या शाळेकडे वेधले गेले. त्यामुळेच शाळेला अनेक ब्रिटिश अधिकाऱ्यांनी भेटी दिल्या. सुरवातीपासूनच भेटी दिल्यामुळे शाळेला थेट त्याचा आर्थिक फायदा झाला असे म्हणता येत नाही परंतु एवढे मात्र खरे की, या भेटींमुळे ब्रिटिश अधिकाऱ्यांचा या शाळेबाबतचा दृष्टिकोन बदलला या बदललेल्या दृष्टिकोनामुळे ब्रिटिश अधिकारी शिथिल नजरेने पाहू लागले कारण यापूर्वी खाजगी शाळांना अर्थसहाय्य करु नये अशा प्रकारची शासकीय भूमिका घेतली जात असे. आता त्यामध्ये बदल झाला. शासकीय शाळांप्रमाणेच खाजगी शाळेकडे ब्रिटिश अधिकारी पाहू लागले. त्यामुळे या दोन वर्षात म्हणजे १८८१ ते १८८२ या कालावधीत किमान शाळेबाबत ब्रिटिश अधिकाऱ्यांचा सकारात्मक बदल जाणवला व भविष्यात काही आर्थिक मदत मिळण्याची आशा निर्माण झाली. वामनराव भावे शाळेबाबत सदैव सर्तक असत त्यांना शिक्षणाच्या एकूण परिस्थितीची जाणीव झाली या जाणिवेतूनच पुढे १८८३ सालीच पुणे येथे एज्युकेशन कमिशन आले व त्या कमिशनपुढे रा. भावे यांनी साक्ष दिली. या साक्षीत त्यानी खाजगी शाळांची स्थिती, सरकारी मदतीची आवश्यकता, सरकारी छात्रवृत्त्या ठेवण्याची विशेष आवश्यकता आहे. यासंदर्भात कमिशनपुढे  आक्रमकपणे मांडणी केली.

दिनांक २९ नोव्हेंबर १८८४ रोजी न्या. महादेव रानडे यांनी शाळेस भेट दिली. याचवर्षी मुंबई इलाख्याचे गव्हर्नर सर जेम्स फर्ग्युसन यांनीही भेट दिली. इलाखाधिपतींची ही पहिलीच भेट होती. सन १८८४ अखेर शाळेत जवळजवळ ६०० विद्यार्थी होते व २१ शिक्षक होते. तर १५ जुलै १८८५ रोजी इलाखाधिपती लॉर्ड रे यांनी सपत्नीक शाळेला भेट दिली. यावेळी त्यांनी शाळेस ५० रुपये बक्षीस म्हणून दिले. वामनराव भावे यांनी शासनकर्ते, अधिकारी संस्थानिकांचे प्रेम व सहानुभूती मिळवण्याचे प्रयत्न सुरु केले होते. त्यांच्या प्रयत्नांना यशही मिळत होते, हे सयाजीराव महाराज गायकवाड, सरकार बडोदे यांच्या भेटीवरुन दिसून येते. सयाजीराव महाराजांनी शाळेला भेट दिली. दिनांक १६.९.१८८५ रोजी ही भेट दिली होती. त्यावेळी त्यांनी संस्थेला ५०० रुपयांची देणगी पाठवून दिली. त्याचप्रमाणे शाळेचे संस्कृत शास्त्री यांनी या प्रसंगी जी स्वागतपर पद्ये केली त्याबद्दल

त्यास पारितोषिक म्हणून ७५ रू. पाठविले. या दरम्यान डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन मि. ली. वॉर्नर यांनी शाळेस भेट दिली व संस्थेवर विश्वास प्रकट करणारा शेरा लिहिला. त्यात ते म्हणतात, “The Poona Native Institution is one entitled to be considered under recognised management.”[14]

वामनराव भावेंच्या अथक परिश्रमामुळे संस्थेचा व्याप हळूहळू वाढला. विद्यार्थी संख्या वाढली. शिक्षक संख्याही वाढली. निकाल ही चांगला लागू लागला. मान्यवरांनी शाळेला भेट देऊन कामकाजाबद्दल समाधान व्यक्त केले. ही शाळेच्या व संस्थेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण बाब होती. ड्यूक ऑफ कॅनॉट यांनी दिलेली भेट ही सुद्धा संस्थेच्या इतिहासातील एक महत्त्वाचा क्षण होता.

एकूणच वामनराव भावे यांच्या तळमळीमुळे संस्थेची प्रगती होऊ लागली. संस्थेला अनेकजणांनी भेटी दिल्या या सदिच्छा भेटींचा संस्थेला भावी काळात फायदा झाल्याचे आपणास दिसते. अशा शासकीय अधिकाऱ्यांनी भेटी दिल्या त्याचप्रमाणे अनेक संस्थानिकांनी देखील शाळेला भेटी दिल्याचे आढळते.या सर्वच भेटींमधून शाळेला या ना त्या प्रकारे लाभ झाला. संस्थेची भरभराट होण्यास या घटना कारणीभूत ठरल्या यामुळे भविष्यात संस्था नावारुपास आली. विविध प्रशासकीय अधिकाऱ्यांनी, संस्थानिकांनी शाळेला दिलेल्या भेटी या केवळ भेटी न ठरता सांस्कृतिक आदानप्रदान करण्यास किंवा त्या वाढवण्याचे कारण ठरल्या.

वामनराव भावे यांच्या प्रयत्नामुळे पुणे शहरासह महाराष्ट्रामध्ये १८८६-८७ पर्यंत संस्थेची एक ओळख निर्माण झाली. शाळेचे संस्थात्मक पातळीवर रुपांतर होण्याच्या या प्रक्रियेचा हा सगळा लेखाजोखा अभ्यासल्यानंतर एक गोष्ट ध्यानात येते म्हणजे, संस्थेची सुरुवात अतिशय खडतर अशा परिस्थितीमधून झाली. मात्र हळूहळू संस्थेच्या कार्यात्मक स्थितीमध्ये वाढ झाल्याने, संस्थेची वाटचाल यशस्वितेकडे सुरु झाली.

कोणतीही संस्था असली तरी तिच्या वाटचालीचा आलेख हा प्रामुख्याने चढ उतारांचा असतो महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी या संस्थेचा आलेख देखील चढउतारांचा असल्याचा आपल्या निदर्शनास येते. अशा चढ उतारांमधूनच संस्थेची जडणघडणात्मक बांधणी व उत्तम प्रकारची रचना आकार घेत असते. किंबहुना संस्था कोणतीही असो ती आकारास येण्यापूर्वी अनेकांनी त्यासाठी कष्ट घेतलेले असतात. त्या सर्वांचा लेखाजोखा म्हणजेच खऱ्या अर्थाने ह्या संस्थेच्या वाटचालीचा

इतिहास असतो आणि या दृष्टिकोनातून महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीची वाटचाल पहाताना आपणास या वाटचालीचा इतिहास केवळ महत्त्वपूर्ण नव्हे तर संघर्षपूर्ण असल्याचे दिसते.

**संस्थेची नोंदणी :**

सन १८८० पर्यंत म्हणजे पहिल्या सहा वर्षात भावे यांनी संस्थेस मान्यता मिळविण्याकरता खूप प्रयत्न केले. त्यांच्या प्रयत्नांमुळेच संस्थेला राजमान्यता मिळाली. शाळेच्या भरभराटीसाठी विद्यार्थ्यांचे यश हा एक महत्त्वाचा निकष असतो. त्याचप्रमाणे व्यक्तिगत पातळीवर केलेल्या प्रयत्नांना सार्वजनिकीकरण केल्याशिवाय त्याला व्यापक स्वरुप प्राप्त होत नाही. त्यामुळे वामनराव भावे यांच्यासह त्यांच्या सहकाऱ्यांनी संस्थेच्या स्वत:च्या जागेकडे लक्ष पुरविण्याचे ठरविले. यानुसारच १९ नोव्हेंबर १८८७ साली कंपनीच्या कायद्यान्वये ही संस्था रजिस्टर करण्यात आली. व तिचे नाव दी पूना नेटिव्ह इन्स्टिटयूशन असोसिएशन असे ठेवण्यात आले.[१५] त्याचबरोबरच संस्थेचे ध्येय व धोरण अधिक व्यापक करण्यात आले. दी पूना नेटिव्ह इन्स्टिटयूशन असोसिएशन या संस्थेचे पहिले अध्यक्ष म्हणून सर जमशेटजी जिजिभॉय बॅरोनेट हे होते. तर बोर्ड ऑफ मॅनेजमेंटचे चेअरमन खानबहादूर दस्तुर हुरांग जमास्प हे होते. यावेळी विद्यार्थ्यांची संख्या सुमारे ७०० होती. या वेळेस वामनराव भावे, लक्ष्मणराव इंदापूरकर, जालनापूरकर, चिंतामण प्रभाकर भावे हे संस्थेचे लाईफ मेंबर्स होते. तर ३ जानेवारी १८८८ रोजी इन्स्पेक्टरांनी पुढीलप्रमाणे मत व्यक्त केले.

“The Poona Native Institution Continues to strengthen its position. Its numbers are still on the increse and it also advances in general efficiency....... it registered itself towards the end of the year under Act 21 of 1860 and has thus acquired an additional claim on public confidence.”

दिनांक १२ डिसेंबर १८८५ रोजी दी नेटीव इन्स्टिटयूशन असोशिएशन या संस्थेची घटना तयार झाली. त्यानूसार संस्थेचे अध्यक्ष व बोर्ड ऑफ मॅनेजमेंटचे चेअरमन सर जमशेटजी जिजिभॉय बेरोनेट, खान बहादूर दस्तूर हुशंग जमास्य, बाळासाहेब सागळीकर, माधवराव कुंटे, गोपाळ हरी, देशमुख, विठ्ठल नातू, वामन प्रभाकर भावे, लक्ष्मण रामचंद्र इंदापूरकर ह्यांच्यात करार झाला.

वामन प्रभाकर भावे, र. ल. इंदापूरकर यांच्याकडून गेली अनेक वर्ष दी नेटीव इन्स्टिटयूशन ही शाळा चालवली जात होती. त्याच शाळेत जेवढे म्हणून शक्य होईल तेवढी फी माफ

करून शिकवावे देणगीदारांनी दिलेले १००० रू. आणि ५०० रू. हे दी नेटीव इन्स्टिटट्यूशन फंड ठेवून त्याच्या व्याजाचे पैसे बँक ऑफ बॉबेज ठेवावे या व्याजातून शाळेसाठी लागणारी स्टेशनरी, ग्रंथालय, इलेक्ट्रीक विद्युत तांत्रिक साधने, प्रयोग शाळेत लागणारे साहित्य व शाळेचा दुरूस्ती खर्च करावेत. मुलांना १० रू. पर्यंत बक्षिस द्यावेत. जर अशी मुले नसतील तर जमशेटजी नौरनशी प्राईज फंड हे खाते काढून त्यात हे पैसे ठेवावेत. हे सर्व पैसे संस्थेच्या अध्यक्षांना वापरण्याचा अधिकार राहील. ते निवृत्त झाल्यावर नविन अध्यक्षांना पैसे वापरण्याचा अधिकार राहील.[१६]

संस्थेची कायमस्वरुपी नोंदणी होणे ही संस्थेच्या वाटचालीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची घटना होती. या नोंदणीमुळे संस्था खाजगी होती ह्यास सार्वजनिक स्वरुप प्राप्त झाले. संस्थेला राजमान्यता मिळाली. संस्थेमध्ये व्यापकता वाढल्याने संस्थेच्या कारभारात देखील फरक पडला. विद्यार्थी संख्या वाढली. संस्थेची नोंदणी केल्यामुळे पुण्यातील लोक संस्थेकडे चांगल्या नजरेने पाहू लागले. नोंदणीसोबत सरकार मान्यता मिळाली त्यामुळे संस्थाचालकांच्या उत्साहामध्ये वाढ होऊ लागली. कोणत्याही संस्थेची शासनदरबारी रीतसर नोंदणी झाली की, ती संस्था अधिकृत समजली जाते याचा अर्थ ज्या संस्थांची नोंदणी होत नसते त्या अनाधिकृत असून त्या गैरव्यवहारी असे समजण्याचे कारण नाही परंतु संस्थेची नोंदणी झाल्याने त्या संस्थेचे उत्तरदायित्व स्वीकारण्यासाठी कोणीतरी असते. असा त्याचा अर्थ होतो म्हणजे नोंदणीला व्यापक अर्थ प्राप्त होतो.

या व्यापक अर्थामागे एक विश्वासू अशा प्रकारचे वातावरण दडलेले असते.या विश्वासू वातावरणाने संस्थेची वाटचाल सुकर व स्पष्ट होत असते. दी पूना नेटिव्ह इन्स्टिटट्यूशन असोसिएशन या संस्थेच्या बाबतीमध्ये देखील असेच झाले असल्याचे आपल्या निदर्शनास येईल. या संस्थेची नोंदणी झाल्यानंतर तात्काळ प्रशासकीय कामांना वेग आल्याचे आपणास दिसून येते, यामध्ये प्रामुख्याने विद्यार्थी संख्येमध्ये वाढ होणे, शासकीय आर्थिक निधीमध्ये वाढ होणे, चाकोरीबद्ध प्रशासकीय कामकाजाची सुरुवात होणे इत्यादी घटकांचा उल्लेख करावा लागेल. यावरुन असेही म्हणता येईल की, संस्थेच्या नोंदणीनंतर संस्था आकारास येऊ लागली. संस्थेला सरकार जबाबदार असल्याने संस्थेवर देखील जबाबदारीचा दाबाव वाढत गेला परंतु अप्रत्यक्षरीत्या या जबाबदारीपूर्ण परिस्थितीमुळे संस्था यशस्वीतेकडे झुकूलागली.

फेब्रुवारी १८८८ मध्ये हिज हायनेस दि महाराजा ऑफ म्हैसूर यांनी शाळेस भेट दिली. यानंतर हिज हायनेस दि महाराजा ऑफ त्रावणकोर यांनी शाळेस भेट दिली. या दोघांच्या

राजपुरुषांच्या भेटीनंतर लगेचच मार्च १८८८ मध्ये हिंदुस्थानचा सार्वभौम बादशहांच्या घराण्यातील राजपुरुषाचा म्हणजे हिज रॉयल हायनेस दि ड्यूक ऑफ कॅनॉट यांनी पुनर्भेट दिली. त्यांच्या हस्तेच ३ मार्च १८८ रोजी बक्षीस समारंभ झाला. यानंतर लवकरच (८.९.१८८८) रोजी ड्यूक ऑफ कॅनॉट यांच्याकडून २५०/- रूपयाची देणगी आली. दिनांक २७.९.१८८८ रोजी जमखंडीचे अधिपती श्री. रामचंद्र रावसाहेब सरकार यांनी भेट दिली. त्यांनी २००/- रूपये दिली. दुसऱ्याच दिवशी सावंतवाडीचे सरदेसाई यांनीही शाळेस भेट देऊन शाळेच्या कामाबद्दल समाधान व्यक्त केले. पुढे शाळेचे नाव व कार्य सगळीकडे प्रसिद्ध पावले. तत्कालिन व्हाइसरॉय लॉर्ड लॅन्सडाऊन यांचे शाळेला पत्र आले होते. १८८८ च्या वर्षअखेरीस शाळेत सुमारे ७०० विद्यार्थी होते. १८८९ च्या जूनमध्ये मि. चेस्टर मॅकनॉटन, जुलैमध्ये प्रो. टी. एम. लिंडस यांनी भेटी दिल्या. यावर्षीही शाळा खात्याने सकारात्मक अभिप्राय व्यक्त केला होता. तर १४ नोव्हेंबर १८८९ रोजी श्रीमंत महाराज छत्रपती कोल्हापूर यांनी शाळेला भेट दिली व समाधान व्यक्त केले.

ऑगस्ट १८९० मध्ये हिज एक्स्लन्सी दि राईट ऑनरेबल लॉर्ड हॅरिस यांनी शाळेस भेट दिली. पुढे १८९३ मध्ये संस्थेसाठी रा. थत्ते यांचा वाडा १५००० रूपयांस विकत घेण्यात आला. त्यामुळे संस्थेला स्वत:ची इमारत मिळाली. यापूर्वी थत्ते यांच्या वाड्यातच भरत होती परंतु ती जागा भाड्याने होती. त्यामुळे थत्ते यांचा वाडा संस्थेने विकत घेऊन स्वत:च्या जागेत आपले कामकाज सुरु केले. १८९० ते १८९१ या काळात युनिव्हर्सिटी परीक्षेतही शाळेने उत्तम यश संपादन केले. १८९० ला लक्ष्मण नारायण महागावकर हे दुसरे जगन्नाथ शंकरशेट स्कॉलर, इलाख्यात ५ वे व पुणे सेंटरला पहिले आले.[१७] सन १८९१ ला वामन विश्वनाथ बापट हे पहिले जगन्नाथ शंकरशेट स्कॉलर आले. नरहरी विनायक देवकुळे हे इलाख्यात ९ वे व पुणे सेंटरला १ ले आले. १८९२ मध्ये मोरेश्वर रघुनाथ आपटे हे इलाख्यात ६ वे व पुणे सेंटरला २ रे आले.

सन १८९१ दामोदर गणेश दाणी स्कूलफायनल मुंबई इलाख्यात ३ रे व पुणे सेंटरला १ ले आले. या वर्षात शाळेची चांगलीच भरभराट झाली. या कालखंडात शाळेला कायमची मान्यता मिळाली. त्याचबरोबर स्वत:ची इमारत खरेदी केली. त्याचबरोबर विद्यापीठाच्या परीक्षेत शाळेने घवघवीत यश संपादन केले. या यशामुळे शाळेची कीर्ती सगळीकडे पोहचली. शाळेच्या कार्याचे महत्त्व लोकांना पटले. भावे स्कूल ही प्रमुख शाळांपैकी एक आहे अशी लोकांची खात्री पटली.शाळेची संस्थेची प्रगती होत होती. लोकांची सहानुभूती मिळत होती. संस्थेचा गुणात्मक दर्जा वाढत होता.

यामुळे संस्थाचालकाच्याही अपेक्षेत वाढ झाली. संस्थेचा विस्तार झाला पाहिजे या भावनेतून कॉलेजची स्थापना करण्याचे ठरविण्यात आले. यावेळी शाळेच्या विद्यार्थ्यांची संख्या ६०० से ७०० पर्यंत होती. या सर्व अनुकूल स्थितीत कॉलेजचे वर्ग सुरु करावेत असे संस्था व्यवस्थापनाला वाटू लागले. त्यादृष्टीने दिनांक १८ ऑगस्ट १८९५ रोजी मुंबई इलाखाधिपती लॉर्ड सँडहर्स्ट यांनी शाळेस भेट दिली व संस्थेच्या कल्पनेला सहमती व सहानुभूती दर्शविली.[१८]

सन १८९६ साली जानेवारी महिन्यात 'महाराष्ट्र कॉलेज' या नावाने कॉलेजचा पहिला वर्ग सुरु करण्यात आला. या वर्गाकरिता तीन वर्षाची मान्यता मिळाली. 'महाराष्ट्र कॉलेज' या नावाने सुरु झालेल्या या कॉलेजमध्ये प्रो. व्ही. बी. गोखले (गणित), प्रो. ए. एस्. साठे (इंग्लिश), प्रो. नटेश आप्पजी द्रविड (इंग्लिश), प्रो. शिवराम महादेव परांजपे (संस्कृत), प्रो. विनायक रामचंद्र जालनापूरकर (इतिहास), प्रिं. वामनराव भावे (लॅटिन) व इंद्रस्वरूप मुनशी (पर्शियन) हे कार्यरत होते. संस्थेचे कॉलेज सुरु करण्याचे स्वप्न साकार झाले. कॉलेजची आवश्यकता होती. सन १८९६ साली प्रिव्हीयस परीक्षेस पाठविलेल्या ३९ विद्यार्थ्यांपैकी ३१ पास झाले.[१९] यावरुन चांगली कामगिरी लक्षात येते. संस्थेच्या माध्यमातून कॉलेज काढण्याचा निर्णय अतिशय महत्त्वाचा होता. शाळेसोबतच उच्च शिक्षणाची सुविधा विद्यार्थ्यांना मिळावी हा हेतू त्यामागे होता.

संस्थेने कॉलेजची स्थापना केल्यावर प्राथमिक शाळेच्या स्थापनेच्या अनुषंगाने चाचपणी सुरु केली. शाळेला प्राथमिक वर्ग जोडणे ही त्यावेळची आवश्यकताच होती. त्याप्रमाणे १८९६ साली शाळेतील एक शिक्षक दामोदर गणेश नगरकर यांना भावे व इंदापूरकर यांनी प्राथमिक शाळा सुरु करण्यास सांगितली. त्यांना सुपरिटेंडेंट म्हणून नेमले. या शाळेची सुध्दा मोठी आवश्यकता होती हे विद्यार्थी संख्येवरुन लक्षात येते. पहिल्या दिवशी या शाळेत ८० मुले आली व वर्षअखेर ही संख्या २५० झाली. महत्त्वाचे म्हणजे पहिल्याच वर्षी शाळेला शाळा खात्याने ४७६ रूपये ग्रँट दिली.

संस्थेने कॉलेजबरोबरच शाळेची स्थापना करुन विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सुविधा उपलब्ध करुन दिली. १८९६ साल संस्थेच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरले. या शाळेत प्राथमिक दुय्यम व उच्च शिक्षण देण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळाली. तीनही विभागातून सुमारे १००० विद्यार्थी शिक्षण घेऊ लागले. संस्थेची ही फार मोठी उपलब्धी होती. सन १८७४ ला फक्त १० मुलांवर सुरु झालेली ही शाळा आता भरभराटीस येऊ लागली होती.

**संस्थेसमोरील प्रतिकूल काळ :**

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी ही संस्था अडचणीतूनच स्थापन करण्यात आलेली होती. अवघ्या दहा विद्यार्थ्यांवर सुरु झालेल्या या शाळेची भरभराट होऊन शाळेला प्राथमिक व कॉलेजचे वर्ग जोडण्यात आले. विद्यार्थ्यांची संख्या वाढू लागली. अत्यंत अडचणीतून सुरु झालेल्या या शाळेची भरभराट झाली. पुण्याच्या शिक्षण क्षेत्रात या संस्थेचा दबदबा निर्माण झाला. विद्यार्थी व पालकांच्यात ही शाळा लोकप्रिय झाली होती. सरकारी मंडळी प्रतिष्ठितांमध्ये या शाळेविषयी सहानुभूती निर्माण झाली होती. परंतु याच दरम्यान संस्थेच्या प्रतिकूल परिस्थितीस प्रारंभ झाला. विविध अडचणी या संस्थेसमोर उद्‌भवल्या. काही हितशत्रूंनी विनाकारण संस्थेला त्रास द्यायला सुरुवात केली. सन १८९५ पासून सार्वजनिक गणेशोत्सवास प्रारंभ झाला. लोकांना संघटित करुन त्यांच्यात प्रबोधन करण्याचे काम मोठ्या प्रमाणावर सुरु झाले. या लोकप्रबोधनाच्या कार्यात शि. म. परांजपे, अच्युत साठ्ये यांनी दौरा काढून ठिकठिकाणी लोकजागृती केली. हे दोघेही जण संस्थेत नव्याने सुरू झालेल्या महाराष्ट्र कॉलेजमध्ये अध्यापनाचे कार्य करत होते. सरकारकडून संस्थेला विचारणा होऊ लागली. संस्थेच्या घटनेप्रमाणे स्टाफमधील लोकांनी राजकारणात भाग घेऊ नये अशी तरतूद नव्हती. सरकारने जुनी घटना बदलून नवी घटना निर्माण करण्याचा तगादा संस्थेकडे लावला. शि. म. परांजपे यांना काढून टाका व कॉलेजचे वर्ग बंद करा. अशा प्रकारची कारवाईही सुरु झाली.

कॉलेजला सर मंचरजी भावनगरी २०,००० रूपये देणगी देणार होते, आर्थिक विवंचनेत असणाऱ्या संस्थेच्या दृष्टिकोनातून ही आनंदाची बाब होती. सर मंचरजी भावनगरी यांनी संस्थेला दिलेल्या देणगीमधून संस्थेच्या इमारत बांधणीचे नियोजन करण्यात आले होते. त्या काळात इमारत बांधणी करणे हे एवढ्या मोठ्या देणगीद्वारे शक्य होणार होते. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना देखील याबद्दल मोठा विश्वास होता. पण सर मंचरजी भावनगरी यांना भेटून २०,००० रू. ची देणगी देऊ नये यासाठी काहींनी सांगण्यात आले. एवढेच नव्हेतर सर मंचरजी यांच्यावर दबाव टाकण्यात आला. एकूणच देणगी प्रकरणाने वेगळे स्वरुप धारण केले. सर मंचरजी यांनी जाहीर केलेली देणगी देणारच असा पवित्रा घेतला, तर संस्थेच्या वतीने विनायकराव भावे यांनी कोणत्याही परिस्थितीत सर भावनगरी यांनी जाहीर केलेली मदत स्वीकारणारच अशी भूमिका घेतली. संस्थेच्या विरोधात असणाऱ्या मंडळींनी दहशतीचा मार्ग अवलंबिला आणि संस्थेला मिळणारी देणगी हाणून पाडण्यात आली.

संस्थेच्या वाटचालीत यासांरख्या घटना अडथळा आणणाऱ्या ठरल्या, संस्थेच्या प्रगती मध्ये या घटना बाधा आणणाऱ्या ठरल्या. या सर्व घटनांचा वामनराव भावे यांना त्रास सहन करावा लागला. संस्थेची वाटचाल खडतर अशा परिस्थितीत सुरु होती परंतु त्यामध्ये देणगी देण्याचा प्रयत्न हाणून पाडण्यात आला. यावरुन एक मात्र लक्षात येते अनंत समस्यांचा सामना करत संस्थेने आपली वाटचाल सुरु ठेवली. उलट अशा घटनांमधून बोध घेऊन नव्या दमाने मार्गस्थ होण्यासाठी वामनराव भावे यांच्यासारखे शिक्षणप्रेमी सिद्ध झाले. एकप्रकारे सर भावनगरी देणगीसारख्या प्रकरणातून संस्थेला प्रतिकूल परिस्थितीशी सामना करण्याची प्रेरणा मिळाली. आपल्या एकूण वाटचालीमध्ये संस्थेला शासकीय आर्थिक मदतीसह अनेक देणग्या आजवर मिळाल्या परंतु आजवरच्या इतिहासात भावनगरी देणगी प्रकरणाचे दिवस मात्र प्रतिकूल काळातले बोचरे पण शिक्षण देणारे दिवस होते. त्यानंतर संस्थेची घटना नव्याने निर्माण करण्यात आली. १८९८ ला मुंबई युनिव्हर्सिटीनी कॉलेजला दिलेली मुदत संपली. याच वर्षी कॉलेज बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला. कॉलेज सुरु करण्याचा एक स्तुत्य व आवश्यक असणारा प्रयत्न उपरोक्त अडचणींमुळे काही थांबवावा लागला होता.

संस्थेच्या वाटचालीत आलेली आणखी एक अतिशय महत्त्वाची अडचण म्हणजे सन १८९६ पासून पुण्यात उद्‌भवणारी प्लेगची साथ. या प्लेगच्या साथीमुळे शाळा वर्षातून २ ते ३ महिने बंद होऊ लागली. मुलांच्या संख्येत कमालीची घट होऊ लागली. सन १८९० पासूनची मुलांची आकडेवारी बघितली तर हे लक्षात येते. १८९० अखेर ६१४ विद्यार्थी होते. १८९५ अखेर ५७८ होते १८९६ पासून ही संख्या कमी होऊ लागली. सन १८९६ ला ४३२ व १८९७ ला ४८० १८९९ अखेर ही संख्या २८८ वर येऊन ठेपली. प्लेगच्या जीवघेण्या साथीमुळे संस्थेच्या कामकाजावर विपरित परिणाम झाला.

श्री. लक्ष्मणराव इंदापूरकर याचे निधन १८९६ मध्ये झाले. इंदापूरकर हे भावेंचे निष्ठावान सहकारी होते. खांद्याला खांदा लाऊन संस्थेसाठी कार्यरत राहणाऱ्या सहकाऱ्याच्या निधनाचा परिणाम निश्चितपणे वामनराव भावे यांच्यावर झाला व त्यामुळे कामाची दगदग संस्थेसमोरील अडचणी यामुळे भावेंनीही केवळ विश्रांतीसाठी सहा महिन्यांची रजा घेतली. सन १८९९ मध्ये एक वर्षाची फर्लो रजा घेऊन ते कर्जतला राहण्यास गेले. तेथेच त्यांचे दिनांक २९ मे १८९९ रोजी निधन झाले.[२०] हा संस्थेवर आणि संस्थेच्या कार्यावर झालेला मोठा आघात होता. वामनराव भावे यांचा या

शाळेच्या व संस्थेच्या विस्तारात मोठा वाटा होता. अतिशय परिश्रमपूर्वक त्यांनी संस्थेचे काम केले. आपल्या सर्व सहकाऱ्यांना सोबत घेऊन प्रतिकूल परिस्थितीशी सामना करत त्यांनी संस्थेची वाटचाल सुरु ठेवली होती. मृत्युसमयी त्यांचे वय ४७ इतके होते. ऐन उमेदीत त्यांना मृत्यू आला. सतत २४ वर्षे त्यांनी या शाळेच्या अत्यंत आस्थैने, प्रेमाने, चिकाटीने विकासात महत्त्वाची भूमिका बजावली. केसरी वृत्तपत्राने त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना श्रद्धांजली अर्पण करणारा लेख लिहिला. वामनराव प्रभाकर भावे यांचे संस्थेच्या विकासात महत्त्वाचे योगदान होते. अत्यंत निष्ठेने त्यांनी संस्थेसाठी समर्पित भावनेने काम केले. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या संस्थेच्या इतिहासात वामनराव भावे यांच्या कार्याची नोंद घेतल्याशिवाय संस्थेच्या इतिहासाचा आढावा घेतला जाणार नाही.

## ३.६ संस्थेचा कार्यविस्तार :

वामनराव भावे यांच्या निधनानंतर संस्थेने केलेले महत्त्वाचे कार्य म्हणजे संस्थेचा वाढलेला विस्तार सर्वसाधारणपणे सन १९०० ते १९१३ या दरम्यान संस्थेने नव्या जोमाने केलेल्या कार्यविस्ताराचा आढावा घेण्यात आला आहे. प्लेगची साथ, भावेंची रजा आणि निधन अशा अरिष्ट्यात सापडलेल्या संस्थेने या काळात नव्या जोमाने आपल्या कार्याला सुरूवात केली. प्लेगच्या साथीच्या दरम्यान विद्यार्थी संख्या घटलेली होती, शाळा बंद पडते की काय अशी परिस्थिती निर्माण झालेली होती. अशातच शैक्षणिक तळमळ व संस्थेविषयी आस्था असणारे वामनराव भावे यांचे निधन संस्थेवर आघात करणारे ठरले. अशा चौफेर संकटातून संस्था वेळीच बाहेर आली. नव्या उत्साहाने संस्थेने आपल्या कार्याला सुरूवात केली. पुणे शहराच्या बाहेर संस्थेने शाळा सुरु केल्या होत्याच. जेजुरी येथील शाळा म्युनिसिपल कमिटीमार्फत चालवली जात असे, परंतु व्यवस्थित चालत नसे म्हणजे, विद्यार्थी संख्या कमी, शैक्षणिक दर्जा कमी अशा समस्या या शाळेच्या बाबतीमध्ये होत्या. त्यामुळे जेजुरीमधील काही लोकांनी ही शाळा महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने चालवावी अशी इच्छा प्रदर्शित केली. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने देखील हा प्रस्ताव मान्य केला व जेजुरी येथे १९०० च्या सप्टेंबर महिन्यात मराठी शाळा सुरु केली.

संस्थेने ही शाळा सुरु केल्यानंतर विद्यार्थी संख्या वाढली. विद्यार्थी व पालकांमध्ये शाळेविषयी आत्मविश्वास निर्माण झाला. जेजुरी येथील मराठी शाळेत गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले जाऊ

लागले. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने ही शाळा सहा वर्ष यशस्वीपणे चालवून दाखविली व शाळेची परिस्थिती सुधारल्यानंतर पुन्हा म्युनिसिपल कमिटीकडे सुपुर्द करण्यात आली.

सन १९०० या वर्षीच कर्जत, जि. कुलाबा या ठिकाणी तेथील लोकांच्या आग्रहास्तव इंग्रजी शाळा सुरु करण्यात आली. या ठिकाणच्या लोकांचा आग्रह होता की या ठिकाणची शाळा महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या वतीनेच सुरु करण्यात यावी लोकांच्या आग्रहावरुन ध्यानात येते की, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी या संस्थेविषयी लोकांच्या मनात किती मोठ्या प्रमाणात आस्था होती. त्यामुळेच कर्जतच्या लोकांनी संस्थेला आग्रह केला होता. सन्मान करुन महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने सुरु केलेली इंग्रजी माध्यमातील शाळा १९१० पर्यंत टिकली. या दरम्यान पुणे शहराबाहेर शाळा काढणे व त्या शाळेचे योग्य प्रकारे संचलन करणे हे काम संस्थेने सुरु केले.यानंतरच्या काळात संस्थेच्या वतीने सासवड ॲग्लो व्हर्नाक्युलर स्कूलची स्थापना करण्यात आली. शाळेचे कायम शिक्षक झांबरे यांच्या नेतृत्वाखाली दि. २६ मार्च १९०६ रोजी या शाळेची स्थापना करण्यात आली. सासवड हे पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील गाव होते आणि अशा ग्रामीण भागात महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने व्हर्नाक्युलर प्रेसची स्थापना करुन आपला शाखाविस्तार ग्रामीण भागामध्ये करण्यास सुरुवात केली.

दरम्यानच्या काळात वामनराव भावे यांच्या निधनानंतर २० डिसेंबर १९०३ रोजी व्ही. बी. गोखले यांचे निधन झाले. गोखले यांच्या निधनामुळे संस्थेवर मोठा आघात झाला. परंतु वामनराव भावे यांच्या निधनाचे दु:ख पचवलेल्या महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने गोखले यांच्या निधनाने संस्थेवर झालेला आघात देखील सहन केला. व शाखाविस्ताराचे धोरण आणखी मोठ्या प्रमाणात वाढवल्याचे संस्थेच्या या काळातील कामकाजावरुन स्पष्ट होते. भावे व गोखले यांच्या पश्चात विनायक रामचंद्र जालनापूरकर यांनी संस्थेची सूत्रे स्वीकारली व संस्थेवर आलेल्या आव्हानांशी दोन हात करत, प्रतिकूल परिस्थितीशी संघर्ष करत संस्थेची वाटचाल सुरु ठेवली.[२१] परंतू त्यांच्याच काळात सोमवार दिनांक ३ मे १९०२ रोजी तिसऱ्या प्रहरी दी पुना नेटीव इन्स्टिट्यूशनच्या शाळेचा बक्षिस समारंभ मे. अ. कलेक्टर भि. स्विफ्ट यांच्या अध्यक्षतेखाली झाला. त्यावेळेस कलेक्टर साहेबांनी वार्षिक अहवाल बघितल्यावर शाळेत १०० पेक्षा जास्त मूले असून फक्त चारच मुली आहेत अशा खेद व्यक्त केला. यावरून असे दिसते की सुरूवातीच्या काळात संस्थेचे स्त्री शिक्षणाकडे दुर्लक्ष झालेले होते. साधारणपणे १९०९ नंतर प्लेगची साथ आटोक्यात आली त्यामुळे पुन्हा एकदा

विद्यार्थ्यांची संख्या वाढू लागली, संस्था उभारी घेऊ लागली. अशातच १९१० मध्ये जालनापूरकरांचे निधन झाले.[२२] या घटनेनंतर मात्र संस्थेची अवस्था बिकट झाली. परंतु अशाही परिस्थितीत १९१६ साली काही माजी विद्यार्थी व चालक यांनी संस्थेला उर्जीतावस्था आणण्यासाठी नवीन आजीव सदस्यांनी नव्याने सुरवात केली.

सन १९२४ ते १९३४ या कालखंडात संस्थेच्या इमारतींचे बांधकाम करण्यात आले. बारामती येथील इमारत १९२४ मध्ये बांधली गेली. पेरुगेट हायस्कूलची इमारतही १९२९ साली बांधून पूर्ण झाली. सन १९३४ मध्ये संस्थेच्या डेक्कन जिमखान्यावरच्या हायस्कूलची ८०,००० रूपयांची इमारत पूर्ण झाली. बारामतीलाही वाढत्या विद्यार्थी संख्येमुळे इमारतीचे विस्तारीकरण करण्यात आले. तर १९४७ मध्ये सदाशिव पेठेतील इतिहास संशोधन मंडळाच्या मागे असलेली श्रीमंत कुरुंदवाडकर-पटवर्धन यांची मालकीची जागा संस्थेने सरकारमार्फत ६७,००० रूपयांना घेतली.

संस्थेच्या इतिहासातील एक महत्त्वाची नोंद या ठिकाणी करणे आवश्यक आहे. सन १९१६ साली आजीव सेवक मंडळाची स्थापना करुन संस्थेने वाटचाल करण्यास प्रारंभ केला. सन १९२२ साली संस्थेचे नाव पूना नेटिव्ह इन्स्टिट्यूशन असोसिएशन हे बदलून पूर्वाश्रमीच्या महाराष्ट्र कॉलेजमधील 'महाराष्ट्र' हा शब्द घेऊन 'महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी' असे ठेवण्यात आले. सन १८९६ ते १८९८ या काळात संस्था महाराष्ट्र कॉलेज या नावाने वरिष्ठ महाविद्यालय चालवित असे परंतू ब्रिटिश सरकारच्या वक्र दृष्टीमूळे सन १८९८ साली वरील कॉलेज बंद करावे लागले ह्याची खंत संस्था चालकांच्या मनात कायम होती. कॉलेजची स्तृती कायम राहावी म्हणून दिनांक २७ ऑगस्ट १९२२ रोजी 'दी पूना नेटिव्ह इन्स्टिट्यूशन' हे नाव बदलून महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी असे नाव संस्थाचालकांनी दिले.[२३]

हॉकी, क्रिकेट व आट्यापाट्या या खेळात शाळांनी नेत्रदीपक यश मिळविले. गुणवत्तेच्या दृष्टीने विचार करता खूप विद्यार्थ्यांनी विविध परीक्षांमध्ये आपली गुणवत्ता सिद्ध करुन शाळेचे व संस्थेचे नाव रोशन केले. उपरोक्त सारणीचा विचार करता महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी या शिक्षण संस्थेचा आढावा आपल्याला घेता येईल. १८७४ पासून सुरु झालेल्या या संस्थेच्या विस्ताराचा विचार करता बारामती, सासवड यासह पुणे शहरातील शाळा स्थापना झाल्याचे दिसून येते. त्याचबरोबर १९४५ मध्ये स्थापन झालेले पुण्यातील कॉलेज हा सुद्धा या संस्थेच्या वाटचालीतील महत्त्वाचा टप्पा आहे.

दिनांक ३१.३.१९४९ अखेर संस्थेच्या विविध शाळा व कॉलेजमध्ये एकूण ५४६६ एवढे विद्यार्थी शिक्षण घेत होते. केवळ १० मुलांच्यावर सुरु झालेल्या या शिक्षण संस्थेत केलेली ही यशस्वी वाटचाल नक्कीच थक्क करणारी व कौतुकास्पद आहे.

सन १९५५ पासून संस्थेच्या विविध शाखांसाठी इमारत बांधकामाचे काम पूर्णत्वास नेण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात आले. प्रा. एन.एस. जमदग्नी हे महाविद्यालयाचे प्राचार्य असताना ग्रंथालयाचे काम सुरु करण्यात आले. त्यानंतर स्टेडीअमचे बांधकाम पूर्ण करण्यात आले. सासवड शाळेच्या सर्व जादा वर्ग खोल्यांचे बांधकाम पूर्ण करण्यात आले. १९६५-६६ या वर्षात संस्थेला सरकारकडून एकूण ५२०८६७ रूपये एवढे अनुदान मिळाले. याच वर्षी आर्टस्, सायन्स कॉलेजच्या वार्षिक समारंभाला आचार्य प्र. के. अत्रे हे उपस्थित राहिले. १९६६ पासून वाणिज्य शाखा सुरु करण्यास विद्यापीठाची मान्यता मिळाली. १९६७ ला स्वतंत्र वाणिज्य महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली. उत्तरोत्तर संस्थेचा व्याप वाढत चालला हे यातून स्पष्ट होते.

सन १९८३ पासून आबासाहेब गरवारे महाविद्यालय इन्स्टिटय़ूट ऑफ कम्युनिकेशन व मॅनेजमेंट व गरवारे वाणिज्य महाविद्यालयात इन्स्टिटय़ूट ऑफ मॅनेजमेंट अॅड करिअर कोर्सेस या व्यावसायाभिमुख शिक्षण देणाऱ्या संस्थांची स्थापना झाली. सन १९८५-८६ मध्ये आबासाहेब गरवारे महाविद्यालयात संगणक केंद्र सुरु करण्यात आले. संस्थेचा विकास होत असताना व्यवसायाभिमुख अभ्यासक्रम, सुसज्ञ इमारती, अभ्यासू शिक्षकवर्ग याकडे वेळोवेळी लक्ष पुरविण्यात आले. त्यामुळे प्रगती वाढत गेली. १९९२-९३ पर्यंत संस्थेच्या एकूण १६ शाखा होत्या व विद्यार्थी संख्या २५६४५ एवढी होती.

सन ९४-९५ या वर्षी आबासाहेब गरवारे महाविद्यालयात सुवर्णमहोत्सव साजरा करण्यात आला. १९९७ पासून संस्थेने राणी लक्ष्मीबाई यांच्या नावाने सैनिकी शाळा स्थापन करुन मुलींना सैनिकी शिक्षण देण्यासाठी एक महत्त्वाचे पाऊल उचलले. २००१-०२ या वर्षापर्यंत संस्थेच्या विस्तारात आणखी वाढ झाली. शाखांची संख्या २९ झाली तर विद्यार्थी संख्या ३१३२२ एवढी झाली. संगणकीय ज्ञानाचा प्राधान्यक्रम देतानाच विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीला प्रोत्साहन देण्यासाठी संस्थेकडून विशेष प्रयत्न करण्यात आल्यामुळे प्रत्येक परीक्षेच्या निकालात यशाची परंपरा निर्माण झाली.

संस्थेच्या शाखा वाढल्या यावरून असे निदर्शनास येते की संस्थेने गुणात्मक व संख्यात्मक विस्तार केला आहे. दर्जेदार शिक्षणाची परंपरा निर्माण झाली. त्याचबरोबर राष्ट्रप्रेमी नागरिकांची पिढी निर्माण व्हावी असे संस्कार व विचार सातत्याने विद्यार्थ्यांना देण्यात आले. विविध उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्त्वाला आकार देण्याचे काम संस्थेने विविध शाखांच्या माध्यमातून झाले आहेत.

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या शाखांचा विस्तार पुढालप्रमाणे झालेला आहे.

| अ.क्र | स्थापना वर्षे | शाखांची नावे | ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | इ.स.१८६० | म.ए.सो. मुलांचे विद्यालय | पुणे |
| २ | इ.स.१८९६ | म.ए.सो. भावे प्राथमिक शाळा | पुणे |
| ३ | इ.स.१९०६ | म.ए.सो. वाघीरे विद्यालय | सासवड, पुणे |
| ४ | इ.स.१९११ | म.ए.सो. बाल मंदिर | बारामती, पुणे |
| ५ | इ.स.१९२२ | म.ए.सो. बाल शिक्षण मंदिर | पुणे |
| ६ | इ.स.१९२५ | म.ए.सो. सौ. विमलाबाई गरवारे प्रशाला | पुणे |
| ७ | इ.स.१९३५ | म.ए.सो. रेणुका स्वरुप मेमोरिअल गर्ल्स हायस्कूल | पुणे |
| ८ | इ.स.१९४५ | म.ए.सो. आबासाहेब गरवारे महाविद्यालय | पुणे |
| ९ | इ.स.१९५८ | म.ए.सो. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे वसतिगृह | पुणे |
| १० | इ.स.१९६७ | म.ए.सो. गरवारे वाणिज्य महाविद्यालय | पुणे |
| ११ | इ.स.१९७९ | म.ए.सो. पूर्व प्राथमिक शाळा | पुणे |
| १२ | इ.स.१९७९ | म.ए.सो. शिशु मंदिर | पुणे |
| १३ | इ.स.१९७९ | म.ए.सो. बाल शिक्षण मंदिर इंग्लिश मिडिअम | पुणे |

| | | | |
|---|---|---|---|
| | | स्कूल | |
| १४ | इ.स.१९८३ | म.ए.सो. इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट अँड करिअर कोर्सेस | पुणे |
| १५ | इ.स.१९८६ | म.ए.सो. बाल विकास मंदिर | सासवड, पुणे |
| १६ | इ.स.१९८६ | म.ए.सो. पूर्व प्राथमिक शाळा | सासवड, पुणे |
| १७ | इ.स.१९८६ | म.ए.सो. बालक मंदिर | बारामती, पुणे |
| १८ | इ.स.१९८९ | म.ए.सो. पूर्व प्राथमिक शाळा | बारामती, पुणे |
| १९ | इ.स.१९८९ | म.ए.सो. रेणुका स्वरुप इन्स्टिटयूट ऑफ करिअर कोर्सेस | पुणे |
| २० | इ.स.१९९६ | म.ए.सो. इंग्लिश मिडिअम स्कूल | शिरवळ, खंडाळा |
| २१ | इ.स.१९९६ | म.ए.सो. शक्ति जिम्नॅशिअम | पुणे |
| २२ | इ.स.१९९६ | म.ए.सो. ज्ञान मंदिर | कळंबोली, नवी मुंबई |
| २३ | इ.स.१९९७ | म.ए.सो. राणी लक्ष्मीबाई मुलींची सैनिकी शाळा | कासार आंबोली, पुणे |
| २४ | इ.स.१९९९ | म.ए.सो. आद्यक्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके विद्यालय | नवीन पनवेल |
| २५ | इ.स.२००० | म.ए.सो. विद्या मंदिर | बेलापूर, नवी मुंबई |
| २६ | इ.स.२००० | म.ए.सो. शिक्षण प्रबोधिनी | पुणे |
| २७ | इ.स.२००५ | म.ए.सो. रेणावीकर माध्यमिक विद्यालय मंदिर | सावेडी, अहमदनगर |

| | | | |
|---|---|---|---|
| २८ | इ.स.२००५ | म.ए.सो. कै. दा. शं. रेणावीकर विद्या मंदिर | सावेडी, अहमदनगर |
| २९ | इ.स.२००५ | म.ए.सो. पूर्व प्राथमिक शाळा | सावेडी, अहमदनगर |
| ३० | इ.स.२००६ | म.ए.सो. व्यक्तिमत्त्व विकास केंद्र | पुणे |
| ३१ | इ.स.२००९ | म.ए.सो. इन्स्टिटयूट ऑफ हेल्थ सायन्स | लौटे घाणेखुंट चिपळूण |
| ३२ | इ.स.२०१० | म.ए.सो. स्कूल ऑफ नर्सिग | लौट घाणेखुंट चिपळूण |
| ३३ | इ.स.२०१० | म.ए.सो.आयुर्वेद महाविद्यालय | लौट घाणेखुंट चिपळूण |
| ३४ | इ.स.२०१० | म.ए.सो. कॉलेज ऑफ नर्सिग | लौट घाणेखुंट चिपळूण |
| ३५ | इ.स.२०१० | म.ए.सो. स्कूल ऑफ पॅरामेडिकल सायन्स | लौट घाणेखुंट चिपळूण |
| ३६ | इ.स.२०१० | म.ए.सो. कम्युनिटी महाविद्यालय | पुणे |

वरील माहितीवरुन हे दिसून येते की, 'महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी' या शिक्षण संस्थेच्या माध्यमातून पूर्वप्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक, महाविद्यालय व विविध कोर्सेस वसतिगृह मिळून ३६ शाखा कार्यरत आहेत व हजारो विद्यार्थ्यांनी आजवर शिक्षण घेतलेले आहे.[२]

## ३.७ संस्थेचे नेतृत्त्व :

'महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी' ही संस्था नावारूपास येण्यामध्ये अनेकांचा सहभाग जसा महत्त्वाचा आहे, त्याचप्रमाणे ज्यांनी संस्थेचे कुशल नेतृत्त्व केले त्या सर्वांचे देखील स्थान संस्थेच्या वाटचालीमध्ये महत्त्वाचे आहे. संस्थेचे नेतृत्त्व करणाऱ्यांमध्ये अनेक नामवंत व महनीय व्यक्तिंचा समावेश आहे. यामधील प्रमुख व्यक्ती खालीलप्रमाणे :

### ३.७.१ सर जमशेटजी जीजीभॉय बॅरोनेट : (इ.स. १८८७ ते १९२५)

'महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी' म्हणजे पूर्वाश्रमीची दि पूना नेटीव्ह इन्स्टिटयूशन असोसिएशन ही संस्था जेव्हा १९ नोव्हेंबर १८८७ साली कंपनी कायद्यान्वये रजिस्टर करण्यात आली. तेव्हाच मि. बॅरोनेट यांनी पदभार स्वीकारला. त्यांच्या काळात वामनराव भावे, लक्ष्मणराव इंदापूरकर, विनायक जालनापूरकर, चिंतामणी प्रभाकर भावे हे संस्थेचे लाइफ मेंबर झाले. बॅरोनेट यांच्या काळातच संस्थेला अधिमान्यता अधिकृतता प्राप्त झाल्याने हा काळ संस्थेच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचा समजला जातो. मि. बॅरोनेट यांचा कार्यकाळ महत्त्वाचा समजला जातो, कारण संस्थेच्या विकासाचे ध्येय हाती घेऊन संस्थेच्या घटनात्मक व रचनात्मक बाबींकडे अधिक प्रमाणात लक्ष दिले.

### ३.७.२ श्रीमंत बाबासाहेब घोरपडे : (इ.स. १९२६ ते १९४३)

श्रीमंत बाबासाहेब घोरपडे यांनी संस्थेचे नेतृत्त्व स्वीकारले तेव्हा संस्थेला नव्या शाळांना मान्यता मिळत होती. परंतु तुटपूंज्या शासकीय आर्थिक मदतीवर संस्थेचा डोलारा सांभाळणे एवढे सोपे नव्हते. परंतु श्रीमंत बाबासाहेब घोरपडे यांनी आव्हान स्वीकारले. संस्थेला आर्थिक शिस्त लावली. अनेकांकडून आर्थिक मदती मिळवून संस्थेला आर्थिक स्थैर्य प्राप्त करुन दिले. श्रीमंत घोरपडे यांच्या नेतृत्त्व कार्यकालाची वैशिष्ट्य म्हणजे या कालावधीमध्ये पालकांनी या संस्थेवर मोठा विश्वास दाखवला. अनेक पालकांनी सामाजिक जबाबदारी समजून स्वत: संस्थेला जमेल त्या प्रकारे आर्थिक मदत केली. मोठ्या विश्वासाने अनेक धनवंत व्यापाऱ्यांनी देखील मदत केली. या मदतीचा संस्थेला विकासात्मक प्रक्रियेला मोठा उपयोग झाला. वेगळ्या शब्दात याला असे म्हणावे लागेल की, आर्थिक विवंचनेत असणाऱ्या संस्थेला आर्थिक स्थैर्य मिळवून देण्याचे महत्तम कार्य श्रीमंत बाबासाहेब घोरपडे यांनी केले आहे.

### ३.७.३ श्रीमंत बाबासाहेब पंडित पंतसचिव : (इ.स. १९४४ ते १९४८)

श्रीमंत बाबासाहेब पंडित पंतसचिव यांनी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे नेतृत्व स्वीकारल्यानंतर संस्थेच्या कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. कारण पंतसचिव यांच्याकडे एक उत्तम स्वभाव वैशिष्टय होते ते म्हणजे कर्मचाऱ्यांशी नेहमी आपुलकीने व आदरपूर्वक नजरेने पाहत असत. श्रीमंत बाबासाहेब पंडित पंतसचिव यांनी नेतृत्व स्वीकारल्यावर त्यामुळेच संस्थेतील कर्मचारी वर्ग आनंदी झाला. संस्था एक कुटुंब आहे हि भावना वाढीस लागली. विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी, पालक व प्रशासन यांच्यामध्ये समन्वय साधला गेला. या काळात आलेल्या सर्व संकटांना सर्वजण सामोरे गेले. परिणामी संस्थेच्या व्यापकतेत परिपूर्णतेमध्ये भर पडली. अनेक नव्या शाळांना नव्या तुकड्यांना परवानग्या मिळाल्या विद्यार्थी संख्या वाढली. संस्थेच्या वाढत्या विकासाबरोबर संस्थेशी संबंधित सर्व घटकांचा आत्मविश्वास वाढला. या सर्वांमागे खरेतर संस्थेचे नेतृत्व करणाऱ्या श्रीमंत बाबासाहेब पंडित पंतसचिव यांच्या कुशल नेतृत्त्वाचा हातभार अधिक मोठ्या प्रमाणात होता हे नाकारून चालणार नाही.

### ३.७.४ श्रीमंत सर मालोजीराव नाईक - निंबाळकर : (इ.स. १९४८ ते १९६६)

सर मालोजीराव नाईक निंबाळकर हे स्वत: संस्थानिक असल्यामुळे त्यांना प्रशासनातील अनेक घटकांचे बारकाईने अवलोकन झाले होते. प्रशासन चालवताना निर्माण होणाऱ्या समस्या कोणत्या प्रकारच्या असतात, त्या समस्यांच्या निवारणार्थ कोणत्या उपाययोजना केल्या जातात. या सर्वांचा तपशिलाचा अभ्यास मालोजीराव नाईक निंबाळकर यांचा असल्यामुळे त्याचा सर्वच फायदा महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीला झाला असे म्हणावे लागेल. नाईक निंबाळकर यांनी देखील महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या कामकाजासाठी अधिक वेळ दिल्याचे आपणास दिसते. संस्थेचे अनेक प्रलंबित निर्णय सर मालोजीराव नाईक निंबाळकर यांच्या कार्यकालात पूर्ण झाले. त्यांना मूर्त स्वरुप प्राप्त झाले, यामध्ये प्रामुख्याने संस्थेच्या शाळांच्या नवीन इमारतींच्या बांधकामास सुरुवात संस्थेच्या शाळांकरिता जागेची खरेदी नवीन शाळांना मान्यता इत्यादी कामांना वेग आल्याचे दिसते.

### ३.७.५ न्यायमूर्ती यज्ञेश्वर वासुदेव दीक्षित : (इ.स. १९६६ ते १९७८)

न्यायमूर्ती यज्ञेश्वर वासुदेव दीक्षित एक नामांकित व ख्यातकीर्द न्यायदाते होते. यासोबत त्यांची अजून एक ओळख म्हणजे ते कमालीचे शिस्तप्रिय होते. देशाचा सर्वांगीण विकास व्हावयाचा

असेल तर राष्ट्राचे सर्व ध्यान विद्यार्थ्यांवर केंद्रित व्हायला हवे, तर विद्यार्थ्यांनी शिस्तप्रिय होऊन नेटाने अभ्यास करायला हवा ही त्यांची धारणा होती. कडक शिस्तीचे नेतृत्व म्हणून अल्पावधीत महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीवर रचनात्मक व कार्यात्मक अशा दोन्ही प्रकारे ठसा उमटवला. विद्यार्थी संख्येची लक्षणिय वाढ, सर्वोत्तम दर्जाचे निकाल यामुळे न्यायमूर्ती यज्ञेश्वर वासुदेव दीक्षित यांची कारकीर्द ओळखली जाते.

### ३.७.६ पद्मभूषण डॉ. आबासाहेब गरवारे : (इ.स. १९७८ ते १९८४)

पद्मभूषण डॉ. आबासाहेब गरवारे यांची कारकीर्द महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या दृष्टिकोनातून अतिशय गाजली. स्पर्धेशिवाय यशाला गवसणी घालता येत नाही या भूमिकेवर डॉ. आबासाहेब गरवारे यांचा कमालीचा विश्वास होता. त्यामुळे पदभार स्वीकारल्यानंतर डॉ. आबासाहेब गरवारे यांनी विद्यार्थ्यांमध्ये अनेक सुप्त गुण असतात त्यामधील शोध घेऊन त्यांना चालना देण्याचे व त्यांच्या स्पर्धा आयोजित करण्याचे धोरण स्वीकारले. संस्थेच्या सर्व शाळांमधून अभ्यासासोबत अनेक खेळांच्या, कलाप्रकारांच्या स्पर्धा होऊ लागल्या. विद्यार्थ्यांकडून अनेक प्रकारामधून नेत्रदीपक कामगिरी होई. या वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमामुळे संस्थेच्या विद्यार्थ्यांना एक हक्काचे व्यासपीठ मिळाले अर्थात याचे श्रेय पद्मभूषण डॉ. आबासाहेब गरवारे यांनाच द्यावे लागेल.

### ३.७.७ डॉ. पां. वा. सुखात्मे : (इ.स. १९८४ ते १९९७)

संस्थेचा विस्तार विद्यार्थी संख्येत वाढ, गुणवत्तापूर्ण शिक्षण या घटकांकडे डॉ. सुखात्मे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर अधिक लक्ष देण्यास सुरवात केली. डॉ. पां. वा. सुखात्मे यांच्याकडे संस्थेचे प्रमुख म्हणून निर्णय घेण्याची क्षमता होती. त्यामुळे महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या कार्यात गतिमानता आली. प्रलंबीत निर्णयांची योग्य प्रकारे सोडवणूक झाल्यामुळे त्याचा संस्थेला एकप्रकारे फायदा झाल्याचे दिसते. डॉ. सुखात्मे यांनी संस्थेसाठी अधिक वेळ दिला. शासनाकडून पारंपरिक अभ्यासक्रमाऐवजी आधुनिक जगाशी सांगड घालणारे अभ्यासक्रम सुरु करण्यास डॉ. सुखात्मे यांच्या कार्यकाळातच परवानग्या मिळाल्या यामागे डॉ. सुखात्मे यांची संस्थेविषयीची तळमळ कारणीभूत होती.

### ३.७.८ डॉ. वि. ग. भिडे : (इ.स. १९९८ ते २००३)

डॉ. वि. ग. भिडे यांची कारकीर्द देखील संस्थेच्या दृष्टिकोनातून महत्त्वाची समजली जाते. किंबहुना संस्थेच्या एकूणच वाटचालीमध्ये डॉ. वि. ग. भिडे यांचे स्थान अनन्यसाधारण आहे. आपल्या उद्दिष्टांशी साजेसा व्यवहार करुन महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने देशभर नावलौकिक मिळवला होता परंतु या नावलौकिकास चौफेर वाढीची दिशा कोणी दिली असेल तर ती डॉ. वि. ग. भिडे यांनी दिली. आपल्या संपूर्ण कारकीर्दमध्ये डॉ. वि. ग. भिडे यांनी प्रशासनावर आपली हुकूमत बसवली महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी आर्थिक घटकाचा सामना करत असताना या अरिष्ट्यामधून संस्थेला बाहेर काढण्याचे कार्य डॉ. वि. ग. भिडे यांनी केले.

### ३.७.९ पद्मभूषण डॉ. वसंत गोवारीकर : (इ.स. २००३ ते २०१२)

केंद्र सरकारचा पद्मभूषण पुरस्कार मिळालेले महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे दुसरे नेतृत्व म्हणून डॉ. वसंत गोवारीकर ओळखले जातात. आपल्या कार्यात्मक शैलीचा ठसा उमटवणारे प्रभावी व्यक्तिमत्त्व म्हणून महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या वाटचालीत डॉ.वसंत गोवारीकर यांच्या कार्याचा गौरव केला जातो. डॉ. वसंत गोवारीकर यांच्या कालावधीमध्ये विद्यार्थ्यांच्या निकाल वाढीसाठी विशेष प्रयत्न केले गेले. यशस्वी व्हायचे असेल तर केवळ पुस्तकी ज्ञान असून चालणार नाही हे विद्यार्थ्यांमध्ये रुजवण्याचे कार्य गोवारीकर यांच्या काळात झाले.

### ३.७.१० संस्था आणि नेतृत्व यांच्या समन्वयामधून विकास :

संस्था कोणतीही असली तरी त्या संस्थेचे नेतृत्व करणाऱ्यांवर संस्थेच्या विकासाची मोठी जबाबदारी असते. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्य विकासात व वाटचालीमध्ये नेतृत्वाने महत्त्वाची भूमिका बजावल्याचे आपणास दिसते. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्षपद ज्या नामांकित व दिग्गजांनी स्वीकारले त्या प्रमुख मंडळींची माहिती आपण वरील घटकामध्ये घेतलेली आहेच. ज्यांनी ज्यांनी संस्थेचे अध्यक्षपद स्वीकारुन महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे नेतृत्व केले त्यांनी संस्थेचे अध्यक्ष असणे म्हणजे आपला गौरव असल्याचे म्हटले आहे. एवढे मात्र खरे की, कोणत्याही संस्थेचा विकास होण्यासाठी संस्थेशी संबंधित सर्व घटकांची भूमिका महत्त्वाची असते.

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीची वाटचाल यशस्वी होण्यासाठी संस्था व नेतृत्व यांच्यामध्ये बौध्दिक स्वरुपाचे ऐक्य असून या दोन्ही घटकांच्या समन्वयामधून संस्थेचा विकास अधिक

गतिमान झाल्याचे अभ्यासाअंती स्पष्ट होते. नेतृत्वाच्या कार्यकुशलतेने महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी प्रगतीच्या शिखरावर पोहचली असून आज देशातील एक नामांकित संस्था म्हणून ओळखली जाते यामागे निश्चितच संस्था व नेतृत्व यांच्या समन्वयामधून शक्य झाल्याचे स्पष्ट होते. म्हणजेच, 'महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी' ही संस्था नावारुपास येण्यामागे कुशल नेतृत्व कारणीभूत असल्याचे स्पष्ट होते. नेतृत्व व संस्था यांच्या समन्वयामधून संस्थेला सफलता प्राप्त झाल्याचे दिसते.

**समारोप :**

पुणे हे महाराष्ट्राच्या इतिहासात सांस्कृतिकदृष्ट्या तसेच सामाजिक व राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे शहर आहे. तसेच ते शैक्षणिकदृष्ट्याही खूप महत्त्वाचे आहे. पुण्यात शैक्षणिक विकासाच्या दृष्टीने जे प्रयत्न झाले ते भारतीय इतिहासात खूप अनन्यसाधारण आहेत. त्यामुळे जेव्हा शिक्षण क्षेत्राचा विचार केला जातो तेव्हा पुण्याचा विचार टाळून पुढे जाता येत नाही. पुण्यातील शैक्षणिक उपक्रमांचा, प्रयत्नांचा ऐतिहासिक दृष्टीने अभ्यास करताना महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे योगदान तितकेच महत्त्वाचे असल्याचे दिसून येते. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी ही पुण्यातील एक सर्वात जुनी व महत्त्वाची शिक्षणसंस्था आहे.

प्रस्तुत प्रकरणात महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी या शिक्षण संस्थेच्या वाटचालीचा, विकासाचा इतिहास मांडण्यात आला आहे. या प्रकरणात चर्चिल्या गेलेल्या मुद्यांच्या आधारे समोर आलेले निष्कर्ष याठिकाणी मांडण्यात येणार आहेत.

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी पुण्यातील महत्त्वाची शिक्षण संस्था आहे. शतकोत्तर सुवर्ण महोत्सव साजरा करणारी, विद्यार्थ्यांना ज्ञान व सुसंस्कार देणारी ही संस्था आहे. सन १८६० मध्ये महागावकरांनी सुरु केलेल्या खाजगी क्लासचे १८७४ साली 'दी पूना नेटिव्ह इन्स्टिट्यूशन'मध्ये रुपांतर करण्यात आले. वासुदेव बळवंत फडके, वामनराव भावे व लक्ष्मणराव इंदापूरकर यांनी तत्कालिन राजकीय व सामाजिक परिस्थितीत आपल्या विद्यार्थ्यांना उत्तम प्रतीचे शिक्षण देण्यासाठी 'पूना नेटिव्ह इन्स्टिट्यूशन'ची स्थापना केली. पुस्तकी ज्ञानाबरोबरच वर्षानुवर्षे आपल्या समाजावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध चीड निर्माण करुन शोषण व अन्यायाविरुद्ध कृतीप्रवण करण्यामध्ये या संस्थेचे योगदान मोठे आहे. अत्यंत महत्त्वाची गोष्ट अशी की, आगरकर, चिपळूणकर व टिळक

यांनी 'डेक्कन एज्युकेशन सोसायटी' व 'न्यू इंग्लिश स्कूल' स्थापन करण्यापूर्वी 'दी पूना नेटिव्ह इन्स्टिटट्यूशन'ची स्थापना झाली आहे. त्यामुळे ही शिक्षण संस्था राष्ट्रीय शिक्षण देणारी पहिली संस्था ठरते. विशिष्ट अशा तत्त्वनिष्ठ विचारसरणीवर या संस्थेचे कामकाज चालू आहे.

प्रारंभीच्या काळात संस्थेने अतिशय जिद्दीने आपले कार्य सुरु केले. सरकारी अनास्था, आर्थिक चणचण, यावर मात करत संस्थेची वाटचाल सुरु झाली. निराश न होता संस्थेचे कार्य विस्तारत गेले. नंतर संस्थानिक व सरकारी अधिकारी यांची सहानुभूती संस्थेला मिळत गेली. वामनराव भावे यांच्या नेतृत्वाखाली संस्थेचे, शाळेचे कामकाज सुरळीत सुरु राहिले. विद्यार्थी संख्या वाढत राहिली. नंतर प्लेगच्या साथीचा अडसर आला. काही काळ अडचणीचा गेला. वामनराव भावे, लक्ष्मणराव इंदापूरकर यांच्या निधनामुळे पोकळी निर्माण केली. परंतु नियामक मंडळाच्या निर्मितीतून संस्थेचे कामकाज सुरुच राहिले.

आज संस्थेच्या सुमारे ३६ शाखा आहेत. विविध अभ्यासक्रम शिकविले जात आहेत. संस्थेच्या माध्यमातून शिकविल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमाची नोंद घेतली तर हे दिसून येते की, संस्थेचे काळानुरुप नव्या आव्हानांना समर्थपणे तोंड देत अभ्यासक्रम घेतले आहेत की ज्यांचा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी उपयोग होईल. पूर्वप्राथमिक शाळेपासून ते महाविद्यालय, संशोधन केंद्रापर्यंत संस्थेची मजल गेली आहे. विविध व्यावसायिक अभ्यासक्रम शिकविले जात आहेत. संस्थेतून शिक्षण घेतलेल्या कित्येक विद्यार्थ्यांनी खूप मोठे यश मिळविले आहे. राजकारणी, खेळाडू, कलावंत, साहित्यिक, उद्योजक, अधिकारी, पत्रकार असे संस्थेचे माजी विद्यार्थी आहेत. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीची २०१२ मध्ये विद्यार्थीसंख्या ३७,५१६ एवढी आहे. संस्थेच्या दृष्टीने ही मोठी उपलब्धी आहे. केवळ १० विद्यार्थ्यांवर सुरु झालेला संस्थेचा हा प्रवास थक्क करणारा आहे.

## संदर्भ आणि टिपा


१. The Poona Native Institution, **Annual Report**, Pune, 1908-9, p. 12.

२. साखरे द. मा., **भारतीय शिक्षणाचा इतिहास**, सुमित प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, २००४, पृ. ८३.

३. The Poona Native Institution, **Annual Report**, Pune, 1908-9, p. 7.

४. कित्ता, पृ. २०.

५. भावे ल.वा.(संपा.), महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी, **हिरक महोत्सव स्मारक ग्रंथ**, पुणे, १९३५, पृ.९.

६. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी, **शतकोत्तर सुवर्णमहोत्सव मुलांचे विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालय गौरव ग्रंथ**, पुणे, २००९-१०, पृ. १०.

७. एम. बी. शाळीग्राम, **महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी स्मारक ग्रंथ**, पुणे, १९५०, पृ. ११.

८. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी, शतकोत्तर सुवर्णमहोत्सव मुलांचे विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालय, **गौरव ग्रंथ**, पुणे, २००८, पृ. १२.

९. **ज्ञानचक्षु वृत्तपत्र**, पुणे, ४ नोव्हेंबर १८७४, पृ. ३.

१०. Chinpunkar V.K., **Annual Report of New English School**, Pune, 1880, p.12.

११. डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्टक्शनचे **No 2249 of 1880 -81** दी पूना नेटिव्ह इन्स्टयुशनला दिलेल पत्र, दिनांक १३.९.१८८०.

१२. भावे ल. वा. (संपा.), **महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी**, हिरक महोत्सव स्मारक ग्रंथ, पुणे, १९३५, पृ. २०.

१३. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी स्मारक ग्रंथ, पूर्वोक्त, पृ. २२.

१४. कित्ता, पृ. २३.

१५. कित्ता, पृ. २०.

१६. Agremment and Constitution, **The Poona Native Institution**, Pune, 12 Dec. 1885.

१७. **दैनिक केसरी**, २६ डिसेंबर १८९९, पृ.३.

१८. **दैनिक केसरी**, २३ जुलै १८९५, पृ. ३.

१९. भावे ल. वा. (संपा.), पूर्वोक्त, पृ. २९.

२०. कित्ता, पृ. २८.

२१. **दैनिक केसरी**, ४ मे १९०२, पृ. २.

२२. The Poona Native Institution, **Annual Report**, Pune, 1908-9, p. 7.

२३. S.B. Gogate ( Secrtary) ह्यांनी१९७१ साली **Press Conference** ला दिलेल्या माहिती पत्रावरून उल्लेख घेतलेला आहे.

२४. **महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी,** वार्षिक अहवाल, पुणे, २०११-१२, पृ. १४ ते १६.

***************

## प्रकरण ४

# महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या पूर्व प्राथमिक ते माध्यमिक विद्यालयांची वाटचाल


४.१ म.ए.सो. मुलांचे विद्यालय, पुणे (इ.स. १८६०) :

४.२ म.ए.सो. भावे प्राथमिक शाळा, पुणे (इ.स. १८९६) :

४.३ म.ए.सो. वाघीरे हायस्कूल, सासवड, जि. पुणे (इ.स. १९०६) :

४.४ म.ए.सो. कै. गजाननराव भिवराव देशपांडे विद्यालय, बारामती, जि. पुणे (इ.स. १९११) :

४.५ म.ए.सो. बाल शिक्षण मंदिर, पुणे (इ.स. १९२२) :

४.६ म.ए.सो. सौ. विमलाबाई गरवारे प्रशाला, पुणे (इ.स. १९२५) :

४.७ म.ए.सो. रेणुका स्वरुप मेमोअियल गर्ल्स हायस्कूल, पुणे (इ.स. १९३५):

४.८ म.ए.सो. पूर्व प्राथमिक शाळा, पुणे (इ.स. १९७९) :

४.९ म.ए.सो. शिशु मंदिर, पुणे (इ.स. १९७९) :

४.१० म.ए.सो. बाल शिक्षण मंदिर इंग्रजी माध्यम शाळा,(पूर्व प्राथमिक विभाग),पुणे (इ.स.१९७९) :

४.११ म.ए.सो. बाल विकास मंदिर, सासवड, पुणे (इ.स.१९८६) :

४.१२ म.ए.सो. बालक विद्या मंदिर, बारामती, पुणे (इ.स.१९८६) :

४.१३ म.ए.सो. पूर्व प्राथमिक शाळा बारामती, पुणे (इ.स.१९८९) :

४.१४ म.ए.सो. इंग्लिश मिडीअम स्कूल, शिरवळ, खंडाळा (इ.स.१९९६):

४.१५ म.ए.सो. ज्ञान मंदिर कळंबोली, नवी मुंबई (इ.स.१९९६) :

४.१६ म.ए.सो. राणी लक्ष्मीबाई मुलींची सैनिकी शाळा, कासार आंबोली (इ.स.१९९७) :

४.१७ म.ए.सो. आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके विद्यालय, नवीन पनवेल (इ.स.१९९९) :

४.१८ म.ए.सो. विद्यामंदिर बेलापूर, नवी मुंबई (इ.स.२०००) :

४.१९ म.ए.सो. रेणावीकर माध्यमिक विद्यालय, सावेडी, अहमदनगर (इ.स.२००५) :

४.२० म.ए.सो. कै.दा.शं. रेणावीकर विद्या मंदिर, सावेडी, अहमदनगर (इ.स.२००५) :

४.२१ म.ए.सो. पूर्व प्राथमिक शाळा, सावेडी, अहमदनगर (इ.स.२००५) :

४.२२ महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या शाळांचा समाजाला झालेला उपयोग :

**प्रस्तावना :**

'महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी' ही महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्रावर प्रभाव टाकणारी महत्त्वाची शिक्षणसंस्था मानली जाते. या शिक्षणसंस्थेने राष्ट्रीय शिक्षणाचा प्रसार व प्रचार करण्याने उल्लेखनीय कार्य केलेले आहे. इतिहासाचा संपन्न वारसा असणाऱ्या या शिक्षणसंस्थेने आपला राष्ट्राभिमान जागृत ठेवत सन १८६० सालापासून प्रारंभ केला होता. हा ज्ञानवृक्ष सतत बहरत गेल्याचे दिसते. शैक्षणिक क्षेत्रातील अनेक समस्यांचा सामना करत शिक्षण संस्थेने आपली वाटचाल सुरु ठेवलेली आहे.

स्थापनेच्या वेळी केवळ पुणे शहर कार्यरत असणारी संस्था पुणे जिल्ह्याच्या भौगोलिक सीमा भेदत जिल्ह्याच्या बाहेर देखील विस्तारली आहे. कुशल प्रशासनाच्या आणि धाडसी नियोजनामुळे संस्थेचा विस्तार वाढलेला आहे. अहमदनगर, सातारा, पुणे व मुंबई इत्यादी ठिकाणी संस्थेच्या वतीने शाळा सुरु करण्यात आल्या आहेत. सामाजिक कृतज्ञता जागृत ठेवत असताना संस्थेने केलेले उपक्रम, राबवलेले प्रयोग दखलपात्र ठरू लागलेले आहेत. प्रामुख्याने यामध्ये वृक्षारोपण, विद्यार्थी दत्तक योजना म्हणजेच आर्थिक दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व शैक्षणिक शुल्क देण्याचे उपक्रम सामजिक बांधिलकी सिध्द करणारे आहेत.

शिक्षणक्षेत्रामधील बदलांचा स्वीकार करून संस्थेने आपली वाटचाल सुरु ठेवलेली आहे. शिक्षण क्षेत्रासमोर अनेक आव्हाने उभी आहेत. अशा वेळी संस्थेने आपल्या उद्दिष्टांपासून फारकत न घेता सुरु केलेला ज्ञानयज्ञ जागृतच ठेवलेला आहे. त्यामुळे महाराष्ट्रामध्ये शैक्षणिक क्रांतीला हातभार लावणाऱ्या ज्या काही शिक्षणसंस्था आहेत, त्यांमध्ये महाराष्ट्र एज्युकेशन संस्थेचे स्थान निश्चितच श्रेष्ठतम दर्जाचे आहे. ज्या ठिकाणी शिक्षणाची आवश्यकता आहे, त्या ठिकाणी गुणवत्तापूर्वक शिक्षणाची व्यवस्था उपलब्ध करून देणे यालाच संस्थेने आजपर्यंत प्राधान्यक्रम दिलेला आहे. त्यामुळे महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून गरजूंना शिक्षण मिळण्याची एक निश्चित हमी प्राप्त झाली आहे.

'महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी' या संस्थेच्या माध्यमातून अध्यापन देणाऱ्या शाखांमधून पूर्व प्राथमिक गटांपासून ते महाविद्यालय गटापर्यंत शिक्षण दिले जाते. प्रस्तुत प्रकरणामध्ये पूर्व प्राथमिक ते माध्यमिक विद्यालयांचा अनुषंगाने अभ्यास करण्यात आला आहे. विद्यालयांची स्थापना, वाटचाल, विकास यासंदर्भात विश्लेषणात्मक अभ्यास करण्यात आला आहे. प्राथमिक शिक्षण हे राष्ट्राच्या दृष्टीने महत्त्वाचे मानले जाते. कोणत्याही देशाची प्रगती त्या देशातील शैक्षणिक

प्रगतीवरून मोजली जाते. त्यामुळे जगातील प्रत्येक देशाने आपल्या देशातील शिक्षणाकडे लक्ष पुरवले आहे.

शिक्षणाचा विकास साधण्यात शासनाचे शैक्षणिक धोरण, शिक्षकांची प्रयोगशीलता व कार्यक्षमता यांची भूमिका महत्त्वाची असते. भारतासारख्या खंडप्राय देशात शिक्षणाला सर्वदूर पोहचवण्यासाठी याहीपेक्षा अधिक प्रयत्नांची आवश्यकता आहे. शासकीय यंत्रणांच्या मर्यादा लक्षात घेता, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीसारख्या संस्थांचे कार्य किती महत्त्वाचे आहे, हे लक्षात येते. या संस्थेचे मूल्यमापन करून या संस्थेचा समाजाला किती फायदा झाला हे शोधण्याचे काम प्रस्तुत संशोधनातून करण्यात येणार आहे. त्यामुळे महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या पूर्व प्राथमिक ते माध्यमिक शाळांचा अभ्यास या प्रकरणात मांडण्यात येणार आहे.

## ४.१ म.ए.सो. मुलांचे विद्यालय, पुणे (इ.स. १८६०) :

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या दृष्टीने मुलांचे विद्यालय हे अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण याच विद्यालयाच्या माध्यमातून संस्थेने आपल्या कार्यास प्रारंभ केला होता. सन १८६० मध्ये पुण्यात इंग्रजी शिक्षणाचे वर्ग श्री. न. रा. महागावकर यांनी सुरु केले होते. ते त्यांनी बापू भाजेकर यांच्याकडे सोपविले. भाजेकरांनी ते वामनराव भावे, वासुदेव फडके आणि लक्ष्मणराव इंदापूरकर यांच्याकडे सोपविले. आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांनी शाळेच्या विकासात योगदान दिले. नंतर त्यांनी स्वत:ला परकीय सत्तेशी लढा देण्यात गुंतविले. वामनराव भावे यांनी पुढील काळात अतिशय निष्ठापूर्वक या शाळेच्या विकासासाठी स्वत:ला झोकून दिले. त्यामुळेच या शाळेला 'पेरुगेट भावे स्कूल' या नावाने ओळखले जाऊ लागले. वामनराव भावे यांच्या कार्यामुळे येथील शाळेने पुण्याच्या शैक्षणिक विश्वात स्वतंत्र स्थान निर्माण केले.

आपल्या ज्ञानसेवेने पेरुगेट भावे स्कूल अल्पावधीतच पुण्याच्या शैक्षणिक विश्वात अत्यंत मानाचा शिरपेचातील तुरा होऊन बसला. कारण वामनराव भावे यांनी आपल्या शिस्तप्रिय स्वभावातून या शाळेला एक सर्वोत्तम असा दर्जा प्राप्त करून दिला. विद्यार्थ्यांना जगाची ओळख करून देण्यास अग्रक्रम दिल्याने व केवळ शिक्षण हिताचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवल्यामुळे पुण्यामध्ये दर्जेदार व चांगले शिक्षण मिळणारी संस्था म्हणून या शाळेकडे पाहिले जाऊ लागले. वामनराव भावे यांनी पूर्ण वेळ शैक्षणिक क्षेत्रामध्ये गुंतवून ठेवल्यामुळे शाळेच्या विद्यार्थी संख्येत देखील वाढ होऊ लागली व शाळा नावलौकिकास येऊन पुणे शहरामध्ये एक नामांकित शाळा म्हणून प्रसिध्द पावली.

अगदी प्रारंभीच्या काळात नाना हौदाजवळील थत्ते वाड्यात ही शाळा भरत होती. १९२६ साली सदाशिव पेठेमध्ये शाळेसाठी जागा घेण्यात आली. या जागेवर शाळेची इमारत बांधण्यासाठी दिनांक १४.६.१९२६ रोजी पाया खणण्याचा समारंभ झाला. श्री. सद्‌गुरू नारायण महाराज बेट केडगाव यांच्या हस्ते हा समारंभ झाला. मुंबईचे प्रसिध्द कॉन्ट्रॅक्टर शेठ विठ्ठल सायण्णा यांनी इमारतीच्या कामास प्रारंभ केला. सन १९२८ पासून या शाळेचे वर्ग नवीन इमारतीमध्ये भरु लागले. सन १९२९ मध्ये शेठ विठ्ठल सायण्णा यांनी शाळेस ५१,०००/- रूपयांची देणगी दिली.[१] या प्रीत्यर्थ शाळेच्या इमारतीचे 'शेठ विठ्ठल सायण्णा' असे नामाभिधान करण्यात आले.

सन १९२९ च्या सुमारास शेठ विठ्ठल यांच्यासारख्या गृहस्थांनी शाळेच्या नवीन इमारतीकरिता ५१,०००/- रुपयांची देणगी देणे हा एक प्रकारे शाळेचा गौरवच होता. मुंबई, पुणे, नाशिक येथील समाजपयोगी कार्यासाठी देणगी देण्याची विनंती विठ्ठल सायण्णा यांच्याकडे अनेकांनी केली होती. पण, सायण्णा त्यास तयार होत नव्हते. परंतु पेरूगेट शाळेसाठी मात्र सायण्णा यांनी मोठ्या विश्वासाने देणगी दिली होती. श्री. सद्‌गुरु नारायण महाराज यांनी उद्‌घाटन करताना काढलेले गौरवोद्‌गार महत्त्वाचे आहेत, 'शेठ विठ्ठल सायण्णा यांनी शाळेच्या इमारतीसाठी दिलेली देणगी ही केवळ इमारतीसाठी नसून देशाच्या उन्नत्तीमार्गातील मोठी गुंतवणूक आहे.' यावरून असे म्हणता येईल की, देशामध्ये शैक्षणिक प्रगती होत असतांना त्यामध्ये आपलेही योगदान असावे या उद्‌देशाने शेठ विठ्ठल सायण्णा यांनी देणगी दिली व त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी शाळेच्या इमारतीचे 'शेठ विठ्ठल सायण्णा' असे नामकरण करण्यात आले. तसेच प्रस्तुत शाळेची इमारत बांधण्यासाठी अनेक दानशुर लोकांनी हातभार लावला. त्यामध्ये बडोद्याचे व कोल्हापूरचे महाराज ह्यांनी सढळ हताने मदत केली.[२]

सध्या शाळेत ३००० विद्यार्थी शिक्षण घेतात. या शाळेने शतकोत्तर रौप्यमहोत्सवी वर्ष पूर्ण केले आहे. शाळेच्या माजी विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रात नाव मिळविले आहे. आपपल्या क्षेत्रात या विद्यार्थ्यांनी नावलौकिक संपादन करून शाळेचे व संस्थेचे नाव रोशन केले आहे. या शाळेतील विद्यार्थ्यी माध्यमिक शालांत परीक्षेत महाराष्ट्रात सर्वप्रथम येण्याचा मान सातत्याने मिळवत आहेत. शैक्षणिक गुणवत्तेचा विचार करता ही शाळा म्हणजे विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देणारी महत्त्वाची शाळा आहे.

या शाळेत विद्यार्थ्यांचा सर्वांगीण उन्नतीसाठी विविध परीक्षा स्पर्धांचे आयोजन केले जाते. या शाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम राबविले जातात. अध्यापक प्रबोधिनी सारख्या

उपक्रमातून विविध तज्ज्ञांचे मार्गदर्शन आयोजित केले जाते. विद्यार्थी-पालक व शिक्षक यांच्यामध्ये सुसंवाद निर्माण व्हावा यासाठी पालक सभेचे आयोजन केले जाते. इ. ५ वी ते १२ वी पर्यंतच्या सर्व वर्गांच्या प्रत्येक सत्रात एक अशा पालकसभा घेतल्या जातात. रात्र अभ्यासिकेचा उपक्रमही विद्यार्थ्यांच्या हिताचा आहे. संध्याकाळी ६ ते रात्री ९ या वेळेत मुले रात्र अभ्यासिकेत अभ्यास करु शकतात. या शाळेत अपंग समावेशित शिक्षण योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. ५ वी ते १० वीच्या कर्णबधिर व अपंग विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन केले जाते. शालेय विद्यार्थ्यांना कमी दरात विद्यार्थ्यांना शालोपयोगी वस्तू मिळाव्यात व स्वदेशी वस्तू वापरण्याची सवय होण्यासाठी सरस्वती शालेय वस्तू भांडार स्थापन करण्यात आले आहे. गुणवंत विद्यार्थ्यांसाठी शिबिराचे आयोजन करण्यात येते. ९ वी ते १० वी विद्यार्थ्यांसाठी व्यवसाय मार्गदर्शन करण्यात येते. व्यक्तिमत्त्व विकास केंद्र सुरु करण्यात आले आहे. या केंद्रात व्यक्तिगत समुपदेशनासाठी शिवाय मनोमापन, बुध्दिमापन, अभिक्षमता मापन करण्यात येते. पालक शिक्षक संघ स्थापन करुन शिक्षक व पालक यांच्यामध्ये सुसंवाद निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

एकंदरीत म.ए.सो. मुलांचे विद्यालय ही शाळा गुणवत्तापूर्ण शिक्षण विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास या अनुषंगाने विचार करता महत्त्वपूर्ण आहे हे दिसून येते.

## ४.२ म.ए.सो. भावे प्राथमिक शाळा, पुणे (इ.स. १८९६) :

इंग्रजी शाळा सरकारी मान्यतेमुळे समाजात आदराचे स्थान मिळवून होती. शाळेचा निकाल चांगला लागत होता. शाळेतील विद्यार्थी युनिव्हर्सिटीत यशस्वी होऊ लागले होते. समाजामध्ये शाळेविषयी, संस्थापकांविषयी प्रेम व आदराची भावना निर्माण झाली होती. इंग्रजी शिक्षणाबरोबरच प्राथमिक शिक्षणाचे महत्त्वही संस्थाचालकांनी ओळखले होते. त्यामुळे मराठी शाळा काढण्याचे विचार संस्थाचालकांच्या मनात येऊ लागले होते. शिक्षणात एकसूत्रता यावी, विद्यार्थ्यांना त्याचे आकर्षण वाटावे यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता संस्थेस वाटू लागली. त्यातूनच सन १८९६ मध्ये भावे प्राथमिक शाळेची स्थापना करण्यात आली.[३] असे संस्थेचे सचिव विनायक शुक्ल यांच्या घेतलेल्या मुलाखतीतून सांगण्यात आले आहे.

शैक्षणिक बदलांसह विद्यार्थ्यांचा सर्वांगीण व बौध्दिक विकास प्राथमिक शाळेपासूनच व्हावा, यासाठी या शाळेची स्थापना करण्यात आल्याचे दिसते. प्राथमिक शालेय स्तरापासूनच विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्याचा संस्थेचा मानस या निर्णयामधून दिसतो.

संस्थेचे संस्थापक श्री. वामनराव भावे यांनी शाळेच्या विकासासाठी चांगले लक्ष घातले. नव्या शाळेस 'पुणे इन्स्टिट्यूट ब्रँच, मराठी शाळा' असे नाव देण्यात आले. या शाळेच्या स्थापनेनंतर विद्यार्थ्यांचा ओढा या शाळेकडे वाहू लागला. शाळा लवकरच भरभराटीस आली. श्री. वामनराव भावे यांच्या निधनानंतर त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ 'भावे प्राथमिक शाळा' असे नाव देण्यात आले. सातत्याने 'अ'श्रेणी मिळविणारी ही पुण्यातील नामवंत शाळा आहे. या शाळेने १९९६ मध्ये शतकोत्तर महोत्सवी वर्ष साजरे केले. शैक्षणिक उज्ज्वल यशाचे परंपरा या शाळेने सातत्याने राखली आहे.

सध्या ही शाळा पुण्यातील एक प्रसिध्द शाळा म्हणून ओळखली जाते. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी विविध उपक्रम या शाळेत राबविले जातात. विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते. महाराष्ट्र ज्ञानपीठ इंग्रजी परीक्षा, गणित परीक्षा, चित्रकला स्पर्धा, कथाकथन स्पर्धा, नाट्यवाचन स्पर्धा, बालनाट्य स्पर्धा, योगासने व सूर्यनमस्कार स्पर्धा अशा विविध स्पर्धांमध्ये सहभागी होत या शाळेने यश संपादन केले आहे. विविध क्रीडा स्पर्धांमध्येही या शाळेच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. विद्यार्थ्यांच्या मनात उच्च संस्कारमूल्य रुजविणारा 'स्नेहबंध समाजाशी' हा उपक्रम या शाळेच्या वतीने राबविण्यात आलेला एक वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम होता. सामाजिक बांधीलकीची जाणीव विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण व्हावी या दृष्टीने हा उपक्रम राबविण्यात येतो. विद्यार्थ्यांच्या मनातील समाजिक भावना जागृत करणे हा या उपक्रमाचा महत्त्वाचा हेतू आहे. सुसज्ज प्रयोगशाळा व ग्रंथालय हे या शाळेचे वैशिष्ट्ये आहे.[४] चरित्र, अभ्यासविषयक, बालसाहित्य, विज्ञानविषयक अशा प्रकारची विद्यार्थ्यांच्या बुध्दिला चालना देतील अशी अनेक पुस्तके या ग्रंथालयामध्ये असून अनेक दुर्मीळ ग्रंथदेखील या ग्रंथालयामध्ये आहेत.

भावे प्राथमिक शाळेचा विस्तार वेगाने होत होता. शारीरिक शिक्षण हा विषय व व्यायाम विद्यार्थ्यांना शिकविला जात असे. ड्रीलचा व्यायाम सर्व विद्यार्थ्यांकडून करुन घेतला जाई. त्याचबरोबर हुतुतू, खोखो, लंगडी वगैरे देशी खेळांसह क्रिकेटसारखे खेळही मुले खेळत असे. प्रारंभीच्या काळात बालवाचनालय व बालवक्तृत्त्व सभा या उपक्रमांतून विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण केली जात असे. चांगली व निवडक पुस्तके तसेच वर्तमानपत्रे विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध केली जातात.

भावे प्राथमिक शाळेत ड्रॉइंग व हस्तव्यवसाय हे सर्व मुलांसाठी होते. ड्रॉइंग, मातीकाम, पेपर फोल्डिंग प्रत्येक आठवड्यात ठरावीक वेळी होते. त्याचबरोबर बागकामासंबंधीही विद्यार्थ्यांना माहिती दिली जात असे. मुलींसाठी शिवणकाम व गायन क्लास उलपब्ध होते. यासाठी ट्रेन्ड स्त्रीशिक्षकाची

नियुक्ती करण्यात आली होती. यावरून असे दिसून येते की, भावे प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाबरोबरच ड्रॉइंग, हस्तव्यवसाय, बागकाम, शिवण क्लास यांसारख्या शिक्षणाची व्यवस्था करण्यात आली आहे. त्याचा उपयोग विद्यार्थ्यांच्या विकासासाठी होत आहे.

### ४.३ म.ए.सो. वाघीरे हायस्कूल, सासवड, जि. पुणे (इ.स. १९०६) :

म.ए.सो. मुलांचे विद्यालय पुणे, भावे प्राथमिक शाळा पुणे या शाळानंतर महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीची महत्त्वाची शाळा म्हणून वाघीरे हायस्कूल सासवड या शाळेची नोंद घ्यावी लागते. सासवड या गावाला एक ऐतिहासिक परंपरा आहे. संत वाङ्‌मयात 'संवत्सरग्राम' म्हणून उल्लेख असलेले हल्लीचे सासवड हे गाव कऱ्हा नदीच्या काठी वसलेले आहे. याच गावात 'अँग्लो व्हर्नाक्युलर स्कूल' सासवड या शाळेची स्थापना २६ मार्च १९०६ रोजी करण्यात आली.[५] या शाळेला हरिभाऊ तथा अण्णासाहेब वाघीरे यांनी दिलेल्या उदार देणगीच्या स्मृतिप्रीत्यर्थ वाघीरे हायस्कूल असे नाव देण्यात आले.

पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यातील एक महत्त्वाचे ठिकाण म्हणजे सासवड होय. सासवड आणि परिसरातील मुलांच्या शिक्षणासाठी आसपास अत्यल्प सुविधा होत्या. दूरच्या अंतरावर आपल्या मुलांना शिक्षणासाठी पाठवणे हे पालकांना देखील जोखमीचे वाटत असे. त्यातच ग्रामीण भाग असल्याने अनेकांची आर्थिक परिस्थिती बेताचीच होती. या सर्वांचा परिणाम मुलांच्या शिक्षणावर होत होता. त्यामुळे अनेक पालक आपल्या मुलांना शिक्षण न देण्याचा मार्ग स्वीकारत. म्हणूनच महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने सासवड आणि परिसरातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक गरज लक्षात घेऊन या शाळेची स्थापना केली गेली. विशेष म्हणजे या शाळेची इमारत बांधतान संस्था कर्जबाजारी झाली. सन १९१६ या वर्षी संस्थेवर ९८०० रूपये कर्ज होते. त्यावेळेस समाजामध्ये ही शाळा बंद पडते की काय असा गैर समज पसरला होता. परुंतु संस्था चालकांनी माजी विद्यार्थ्यांच्या मदतीने सर्व कर्ज फेडले.[६] अशा पध्दतीने शाळेच्या इमारतीचे बांधकाम झाले.

गावातील शिक्षणप्रेमी, उदार वृत्तीच्या नागरिकांच्या आस्थेतून आणि संस्थाचालकांच्या प्रयत्नातून या शाळेची स्थापना झाली. परंतु या शाळेची स्थापना इंग्रजी शिक्षणाच्या गरजेतून झाल्याचे दिसून येते. या शाळेत शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांमध्ये आचार्य अत्रे, बॅ. वि. म. तारकुंडे, पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरु प्रा. डॉ. राम ताकवले, राज्याचे पहिले पोलीस महानिरीक्षक कै. ना. मा. कामठे या दिग्गजांचा समावेश होतो. या सर्व माजी विद्यार्थ्यांनी सामाजिक, शैक्षणिक कार्यात उत्तुंग भरारी मारलेली आहे हे शाळेसाठी व संस्थेसाठी गौरवास्पद आहेत.

सन १९८६ मध्ये या शाळेत पूर्व प्राथमिक व प्राथमिक शाळा असे दोन स्वतंत्र विभाग करण्यात आले आहेत. तर १९९० पासून कला शाखेचे उच्च माध्यमिक वर्ग सुरु करण्यात आले.[७]

सरदार आबासाहेब पुरंदरे, शंकरराव पांडुरंगराव उर्फ दादासाहेब जगताप, वामनराव बंगाळे या प्रमुख मंडळींच्या सहकार्यातून शाळेचा विकास झाला. या शाळेचे पहिले हेडमास्तर श्री. कृष्णाजी माधव झांबरे यांनी काम पाहिले होते. त्यांचा कार्यकाल सन १९०६ ते १९११ होता. पुढे सन १९११ ते १९१८ या काळात गोपाळ नारायण जोशी यांनी कार्यभार सांभाळला. सन १९०६ पासून शाळेचे रजिस्ट्रेशन सरदाराच्या दफ्तरी सालोसाल होत असे. सन १९१५-१६ साली मे. वांगीकर, पर्सनल असिस्टंट, एज्युकेशन इन्स्पेक्टर यांच्या पत्रान्वये ही शाळा कायमची रजिस्टर झाली.

सासवडमधील वाघीरे हायस्कूल ही शाळा कायमची रजिस्टर झाल्यानंतर शाळेचा सर्वांगीण विकास होण्यास मदत झाली. तसेच शाळेच्या विद्यार्थी संख्येमध्ये वाढ झाली. बौध्दिक व शारीरिक विकासावर भर दिल्याने अनेक नामवंत विद्यार्थी या शाळेत घडले. तसे या भागातील एक गुणवत्तापूर्ण शाळा म्हणून या शाळेकडे पाहिले गेले. मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या कामकाजामुळे ही शाळा आपल्या कार्यातूनच सासवडच्या शैक्षणिक इतिहासाचा मानबिंदू ठरली.

श्री. सदाशिव नारायण गोखले यांच्या हेडमास्तरपदाच्या कार्यकाळात एन्फ्लुएंझाची साथ आली होती, याचा परिणाम शाळेवर झाला. परंतु गोखले यांनी शाळा बंद पडू दिली नाही. सन १९२६ ते २८ या काळात वि. के. खासनीस यांच्या प्रयत्नाने शाळेत इंग्रजी सहावीचा वर्ग सुरु करण्यात आला.

पुरंदर तालुक्यातील सासवडसारख्या ठिकाणी इंग्रजी शिक्षण उपलब्ध करुन देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या शाळेच्या माध्यमातून झाले आहे. एकूणच या शाळेने सासवडमध्ये उपलब्ध नसणारे शिक्षण विद्यार्थ्यांना दिल्याने अनेकांना या शाळेमधून शिक्षण घेता आले. 'वाघीरे हायस्कूल सासवड' ही शिक्षणासोबत जीवन शिक्षण देणारी शाळा आहे. सन १९०६ साली सुरु झालेला हा शिक्षण यज्ञ ज्ञानदानाने सासवड मधील पुढच्या अनेक पिढ्यांना तृप्त करेल असा अभिप्राय त्यामुळेच सासवड नगरपरिषदेने नोंदवला आहे.[८]

## ४.४ म.ए.सो. कै. गजाननराव भिवराव देशपांडे विद्यालय, बारामती, जि. पुणे (इ.स. १९११) :

बारामती हे पुणे जिल्ह्यातील तालुक्याचे ठिकाण आहे. व्यापारासाठी प्रसिध्द असलेले हे गाव आहे. या गावात इंग्रजी शिक्षणाची सोय व्हावी या हेतुने म्युनिसिपल कमिटीने इंग्रजी शिक्षणाचे वर्ग सन १८८५ मध्ये सुरु केले होते. या वर्गांचा चांगल्या प्रकारे विकास व्हावा यासाठी पुण्यातील एका चांगल्या शिक्षण संस्थेकडे वर्ग सोपवावेत असे शाळा चालकांना वाटले. त्यातील एकजण भावे स्कूलचे माजी विद्यार्थी होते. त्यांनी पूना नेटिव्ह इन्स्टिटयूशनकडे हे वर्ग देण्याची शिफारस केली. दिनांक १ मार्च १९११ रोजी या शाळेची स्थापना करण्यात आली.[१] अतिशय मोठे सभागृह व विस्तीर्ण क्रीडागण ही या शाळेची वैशिष्ट्ये आहेत. पूर्व प्राथमिक आणि प्राथमिक शाळा १८९६ मध्ये सुरु केल्या. प्राथमिक शाळा १००% अनुदानावर चालत असून तेथे ४०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. सन १९८६ मध्ये शाळेने अमृतमहोत्सव साजरा केला.

बारामती येथे ही शाळा स्थापन होण्यापूर्वी महाराष्ट्र एज्युकेशन या संस्थेने शिक्षण क्षेत्रात भरीव अशा स्वरूपाची कामगिरी केली होती. ही शाळादेखील म्युनिसिपल कमिटीने त्याच विश्वासाने सोसायटीकडे सोपवली होती. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर भर देताना शालेय प्रशासनाने कोणत्याही प्रकारची तडजोड केली नाही. शालेय स्तरावरच विद्यार्थ्यांमध्ये अनेक विषयांची आवड निर्माण केली. पुण्यानंतर व्यापारी व ऐतिहासिक दृष्टीने बारामतीला महत्त्व आहे. अशा महत्त्वाच्या गावात सुरु असणारे वर्ग दी पूना नेटिव्ह इन्स्टिटयूशनकडे चालविण्यास देण्याचा शाळा चालकांचा विश्वास संस्थेने सार्थ ठरविला. अगदी सुरुवातीपासून आतापर्यंत शाळेने उत्तरोत्तर प्रगती केली आहे.

बारामती या ठिकाणी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या वतीने सुरु करण्यात आलेल्या शाळेची वरीलप्रमाणे माहिती विचारात घेतली असता या शाळेच महत्त्व समजून येते. त्याचबरोबर महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे मोठेपणही समजून येते. म्युनिसिपल कमिटीने सुरु केलेले हे वर्ग जेव्हा पुण्यातील एखाद्या नामांकित व कार्यक्षम संस्थेकडे सोपविण्याची वेळ आली तेव्हा महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीला ही संधी मिळाली. लोकांचा संस्थेवर असलेला विश्वास व संस्थेची कार्यक्षमता यातून दिसून येते. लोकांनी टाकलेल्या या विश्वासाला महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने तडा जाऊ दिला नाही. संस्थेने हे वर्ग ताब्यात घेतल्यानंतर सातत्याने प्रगती होत गेली.

चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, हस्ताक्षर, पाठांतर स्पर्धा असे अनेक उपक्रम या शाळेच्या माध्यमातून वर्षभर चालवले जातात. तर सांस्कृतिक व विविध कलागुणांना वाव मिळावा, विद्यार्थ्यांमधील सुप्त गुण प्रकाशझोतात यावेत यासाठी या शाळेमध्ये स्पर्धात्मक दर्जाचे सांस्कृतिक संमेलन आयोजित केले जातात. 'बारामतीमधील ऐतिहासिक असणारी ही शाळा स्पर्धेच्या जगात आव्हाने पेलायला शिकवते. तशीच ती स्वत: पायावर उभे राहण्याचे संस्कार बाल्यावस्थेत करते, असे मत नवनाथ धाडवे यांनी या शाळेबद्दल मांडले आहे ते यथार्थच आहे.[१०] शैक्षणिक दर्जा, गुणवत्ता याबाबतीत बारामतीच्या या शाळेने नेहमीच सातत्य राखले आहे. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचा जेव्हा आपण विचार करतो तेव्हा संस्थेच्या शाळांपैकी ही एक महत्त्वाची व गुणवत्तेच्या बाबतीत आघाडीवर असणारी शाळा असल्याचे दिसून येते.

## ४.५ म.ए.सो. बाल शिक्षण मंदिर, पुणे (इ.स. १९२२) :

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीची ही जुन्या शाळांपैकी एक शाळा आहे. 'दी पूना नेटिव्ह इन्स्टिट्यूशन' असोसिएशन या संस्थेने १८९६ मध्ये सुरु केलेल्या मराठी शाळेची प्रगती खूपच चांगली होती. कालमानाप्रमाणे पुणे शहराचा विकास होत होता. लकडी पुलापलीकडे डेक्कन जिमखाना कॉलनी निर्माण झाली. या भागातील रहिवाशांना या भागात प्राथमिक शिक्षणाची गरज भासू लागली. त्या नागरिकांनी शाळा सुरु करण्याचा निर्णय घेतला. दी पूना नेटिव्ह इन्स्टिट्यूशनच्या चालकांना हा विचार समजला तेव्हा संचालकांनी नागरिकांना ही शाळा संस्थेकडे सोपवावी असे सांगितले. त्या परिसरातील नागरिकांनी या प्रस्तावाचा स्वीकार केला. त्याचबरोबर नवीन इमारतीस लागणारी जागा मोफत देण्याचेही मान्य केले. तसेच शाळेला आपला तालीमखाना, क्रीडांगण यांचा उपयोग करु देण्याचे ठरवून संस्थेस नवीन शाळा चालविण्यास परवानगी दिली.

त्यानुसार दि. २२ ऑक्टोबर १९२२ रोजी डेक्कन जिमखान्यानजीक असलेल्या 'भाजेकर पॅव्हेलियन' मध्ये मोठ्या समारंभाने नामदार गुलामहुसेन हिदायतउल्ला यांच्या हस्ते शाळेच्या उद्‌घाटनाचा समारंभ संपन्न झाला.[११] सदर शाळेला ६ सप्टेंबर १९२४ रोजी मुंबईचे तत्कालिन गव्हर्नर ना. सर लेस्ली विल्सन यांनाही भेट देऊन 'ही शाळा पुण्यातील एक नमुनेदार शाळा आहे व तिची सर्व बाजूंनी उत्तम प्रगती होत आहे.' असा अभिप्राय दिला होता. यावरून या शाळेच्या एकूण प्रगतीचा अंदाज येतो.

शाळेचे क्रीडांगण, प्रयोगशाळा, गुणवत्तापूर्ण शिक्षण, शाळेची इमारत, विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती, स्वाथ्यपूर्ण सोई (स्वच्छ प्रकाश, मोकळी हवा, स्वच्छता गृहे) इत्यादी घटक या शाळेत

महत्त्वाचे आहेत. या संस्थेने प्रसिध्द केलेल्या अहवालात नोंदवले आहे. पुणे शहरातील एकूण शाळांपैकी २४ शाळांचा अभ्यास करण्यात आला, ह्यामध्ये बाल शिक्षण मंदिर शाळा सर्वच घटकामध्ये सर्वोत्तम आहे. निश्चितच शाळेच्या दृष्टींनी ही गौरवाची बाब आहे. सन १९९५ साली विद्यार्थ्यांची वाढती संख्या लक्षात घेऊन पालकांनी या शाळेतील तुकड्यांची संख्या वाढवावी अशी मागणी केली होती. शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या वाढते आहे याचा विचार करून शाळेने तुकडी संख्या वाढवावी. काही कायदेशीर प्रश्न असतील तर त्यावर मार्ग काढावा. विद्यार्थ्यांच्या हिताला प्राधान्य द्यावे व गैरसोय टाळावी. अशा प्रकारची विनंती पालकांनी संस्थेच्या चालकांना विनंती केली.[१२] या वरून सदर संस्थेचा शिक्षण देण्याचा दर्जा उत्तम आहे असे म्हणण्यास हरकत नाही.

## ४.६ म.ए.सो. सौ. विमलाबाई गरवारे प्रशाला, पुणे (इ.स. १९२५) :

डेक्कन जिमखाना या पुण्यातील एका चांगल्या लोकवस्तीतील भांडारकर इन्स्टिट्यूट रस्त्यावर असलेल्या बाल शिक्षण मंदिर शाळेत प्राथमिक शिक्षणाची चांगली सोय झाली. त्यामुळे या परिसरात माध्यमिक शाळेची गरज निर्माण झाली होती. ती गरज ओळखून सन १९२५ मध्ये सौ. विमलाबाई गरवारे प्रशाला सुरू झाली. सन १९३४ साली डेक्कन जिमखाना भावे स्कूलच्या रुपाने ही शाळा सुरु करण्यात आली. सन १९६१मध्ये आलेल्या पुराने शाळेचे प्रचंड नुकसान झाले होते. परंतु अडचणींवर मात करुन आज शाळा शिक्षण क्षेत्रात आघाडीवर आहे. एस.एस.सी. बोर्डात विक्रमी संख्येने विद्यार्थी झळकतात अशी ख्याती या शाळेने प्राप्त केली आहे.

या शाळेच्या विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच इतर उपक्रमांतही घवघवीत यश प्राप्त केले आहे. क्रीडा, वक्तृत्व, एनटीएस एमटीएस यासारख्या विविध स्पर्धांमध्ये या शाळेतील विद्यार्थ्यांनी यश मिळविले आहे. १९७२ मध्ये गरवारे उद्योग समूहाने देणगी दिली. त्या कृतज्ञेतून शाळेचे नामकरण 'सौ. विमलाबाई गरवारे प्रशाला' असे करण्यात आले आहे.[१३]

संस्थेच्या वाढत्या कार्यविस्तारासोबत या शाळेची स्थापना झाल्याने त्या स्थापनेला शाळेच्या दृष्टिकोनातून वेगळे महत्त्व प्राप्त झाले आहे. गरवारे उद्योग समूह हा शाळा स्थापनेच्या कालावधीमध्ये नामांकित व प्रथितयश उद्योग होता. या उद्योग समूहाने शाळा उभारणीसाठी दिलेली मदत ही सामाजिक कृतज्ञता म्हणून दिली असली तरी संस्थेची या आधीची शिक्षणक्षेत्रातील कामगिरी पाहूनच गरवारे उद्योग समूहाने देणगी दिली. त्यामुळे ती केवळ देणगी न ठरता संस्थेच्या शैक्षणिक स्वप्नांना पाठबळ देणारी होती. ही शाळा सध्या एका भव्य वास्तुत आहे. ही शाळा पुणे शहरातील मराठी माध्यमाची नामांकित शाळा आहे. १२ डिसेंबर १९३६ हा या शाळेचा प्रारंभ दिन

आहे. या शाळेला ७५ वर्षांची परंपरा लाभली आहे. या शाळेची इमारत सर्व सोयींनी युक्त आहे. भौतिक घटकांनी परिपूर्ण असलेली ही इमारत अतिशय मनमोहक व भव्य आहे.

या शाळेला विविध क्षेत्रातील ज्येष्ठ व श्रेष्ठ अशा नामवंत विद्यार्थ्यांची परंपरा आहे. या शाळेतील शिक्षक वर्गही आपली परंपरा टिकवून आहे. अनुभवी, उच्च शिक्षित शिक्षकांमुळे शाळेच्या गुणवत्तेवर सकारात्मक परिणाम होत आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण उन्नतीसाठी विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष दिले जाते. विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम राबविले जातात. येथे ५ वी ते १० वी पर्यंत सेमी इंग्रजी सुविधा उपलब्ध आहे. त्याचबरोबर ८ वी पासून तंत्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध आहे. अद्ययावत कार्यशाळा, संगणक कक्ष, संगणक प्रशिक्षणाची सोय शाळेत उपलब्ध करून देण्यात आली आहे. ग्रंथालय व सुसज्ज अशी प्रयोगशाळाही आहे. विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी, तज्ज्ञांकडून मार्गदर्शनाची सुविधा, करिअरविषयक मार्गदर्शन, व्यक्तिमत्त्व विकास केंद्रांतर्गत समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन या प्रशालेत केले जाते हे या प्रशालेचे वैशिष्ट्ये आहे.

## ४.७ म.ए.सो. रेणुका स्वरुप मेमोअियल गर्ल्स हायस्कूल, पुणे (इ.स. १९३५):

सन १८७४ मध्ये सुरु केलेली मूळ शाळा मुलांचे भावे स्कूलही म.ए.सो. शिक्षण संस्थेची पहिली शाळा होती. या शाळेत मुलींच्या शिक्षणाची सोय नव्हती. मुलींच्या शाळेची व्यवस्था व्हावी अशी मागणी समाजातून होत होती. त्यामुळे १९३५ मध्ये मुलींनाही या शाळेत प्रवेश देण्यात आला.[१४] पेरुगेट भावे स्कूल मधील एका भागात हे वर्ग सुरु झाले. मुलींच्या शिक्षणाची वाढ झपाट्याने होऊ लागली. मुलींची संख्याही वाढू लागली. सन १९३५ साली पहिल्याच वर्षी २९३ मुली शिक्षण घेत होत्या. पुढे हीच संख्या ७३३ वर गेली. त्यामुळे संस्थेने मुलींच्या शिक्षणासाठी स्वतंत्र शाळा सुरु करण्याचा निर्णय घेतला.

सन १९५५ मध्ये आजच्या रेणुका स्वरुप शाळेच्या नव्या इमारतीत ही शाळा स्थलांतरित करण्यात आली. सन १९६० मध्ये माजी राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या उपस्थितीत शाळेचा रौप्यमहोत्सव उत्साहात व भव्य स्वरुपात साजरा करण्यात आला. १९७१ मध्ये कै. भरत स्वरुप यांनी आपली कन्या कै. रेणुका हिच्या स्मृतीप्रीत्यर्थ शाळेला भरीव आर्थिक मदत केली. त्यामुळे शाळेचे नाव 'रेणुका स्वरुप मेमोरिअल गर्ल्स हायस्कूल' असे ठेवण्यात आले.[१५]

शहर आणि उपनगरातील अनेक विद्यार्थिनींनी या शाळेमधून शिक्षण घेतलेले आहे. विद्यार्थिनींच्या शिक्षणामधील या शाळेचे वैशिष्ट्ये म्हणजे गरिब व होतकरु विद्यार्थिनींना शालेय साहित्याचे वाटप करून शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली हेच होय. १९९१ साली शाळेमधील

२० विद्यार्थिंनींना शैक्षणिक शुल्कासह, शालेय साहित्याचे वाटप केले.[१६] यावरून शाळेचा हा उपक्रम केवळ स्तुत्य नसून गरीब व होतकरु विद्यार्थीनींना शिक्षणाची दारे खुली करून देणारा होता असे दिसते.

या शाळेच्या विद्यार्थीनी नाट्य, वक्तृत्व, क्रीडा, संगीत या उपक्रमात सातत्याने आघाडीवर असतात. अभ्यासातही या शाळेचा दबदबा कायम आहे. ही यशाची परंपरा विद्यार्थीनींनी कायम ठेवली आहे. सध्या या शाळेत सुमारे ३००० विद्यार्थीनी शिक्षण घेत आहेत. विविध आंतरशालेय क्रीडा स्पर्धेत या शाळेच्या विद्यार्थीनींनी यश मिळविले आहे. विद्यार्थीनींना शिस्त लागावी, त्यांचे नेतृत्वगुण विकसित व्हावेत, एकतेची भावना निर्माण व्हावी यासाठी एन.सी.सी सुरु करण्यात आली आहे. या माध्यमातून विविध प्रकारचे ड्रीलमार्चिंग, रायफल ट्रेनिंग, फर्स्ट एड, मॅप रिडींग, आपत्ती व्यवस्थापन, राष्ट्रीय एकात्मता, समाजसेवा पर्यावरण असे विविध विषय शिकविले जातात.

रेणुका स्वरुप मेमोरिअल गर्ल्स हायस्कूलचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे या हायस्कूलमध्ये असलेला सुसज्ज असा संगणक विभाग, २० अद्ययावत संगणक व इंटरनेटची सुविधा या शाळेत विद्यार्थिनींसाठी उपलब्ध आहे. त्याचबरोबर २३,००० ग्रंथसंपदा असणारे ग्रंथालय आहे. सन २००८ पासून या शाळेत व्यक्तिमत्त्व विकास केंद्राची सुरुवात झाली आहे. प्रत्येक विद्यार्थिनींचा सर्वांगीण विकास होणे हा या केंद्राचा प्रमुख उद्देश आहे. या केंद्राच्या माध्यमातून विद्यार्थिनींचे बुध्दिमापन, अभ्यास कौशल्ये, एकेरी पालकत्त्व, ताणाचे व्यवस्थापन, वैयक्तिक समुपदेशन केले जाते.

### ४.८ म.ए.सो. पूर्व प्राथमिक शाळा, पुणे (इ.स. १९७९) :

या शाळेची स्थापना सन १९७९ मध्ये करण्यात आली.[१७] स्वतंत्र इमारत, विविध शैक्षणिक साधने, निरनिराळ्या प्रकारचे खेळ, बाग, वाळूचा हौद, स्विमिंग टँक, बोलक्या भिंती अशा वैशिष्ट्यांनी ही शाळा परिपूर्ण आहे. मुलांचा संस्कारक्षम जीवनाचा पाया या शाळेत घातला जातो. पूर्व प्राथमिक शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा वयोगट लक्षात घेऊन त्यांच्यासाठी कृतीयुक्त पध्दतीने शिक्षण दिले जाते. मुलांना केंद्रस्थानी ठेऊन भाषा, गणित, हस्तव्यवसाय, चित्रकला अशा सर्व विषयांची ओळख खेळातून आणि कृतीयुक्त पध्दतीवर विद्यार्थ्यांना करुन दिली जाते. बालवाचनालय, स्विमिंग टँक, स्पोकन इंग्लिश हे नवीन उपक्रम गेल्या चार वर्षात सुरु करण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांसाठी स्नेहसंमेलनाचे आयोजन केले जाते. तसेच विविध स्पर्धाही घेतल्या जातात. विद्यार्थ्यांमध्ये धीटपणा, आत्मविश्वास, एकाग्रता, पाठांतरक्षमता वाढावी यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले जातात.

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीची ही एक प्रयोगशील शाळा म्हणून उल्लेखली जाते. वयोगट लक्षात घेऊन कृतीयुक्त पध्दतीने शिक्षण देणारी शाळा म्हणून ही ओळखली जाते. विद्यार्थ्यांच्या सूक्ष्म कलागुणांना चालना देण्यासाठी विविध प्रयोग या शाळेत राबविले जातात. विद्यार्थ्यांच्या क्रीडा विकासासाठी, बौध्दिक विकासासाठी तसेच त्यांना वाचनाची आवड लागावी यासाठी या शाळेत जाणीवपूर्वक प्रयत्न होत असल्याचे दिसून येते.

नवनवीन प्रयोग करून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी प्रयत्नशील असणारी ही शाळा आपल्या अभिनव प्रयोगाने नेहमीच चर्चेत राहीली आहे. व्यक्तिमत्त्व विकास, नेतृत्वगुण, व्यावसायिकता, संभाषण चातुर्य यासारखे शाळेने केलेले प्रयोग कमालीचे यशस्वी झालेले आहेत. यामुळे या शाळेच आदर्श इतर शाळांनी घेतल्याचे दिसते. हडपसर येथे पार पडलेल्या मुख्याध्यापक संघाच्या बैठकीत या प्रयोगांची चर्चा झाल्याचे संदर्भ मिळतात ते असे, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या पूर्व प्राथमिक शाळेने विद्यार्थ्यांना नेतृत्वगुण, पाठांतर, एकाग्रता या गुणांच्या वाढीसाठी जे प्रयोग शालेय स्तरावर केले तशाच प्रकारचे प्रयोग आपण आपापल्या शाळेत करावेत.[१८] यावरून या प्रयोगांचे स्वरुप निदर्शनास येते.

## ४.९ म.ए.सो. शिशु मंदिर, पुणे (इ.स. १९७९) :

सन १९७९ साली या शाळेची स्थापना झाली आहे. बालमनावर चांगल्या विचारांचे संस्कार व्हावेत यासाठी या शाळेची उभारणी करण्यात आली. या शिशु मंदिरातून विद्यार्थ्यांच्या भावी आयुष्यातील चांगल्या काळाची पायाभरणी करण्यात येते. त्यामुळे शिशु मंदिरातून मुलांवर होणारे संस्कार महत्त्वाचे आहेत. मुलांच्या कला, कौशल्याला वाव मिळावा यासाठी इथे विशेष प्रयत्न करण्यात येतात. उद्‌बोधनात्मक व मनोरंजनात्मक अशा स्वरुपाचे विविध कार्यक्रम राबविण्यात येतात. मुलांच्या निरीक्षण क्षमतेमध्ये वाढ व्हावी व त्यांच्या ज्ञानात भर पडावी यासाठी सहलीचे आयोजन केले जाते. गोष्टी, श्लोक, कवायत सवयी, शिस्त, स्वावलंबन या सर्व बाबतीत मुलांवर संस्कार करण्यात येतात. तज्ज्ञ डॉक्टरांकडून वैद्यकीय तपासणी करुन विद्यार्थ्यांची काळजी घेण्यात येते.

या शाळेमध्ये मुलांना मातीच्या वस्तू तयार करणे, टाकाऊ वास्तूपासून टिकाऊ वस्तू तयार करणे, कागदापासून शोभेच्या वस्तू तयार करणे इत्यादींचे प्रशिक्षण शालेय अभ्यासासोबतच दिले जाते. निश्चितच विद्यार्थ्यांना याचा फायदा होतो. सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना वाव दिला जातो. चांगल्या हस्ताक्षरासाठी ही शाळा प्रसिध्दीस आलेली

आहे. मैदानी खेळ, बैठे खेळ यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या शारीरिक वाढीकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले जाते. यावरून असे म्हणता येते की, शालेय विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीकरिता शिशु मंदिर प्रयत्न करत असते. या शाळेने राबवलेला लक्षवेधी उपक्रम म्हणजे पाढे पाठांतर स्पर्धा होय. पाढे पाठ झाले की, अवघड गणितांची उकल लवकर होते व त्यामुळे गणिताविषयी मुलांच्या मनात आवड निर्माण होते. त्यामुळे आवडीने गणित विषय शिकणारी मुले या शाळेत पाहयला मिळतात. म्हणून असे म्हणता येईल की, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उन्नत्तीचा ध्यास घेतलेल्या या शाळेत गणितासारखे अवघड विषय सोपे करून शिकवण्याची व पाढे पाठांतर करुन विद्यार्थ्यांची पूर्व तयारी करून घेण्याची नवी पध्दती विकसित केल्यामुळे शाळेच्या नावलौकिकात भर पडली. तशीच मुलांच्या गुणवत्तेमध्ये सुधारणा झाली, खऱ्या अर्थाने हेच या शाळेचे परिपूर्ण यश समजले पाहिजे.

## ४.१० म. ए. सो. बाल शिक्षण मंदिर इंग्रजी माध्यम शाळा, (पूर्व प्राथमिक विभाग), पुणे (इ.स.१९७९) :

बाल शिक्षण मंदिर इंग्रजी माध्यम शाळा या इंग्रजी माध्यमाच्या शाळेची स्थापना सन १९७९ मध्ये करण्यात आली.[१९] बालकांना इंग्रजी माध्यमातून ज्ञान मिळावे या उद्देशाने या शाळेची स्थापना करण्यात आली होती. स्थापनेमागील उद्देशाप्रमाणे शाळेचे कार्य उत्तम प्रकारे सुरु आहे. या शाळेत विविध उपक्रम राबविले जातात. विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. यामध्ये पाठांतर, क्रीडा, नृत्य यांचा समावेश होतो. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी या स्पर्धांचा उपयोग होतो. वार्षिक स्नेहसंमेलन हा विद्यार्थ्यांच्या दृष्टीने एक आनंदाचा सोहळा असतो. स्नेहसंमेलनाच्या निमित्तानेही विविध आनंददायी उपक्रम राबविण्यात आले.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर शिक्षणाचे सार्वत्रिकरण होऊ लागले. खेड्यापाड्यात शिक्षण संस्था उभारल्या गेल्या. पुण्यामध्ये देखील अनेक शाळा निर्माण झाल्या. मुळात पुणे हे तर शैक्षणिक केंद्र म्हणून नावारूपास आले होते. १९६० नंतर मात्र पुण्यात इंग्रजी माध्यमांच्या शाळेत आपल्या पाल्याला पाठवण्याची नवी पध्दत सुरु झाली. जागतिक स्पर्धेमध्ये टिकण्यासाठी इंग्रजी भाषेवर प्रभुत्व असले पाहिजे. नव्या संधीच्या शोधार्थ असणाऱ्या पालकांची ही इच्छा असे. स्वीकृतीदर्शनी असे दिसते की, तत्कालिन वेळी इंग्रजी शाळांची पुण्यामध्ये संख्या फारच कमी होती व ही पोकळी भरून काढण्यासाठी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने या शाळेची स्थापना केली. काहीही असले तरी इंग्रजी माध्यमाची पूर्व प्राथमिक शाळा स्थापन करून संस्थेने शैक्षणिक क्षेत्रातील एक क्रांतिकारी

पाऊल टाकले. कारण इंग्रजी ही जागतिक भाषा तसेच जगातील सर्वोत्तम ज्ञान याच भाषेमध्ये उपलब्ध होत असे. म्हणजेच संस्थेचा हा निर्णय इंग्रजीचा आग्रह धरणाऱ्या पालकांना खुश करणारा होता. तसाच इंग्रजी भाषेतील ज्ञानाचे मोठे भांडार सर्वांसाठी खुले करणारा होता. त्यामुळे इंग्रजी माध्यमातील बाल शिक्षण शाळा ही संस्थेच्या दृष्टिकोनातून महत्त्वाची तशीच वैशिष्ट्यपूर्ण ठरली आहे.

पूर्व प्राथमिक विभागामध्ये इंग्रजी माध्यमातून शिक्षण देणाऱ्या पुण्यामध्ये जितक्या शाळा आहेत, त्यामध्ये गुणवत्तापूर्वक शिक्षण देणारी शाळा म्हणून निश्चितच बाल शिक्षण मंदिर या शाळेचे स्थान श्रेष्ठ दर्जाचे आहे. स्थापनेपासून विविध क्षेत्रामध्ये नेत्रदीपक प्रगती करणाऱ्या या शाळेचे नामांकन वाढतच असून पालक विद्यार्थ्यांच्या प्राधान्यक्रम ठरवणाऱ्या यादीमध्ये या शाळेचे नाव असणे ही शाळेच्या गुणकार्याची पोहच पावती समजावी लागेल.

## ४.११ म.ए.सो. बाल विकास मंदिर, सासवड, पुणे (इ.स.१९८६) :

म.ए.सो. बालविकास मंदिर सासवड या शाळेची जून १९८६ मध्ये स्थापना झाली.[२०] प्राथमिक शिक्षणातून विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार घेऊन यावेत यासाठी या शाळेची स्थापना करण्यात आली होती. पहिली ते चौथी पर्यंतच्या प्रत्येकी २ तुकड्या या शाळेत असून जवळजवळ ५०० विद्यार्थी या शाळेत शिक्षण घेत आहेत. शाळेची इमारत, मैदान, वर्ग खोल्या, अभ्यासक्रमासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक साधने या गोष्टींनी ही शाळा सुसज्ज आहे. शैक्षणिक वातावरण नेहमी आनंददायी ठेवण्याचा प्रयत्न केला जातो. आनंददायी शिक्षणातूनच विद्यार्थ्यांची उत्तम प्रगती होऊ शकते. या विश्वासातून विविध उपक्रम राबविले जातात. शाळेतील सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून मुलांच्या कलागुणांना वाव दिला जातो. बालसभा फलक लेखन, मूल्यशिक्षण या उपक्रमांची योजना शाळेमध्ये नेहमी करण्यात येत असते. बालकांच्या प्रबोधनासाठी विविध उपक्रम राबविले जातात. पालकसभा चर्चासत्र, प्रबोधन वर्ग, सांस्कृतिक कार्यक्रम घेतले जातात. शाळेने आपल्या प्रगतीत सातत्य ठेवलेले असून शाळेची वाटचाल योग्य रीतीने सुरु असल्याचे दिसून येते.

नवनवीन साधनांचा प्रभावी उपयोग करून विद्यार्थ्यांना ज्ञानार्जन करण्याची संधी प्राप्त करून देणे हे बालविकास मंदिर या शाळेने आपले ध्येय समजल्यामुळे अनुभवसिध्द शिक्षण देण्यासाठी या शाळेने नकाशे, अभ्यास सहली, प्रतिकृती यांच्या वापरातून एक नवी शैक्षणिक पायवाट चोखाळल्याचे दिसते. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे वाघीरे हायस्कूल, सासवडमध्ये आधीच स्थापन झाल्यामुळे बालविकास मंदिरामध्ये विद्यार्थ्यांची कमतरता कधीच भासली नाही.

उलट सासवडमधील नागरिकांनी देखील शाळेला वेळोवेळी सहकार्य करून गुणवत्तावाढीसोबतच अनेक घटकांमध्ये सहकार्य केल्याचे दिसते. 'पुरंदर प्रतिष्ठानच्या वतीने १९९८ ते २००० पर्यंत या शाळेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षीस देऊन गौरवल्याचे दिसते.'[२१] म्हणून असे म्हणता येईल महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी या संस्थेचे मार्गदर्शन बालविकास मंदिर या शाळेतील शिक्षकांचे प्रयत्न परिसरातील नागरिकांचे सहकार्य आणि विद्यार्थ्यांची गुणवत्ता यामुळे दिवसागणिक शाळेच्या विकासाचा आलेख उंचावतो आहे. निश्चितच संस्थेच्या कार्यविस्ताराच्या सीमा रुंदावत असताना बालविकास मंदिराने विविध क्षेत्रात जे नेत्रदीपक यश संपादन केले आहे म्हणूनच वैशिष्ट्यपूर्ण ठरले आहे.

## ४.१२ म.ए.सो. बालक विद्या मंदिर, बारामती, पुणे (इ.स.१९८६) :

बारामती या पुणे जिल्ह्यातील एका महत्त्वाच्या ठिकाणी संस्थेने आपली माध्यमिक शाळा सन १९११ मध्येच सुरु केली होती. या शाळेने बारामतीच्या शैक्षणिक विकासात मोठे योगदान दिले आहे. या शाळेत विद्यार्थी संख्या लक्षनिय होती. विद्यार्थी संख्या लक्षणिय होती. अशा वेळी माध्यमिक शाळेच्या दृष्टीने विचार करता संस्थेची प्राथमिक शाळा ही येथील माध्यमिक शाळेची आवश्यकता असल्याचे दिसून आले. हा विचार पुढे नेण्याचा दृष्टिकोनातून सासवडप्रमाणेच बारामती येथे या शाळेची स्थापना १९८६ साली करण्यात आली.

सध्या या शाळेमध्ये ४०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. अत्यंत कमी काळात या शाळेने आपले कर्तृत्व सिध्द करून दाखविले आहे. संस्थेच्या कार्यविस्ताराच्या कक्षा वाढवत असताना संस्थेच्या नियामक मंडळाने असा विचार केला की, ज्या ठिकाणी संस्थेच्या माध्यमिक शाळा असतील त्या ठिकाणी संस्थेच्या वतीने प्राथमिक शाळा सुरु करण्यात येतील. याप्रकारचा विचार जेव्हा संस्थेने केला तेव्हा सासवड या ठिकाणी देखील प्राथमिक शाळा सुरु करण्यात आली.

संस्थेची सन १९११ पासून माध्यमिक शाळा बारामती येथे सुरु असल्यामुळे कोणत्याही प्रकारे बालक विद्या मंदिराच्या स्थापनेसाठी नवीन आव्हानांना सामोर जावे लागले नाही व शाळा स्थापन झाल्यापासून कधीही विद्यार्थ्यांची उणीव भासली नाही. या घटना संस्थेच्या यशस्वितेकडे निर्देश करतात. बारामती हे आज तालुक्याचे ठिकाण म्हणून नावारूपास आलेले आहे. बारामतीमधील वाढते शहरीकरण, निश्चितच या शहरीकरणाचा ताण शिक्षण व्यवस्थेवर आला. बारामतीमधील प्राथमिक शिक्षण व्यवस्थेवरील अल्पसा का होईना, परंतु तो ताण कमी करण्याचे कार्य बालक विद्या मंदिर, बारामती या शाळेच्या माध्यमातून झालेले आहे. प्रतिवर्षी ४०० विद्यार्थी

संख्येची क्षमता असणाऱ्या या शाळेमध्ये नेहमी नाविन्यपूर्ण उपक्रम राबवले जातात. विद्यार्थ्यांच्या आत्मविकासाला संधी दिली जाते. शाळेच्या शैक्षणिक प्रगतीचा आलेख दरवर्षी उंचावत असून शिक्षणामधून समृध्दीकडे झेपावण्यासाठी संस्कारक्षम बालमन घडवण्यासाठी शाळेने केलेले प्रयत्न आदर्शवत अशा स्वरूपाचे आहेत.

## ४.१३ म.ए.सो. पूर्व प्राथमिक शाळा बारामती, पुणे (इ.स.१९८९) :

या शाळेची स्थापना सन १९८९ साली करण्यात आली. बालमनावर चांगले संस्कार व नवे उपक्रम राबविणारी शाळा म्हणून पूर्व प्राथमिक शाळा बारामतीकडे पाहिले जाते. पूर्व प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या मानसिकतेचा विचार करून या शाळेत विविध उपक्रम राबविले जातात. बारामती परिसरातील प्रयोगशील शाळा म्हणून ही शाळा ओळखली जाते. शिक्षकांनी मुलांच्या विकासासाठी कसे प्रयत्न करावेत यासाठी प्रशिक्षण देण्यात येते. त्याचबरोबर कार्यशाळांचेही आयोजन करण्यात येते. आनंददायी शिक्षणाची संकल्पना राबवून हसत खेळत शिक्षण देण्याकडे या शाळेने भर दिला आहे. मुलांना शाळेची गोडी लागावी यासाठी उपक्रमांचे नियोजन केले जाते.

मुलांच्यासाठी शैक्षणिक साहित्याचे प्रदर्शन भरविण्यासाठीचा चांगला उपक्रम या शाळेत राबविला आहे. त्याशिवाय मुलांमधील संवाद कौशल्य वाढविण्यासाठी, भाषा विषयक कार्यशाळेचे आयोजनही या शाळेत करण्यात आले होते. त्याचबरोबर पालकसभेच्या आयोजनातूनही विद्यार्थ्यांच्या विकासाची चर्चा करुन त्याची अंमलबजावणी करण्यात येते. माध्यमिक शाळा बारामतीमध्ये स्थापन झाल्यानंतर महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने बारामती येथे पूर्व प्राथमिक शाळा, बारामती स्थापन केली. आपल्या कार्यकर्तृत्वाचा वेगळा ठसा उमटवणारी शाळा म्हणून या शाळेकडे सुरुवातीपासूनच पाहिले जाते. संस्थेची माध्यमिक शाळा, बारामती येथील नागरिक, पालक, विद्यार्थ्यांच्या विश्वासास पात्र ठरल्यानंतर पूर्व प्राथमिक शाळेच्या माध्यमातून हा विश्वास अधिक उंचीवर गेल्याचे दिसते. पूर्व प्राथमिक शाळा, बारामती यांच्या वतीने राबवल्या जाणाऱ्या उपक्रमांची विभागणी खालीलप्रकारे केली जाते.

१) विद्यार्थी मानसिक व बौध्दिक विकासात्मक कार्यक्रम.

२) अनुभवसिध्द शैक्षणिक कार्यक्रम.

३) विद्यार्थी व्यक्तिमत्त्व विकासात्मक कार्यक्रम.

४) प्रात्यक्षिक पध्दतीचे शैक्षणिक कार्यक्रम.

५) पालक-विद्यार्थी-शिक्षक संवादामधून शिक्षणवृध्दी कार्यक्रम.

अशा प्रकारच्या नवीन शिक्षणपध्दती विकसित करून शाळेने आपली गुणवत्ता सिध्द केलेली आहे. या शैक्षणिक वाढीसोबत शाळेने आपली सामाजिक बांधिलकी देखील जोपासली आहे. यासाठी शाळेने वृक्षारोपणासारखे कार्यक्रम आयोजित करून पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रयत्न केल्याचे दिसते.

## ४.१४ म.ए.सो. इंग्लिश मिडीअम स्कूल, शिरवळ, खंडाळा (इ.स.१९९६):

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या बहुतांश शाखा पुणे जिल्ह्यात आहेत. पुणे जिल्ह्याची सीमा ओलांडून शेजारच्या सातारा जिल्ह्यात ही शाळा सुरु करण्यात आली. शिरवळ येथे औद्योगिक वसाहतीतील रहिवाशांची गरज लक्षात घेऊन इंग्रजी माध्यमाची शाळा सन १९९६ मध्ये सुरु केली आहे.[२२] या ठिकाणी पूर्व प्राथमिक व प्राथमिक असे विभाग सुरु झाले आहेत. शासनाने या शाळेला मान्यता दिली आहे.

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने शिक्षणाच्या प्रसाराचे कार्य सातत्याने केले आहे. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची आवश्यकता ध्यानात घेऊन ठिकठिकाणी संस्थेने शाखा सुरु केल्या. त्यामागे शिक्षण प्रसाराची भूमिका आहे. इंग्लिश मिडीअम स्कूल शिरवळच्या स्थापनेतही हाच उद्देश होता, ही महत्त्वपूर्ण बाब आहे. शिरवळसारख्या ग्रामीण तोंडावळा असणाऱ्या व औद्योगिक वसाहत विकसित झालेल्या परिसरातील बालकांच्या दर्जेदार शिक्षणाची उणीव भरून काढण्यासाठी संस्थेने शिरवळमध्ये इंग्लिश मिडीअम स्कूलची स्थापना केली आहे. या शाळेत बालकांना उत्तम, सकस व दर्जेदार शिक्षणाची उपलब्ध करून देण्यात येते. १९९६ पासून आतापर्यंत या शाळेने आपला दर्जा टिकविला असून ग्रामीण भागातील मुलांना उत्तम इंग्रजी शिक्षणाची संधी दिली आहे. संस्काराबरोबरच विविध कलाकौशल्यांना वाव देण्यासाठी संस्थेचा नेहमीच प्रयत्न असल्याने या शाखेतही विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार करण्याचा आटोकाट प्रयत्न केला जातो.

शिरवळ येथे प्रामुख्याने कामगारांची संख्या अधिक असल्याने कष्टकरी, कामगार यांच्या मुलांनीच इंग्लिश मिडीअम स्कूलच्या शिरवळ येथील शाळेमध्ये प्रवेश घेणे हे नैसर्गिक आहे. कामगार कष्टकऱ्यांच्या मुलांना इंग्रजी माध्यमातील शिक्षण देण्याचा संस्थेने जो संकल्प १९९६ साली या शाळेच्या माध्यमातून केला तो यामुळेच महत्त्वाचा ठरतो. संस्थेने शिरवळसारख्या ठिकाणी इंग्रजी माध्यमाची कष्टकरी कामगारांच्या मुलांसाठी शाळा स्थापन करण्याचा घेतलेलाा निर्णय लाखमोलाचा ठरतो. कष्टकरी, कामगारांचे जीवन ज्ञानप्रकाशमय करण्याची संस्थेची भूमिका या निर्णयामधून अधोरेखीत होते.

शिरवळसारख्या सातारा जिल्ह्यातील औद्योगिकदृष्ट्या विकसित होत असलेल्या परिसरातील विद्यार्थ्यांची इंग्रजी शिक्षणाची सोय महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने पूर्ण केली आहे. भविष्यात या भागातील विद्यार्थ्यांनी आपले ज्ञान, कला व कौशल्य या जोरावर जीवन उन्नत करावे यासाठी ही इंग्रजी माध्यमाची शाळा निश्चितच महत्त्वाची भूमिका बजावेल.

## ४.१५ म.ए.सो. ज्ञान मंदिर कळंबोली, नवी मुंबई (इ.स.१९९६) :

नवी मुंबई हा सिडकोमार्फत विकसित असलेला परिसर आहे. शाळा व महाविद्यालयांसाठी सिडकोमार्फत जागा आरक्षित करण्यात आल्या आहेत. यातील काही जागांवर सिडकोमार्फत शाळांसाठी सुसज्ज इमारती बांधण्यात आल्या आहेत. या इमारती काही शैक्षणिक संस्थांना भाडेपट्टा तत्त्वावर देऊन हा परिसर शैक्षणिक सुविधांनी विकसित करण्याचा शासनाचा उद्देश आहे. अशाच इमारतींपैकी कळंबोली येथील शाळेची इमारत संस्थेकडे देण्यात आली. संस्थेची उज्ज्वल शैक्षणिक परंपरा व सक्षम व्यवस्थापन या बाबी विचारात घेऊन १९९७ साली भाडेपट्टा तत्त्वावर ही इमारत संस्थेला देण्यात आली. जून १९९७ ला संस्थेने या ठिकाणी इंग्रजी व मराठी माध्यमाची पूर्व प्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक शाळा संस्थेमार्फत सुरु केल्या आहेत.

शाळेचा दर्जा, सुविधा, शैक्षणिक वातावरण व शिस्त यामुळे ही शाळा अल्पावधीतच लोकप्रिय झाली आहे. या शाळेच्या माध्यमातून नवी मुंबई परिसरात उत्तम व दर्जेदार शिक्षणाची परंपरा सुरु झाली आहे. 'पूर्व प्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक विद्यालय कळंबोली, नवी मुंबई' या नावाने सुरु झालेल्या शाळेचे संस्थेने २००१ मध्ये 'म.ए.सो. ज्ञान मंदिर, कळंबोली' असे नामकरण केले आहे.[२३] विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी विविध उपक्रम राबविले जातात. त्यामध्ये चित्रकला स्पर्धा, गीतगायन स्पर्धा, क्रीडा स्पर्धा, नाट्य स्पर्धा अयोजित केल्या जातात. विद्यार्थ्यांच्या नेतृत्वगुणांना संधी देण्यासाठी विद्यार्थी प्रतिनिधी निवडणूक घेतली जाते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर व्याख्यानांचे आयोजन केले जाते. त्याचबरोबर स्नेहसंमेलनाचा उपक्रमही घेतला जातो.

यावरून हे स्पष्ट होते की, या शाळेच्या माध्यमातून कळंबोली परिसरातील विद्यार्थ्यांना उत्तम ज्ञान देण्याचा प्रयत्न केला जातो. इंग्रजी माध्यमाच्या शाळेतूनही विद्यार्थ्यांना जागतिक ज्ञान भाषेतून शिक्षण देऊन त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीत शाळेने मोलाचा वाटा उचलला जात आहे. विद्यार्थ्यांच्या आंतरिक कौशल्यांना संधी देऊन त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देण्याचा प्रयत्न या कळंबोलीतील शाळांच्या माध्यमातून सुरु असल्याने दिसून येते. या दृष्टीने विचार करता या शाळांचे महत्त्व स्पष्ट होते.

## ४.१६ म.ए.सो. राणी लक्ष्मीबाई मुलींची सैनिकी शाळा, कासार आंबोली (इ.स.१९९७) :

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने आपल्या उद्देशिकेत स्वदेश प्रेम, राष्ट्रीय शिक्षणाची भूमिका घेतली आहे. या भुमिकेनुसार संस्थेची वाटचाल सुरु आहे. काळाशी सुसंगत असे बदल स्वीकारून संस्थेचा प्रवास सुरु आहे. सन १८७४ पासून संस्थेने याच दिशेने वाटचाल सुरु ठेवली आहे. या वाटचालीतील एक महत्त्वाचा टप्पा म्हणून राणी लक्ष्मीबाई मुलींची सैनिकी शाळा या उपक्रमाकडे पाहिले जाते. 'महाराष्ट्र सरकारची मुलींना सैनिकी शिक्षण देण्याची महत्त्वाकांक्षी कल्पना संस्थेने स्वीकारली आहे.' ही बाब मुलींच्या शिक्षणाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची आहे. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने ही मुलींना सैनिकी शिक्षण देणारी शाळा सुरु केल्यामुळे 'भारतातील पहिली मुलींच्या सैनिकी शिक्षणाची शाळा सुरु करण्याचा मान संस्थेस मिळाला आहे.' या शाळेसाठी महाराष्ट्र शासनाने सुमारे ३० एकर जागेची उपलब्धता मुळशी तालुक्यातील कासार आंबोली येथे करून दिली आहे.[२४]

मुलींना शिक्षण देण्याचा संदेश पुणे शहरातूनच संपूर्ण भारताला देण्याचा पहिला प्रयत्न महात्मा फुले यांनी केला होता. त्याच विचारांच्या अनुषंगाने महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने मुलींच्या शिक्षणासाठी सातत्याने सकारात्मक भूमिका घेतली आहे. राणी लक्ष्मीबाई यांच्या नावाने मुलींची सैनिकी शाळा स्थापन करून संस्थेने मुलींच्या शिक्षणात एक महत्त्वाचे व पुढचे पाऊल टाकले आहे. आज स्त्री कोणत्याही क्षेत्रात मागे नाही. तिने आपले कर्तृत्व सिध्द केले आहे. स्त्रियांना योग्य ती संधी व शिक्षण दिले तर स्त्री आपले कर्तृत्व सिध्द करू शकते. त्यामुळेच संस्थेने मुलींच्या शिक्षणासाठी हा एक महत्त्वाकांक्षी असा प्रकल्प उभारण्याचे नियोजन केले आहे.

या शाळेत मुलींच्या विकासासाठी वेगवेगळे परंतु महत्त्वाचे उपक्रम राबविले जातात. मुळातच ही शाळा म्हणजे संस्थेच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाकांक्षी व अभिमानास्पद प्रकल्प आहे. विद्यार्थिनींच्या संख्येत दरवर्षी वाढ होत आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून मुली या शाळेत येत असतात. ज्ञान, धाडस आणि व्यक्तिमत्त्व विकास यादृष्टीने शाळेत अभ्यासक्रम शिकविला जातो. ही शाळा निवासी स्वरुपात असल्यामुळे मुलींच्या सर्वांगीण दृष्टीने या ठिकाणी उपक्रम राबविले जातात.

'मुलींवर उत्तम संस्कार व्हावेत, देशकारणासाठी मुलींनी तयार व्हावे, राष्ट्रीय मूल्ये जपावीत आणि जोपासावीत यासाठी अनेक उपक्रमांद्वारे सातत्याने प्रयत्न केले जातात. त्यामध्ये चित्रकला,

क्रीडा, गायन, विज्ञान अशा विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते. अभ्यास कौशल्य व गटमार्गदर्शनाचे आयोजन केले जाते. मुलींच्या व्यक्तिमत्त्वासाठी सुध्दा विविध उपक्रम राबविले जातात. शिस्त, संस्कार व ज्ञान या अनुषंगाने विविध कार्यशाळांचे आयोजन केले जाते.

मुलींना सैनिकी शिक्षण देणारी ही शाळा संस्थेची एक महत्त्वाची शाळा आहे. कारण ही शाळा स्थापन करून शिक्षणक्षेत्रात स्त्री-पुरुष समतेचा एक नवा पायंडा घालून दिला आहे. यापूर्वी सैनिकी शाळांमधून केवळ मुलांना शिक्षण दिले जात असे. मुलींच्या पालकांना देखील सैनिकी शाळा किंवा देशाच्या सुरक्षेच्या दृष्टीने सीमेवर मुलींची नियुक्ती असावी असे वाटत नसे. संपूर्ण देशात स्त्री-पुरुष समतेचा जागर होत असतांना स्त्रियांना सन्मानपूर्वक समानतेची वागणूक दिली जात असताना ही शाळा स्थापन होण्याला त्यामुळेच वेगळ्या प्रकारचे महत्त्व प्राप्त होते.

या शाळेमध्ये विज्ञान, गणित, भाषा या विषयांसह इतरही विषय शिकवले जातात तर घोडेस्वारी, तलवारबाजी, विविध खेळ, नेमबाजी यांचे शास्त्रशुध्द प्रशिक्षण दिले जाते.[२५] येथे शिक्षण घेणाऱ्या मुलींमध्ये विद्यार्थीदशेतच देशाभिमानाचे धडे दिले जातात. एक कर्तव्यदक्ष नागरिक, भारतीय लष्करामधील विविध सेवांसाठी एक सुसंस्कारित युवा पिढी निर्माण करणे हाच या शाळेच्या स्थापनेमागचा खरा उद्देश म्हणावा लागेल.

### ४.१७ म.ए.सो. आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके विद्यालय, नवीन पनवेल (इ.स.१९९९) :

नवीन पनवेल सेक्टर क्र. ६ मध्ये सिडकोकडून शाळेची इमारत संस्थेला मिळाली आहे. १९९९ मध्ये इमारत संस्थेला मिळाली. यावर्षीपासून संस्थेने पूर्व प्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक शाळा संस्थेमार्फत सुरु केल्या आहेत. संस्थेचे संस्थापक आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांचे जन्मगाव पनवेल तालुक्यातील शिरढोण हे असल्याने त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ संस्थेने या शाळेस त्यांचेच नाव दिले आहे. दि. २१ जून १९९९ रोजी या शाळेचा शुभारंभ झाला.[२६] प्रारंभापासूनच या शाळेने आपला दर्जा व गुणवत्ता यामध्ये सातत्य राखले आहे. त्यामुळे पनवेल परिसरातून या शाळेला मोठा प्रतिसाद लाभत आहे.

विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्त्व विकासाच्या सर्व संधी उपलब्ध व्हाव्यात व त्यांच्यावर नैतिक मूल्यांचे संस्कार व्हावेत यासाठी शाळेमध्ये विविध उपक्रम राबविण्यात येतात. 'विद्यार्थी समस्या' केंद्रित चर्चासत्र सर्व शिक्षकांसाठी घेण्यात आले आहे. विविध परीक्षांमध्ये यशस्वी झालेल्या

विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात येतो. अभ्यासाबरोबरच नाट्य, नृत्य, गायन या कलांच्या विकासासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले जातात. 'भावनिक बुध्दिमत्ता' विषयावर तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. ज्याचा फायदा विद्यार्थ्यांना झाला आहे. दृकश्राव्य कक्ष, कृतिसंशोधन कार्यशाळा या संदर्भानेही या शाळेत उपक्रम राबविण्यात येतात. त्याचबरोबर किशोरावस्थेतील भावनांचा गोंधळ उडालेला विद्यार्थ्यांना त्यांच्या भावनांचे आरोग्य राखण्यासाठी विशेष मार्गदर्शनाचे आयोजन केले जाते. विद्यार्थ्यांच्या मनात वाचनाविषयी गोडी निर्माण व्हावी यासाठी पुस्तक जत्रेचे आयोजन केले जाते. विद्यार्थ्यांच्या मनात पर्यावरणविषयक जाणिवा जागृत व्हाव्या यासाठी वृक्षदिंडीसारखे प्रयत्न केले जातात.

उपरोक्त विवेचनावरून हे दिसून येते की, 'महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी' या संस्थेने पुण्याबाहेरही या शाळेच्या माध्यमातून यशस्वी पाऊल टाकले आहे. संस्थापक सदस्य व आद्यक्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके याच्या नावाने सुरु असलेल्या या शाळेत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी प्रयत्न केले जात आहेत. विद्यार्थ्यांच्या मानसिक, शारीरिक, बौध्दिक विकासासाठी जाणीवपूर्वक नियोजनबध्द काम सुरु असल्याचे दिसून येत आहे.

### ४.१८ म.ए.सो. विद्यामंदिर बेलापूर, नवी मुंबई (इ.स.२०००) :

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने नवी मुंबई परिसरात आपल्या कार्यास प्रारंभ केला आहे. २००० साली सी. बी. डी. बेलापूर येथे आयकर कॉलनीमध्ये भव्य इमारत बांधली आहे. पारसिक हिलच्या पायथ्याशी असलेल्या या निसर्गरम्य परिसरात इंग्रजी व मराठी माध्यमाची शाळा सुरु करण्याच्या उद्देशाने संस्थेने ही इमारत बांधली.[२७] उत्तम ग्रंथालय, प्रयोगशाळा, संगणक वर्ग याबरोबरच मोठे क्रीडांगण व प्रशस्त वर्ग खोल्या अशी इमारतीची वैशिष्ट्ये आहेत. दिनांक १९ जून २००० रोजी शाळेस प्रारंभ झाला. प्रारंभी या शाळेचे नाव 'म.ए.सो इंग्लिश मिडिअम स्कूल, बेलापूर' या नावाने सुरु झालेल्या शाळेचे संस्थेने इ. स. २००१ मध्ये 'म.ए.सो. विद्यामंदिर बेलापूर' असे नामकरण केले.

या शाळेने अल्पावधीतच आपल्या वैशिष्ट्यपूर्ण कार्याचा ठसा उमटविला आहे. शाळेत विविध उपक्रम राबविले जातात. कथाकथन, कथा लेखन, मूक अभिनय स्पर्धा अशा स्पर्धांतून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यात आला. देशभक्तीपर गायनासारख्या स्पर्धांतून विद्यार्थ्यांना आपले गायनकौशल्य सिध्द करता आले. नाट्यछटेसारखे उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना अभिनय कौशल्याची संधी देण्यात आली. श्रमप्रतिष्ठेचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून देण्यासाठी विविध मान्यवर वक्त्यांची

व्याख्याने आयोजित करण्यात आली. १४ नोव्हेंबर हा दिवस बालदिन म्हणून साजरा करताना नैतिक मूल्यांवर आधारित खेळ खेळण्याचा उपक्रम राबविण्यात आला.

मुंबई परिसरातील संस्थेची ही शाळा चांगल्या प्रकारे सुरु आहे. सर्व भौतिक सोयीसुविधा, भव्य इमारत असणारी ही शाळा या परिसरातील विद्यार्थ्यांसाठी एक चांगली संधी बनली आहे. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या ध्येय धोरणांना अनुसरून याही शाळेची वाटचाल सुरु आहे. विद्यार्थ्यांना शैक्षणिक व अभ्यासक्रमातील ज्ञान देण्याबरोबरच त्यांच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वात भर टाकण्याचा प्रयत्न या शाळेतील विविध कार्यक्रमांतून केला जातो. आजचा विद्यार्थी उद्याचा जबाबदार नागरिक असतो. यादृष्टीने आजच्या विद्यार्थ्यांना संस्कार, ज्ञान आणि आत्मविश्वास देण्याचा प्रयत्न या शाळेतून दिला जात असल्याचे दिसून येते.

### ४.१९ म.ए.सो. रेणावीकर माध्यमिक विद्यालय, सावेडी, अहमदनगर (इ.स.२००५) :

रेणावीकर या माध्यमिक विद्यालयाची स्थापना २००५ मध्ये करण्यात आली आहे. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने आपल्या कार्याची व्याप्ती वाढविली आहे. पुणे शहर व जिल्हा अशी मर्यादा न ठेवता शिक्षणाची आवश्यकता असणाऱ्या भागात संस्थेने आपला विस्तार वाढविण्याची भूमिका घेतली आहे. त्यानुसारच या विद्यालयाची स्थापना करण्यात आली आहे.

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी ही शैक्षणिक संस्था महाराष्ट्रातील एक महत्त्वाची शिक्षणाची संस्था आहे. ज्या ठिकाणी शिक्षणाची आवश्यकता आहे अशा ठिकाणी शिक्षण उपलब्ध करून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य संस्थेने केले आहे. संस्कार, नैतिकता यांनी युक्त शिक्षणाची संकल्पना महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने यशस्वी करुन दाखविली आहे. याबरोबर आपण मिळविलेल्या ज्ञानाचा उपयोग आपल्या राष्ट्रासाठी व समाजासाठी व्हायला पाहिजे या संस्थेच्या धोरणानुसार वाटचाल करण्याचे काम या विद्यालयाच्या माध्यमातून होत आहे.

अहमदनगर जिल्ह्यातील सावेडी या ठिकाणी शाळा उघडून उत्तम, गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचा संस्थेचा प्रयत्न या शाळेच्या माध्यमातून यशस्वी होत आहे हे दिसून येत आहे. या शाळेच्या माध्यमातून स्थापनेपासूनच नवनवीन उपक्रम राबवले जातात. या शाळेमधील असाच एक वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम म्हणजे विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण व्हावी म्हणून निर्माण केलेला उपक्रम म्हणजे विद्यार्थी वाचन अभियान होय. या अभियानाअंतर्गत  दररोज एका नवीन पुस्तकाची ओळख विद्यार्थ्यांना करून दिली जाते. यामध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शक ठरतील अशी चरित्रात्मक

पुस्तकांचीही ओळख करून दिली जाते. विद्यार्थी अधिक कुतुहल निर्माण साहजिकच पुस्तकाचे वाचन करतात. हेच या शाळेचे खऱ्या अर्थाने वैशिष्ट्य समजले पाहिजे.

शाळेच्या परिसरातील कोणतेही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहणार नाहीत याची काळजी शाळा घेत असते. महापुरुषांच्या जयंत्या, पुण्यतिथी साजरी करणे, विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक शिक्षणाची आवड निर्माण करणे, मूल्य शिक्षणाचा दररोजच्या अध्यपनात वापर करणे या सर्वांमुळे अल्पावधीतच ही शाळा वैशिष्ट्यपूर्ण ठरली आहे. या शाळेमधील विद्यार्थी देखील होतकरू आहे. शिक्षकांच्या प्रयत्नांना विद्यार्थ्यांच्या अभ्यासची जोड मिळाल्याने, या शाळेमधील विद्यार्थी विविध परीक्षांमध्ये गुणवत्ता यादीत चमकले आहेत.

### ४.२० म.ए.सो. कै.दा.शं. रेणावीकर विद्या मंदिर, सावेडी, अहमदनगर (इ.स.२००५) :

या प्राथमिक शाळेची स्थापना २००५ मध्ये करण्यात आली आहे. आपल्या वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमांनी या शाळेने आपले नाव कमाविले आहे. या शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध परीक्षांतून उज्ज्वल यश मिळविले आहे. आय.पी.एम.परीक्षा, गणित प्रश्नमंजुषा परीक्षा, गणित प्रावीण्य परीक्षा, भारती विद्यापीठ परीक्षा, हिंदी राष्ट्रभाषा परीक्षा, बेस्ट स्कॉलर स्पर्धा, वैदिक गणित स्पर्धा, बाह्य स्पर्धा अशा विविध परीक्षांतून या विद्यालयाचे विद्यार्थी सहभागी होतात. याव्यतिरिक्त वेगवेगळ्या क्रीडा स्पर्धांतूनही या शाळेच्या विद्यार्थ्यांनी यशस्वी कामगिरी बजावली आहे.

शैक्षणिक सहल, स्नेहसंमेलनासारखे उपक्रम राबवून विद्यार्थ्यांच्या विकासात भर टाकली जाते. त्याचबरोबर पालक शिक्षक संघासारखा उपक्रम राबवून प्रशालेचा गुणात्मक दर्जा वाढावा व टिकावा तसेच शाळेतील समस्या पालकांपर्यंत पोहचाव्या आणि त्या सोडविण्यासाठी पालकांची मदत व्हावी यासाठी प्रयत्न केले जातात. पर्यावरणाचे महत्त्व विद्यार्थ्यांच्या लक्षात यावे, पर्यावरणासंबंधी त्यांच्यात जागृती निर्माण व्हावी यासाठी पर्यावरण प्रकल्प राबविण्यात येतात. या शाळेत पालक प्रबोधन कार्यशाळेचे आयोजनही केले जाते. ज्याद्वारे पालकांचे प्रबोधन केले जाते. ही शाळा स्थापन होण्याला संस्थेच्या इतिहासामध्ये श्रेष्ठ स्थान मिळाले आहे. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने आपली पहिली शाळा सुरु करण्यापासून ते रेणावीकर शाळा स्थापन करेपर्यंत अनेक जाती-धर्मा पलीकडील विद्यार्थ्यांना आपल्यामध्ये सामावून घेतले. अखंडपणे व्रतस्थ प्रकारे ज्ञानदान करून शिक्षणाची मशाल तेवत ठेवली आहे व याचीच प्रचीती या शाळेच्या स्थापनेमधून पहायला मिळते. जिथे शिक्षणाची गरज किंवा आवश्यकता असेल तिथे संस्थेने शाळा सुरु केल्या. त्यांमधील ही एक शाळा आहे. उण्यापुऱ्या आठ-दहा वर्षांच्या कालखंडात शाळेची शैक्षणिक प्रगती नजरेत भरण्याजोगीच

आहे. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे मुख्यालय पुणे येथे असले तरी जिल्ह्याबाहेरील एक चांगली शाळा म्हणून या शाळेचा संस्थेमध्ये अल्पावधीतच दबदबा निर्माण झाला आहे, हेच या शाळेचे वैशिष्ट्य आहे.

## ४.२१ म.ए.सो. पूर्व प्राथमिक शाळा, सावेडी, अहमदनगर (इ.स.२००५) :

सावेडी या ठिकाणी माध्यमिक व प्राथमिक शिक्षण देणाऱ्या शाळा महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने आधीच स्थापन केल्या होत्या. पुणे, बारामती, सासवडच्या धर्तीवर सावेडी, अहमदनगर या ठिकाणी देखील पूर्व प्राथमिक, प्राथमिक शाळा असावी या उद्देशाने या शाळेची स्थापना केलेली होती. पूर्व प्राथमिक गटातील बालकांवर चांगले संस्कार करणे, त्यांना योग्य शिक्षण देणे हा देखील उद्देश शाळा स्थापने वेळी होता. विविध प्रकारच्या खेळाच्या माध्यमातून बालकांना शिक्षित करणे, सांस्कृतिक कार्यक्रम, पाठांतर, हस्ताक्षर, कविता गाण्याच्या स्पर्धा यांसारख्या उपक्रमांमधून महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या सावेडी अहमदनगर शाळेने आपले वेगळेपण जपलेले आहे.

## ४.२२ महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या शाळांचा समाजाला झालेला उपयोग :

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीची स्थापना ज्या उद्देशाने झाली आहे, त्यामध्ये समाजाचा सर्वांगीण विकासासाठी शिक्षण हा हेतू आहे. 'समाज व राष्ट्राभिमुख शिक्षणप्रणाली, विज्ञाननिष्ठा, उज्ज्वल चारित्र्यनिर्मिती, विवेकसंपन्न सांस्कृतिक पर्यावरण या चतुःसूत्रीवर असलेल्या श्रध्देमधून माणूस घडवायचा आहे.' हेच ध्येय समोर ठेवून अनेक शिक्षणसंस्था कार्य करीत आहेत. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी ही अशीच आद्यसंस्थांपैकी एक संस्था आहे. यावरून महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीची भूमिका, उद्देश व वाटचाल दिसून येते. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी शैक्षणिक कार्याचा समाजाला अनेक प्रकारे उपयोग झाला असून, झालेल्या उपयोगांचा आढाव खालीलप्रमाणे घेता येईल.

### ४.२२.१ शिक्षणाची संधी निर्माण झाली :

सन १८६० मध्ये खाजगी शिक्षणाचे वर्ग पुण्यामध्ये सुरु होते. ते महागावकरांनी भाजेकरांकडे सोपवले. भाजेकरांनी वामन प्रभाकर भावे यांचेकडे सुपूर्द केले. पूना नेटीव्ह इन्स्टिट्यूशनच्या माध्यमातून संस्थेच्या कार्यास प्रारंभ झाला. दरम्यानच्या कालावधीमध्ये राष्ट्रीय शिक्षणसंस्थेमध्ये शिक्षण घेण्याची एक नवी शक्कल राष्ट्राभिमान्यांनी लढवली. त्यामुळे राष्ट्रीय शाळांमधून शिक्षण घेण्यास भारतीयांना अवसर प्राप्त झाला. राष्ट्रप्रेमाने भारावलेल्या व्यक्तींसाठी ही

मोठी आनंददायी घटना होती. नंतरच्या कालावधीत संस्थेच्या सर्वच शैक्षणिक संकुलामधून अनेक विद्यार्थ्यांनी शिक्षण घेतले. शहरी तसेच ग्रामीण भागांमधून महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी विद्यार्थ्यांना शिक्षण देत असल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी निर्माण झाली. अनेक विद्यार्थ्यांना या शिक्षणसंस्थेचा उपयोग झाला. पर्यायाने समाजामध्ये शैक्षणिक विकास पुणे, सातारा, अहमदनगर, मुंबई यांसारख्या ठिकाणीच्या अनेक लोकांना आपपल्या पाल्यांना म.ए.सोसायटीच्या शाळांमधून शिक्षण देता आले. इतिहास प्रसिध्द असणाऱ्या या शाळांमध्ये शिक्षणाची संधी उपलब्ध होणे हा एक समाजाला झालेला मोठा उपयोग समजला पाहिजे.

महाराष्ट्र एज्युकेशनचा समाजावर झालेल्या उपयोगाची मीमांसा करत असताना हे ध्यानात घेतले पाहिजे की उपयोगाचे दोन प्रकार आहेत ते म्हणजे दृष्य स्वरूपातील उपयोग व अदृश्य उपयोग. अनेक विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी याशाळेमधून प्राप्त झाली, हा महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचा समाजावरील एक अदृश्य परंतु महत्त्वाचा व उल्लेखनीय उपयोग त्यामुळेच समजला जातो. या संस्थेच्या शैक्षणिक संकुलामधून शिक्षण घेणाऱ्यांमध्ये अनेक जाती धर्माचे- पंथाचे, विविध व विषम आर्थिक घटकांतील मुले व मुली होत्या. त्यामुळे असेच म्हणावे लागेल की, महाराष्ट्र एज्युकेशन या संस्थेचा समाजाला सर्वात मोठा झालेला फायदा समाजातील सर्व घटकांना शिक्षणाची संधी प्राप्त झाली हाच असेल. कारण आपला ऐतिहासिक वारसा जपत संस्थेने अव्याहतपणे आपले ज्ञानदानाचे कार्य सुरु ठेवले ते समाजाला सुशिक्षित करण्यासाठी. चारित्र्यसंपन्न, राष्ट्राभिमानी पिढी घडवण्यासाठी आणि अशा समाजाला उपयोग झाला तसा राष्ट्राच्या बलशाली जडणघडणीमध्ये या संस्थेचा वाटा केवळ उल्लेखनीय नाही तर जबाबदारीयुक्त अशा स्वरुपाचा आहे.

### ४.२२.२ प्रतिभासंपन्न विद्यार्थी घडले :

संस्थेच्या स्थापनेपासूनच शिक्षणासोबत अनेक प्रकारामध्ये नैपुण्य मिळवण्यासाठी संस्थेने जाणिवपूर्वक प्रयत्न केले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना, प्रतिभेला, अभ्यासाला, खेळाला चालना दिली. विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीमध्ये अतिशय जोमदारपणे प्रावीण्य मिळवावे यासाठी संस्थेच्या सर्वच शाळा महाविद्यालयांमधून प्रयत्न केले गेले. याचाच एक परिणाम म्हणजे संस्थेच्या शाळेमध्ये अनेक राष्ट्राभिमानी विद्यार्थी निर्माण झाले.

चित्रकला, निबंध, वक्तृत्व, पाठांतर, गणिती सूत्रे, संशोधन चालना यांसारख्या अनेक स्पर्धा तसेच स्पर्धात्मक सांस्कृतिक कार्यक्रम, विद्यार्थी वाचन अभियान यासारख्या स्पर्धेमधून वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये अनेक प्रतिभासंपन्न विद्यार्थी संस्थेच्या माध्यमातून आकारास आले आहेत. कोणकोणत्या

क्षेत्रामध्ये संस्थेमधील शैक्षणिक संकुलामधून शिक्षण घेतलेल्या किती विद्यार्थ्यांनी देदिप्यमान कामगिरी केली याची निश्चित माहिती उपलब्ध होत नसली तरी विविध शाळांच्या, महाविद्यालयांच्या माजी विद्यार्थ्यांची उपलब्ध माहिती तपासता ध्यानात येते की, आचार्य अत्रे, डॉ. राम ताकवले, संगीततज्ज्ञ प्रभाकर कुलकर्णी, स्व. स्मिता पाटील, महाराष्ट्रातील नामांकित कुस्तिगीर शामराव ठोंबरे, अनुराधा पोटे, मा. शरदचंद्र पवार, ना. प्रकाश जावडेकर यांच्यासारख्या अनेक विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या संस्थेमधून शिक्षण घेतले होते.[२८]

गेल्या काही काळात विविध क्षेत्रात प्रभावशील असणारे हे संस्थेचे विद्यार्थी खऱ्या अर्थाने संस्थेची संपत्ती आहे. तसाच, संस्थेचा समाजाला झालेला मोठा उपयोग आहे. यांच्या व्यतिरिक्त देखील अनेक विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीत शिक्षण घेऊन कर्तृत्व सिध्द केले असेल परंतु त्यांची माहिती संकलित होऊ शकली नाही, ही या संशोधनाची मर्यादा आहे.

### ४.२२.३ मुलींसाठी लष्करी शिक्षण :

सन १९४७ साली भारत देश स्वतंत्र झाला असला तरी पुढेही अनेक काळ लष्करामध्ये स्त्रियांचा समावेश केला गेला नव्हता. त्यामुळे साहजिकच लष्करी शिक्षण केवळ मुलांनाच दिले जात असे. दरम्यान महाराष्ट्र सरकारने मुलींना सैनिकी शिक्षण देण्याची कल्पना मांडली. तात्काळ महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने मुळशी तालुक्यातील कासार आंबोली या ठिकाणी शाळा सुरु केली. देशामध्ये मुलींना सैनिकी शिक्षण देणारी ही सर्वात पहिली शाळा ठरली. समाजाला या शाळेने खूप मोठ्या प्रमाणात उपयोग झाल्याचे दिसते. अनेक मुलींनी या शाळेमधून सैनिकी शिक्षण म्हणजे अर्थातच तलवारबाजी, भालाफेक, नेमबाजी, घोडेस्वारी, तिरंदाजी यांचे शास्त्रशुध्द शिक्षण घेतलेले आहे.

यापेक्षा या शाळेचा समाजाला सर्वात मोठा झालेला उपयोग म्हणजे, समाजमनाची मानसिकता बदलण्यास या शाळेमुळे वाव मिळाला. ही शाळा स्थापन होण्यापूर्वी मुलींनी सैन्यदलात सहभागी व्हावे ही कल्पनाच अनाठायी वाटत असे. या शाळेमुळे या परिस्थितीत बदल झाले.

स्त्री-पुरुष समानता हे केवळ बोलण्यातील परवलीचे शब्द नसून महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने राणी लक्ष्मीबाई मुलींची सैनिकी शाळा स्थापन केल्यामुळे एक अर्थपूर्ण शब्द ठरले. आणि याच स्त्री-पुरुष समतेसाठी संस्थेने या शाळेची स्थापना केली होती. खरे तर समाजीत स्त्री-पुरुष भेद संपवण्यासाठी संस्थेने केलेले कार्य कौतुकास्पद होते. समाजाला याचा मोठा फायदा झाला.

अनेकांच्या मनातील स्त्रियांबाबतची विषमतेची जळमटे या शाळेच्या स्थापनेने जाळली गेली. हाच समाजावरील उपयोगांसह परिवर्तन होण्याचा प्रवास समजला पाहिजे.

### ४.२२.४ ज्ञानाचे जागतिक भांडार खुले :

जगातील सर्वोत्तम ज्ञान इंग्रजी भाषेमध्ये आहे व इंग्रजी हीच जगाच्या व्यवहाराची भाषा आहे. जागतिक स्पर्धेमध्ये टिकायचे असेल तर इंग्रजी भाषेचे ज्ञान फारच अत्यावश्यक आहे. असा विचार करून महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरु केल्या. त्यामध्ये संस्था प्रशासनाने असाही एक विचार केला होता की, प्रादेशिक असणाऱ्या मराठी भाषेच्या ज्ञानाला मर्यादा येतात, व केवळ त्यासाठीच मर्यादेबाहेरचे जग, मर्यादेबाहेरचे ज्ञान देशी विद्यार्थ्यांना मिळावे म्हणून या शाळांची स्थापना करण्यात येत होती.

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने सुरू केलेल्या शाळेमध्ये पालकांनी आपली मुले पाठवली. समाजातील अनेक घटकांना याचा उपयोग झाला. इंग्रजी शिक्षण देणाऱ्या इतर शाळा होत्या. त्यांच्या तुलनेत महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या इंग्रजी शाळेच्या शैक्षणिक शुल्कामध्ये तफावत असे. सर्वसामान्य मध्यम वर्गीयांच्या खर्च करण्याच्या टप्प्यातील आर्थिक गरजेच्या मर्यादेत संस्थेच्या शाळेत शैक्षणिक शुल्क आकारले जाई. हा सुध्दा समाजाला झालेला महत्त्वाचा उपयोग समजला पाहिजे.

सर्वात वैशिष्ट्यपूर्ण बाब म्हणजे स्वातंत्र्यपूर्व काळापासून महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या वतीने अनेक विद्यार्थ्यांना मायबोली मराठीच्या अमृताची चव चाखता आली. परंतु हे अमृताचे केवळ काहीच थेंब होते. जगाची भाषा असणाऱ्या इंग्रजीमध्ये वैविध्यपूर्ण ज्ञानाचा साठा होता. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने इंग्रजी शाळा स्थापन करून ज्ञानाचे जागतिक भांडार सर्वसामान्य विद्यार्थ्यांना खुला केले, हाच इंग्रजी माध्यमातील शाळा स्थापन केल्यानंतर समाजाला झालेला सर्वात मोठा उपयोग होता. विद्यार्थ्यांनी देखील संस्थेच्या संकल्पनेला प्रयत्नांची जोड देऊन अल्पावधीत इंग्रजी भाषेवर प्रावीण्य मिळवले आहे.

### ४.२२.५ मोठा आत्मविश्वास निर्माण करण्यात यशस्वी :

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीची स्थापना स्वातंत्र्यपूर्व कालावधी मध्ये झाली तेव्हा संस्था पुणे शहरामध्ये कार्यरत होती. शिक्षणाच्या राष्ट्रीय करणानंतर संस्थेच्या कार्याचा विस्तार झाला. पुणे शहर -जिल्हा, अहमदनगर, सातारा, मुंबई इत्यादी ठिकाणी संस्थेच्या वतीने विविध विद्यार्थी

गटासाठी शाळा महाविद्यालयांची स्थापना करण्यात आली. संस्थेच्या वतीने ग्रामीण भागामध्ये शाळा सुरु करण्यात आल्या. शिरवळसारख्या औद्योगिक वसाहतीमध्ये शाळा सुरु करण्यात आल्या. समाजाला याचा एक मोठा फायदा झाला. ग्रामीण भागातील, औद्योगिक ठिकाणच्या कष्टकरी कामगारांच्या मनात एक नवा आत्मविश्वास नवी चेतना निर्माण होण्यास या शाळांमुळे उपयोग झाला.

मराठी भाषेतील गुणवत्तापूर्ण शिक्षण, इंग्रजी भाषेतील दर्जेदार शिक्षण आपल्या पाल्याला मिळते आहे. निश्‍चित इतरांच्या तुलनेत आपण कमी नाही आहोत, याची जाणीव कष्टकरी कामगार शेतकऱ्यांना होऊ लागली. तसेच शहरी भागातील मध्यमवर्गीयांमध्ये देखील या संस्थेमुळे आत्मविश्‍वास व चेतना निर्माण झाली.

वरील सर्व बाबींचे विवेचन करता निदर्शनास येते की, समाजातील शैक्षणिक स्थितीचे परिवर्तन करण्यात महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे योगदान आहे. किंबहुना त्यापेक्षा अधिक समाजाला याचा उपयोग झाला आहे. आत्मविश्वास गमावलेल्या समाजात सर्व साधने उपलब्ध असताना देखील काही हिताची कार्ये होत नाहीत. उलट, जागृत झालेल्या आत्मविश्‍वासाने समग्र आणि सम्यक परिवर्तन अटळ असते. म्हणून या दृष्टीने महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीकडे पाहिल्यास नेमका अर्थबोध होतो.

### ४.२२.६ स्वातंत्र्याची वातावरण निर्मिती :

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी या संस्थेची स्थापना स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये झाली होती. तत्कालिन वेळी पारतंत्र्यात खचलेल्या भारतीयांना कोणत्याही परिस्थितीमध्ये स्वातंत्र्य हवे होते. तर स्वातंत्र्याचा चळवळीमध्ये तर सुरुवातीपासूनचे पुणे शहर देशात आघाडीवर होते. भारताला स्वातंत्र्य मिळेपर्यंत म्हणजे १९४७ पर्यंत महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी या संस्थेचा कार्यविस्तार वाढला होता. तसेच संस्थेचा प्रारंभीचा काळ हा देशप्रेमाने भारावलेला काळ होता. याच कालावधीमध्ये स्वातंत्र्य देशप्रेम या संकल्पना बाल्यवस्थेमध्येच शाळेतून दिल्या जात असत.

स्वातंत्र्यासाठी समाजजागृती करण्यासाठी समाजसेवक धडपडत असत. हेच कार्य शाळेच्या माध्यमातून महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने केलेले आहे. लहान मुलांना स्वातंत्र्याविषयी गोष्टी सांगितल्यामुळे घरी जाऊन आपल्या पालकांना सांगत. त्याचा परिणाम असा होत असे की, लोकांमध्ये मोठ्याप्रमाणावर जागृती वाढल्यामुळे स्वातंत्र्यासाठी सिध्द होण्यास काही प्रमाणात मदत झाली.

वेगळ्या अर्थाने स्पष्ट करायचे झाल्यास असे म्हणावे लागेल की भारतीय स्वातंत्र्याची निर्मिती करण्यात थोडी का होईना पार्श्वभूमी तयार करण्याचे महत्तम कार्य महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने केलेले आहे. त्याचा समाजाला किंवा देशाला हा उपयोग झाला की, आपसूकच थोडे का होईना पण स्वातंत्र्यभिमानी, समाजसेवक, जाज्वल्य देशाभिमान जोपासणारे, राष्ट्राभिमानी नागरिक तयार झाले. समाजाला झालेला उपयोग त्या त्या भागात स्वातंत्र्याची पेरणी करणारा नवविचारच होता हे कोणीही नाकारू शकणार नाही.

### ४.२२.७ संस्कारक्षम मूल्यशिक्षणासह गुणवत्ता वाढ :

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या सर्वच शाळांमधून मूल्यशिक्षणावर अधिक भर दिला जातो. सामाजिक, न्याय, समता, स्वातंत्र्य, बंधूता इत्यादीचे शिक्षण दिले जाते. विद्यार्थ्यांना याचा मोठा फायदा होतो. गुणवत्तेमधील केवळ २०१० - २०११ या वर्षाची महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या सर्व शाळांची एकत्रित निकालाची आकडेवारी पाहिल्यास हे आपल्या ध्यानात येते.

| परीक्षा | सहभागी विद्यार्थी | उतीर्ण विद्यार्थी | निकाल % |
|---|---|---|---|
| ४ थी शिष्यवृत्ती | ५९३ | ५९० | ९९.४९ |
| ७ वी शिष्यवृत्ती | ५७३ | ४२२ | ७३.६४ |
| माध्यमिक शालांत | २५७० | २४७२ | ९६.१८ |

या कालावधीत '४ थी शिष्यवृत्तीचा निकाल ९९.४९% इतका लागला आहे. ७ वी शिष्यवृत्तीचा निकाल ७३.६४% इतका लागला आहे. तर माध्यमिक शालांत परीक्षेचा निकाल ९६.१८% लागला आहे.'[२९] अशा गुणवत्तेचा या आधीही समाजाला मोठा उपयोग झाला आहे. दर्जेदार गुणवत्ताधारक नागरिक यामुळे समाजाला सहजपणे लाभले आहेत. त्यामुळे ही गुणवत्ता संस्थेसह समाजाच्या सन्मानाचा केंद्रबिंदू ठरून देशाच्या विकासाला सहाय्य करण्यास पूरक ठरलेली आहे असेच म्हणावे लागेल.

### ४.२२.८ सर्व जाती धर्माच्या मुलांसाठी शिक्षण :

सन १९११-१२ च्या वार्षिक अहवालानुसार दी पुना नेटिव्ह इन्स्टिटयुट संस्थेचे स्वातंत्र्यपूर्व कालखंडात सुध्दा सर्व जाती धर्मातील विद्यार्थी शिक्षण घेत होते असे दिसते.

| अ.क्र | इयत्ता | मुले |
|---|---|---|
| १ | १ ली | १२३ |
| २ | २ री | १०३ |
| ३ | ३ री | १०१ |
| ४ | ४ थी | ११२ |
| ५ | ५ वी | ९८ |
| ६ | ६ वी | १२१ |
| ७ | ७ वी | १९२ |
| | एकूण | ८५० |

जातधर्मानूसार वरील विद्यार्थ्यांची वर्गीकरण -

ब्राम्हण - ५७१

इतर हिंदु - २२५

पारशी - ८

ख्रिश्चन - ३

ज्यु - २

लिंगायत - १

अस्पृश्य - १

एकूण[३०] - ८५०

वरील आलेखावरून असे दिसते की, 'दी पूना नेटिव्ह इन्स्टिटट्यूशन'मध्ये सर्व जाती धर्माचे विद्यार्थी जरी शिक्षण घेत असले तरी त्यात सर्वात ब्राम्हण समाजाच्या विद्यार्थ्यांचे प्रमाण अधिक असून अस्पृश्य समाजाचे प्रमाण फारच नगण्य आहे.

### ४.२२.९ एज्युकेशन सोसायटीत विद्यार्थी संख्यावाढीचे प्रमाण :

दिनांक ३१.३.१९४९ रोजी संस्थेत विद्यार्थी संख्येचे प्रमाण खालील प्रमाणे होते.[३१]

| अ.क्र | शाळेचे नाव | स्थापना | मुले | मुली | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | मुलांचे विद्यालय पुणे शहर | १८७४ | १३१४ | ० | १३१४ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | मुलींचे विद्यालय | १९३५ | ० | ८४० | ८४० |
| ३ | मुला मुलींचे विद्यालय<br>डेक्कन जिमखाना पुणे. | १९२५ | ४०६ | ३१६ | ७२२ |
| ४ | मुला मुलींचे विद्यालय<br>बारामती, पुणे. | १९११ | ५०९ | १०६ | ६१५ |
| ५ | मुला मुलींचे विद्यालय<br>सासवड, जि. पुणे. | १९०६ | १९७ | २३ | २२० |
| ६ | भावे प्राथमिक शाळा, पुणे. | १८९९ | ४६८ | ३५३ | ८२१ |
| ७ | बालशिक्षण मंदिर, पुणे. | १९२२ | ३६० | २५२ | ६१२ |
| ८ | बालशिक्षण मंदिर, पुणे. | १९४० | ६७ | ३४ | १०१ |
| ९ | एस.टी.टी. इन्स्टिटट्यूट, पुणे. | १९४० | ६७ | ३४ | १०१ |
| १० | म.ए.सो. कॉलेज, पुणे | १९४५ | १६९ | १५ | १८४ |
| | एकूण | | ३४९४ | १९७२ | ५४६६ |

वरील विवेचनावरून असे दिसते की १० विद्यार्थ्यांवर सुरू झालेल्या संस्थेतील विद्यार्थीची संख्या दिवसेंदिवस वाढतच गेलेली दिसते. असे जरी असले तरी मुलांच्या तुलनेत मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण कमीच होते असे दिसते.

### ४.२२.१० सर्व प्रकारचे शिक्षण एकाच ठिकाणी :

साधारणपणे १९८०-९० नंतर अनेक पालक आपल्या पाल्यांना केवळ शालेय शिक्षण न देता अनेक प्रकारचे शिक्षण देण्यास सुरुवात करु लागले. आणि यासाठी अशा पालकांना आपल्या विद्यार्थ्यांचे छंद जोपासण्यासाठी खाजगी शिकवण्यांचा आधार घ्यावा लागत असे. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या शाळांमधून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना पर्यायाने पालकाला, समाजाला अनेक प्रकारचे छंद जोपासण्यासाठी उपयोग झाला.

विविध छंद जोपासण्याची विद्यार्थ्यांमध्ये आवड निर्माण करण्याचे मोठे कार्य महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने केले आहे. या छंदामध्ये प्रामुख्याने टपाल तिकिटे संग्रह विविध दुर्मीळ पुस्तकांचा संग्रह, वेगवेगळ्या प्रकारच्या नाण्यांचा संग्रह, सर्वोत्तम फोटोंचा संग्रह करण्याची आवड संस्थेने निर्माण केली.

गायन, नृत्य, हस्ताक्षरलेखन, पाठांतर सांस्कृतिक कार्यक्रम असे अनेक छंद जोपासण्याची आवड या संस्थेतील विद्यार्थ्यांना शालेय स्तरापासूनच झाली म्हणजेच महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून सर्व प्रकारचे शिक्षण एकाच ठिकाणी मिळू लागले. हा समाजाला झालेला सर्वात मोठा उपयोग आहे असे म्हणावे लागेल.

नोकरी किंवा व्यवसाय उदरनिर्वाहासाठी, जगण्यासाठी महत्त्वाचे असतात पण कसं जगावं यासाठी एखादी कला किंवा एखादा छंद जोपासावा लागतो. अर्थातच मानवी जीवन सुखकारक करण्यासाठी अशा छंदाची आवश्यकता असतेच. आणि या अर्थाने संस्थेच्या शाळांमधून विद्यार्थ्यांच्या शिक्षणासोबत या घटकाचे उपक्रम राबवले गेल्यामुळे समाजाला त्याचा फायदा झाला आहे. म्हणजेच शालेय शिक्षणासोबत जीवनशिक्षण देण्याचे समाजोपयोगी कार्य महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने केले आहे. त्यामुळेच राष्ट्र उभारणीला हातभार लावणारी एक अग्रण्य म्हणून महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी ही संस्था महत्तपूर्ण ठरली आहे.

**समारोप :**

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या विविध पूर्व प्राथमिक शाळा, प्राथमिक शाळा व माध्यमिक शाळा यांचा अभ्यास केल्यानंतर जे निष्कर्ष हाती आले आहेत ते या ठिकाणी मांडण्यात आले आहेत. या संस्थेच्या एकूण २२ शाळा पूर्व प्राथमिक ते माध्यमिक शाळा आहेत.

पुणे शहर व जिल्हा, अहमदनगर जिल्हा, सातारा जिल्हा व नवी मुंबई पनवेल या परिसरात या शाळा कार्यरत आहेत. शतकोत्तर सुवर्णमहोत्सव साजरा करणाऱ्या महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने आपल्या शाळांच्या माध्यमातून आपले वेगळेपण सिध्द केले आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण, ज्ञान, शिस्त, नैतिकता, संस्कार यांच्या एकत्रीकरणातून सर्वच शाळांनी नवनवे उपक्रम राबवून व प्रयोग करून आपल्या दर्जात सातत्य ठेवल्याचे दिसून येत आहे.

पूर्व प्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक शिक्षण हे देशाच्या प्रगतीच्या दृष्टीने खूपच महत्त्वाचे असते. अशा महत्त्वाच्या क्षेत्रात महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने दिलेले योगदान महत्वाचेच आहे. स्वच्छ चारित्र्य, देशाभिमान, लोकशिक्षण आणि लोकसामर्थ्य निर्माण करणाऱ्या राष्ट्रीय शिक्षणाची आज देशाला आवश्यकता आहे. राष्ट्रीय शिक्षणाची विचारधारा स्वीकारून वाटचाल करणारी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी ही आघाडीवर आहे हे संस्थेचे वैशिष्ट्य आहे.

शिक्षणातून केवळ पुस्तकी ज्ञान मिळविण्यापेक्षा चांगल्या विचारांनी आपल्या व्यक्तिमत्त्वात विधायक बदल घडवून आणणे हे महत्त्वाचे असते. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या या विविध

शाळांतून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला चालना देणारे विविध उपक्रम राबविले जात असल्याचे दिसून येते. क्रीडा स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, गायन स्पर्धा यांचे आयोजन करून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव दिला जातो. प्रचलित ज्ञानाबरोबर इतर कौशल्ये आत्मसात करून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देण्यासाठी या शाळांनी प्रयत्न केल्याचे दिसून येते. क्रीडा, गायन, वक्तृत्व स्पर्धांसह विद्यार्थ्यांच्या बौध्दिक विकासाला चालना देणारे उपक्रमही या शाळांनी राबविल्याचे दिसून येते.

स्पर्धेच्या या युगात पूर्व प्राथमिक ते माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांने सर्व दृष्टीने परिपूर्ण बनविण्याची आवश्यकता आहे. ही आवश्यकता संस्थेच्या या शाळांनी ओळखलेली दिसते. विद्यार्थ्यांच्या मानसिक स्थैर्यासाठी व विकासासाठी काही उपक्रम राबविण्यात आले आहेत. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना सर्वांगीण उन्नतीच्या दिशेने न्यायचे असेल तर अभ्यासक्रमाच्या पलिकडे जाऊन काही गोष्टी करणे आवश्यक आहे. शिक्षकांनी अद्ययावत ज्ञानाने परिपूर्ण होऊन विद्यार्थ्यांना कशा प्रकारे हाताळावे यासाठी शिक्षकांच्या कार्यशाळा आयोजित करण्याचा उपक्रम महत्त्वाचा आहे. त्याचबरोबर विद्यार्थी, पालक व शिक्षक यांच्यात सुसंवाद निर्माण व्हावा यासाठी ही विविध शाळांनी जाणीवपूर्वक काम केल्याचे दिसून येते. ही नोंदही अतिशय महत्त्वाची आहे. यावरुन असे स्पष्ट होते की, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या शाळांमधून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी विविध स्तरांवर प्रयत्न केले जातात.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी सर्व भौतिक सोयीसुविधांनी युक्त अशा इमारतीही खूप महत्त्वाच्या आहेत. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या सर्व शाळा चांगल्या इमारतींमध्ये भरत आहेत. विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सर्व पायाभूत सुविधा प्रत्येक इमारतींमध्ये उपलब्ध आहेत असे दिसून येते. बदलत्या काळाचा वेध घेऊन महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने नवे बदल स्वीकारले आहेत. आपल्या शाळांमधून नवे बदल केले आहेत. इंग्रजी आज जागतिक भाषेचा दर्जा मिळविलेली भाषा आहे. इंग्रजी ही ज्ञानभाषा असल्यामुळेच तिला हा दर्जा प्राप्त झाला आहे. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने या गोष्टीचा गांभीर्याने विचार करून इंग्रजी माध्यमांच्या शाळा सुरु केल्या आहेत.

संगणकीय साक्षरता ही काळाची गरज आहे. संगणकाचे ज्ञान असणे ही अतिशय महत्त्वाची गोष्ट आहे याचा विचार करुन महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने विद्यार्थ्यांमध्ये संगणकीय ज्ञान वाढावे यासाठी प्रयत्न केले आहेत. विद्यार्थ्यांना संगणक उपलब्ध करुन त्यांच्यासाठी संगणकीय शिक्षणाची उपलब्धता करून दिल्याचेही दिसून येते.

भारत देशाच्या दृष्टीने मुलींचे शिक्षण हा अतिशय संवेदनशील प्रश्न आहे. चिंता करण्यायोग्य असा चिंतनाचा विषय आहे. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने मुलींच्या शिक्षणासाठी प्रारंभापासूनच विशेष प्रयत्न केल्याचे दिसते. संस्थेच्या पूर्व प्राथमिक ते माध्यमिक शाळांतून मुलींची संख्या लक्षणीय आहे. याचे श्रेय अर्थातच संस्थेच्या ध्येय, धोरणांना आहे, मुलींनी केवळ पारंपरिक शिक्षण घेऊन चालणार नाही तर चाकोरीबाहेरचे शिक्षण घेऊन स्वत:चा विकास करण्यासाठी व देशाला यथायोग्य योगदान देण्यासाठी मुलींना लष्करी शिक्षण देण्याची भूमिका महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने घेतली. या भूमिकेतूनच कासार आंबोली येथे मुलींची सैनिकी शाळा आकाराला आली असून या शाळेला मुलींचा भरघोस प्रतिसाद मिळत आहे. हा उपक्रम अतिशय स्तुत्य व उल्लेखनीय असल्याचे दिसते कारण अशा प्रकारची ही देशातील पहिली शाळा आहे. यावरून या उपक्रमाचे महत्त्व स्पष्ट होते. पारंपरिक शिक्षणव्यवस्थेत शाळाचे मूल्यमापन परीक्षांच्या निकालावरून केले जाते. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या पूर्व प्राथमिक ते माध्यमिक शाळा या संदर्भातही अग्रेसर आहेत. सातत्याने माध्यमिक शालांत परीक्षांचे निकाल चांगल्या प्रकारे लावून परीक्षांच्या निकालातही आपण कमी नाही हे महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या शाळांनी सिध्द केले आहे.

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीसारखी मोठा विस्तार असलेली शिक्षण संस्था चालवित असताना व्यवस्थापन व संचालक मंडळाची भूमिकाही तितकीच महत्त्वाची असते. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने यामध्येही आपले कर्तृत्व सिध्द केले आहे. संस्थेच्या नियामक मंडळाच्या कार्यामुळेही पूर्व प्राथमिक ते माध्यमिक शाळांच्या यशस्वी कामगिरीला बळ मिळाल्याचे दिसून येते.

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या पूर्व प्राथमिक ते माध्यमिक शाळांचा लेखाजोखा मांडल्यानंतर एक गोष्ट लक्षात येते की, यातील बहुतांश शाळा या नागरी भागात आहेत. संस्थेने ग्रामिण भागात लक्ष घातले तर संस्थेचा उत्तम, दर्जेदार शिक्षणाचा फायदा ग्रामिण भागातील मुलांना होऊ शकतो. संस्थेचा प्रखर राष्ट्रवादी, सामाजिक विचार लक्षात घेता संस्थेने शिक्षणाचा प्रवाहात नसलेल्या, शालाबाह्य मुलांसाठी, उपेक्षित व वंचितांच्या मुलांसाठी काही उपक्रम राबविले तर संस्थेच्या विचारांचा व कार्यक्षमतेचा उपयोग अशा मुलांसाठीही होऊ शकतो.

एकूणच महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी या शिक्षण संस्थेचे पूर्व प्राथमिक ते माध्यमिक शाळांच्या माध्यमातून दिलेले शैक्षणिक योगदान अतिशय महत्त्वाचे आहे. या शाळा परिणामकारकतेने शिक्षण क्षेत्रात कार्यरत असल्याचे दिसून येते. या शाळांनी त्या त्या भागाच्या शैक्षणिक व सामाजिक विकासात महत्त्वाचे योगदान दिल्याचे स्पष्ट होते.

## संदर्भ आणि टिपा


१. वार्षिक अहवाल, **महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी**, १९२९-३०, पृ. १३.

२. **दैनिक केसरी**, २६ फेब्रवारी १८९५, पृ. ३.

३. The Poona Native Institution, **Annual Report**, Pune, 1896-1897, p.22.

४. **माहिती पत्रक**, भावे हायस्कूल, पुणे, २००९, पृ. ३.

५. The Poona Native Institution, **Annual Report**, Pune, 1906-1907, p.18.

६. **दैनिक केसरी**, ९ मे १९१७, पृ. २.

७. वार्षिक अहवाल, **महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी**, १९९०-९१, पृ. १०.

८. सासवड नगरपरिषद, **वार्षिक अहवाल**, सासवड, २००६, पृ. ४५.

९. The Poona Native Institution, **Annual Report**, Pune, 1911-1912, p.26.

१०.धाडवे नवनाथ, प्रासंगिक, **दै. सुराज्य**, सोलापूर, दि. १ मार्च २०११, पृ. ६.

११.वार्षिक अहवाल, **महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी**, १९२२-२३, पृ. १९.

१२. वार्षिक अहवाल, **महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी**, १९९५-९६, पृ. ९.

१३.वार्षिक अहवाल, **महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी**, १९७२-७३, पृ. १६.

१४.वार्षिक अहवाल, **महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी**, १९३५-३६, पृ. २७.

१५. वार्षिक अहवाल, **महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी**, १९७१-७२, पृ. ४०.

१६. वार्षिक अहवाल, **महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी**, १९९१-९२, पृ. १३.

१७. वार्षिक अहवाल, **महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी**, १९७९-८०, पृ. ३५.

१८. मुख्याध्यापक संघ, अहवाल, पुणे, २००५, पृ. २७.

१९. वार्षिक अहवाल, **महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी**, १९७९-८०, पृ. २०.

२०. वार्षिक अहवाल, **महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी**, १९८६-८७, पृ. १८.

२१. पुरंदर प्रताप, **पुरंदर प्रतिष्ठाणचे शैक्षणिक उपक्रम**, पुणे, दिनांक २२.७.२०००, पृ. ८.

२२. वार्षिक अहवाल, **महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी**, १९९६-९७, पृ. ३०.

२३. वार्षिक अहवाल, **महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी**, २००१-२, पृ. ४२.

२४. वार्षिक अहवाल, **महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी**, १९९६-९७, पृ. ९.

२५. म.ए.सो. राणी लक्ष्मीबाई मुलींची सैनिक शाळा, **माहिती पुस्तिका**, २००३, पृ. ३.

२६. वार्षिक अहवाल, **महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी**, १९९९-२०००, पृ. ५.

२७. वार्षिक अहवाल, **महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी**, २००१-०२, पृ. १६.

२८. निवडक माजी विद्यार्थ्यांचे **माहितीपत्रक**, पुणे, २००२, पृ. ४.

२९. वार्षिक अहवाल, **महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी**, २०१०-११, पृ. ८०.

३०. भावे ल. वा.(संपा.), महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी, **हिरक महोत्सव स्मारक ग्रंथ**, पुणे, १९३५, पृ. ४२.

३१. एम. बी. शाळीग्राम, **महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी स्मारक ग्रंथ**, १९५०, पृ. ५.

***************

## प्रकरण ५

# उच्च माध्यामिक, पदवी, पदव्युत्तर महाविद्यालये व व्यावसायिक महाविद्यालये

५.१ महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या उच्च माध्यमिक विद्यालयांच्या स्थापनेचे उद्देश :

५.२ उच्च शिक्षण व समाज :

५.३ कमवा आणि शिका योजना - स्वावलंबी शिक्षणाचा परिपाठ :

५.४ शिक्षणक्षेत्रातील उच्च शिक्षणाचे महत्त्व :

५.५ म.ए.सो. चे धोरण सर्वांगीण विकासाचे सूत्र उच्च शिक्षण :

५.६ शैक्षणिक समतोल व महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी :

५.७ म.ए.सो. भावे उच्च माध्यमिक विद्यालय, पुणे (इ.स. १८९६) :

५.८ म.ए.सो. आबासाहेब गरवारे महाविद्यालय, पुणे (इ.स. १९४५) :

५.९ म.ए.सो. गरवारे वाणिज्य महाविद्यालय, पुणे (इ.स. १९६७) :

५.१० म.ए.सो. रेणुका स्वरूप ज्युनिअर कॉलेज, पुणे (इ.स. १९७५) :

५.११ म.ए.सो. विमलाबाई गरवारे ज्युनिअर कॉलेज, पुणे (इ.स. १९७५) :

५.१२ म.ए.सो. वाघीरे ज्युनिअर कॉलेज, सासवड, पुणे (इ.स. १९७५) :

५.१३ म.ए.सो. कै. गजाननराव भिवराव देशपांडे उच्च माध्यमिक विद्यालय, बारामती (इ.स. १९९२) :

५.१४ म.ए.सो. राणी लक्ष्मीबाई मुलींची सैनिकी शाळा, कासार आंबोली, पुणे (इ.स. १९९७) :

५.१५ म.ए.सो. इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट अँड करिअर कोर्सेस, पुणे (इ.स. १९८३) :

५.१६ म.ए.सो. रेणुका स्वरुप इन्स्टिटयूट ऑफ करिअर कोर्सेस, पुणे (इ.स. १९८९):

५.१७ म.ए.सो. कॉलेज ऑफ नर्सिंग, पुणे (इ.स. २०१०) :

५.१८ म.ए.सो. स्कूल ऑफ पॅरामेडिकल सायन्स, चिपळूण (इ.स. २०१०) :

५.१९ म.ए. सो. कम्युनिटी महाविद्यालय, पुणे (इ.स. २०१०) :

५.२० इतर कार्य :

**प्रस्तावना :**

पुण्यातील महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी ही शतकोत्तर सुवर्णमहोत्सव साजरा करणारी पुण्यातील एक महत्वाची शिक्षण संस्था आहे. पूर्वप्राथमिक पासून पदव्युत्तर शिक्षण देणारी संस्था म्हणून ही संस्था ओळखली जाते. दर्जेदार शिक्षण देणारी, राष्ट्रीय भावना विद्यार्थ्यांच्या मनात रुजवून स्वतःच्या विकासासह समाजाच्या विकासात योगदान देण्याचा संस्कार करणारी ही संस्था आहे.[१] माध्यामिक व उच्च शिक्षण हे समाजाच्या तसेच राष्ट्राच्या विकासासाठी अतिशय महत्वाचे आहे. किशोरवयीन व युवकांच्या बौद्धिक प्रगतीला या माध्यमिक व उच्चशिक्षणाच्या माध्यमातून गती येत असते. कोणताही देश प्रगतीचे टप्पे पार करत असताना त्याच्या उच्चशिक्षणाची स्थिती कशी आहे याचे मूल्यमापन करणे आवश्यक आहे. त्यामुळे देशाचा, समाजाचा विकास मोजण्याचा एक महत्वाचा निकष म्हणून उच्चशिक्षणाकडे पाहिले जाते. यावरुन उच्च शिक्षणाचे महत्त्व लक्षात येते.

'महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी' ही शिक्षण संस्था एका ध्येयनिष्ठेने स्थापन झालेली संस्था आहे. अत्यंत दूरदृष्टीने संस्थेच्या संस्थापकांनी संस्थेची स्थापना करुन एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात माध्यमिक व उच्च शिक्षणाची सुविधा पुण्यामध्ये उपलब्ध करुन दिली होती. ब्रिटिश शासनाच्या कार्यकाळात राष्ट्रीय शिक्षणाच्या ध्येयाने, समाजात ज्ञानप्रसार करण्याच्या उद्दिष्टाने या संस्थेने आपल्या कार्याला सुरुवात केली होती, ही बाब अनन्यसाधारण महत्वाची आहे. यामुळे महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीची माहिती घेत असताना या संस्थेच्या उच्च माध्यमिक पदवी व पदव्युत्तर महाविद्यालये व व्यावसायिक महाविद्यालयांचा अभ्यास मांडणे आवश्यक आहे.

देशातील विद्यार्थ्यांना दर्जेदार, सकस शिक्षण उपलब्ध करुन देणे ही काळाची गरज आहे. उत्तम शिक्षण मिळाले तरच देशाचे भावी नागरिक बौद्धिकदृष्टया संपन्न होतील, सामाजिक भान जपणारे होतील. देशाच्या प्रगतीत आपले योगदान देऊ शकतील. त्यामुळे उच्च शिक्षणाचा संबंध हा थेट देशाच्या विकासाशी जोडला गेला आहे. कुशल मनुष्यबळ निर्माण करणे. त्यांच्या कुशलतेचा अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी उपयोग करणे, त्यांच्या बौद्धिक क्षमतेतून विकास साधणे याबरोबरच राजकारण, कला, साहित्य व संशोधन या क्षेत्रात प्रगती करणे या गोष्टी उच्च शिक्षणाच्या प्रसारातूनच शक्य होणार आहेत. त्यामुळे उच्च शिक्षणाकडे अतिशय गांभीर्याने बघण्याची गरज आहे. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचा विचार करता या संस्थेने उच्च माध्यमिक व उच्च शिक्षणाची सुविधा अगदी

प्रारंभापासूनच करुन दिली आहे. त्यामुळे नि:संशयपणे समाजाच्या सर्वांगीण विकासात या महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचा महत्त्वाचा वाटा आहे.

प्रस्तुत प्रकरणात महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने उच्च माध्यमिक व उच्च शिक्षणाच्या प्रसारासाठी ज्या शाखा कार्यान्वित केल्या अशा शाखांचा अभ्यास मांडण्यात येणार आहे. या शाखांचे मूल्यमापन करून त्यांचे महत्त्व व त्यांची प्रस्तुतता याविषयी मांडणी करण्यावर भर देणार आहे.

## ५.१ महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या उच्च माध्यमिक विद्यालयांच्या स्थापनेचे उद्देश :

पुणे शहरासह ग्रामीण भागामध्ये शैक्षणिकदृष्टया अतिशय महत्त्वपूर्ण अशा प्रकारचे कार्य 'महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी' या शैक्षणिक संस्थेने केलेले आहे. पूर्व प्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक दर्जाचे शैक्षणिक ज्ञानदानाचे कार्य करुन संस्थेने आपली सामाजिक बांधिलकी जोपासत राष्ट्र उभारणीच्या प्रवासात आपले महत्त्वपूर्ण योगदान बहाल केलेले आहेच, त्यामुळे पालक व विद्यार्थ्यांचा विश्वास संपादन करण्यास संस्थेला फारसे कष्ट घ्यावे लागले नाही. या सर्व अलिखीत घटना असल्या तरी उच्च माध्यमिक विदयालयांच्या स्थापनेमागे महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीची निश्चित धारणा, स्पष्ट उद्देश व काही व्यापक दृष्टिकोन होता, याची मांडणी खालीलप्रमाणे करता येईल.

१. जात, धर्म, लिंग, पंथ या आधारावर शिक्षणाची विभागणी न करता शिक्षण हे सर्वांसाठी खुले झाले पाहिजे.

२. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी या संस्थेचा विचार करता ज्ञानार्जन करणाऱ्या विद्यार्थ्यांना मायबोली मराठीसह, इंग्रजीभाषा माध्यमातून शिक्षण घेता आले पाहिजे.

३. विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासासह, शारीरिक, मानसिक विकास साधणे, विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक जगात विविध प्रकारची आव्हाने पेलण्यास सिद्ध करणे.

४. विद्यार्थ्यांमधे बौद्धिक क्षमता वाढीस लागावी यासाठी महत्वपूर्ण प्रयत्न करणे.

५. माध्यमिक शिक्षणानंतर विद्यार्थ्यांची प्रामुख्याने नागरिक म्हणून जडणघडण होत असते. विद्यार्थ्यांच्या या नागरिकीकरण प्रक्रियेला सम्यकदृष्टीने प्रभावित करणे.

६. शिक्षणासाठी आर्थिक निकष व घटक यांची परिमाणे न लावता सर्वांना शिक्षण देण्यासाठी प्रयत्न करणे.

७. उच्च माध्यमिक, पदवी, पदव्युत्तर प्रकारचे शिक्षण देणाऱ्या विविध ज्ञानशाखांचा अंतर्भाव महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून करुन देणे, जेणेकरुन विद्यार्थ्यांच्या आवडीला ज्ञानाची जोड मिळाल्याने निश्चितच राष्ट्रनिर्माण कार्यास बळकटी येऊन संस्थेच्या माध्यमातून अशा महाविद्यालयांना प्रोत्साहन देणे.

८. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी या संस्थेमध्ये माध्यमिक पर्यंतचे शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी नवे, आधुनिक शैक्षणिक पर्याय उपलब्ध करुन देणे.

९. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी ही शिक्षणसंस्था स्वातंत्र्यपूर्व काळात स्थापन झाली असली तरी समकालीन कालावधीत उपयुक्त, प्रत्यक्ष जीवनाशी सुसंगत, सामाजिक बांधिलकी जागृत करणारे अशा प्रकारचे अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना ग्रहण करण्यासाठी उद्युक्त करणे.

१०. देशाच्या बौद्धिक संपन्नतेमध्ये वाढ करण्यासाठी, उपलब्ध ज्ञान प्रवाही करण्यासाठी पर्यायाने या सर्वांचा उपयोग करुन परंपरेला आधुनिकतेची जोड देऊन देशाला बलशाली, संपन्न, सुजलाम, सुफलाम बनवण्यासाठी प्रयत्न करणे व या प्रयत्नाचा भाग म्हणून उच्च माध्यमिक व उच्च शिक्षणाला अग्रक्रम देणे व सामाजिक, सर्वांगीण विकास साधणे.[२]

उच्च शिक्षण देण्यामागे संस्थेची नेमकी काय उद्देशपत्रिका होती. याची सविस्तर मीमांसा वरील मुद्यांच्या आधारे आपल्याला अधिक स्पष्ट करता येईल. म्हणजेच संस्थेने कोणत्याही आधारावर शैक्षणिक विषमता न करण्याचे धोरण अवलंबिले हाच भारतीय संविधानाचा गाभा आहे, त्यामुळे संस्थेच्या उच्च शिक्षण देणाऱ्या विविध शाखा निर्माण करणाऱ्या धोरणासाठी जो पहिला उद्देश आहे तो भारतीय संविधानाची अंमलबजावणी करणारा घटक आहे. त्यामुळे या शैक्षणिक समानतेच्या आधारावर 'महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी' या संस्थेची यशस्वी घोडदौड होण्याला एक सामाजिक आशयमूल्य प्राप्त झाले असले तरी उच्चवर्णीय समाजातील विद्यार्थ्यांच्या तुलनेत मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे प्रमाण कमीच दिसते.

'महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी'ही संस्था स्वातंत्र्यपूर्व कालखंडात स्थापन झालेली संस्था असली तरी कालपरत्वे या संस्थेने आपल्यामध्ये अनेक बदल सामावून घेतलेले आहेत. ऐतिहासिक

संदर्भाशी असणारे आपले नाते जपता जपता या शैक्षणिक संस्थेने व्यावसायिक, विविध पदवी, पदवीका यांचे शिक्षण अभ्यासक्रम सुरु करून आपण खऱ्या अर्थाने आधुनिक असल्याचे स्पष्टपणे सिद्ध केले. विशेष म्हणजे महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी आपल्या शैक्षणिक दर्जामध्ये कोणत्याही प्रकारे तडजोड करण्याची भूमिका स्वीकारत नाही. पूर्व प्राथमिक, माध्यमिक, प्राथमिक शाळांमधून उच्च पराकोटीचे दर्जेदार सकस शिक्षण दिल्यानंतर जी एक विश्वासार्हता संस्थेला प्राप्त झाली होती, ती त्यांनी कायम ठेवली.त्यामुळेच देशाला बलशाली करणे, सक्षम पिढी निर्माण करणे, बौद्धिक संपन्नतेच्या वाढीसाठी प्रयत्नशील असणे व या सर्वांसाठी उच्च शिक्षण देणाऱ्या महाविद्यालये व शैक्षणिक संकुलाची निर्मिती करणे हे उद्देश संस्थेने समोर ठेवलेले आहेत, म्हणून तो उद्देश केवळ महत्त्वपूर्ण नाही तर विद्यार्थ्यांच्या व पर्यायाने देशाच्या शैक्षणिक विकासाची हमी देणारा आहे.

## ५.२ उच्च शिक्षण व समाज :

भारत देश १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वतंत्र झाला. स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु झाले. आंतरराष्ट्रीय प्रश्नांची जाण असणाऱ्या जगातील मोजक्या नेत्यांमध्ये त्याकाळात जवाहरलाल नेहरुंची गणना होत असे. नेहरुंची शैक्षणिक मते देखील उच्च दर्जाची होती. महात्मा गांधीजींनी सुचवलेला वर्धा प्रस्ताव व त्यासोबत स्वत:ची अशी एक सर्वस्पर्शी शैक्षणिक धारणा यामुळे पहिल्या पंचवार्षिक योजनांपासूनच नेहरुंनी उच्च शिक्षणाचे स्वरुप ठरवण्याचा प्रयत्न केला. 'विश्वविद्यालय अनुदान आयोगाची सन १९५६ ला स्थापना झाली.[३] यामुळे उच्चशिक्षणाला समाजाशी जोडण्याच्या प्रक्रियेला गती प्राप्त झाली. उच्च शिक्षण हा एकूण शिक्षण पद्धतीचा आत्मा असतो. समाजातील अनेक घटकांना उच्च शिक्षण जसे प्रभावित करते, तसेच उच्च शिक्षणावर समाजाचे प्रतिबिंब उमटत असते. त्यामुळे या दोन्ही घटकांमध्ये समन्वय असणे, या दोन्ही घटकांमध्ये सुसंवाद स्थापित होणे हे देशाच्या हिताचेच असते.

समाजाला बौध्दिक कुशलता पुरवण्याचे कार्य हे उच्च शिक्षणाचे असते. तसेच समाजातील छोट्या छोट्या बदलांची नोंद घेवून त्याप्रमाणे आव्हानांना सामोरे जाणे हे देखील उच्च शिक्षणाला आत्मसात करावे लागते. म्हणजेच देशाच्या उज्ज्वल भवितव्याच्या दृष्टिकोनातून उच्च शिक्षण हा महत्त्वाचा घटक ठरतो त्याचप्रमाणे समाज हा घटक देखील तितकाच महत्वपूर्ण असतो हे ध्यानात घेतले पाहीजे. लौकिकप्राप्त महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने देखील उच्चशिक्षणाबाबत नेहमीच समाज

केंद्रबिंदू मानल्याचे आपल्याला दिसते. संस्थेच्या माजी विद्यार्थ्यांनी २००५ मध्ये जे संमेलन आयोजित केले होते त्यामध्ये या घटकावर प्रकाश टाकणारे महत्त्व स्पष्ट झाले होते. या संमेलनात बोलताना संस्थेच्या महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी डॉ. अविनाश कवठेकर म्हणाले होते की, 'महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी ही महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशातील अग्रगण्य शैक्षणिक संस्था आहे आणि हा देशपातळीवरचा बहुमान प्राप्त होण्यासाठी समाजाचा वाटा मोठा आहे. आपण याची जाणीव ठेवून, माजी विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकी अधिक मोठ्या प्रमाणात जोपासली पाहिजे.'[४] यावरुन असे म्हणता येईल की, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या महाविद्यालयात शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांवर देखील संस्थेचे विचारसंस्कार झालेले आहेत.

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने उच्च शिक्षण अधिक लोकाभिमुख, लोकोपयोगी व समाजशिल अशा प्रकारचे बनवलेले आहे. त्यामुळे संस्थेच्या दृष्टिकोनातून समाज व उच्च शिक्षण हा भावनिक ऋणानुबंध अधिक दृढ झालेला पहायला मिळतो. शिक्षण हा व्यवसाय नसून ती समाजाची गरज आहे व महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून दिले जाणारे उच्च शिक्षण हे सामाजिक बाधिलकीचा अविष्कार आहे.

## ५.३ कमवा आणि शिका योजना - स्वावलंबी शिक्षणाचा परिपाठ :

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या वतीने उच्च माध्यमिक, उच्च शिक्षण देणाऱ्या पदवी, पदविका, पदव्युत्तर पदवी व व्यावसायिक महाविद्यालयात अनेक प्रकारची कौटुंबिक पार्श्वभूमी असणारे विद्यार्थी असतात. यामध्ये आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थी देखील असतात. गुणवत्ता आहे, शिक्षण घेण्याची जिद्द आहे परंतु केवळ आर्थिक कारणामुळे कोणी विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये ही 'महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी' संस्थेची सुरवातीपासूनची धारणा आहे. पुणे शहराचा विचार करता या शहरामध्ये महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या वतीने उच्च माध्यमिक व उच्च शिक्षण देणाऱ्या व व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या अनेक शाखा आहेत. मुळात महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी ही संस्था स्वातंत्र्यपूर्व कालखंडात स्थापन झालेली व विश्वासार्हता प्राप्त केलेली असल्याने या शैक्षणिक संस्थेमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या देखील मोठी आहे. 'विश्वासार्हते'सोबत या शैक्षणिक संस्थेमधून दर्जेदार शिक्षण दिले जात असते व यामुळे अनेक विद्यार्थी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीमध्ये प्रवेश घेण्यासाठी प्राधान्यक्रम देत असतात. यावरुन

असे म्हणता येईल की, बहुसंख्य विद्यार्थी शिक्षण अभ्यासक्रम निवडताना पहिला पसंतीक्रम 'महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी' या संस्थेला देत असतात.[५]

कष्टकरी, कामगार, श्रमकरी, गरीब कुटुंबातील विद्यार्थी देखील या संस्थेमध्ये प्रवेश घेतात. आर्थिक टंचाई अभावी त्यांच्या अभ्यासावर परिणाम होत असतो. शैक्षणिक शुल्कासह इतर शैक्षणिक साहित्य घेण्यासही हे विद्यार्थी सक्षम नसतात. त्यामुळेच महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार व पुणे विद्यापीठाच्या सल्ल्यानुसार महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना काही काम दिले जाते व त्याचा योग्य मोबदला देखील दिला जातो. या योजनेला 'कमवा आणि शिका योजना' या नावाने ओळखले जाते. खरेतर ही योजना गरीब व होतकरु विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवतत्तेला चालना देण्याचे कार्य करत असते. म्हणूनच तर विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य करण्यासोबत एक सामाजिक बांधिलकी जपणारी योजना म्हणून याचा उल्लेख करावा लागेल.

'कमवा आणि शिका योजना' सुरु करुन खऱ्या अर्थाने संस्थेने विद्यार्थ्यांमध्ये श्रमाबद्दलची प्रतिष्ठा निर्माण केली आहे. आणि त्याचा अप्रत्यक्ष फायदा विद्यार्थ्यांना भावी आयुष्यामध्ये होतच असतो. गरीब गरजू विद्यार्थ्यांना देखील या योजनेचे महत्त्व अधिक मोठ्या प्रमाणात वाटत असते. त्यामुळेच तर या योजनेचा लाभ घेतलेले अनेक विद्यार्थी या योजनेबद्दल आपुलकी बाळगुन असतात. तर गरवारे महाविद्यालयात या योजनेचा लाभ घेऊन आपले शिक्षण पूर्ण केलेले व सध्या पुणे म.न.पा.मध्ये कक्षअधिकारी असलेले संजय आपटे म्हणतात, 'कमवा आणि शिका योजना' म्हणजे गरीब, होतकरु व आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना मदतीचा हात असतो, अशा विद्यार्थ्यांमध्ये श्रमाविषयी आवड निर्माण करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न असतो. माझ्यासारखे अनेक विद्यार्थी केवळ या योजनेमुळे घडलेले आहेत, स्वत:च्या पायावर उभे राहिले आहेत. त्यामुळे या योजनेत सहभागी होवून शिक्षण घेतल्याचा मला अभिमान आहे.[६] ही प्रतिक्रिया प्रातिनिधीक असली तरी अनेकांनी हृदयातील कृतज्ञता व्यक्त करणारी आहे.

एकूणच या योजनेमुळे अनेक विद्यार्थी घडलेले आहेत. केवळ आर्थिक दारिद्र्यामुळे शिक्षण बंद करण्याची वेळ कुणावर आलेली नाही आणि त्यामुळे महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार पुणे विद्यापीठाच्या मार्गदर्शनानुसार महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने 'कमवा आणि शिका योजना' सुरु करुन विद्यार्थ्यांच्या प्रगतीला हातभार लावला आहे. असे म्हणावे लागेल परंतु या योजनेचे महत्त्व

एवढ्यापुरते सिमित नाही तर विद्यार्थ्यांना स्वावलंबी शिक्षण देण्याचा आदर्श परिपाठ महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने घालून दिल्याचे आपल्या निदर्शनास येते.

## ५.४ शिक्षणक्षेत्रातील उच्च शिक्षणाचे महत्त्व :

अन्न, वस्त्र, निवारा या मानवाच्या प्राथमिक गरजा पूर्ण झाल्या की पुढील गरज शिक्षण व आरोग्य या असतात. साधारणत: भारताचा विचार करता पूर्व प्राथमिक व प्राथमिक हा बालकांचा शैक्षणिक पाया आहे असे समजले जाते. त्यानंतरचा टप्पा हा माध्यमिक स्वरुपाचा असून या कालावधीत शैक्षणिक जडणघडण होत असते. म्हणजेच हा कालखंड बौद्धिक क्षमता विकसित होण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांना महत्त्वाचा ठरत असतो. या कालावधीमध्ये विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जाणिवा वाढत जातात, त्यामुळे देखील हा कालखंड शैक्षणिक दृष्ट्या दुर्लक्षून चालणार नाही.

उच्च शिक्षण हे ज्ञानाची सर्वोच्च पातळी असते. प्राप्त केलेल्या ज्ञानाचे अनेक आवश्यक घटकांमध्ये रुपांतर करण्याचा कालावधी असतो. महाराष्ट्रातील ख्यातनाम शिक्षण तज्ज्ञ डॉ. जे. पी. नाईक यांनी उच्च शिक्षणाला ज्ञानाचे सर्वोच्च शिखर व जीवन अंकुर ही संज्ञा दिलेली आहे.[७] म्हणजे यावरुन असे म्हणता येईल की, उच्च शिक्षण घेतल्यानंतर भारतात थेट नागरिकत्वाची जबाबदारी शिरावर पडत असते. त्यामुळे साहजीकच भारताचा नागरिक म्हणून सक्षमपणे जबाबदाऱ्या पेलण्यासाठी उच्च शिक्षणामधून चांगला पुरवठा होणे देखील आवश्यक आहे. या चांगल्या पुरवठ्याच्या आधारेच विद्यार्थी पुढील आयुष्यात आपापल्या वेगवेगळ्या क्षेत्रात कर्तृत्वाची मोहोर उमटवण्यासाठी सिद्ध होत असतात. हीच या उच्च शिक्षणापाठीमागची महत्त्वाची भूमिका आहे.

एक श्रेष्ठतम दर्जाची बुद्धिमत्ता निर्माण व्हावी, प्राप्त ज्ञानाचा, बुद्धिचा वापर विद्यार्थ्यांच्या व समाजाच्या व्यावहारिक जीवनामध्ये व्हावा असा एक उद्देश ठेवून उच्च शिक्षणाच्या अभ्यासक्रमाची निर्मिती करण्यात येत असते. म्हणजेच व्यावहारिक शिक्षण साक्षरता निर्माण करण्याच्या दृष्टिकोनातून उच्च शिक्षण हे अतिशय महत्त्वाचे आणि तेवढेच प्रभावी माध्यम आहे आणि या माध्यमाचा वापर करुनच देशाची बौद्धिक संपन्नता वाढवणे, नागरिकांच्या क्रयशक्तीमध्ये वाढ करणे व मानवी जीवन सुखकारक करणे शक्य होत असते त्यामुळे एकूण शिक्षणातील उच्च शिक्षण हा घटक महत्त्वाचा ठरत असतो. जगभरात शैक्षणिक क्षेत्रामध्ये आता नवे प्रवाह व प्रघात प्राप्त करुन शिक्षणक्रम राबवले जात आहेत. माजी कुलगुरू असणाऱ्या राम ताकवले यांनी एके ठिकाणी म्हटले

होते 'ज्या शैक्षणिक संस्था जागतिक प्रवाहांना आपल्या अभ्यासक्रमात स्थान देतील त्या संस्था येणाऱ्या काळात अधिमान्यता पावतील.'[८] या विधानाचा रोख पाहता आपल्या ध्यानात येईल की केवळ पारंपारिक शिक्षणावर अवलंबून न राहता आधुनिक व नावीन्याचा पुरस्कार करणारे शिक्षण हे किती महत्त्वाचे असू शकते.

आधुनिक व नावीन्याचा पुरस्कार करणाऱ्या भूमिकेतून महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने उच्च शिक्षणाकडे पाहिल्याचे ध्यानात येते, त्यामुळे स्वातंत्र्योत्तर कालखंडात उच्च माध्यमिक व उच्च शिक्षण देणाऱ्या महाविद्यालयांची निर्मिती करुन महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने एक जबाबदार शिक्षण क्षेत्रात एक जबाबदार पाउल उचलले आहे असे म्हणता येईल. म्हणजे शिक्षणाचे वेगवेगळे अभ्यासक्रम व अनेक महाविद्यालये हा संस्थेच्या मूल्यमापनाचा संख्याघटक नाही तर शिक्षणक्षेत्रातील उच्च शिक्षणाचे महत्त्व अचूक ओळखून त्याप्रमाणे मार्गक्रमण करणारी सदर संस्था आहे असे मानावे लागेल.

## ५.५ म.ए.सो. चे धोरण सर्वांगीण विकासाचे सूत्र उच्च शिक्षण :

'महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी' ही महाराष्ट्रातील एक नामांकित शिक्षण संस्था म्हणून ओळखली जाते. सर्व वयोगटांसाठी शिक्षण या संस्थेच्या माध्यमातून वेगवेगळ्या ठिकाणाहून दिले जाते. अगदी पूर्व प्राथमिक पासून ते पदव्युत्तर पातळीपर्यंत शिक्षण महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी देत आहे. शहरामध्ये तसेच ग्रामीण भागात देखील संस्थेची अनेक शैक्षणिक संकुले आहेत. प्राथमिक शिक्षण हे विद्यार्थ्यांना शिक्षणाचे वळण त्यात असते. विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणविषयक आवड निर्माण करत असते. त्यामुळे एकूण शिक्षणपद्धतीमध्ये या शिक्षणाला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण हे काही स्वरूपात निराळ्या स्वरुपाने असते. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी देखील आजपर्यंत याकार्याकडे व्यापक दृष्टिकोनातून पाहिलेले आहे.

उच्च माध्यमिक दर्जापासून ते महाविद्यालयीन पातळीवर दिले जाणारे पदवी किंवा पदव्युत्तर शिक्षण विद्यार्थ्यांची आवड जोपासणारे व त्याबरोबरच विषयाची निवड ठरवणारे असते. या पातळीवरचे शिक्षण हे विशेष दर्जाचे असते. या शिक्षणाचा परिणाम विद्यार्थ्यांसह समाजावर पडत असतो. म्हणजेच काय तर उच्च शिक्षणात अनेक ज्ञानशाखांचे पर्याय उपलब्ध झालेले असतात. या उपलब्ध पर्यायामधून विद्यार्थी आपली आवड, त्या ज्ञानशाखेतील उपलब्ध विविध संधी यांचा विचार करुन

अभ्यासक्रम व ज्ञानशाखा निवडत असतात. एकूणच हा कालावधी विद्यार्थ्यांच्या पालकाच्या दृष्टीने योग्य निर्णय घेण्याचा महत्त्वाचा कालखंड असतो. या काळात महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या वतीने याबाबत मार्गदर्शन केले जाते. विद्यार्थ्यांचा कल, उपलब्ध संधी याचा विचार करुन हे मार्गदर्शन केले जाते. यामुळेच विद्यार्थी व महाराष्ट्र एज्युकेशन सासायटी यांच्यामध्ये एकप्रकारचे भावनिक नाते निर्माण झालेले आहे. असे निदर्शनास येते.

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने आजपर्यंत उच्च शिक्षणाबाबतची आपली भूमिका व्यापक ठेवलेली आहे आणि या व्यापकतेमधूनच संस्थेने उच्च शिक्षणाला विकासाचे सर्वांगीण सूत्र म्हणून जाहीर केले आहे. उच्च शिक्षण हे विकास साधण्याचा महत्त्वाचा घटक आहे ही नियमितपणे महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीची धारणा संस्थेने जोपासली आहे. म्हणूनच विद्यार्थ्यांच्या करिअरसाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन, जागतिकीकरण, आधुनिकीकरण इत्यादींना सामावून घेणारे विविध अभ्यासक्रम संस्थेने आपल्या शैक्षणिक संकुलामधून देण्यास सुरवात केली आहे. विद्यार्थी आत्मनिर्भर व्हावे, स्वावलंबी व्हावे भावी आयुष्यात त्यांना विविध स्पर्धांचा सामना करावा लागला तरी त्याला सामोरे जाण्याची भूमिका त्यांच्यामध्ये निर्माण व्हावी, यासाठी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने उच्च शिक्षण हे विकासाचे सूत्र मानून आतापर्यंत वाटचाल केलेली आहे. शैक्षणिकदृष्ट्या ही महत्त्वाची भूमिका समजली पाहिजे. उच्च शिक्षणामधून विकास साधता येतो यावर महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचा विश्वास आहे. उच्च शिक्षण हे माणसाला घडवण्याची स्थैर्य प्राप्त करुन देण्याची प्रक्रिया असते. उच्च शिक्षण म्हणजे स्वयंविकासासह समाजविकास करण्याचे माध्यम असते अशी भूमिका ठेवून आजपर्यंत महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने आपली धोरणे राबवलेली आहेत.

### ५.६ शैक्षणिक समतोल व महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी :

कोणत्याही घटनेचा समतोल असणे फार महत्वाचे असते. शैक्षणिक क्षेत्रामध्ये देखील समतोल अतिशय महत्त्वाचा समजला जातो. तसेच बौद्धिक व ज्ञानाच्या क्षेत्रात शैक्षणिक असमतोल या समाजामध्ये अनेक प्रश्न निर्माण करत असतो. या शैक्षणिक परिणांमाची दाहकता लक्षात घेऊन महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी या शैक्षणिक संस्थेने नियमीतपणे शैक्षणिक समतोल ठेवलेला आहे असे निदर्शनास येते. कला, वाणिज्य व विज्ञान या तीनही ज्ञानशाखांचा समतोल राखण्यात महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी यशस्वी झाली आहे असे निदर्शनास येते. उच्च माध्यमिक विभागात कला,

वाणिज्य व विज्ञान या शाखा मिळून तीनही ज्ञानशाखांमध्ये महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार अमंलबजावणी केलेली दिसते. तसेच उच्च महाविद्यालयात याच प्रकारे स्थिती पाहवयास मिळते. यासोबतच व्यावसायिक महाविद्यालयांची स्थापना करुन संस्थेने समाजाच्या अचूक गरजा ओळखून तिथेही समतोल ठेवल्याचे दिसते.

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने शैक्षणिक समतोल राखला जावा म्हणून संस्थात्मक पातळीवर प्रयत्न करुन असा शैक्षणिक समतोल राखला आहे. हे पुणे शहरात स्थापन केलल्या खालील महाविद्यालयाद्वारे ध्यानात येते.

१) आबासाहेब गरवारे महाविद्यालय, पुणे.

२) गरवारे वाणिज्य महाविद्यालय, पुणे.

३) महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे भावे उच्च माध्यमिक कॉमर्स, सायन्स विद्यालय, पुणे.

४) महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे वाघीरे ज्युनिअर कॉलेज, सासवड.

५) महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीची उच्च माध्यमिक मुलींची सैनिकी शाळा, कासार आंबोली.

६) महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे कै. गजाननराव भिवराव देशपांडे उच्च माध्यमिक विद्यालय, बारामती.

७) इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट अॅन्ड करीअर कोर्सेस, पुणे.

८) रेणुका स्वरुप इन्स्टिटयूट ऑफ करिअर कोर्सेस, पुणे.

९) महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे कॉलेज ऑफ नर्सिंग, लोटे घाणेखुंट, चिपळूण.

१०) स्कूल ऑफ पॅरामेडिकल सायन्स, लोटे घाणेखुंट, चिपळूण.

११) महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे कम्युनिटी महाविद्यालय, पुणे.

अशाप्रकारे वेगवेगळया क्षेत्रातील ज्ञानशाखांमधील शिक्षण देणाऱ्या या शैक्षणिक संकुलाची निर्मिती करुन संस्थेअंतर्गत शैक्षणिक समतोल राखण्यात महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी यशस्वी झालेली आहे. शैक्षणिक समतोलामुळे समाजातील बौद्धिक क्षेत्रामध्ये निकोप व निरामय

वातावरणाची निर्मिती करण्यात महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने लावलेला हातभार महत्त्वपूर्ण आहे. या हातभारामुळे व्यापक सहभागामुळे निश्चितपणे महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने आपण आपल्यावरील जबाबदारीचे भान ठेवून त्याप्रमाणे यशस्वीपणाने जबाबदारी स्वीकारल्याचे आपणास लक्षात येते. हेच संस्थेचे महत्त्वाचे यश आहे.

## ५.७ म.ए.सो. भावे उच्च माध्यमिक विद्यालय, पुणे (इ.स. १८९६) :

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या उच्च माध्यमिक विद्यालयाचा समावेशात भावे उच्च माध्यमिक विभागातील महत्त्वाचे विद्यालय म्हणून केला जातो. शाळेची गुणवत्ता वाढावी यासाठी सातत्याने सर्व स्तरांवर प्रयत्न केले जातात. संस्थेची ही सर्वात जुनी आणि महत्त्वाची शाखा आहे. भावे विद्यालयात १९७५ सालापासून वाणिज्य आणि विज्ञान या उच्च माध्यमिक विद्यालयाची शाखा सुरू झाली. येथील शाखेचा निकाल वर्षानुवर्ष वाढत आहे. या शैक्षणिक विकासाबरोबरच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी विविध उपक्रम येथे राबविले जातात.[९] वर्षभरात विद्यार्थ्यांसाठी विविध परीक्षा घेतल्या जातात. वक्तृत्व, क्रीडा, संगीत, संगणक अशा विविध क्षेत्रात स्पर्धा घेतल्या जातात व विद्यार्थ्यांच्या कामगिरीला संधी व प्रोत्साहन दिले जाते. उच्च माध्यमिक विद्यालयात विविध उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले जाते. अध्यापक प्रबोधिनी कडून हा उपक्रम राबविला जातो. शिक्षकांना प्रेरणा आणि मार्गदर्शन मिळण्यासाठी विविध विषयांवर व्याख्याने आयोजिली जातात. कृतीसंशोधन या विषयावर या विभागाच्या वतीने कार्यशाळा घेण्यात आली होती. त्यामुळे शिक्षकांचे प्रबोधन झाले. त्यांना ज्ञान व अधिकची माहिती मिळाली तर विद्यार्थ्यांना त्यांचा फायदा होऊ शकतो. यादृष्टीने हा उपक्रम महत्त्वाचा आहे. या विद्यालयातील विद्यार्थ्यांना याचा फायदा झालेला आहे. हे या उपक्रमाचे यश आहे. पालक सभेचा उपक्रमही असाच वैशिष्ट्यपूर्ण आहे. पालक, शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यात सुसंवाद साधला जावा म्हणून त्यांच्या अडचणी, शंका यांचे निरसन करुन शाळेच्या विविध योजना पालकांपर्यंत पोहचविणे व शाळा आणि पालक यांच्यात स्नेह निर्माण व्हावा यासाठी पालकसभांचे आयोजन केले जाते याचा परिणाम विद्यार्थ्यांच्यावर निश्चितच होतो. या विद्यालयात रात्र अभ्यासिकेचा उपक्रमही असाच वैशिष्टपूर्ण आहे. ज्या मुलांना घरी अभ्यास करणे गैरसोयीचे असते, जागा अपुरी असते अशा मुलांसाठी हा उपक्रम राबविला जातो. या अभ्यासिकेत संध्याकाळी ६ ते रात्री ९ या वेळेत मुले अभ्यास करु शकतात.[१०]

सरस्वती शालेय वस्तू भांडार या उपक्रमांतर्गत बाजारभावापेक्षा कमी दरात विद्यार्थ्यांना शालोपयोगी वस्तू मिळाव्यात व स्वदेशी वस्तू वापरण्याची सवय व्हावी या उद्देशाने हे भांडार चालू करण्यात आले आहे. या भांडाराला पालक व विद्यार्थी यांच्याकडून उत्तम प्रतिसाद मिळत आहे. उच्चमाध्यमिक विद्यालयातील सुसज्ज प्रयोगशाळा हे महत्त्वाचे वैशिष्टय आहे. अद्ययावत प्रयोगशाळांचा विद्यार्थ्यांना चांगला फायदा होतो. विज्ञानप्रदर्शनांच्या आयोजनातूनही विद्यार्थ्यांच्या प्रतिभेला व कल्पनाशक्तीला वाव दिला जातो. या विद्यालयाचे ग्रंथालय हे विविध विषयावरील ग्रंथ व नियतकालिकांनी समृद्ध आहे. त्याचा वापर विद्यार्थी व शिक्षक नियमितपणे करतात. विद्यार्थ्यांसाठी गृहवाचन योजना, पुस्तकपेटी योजना आहे. तसेच मधल्या सुटीतही मुलांना जुनी हस्तलिखिते ग्रंथालयात बसून वाचण्यासाठी दिली जातात. विद्यार्थ्यांच्या सामान्यज्ञानात भर पडावी म्हणून विविध विषयांवरील माहिती व कात्रणे काचफलकात लावली जातात.

विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना वाव देऊन त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात त्यांना स्वच्छंदपणे विहार करण्यास प्रोत्साहन देण्याची भूमिका नेहमीच भावे उच्च माध्यमिक विद्यालयाने घेतलेली आहे पाठ्यपुस्तकाव्यतिरिक्त इतर अनेक बाबींचे ज्ञान देऊन एक संस्कारक्षम पिढी घडवण्यासाठी विद्यालय कटिबद्ध असल्याचे वारंवार सिद्ध झाले आहे.

खेळाच्या, वक्तृत्वाच्या, निबंधाच्या व इतर शालेय स्पर्धा आयोजित करून विद्यार्थ्यांची स्पर्धात्मक तयारी हे विद्यालय करुन घेत असल्याने विद्यार्थ्यांची योग्य प्रकारे स्पर्धेला सामोरी जाण्याची मानसिकता होत असते व यामागे विद्यालयाचा हाच उद्देश आहे हे आपण समजून घेतले पाहिजेत.

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी संस्था ही आपल्या कार्यकर्तृत्वाने नावारुपास आलेली संस्था आहे. त्याचा अप्रत्यक्ष फायदा भावे उच्च माध्यमिक विद्यालयाला झालेला आहे. परंतु भावे उच्च माध्यमिक विद्यालयाने शिक्षणक्षेत्रातील आपले वेगळेपण सिद्ध करुन पुण्यातील पालक विद्यार्थ्यांमध्ये आपली वैशिष्ट्यपूर्ण छाप उमटवली आहे. या विद्यालयाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थ्यांमध्ये मूल्यशिक्षणाविषयी निर्माण केलेली आवड होय. पाठ्यपुस्तकाव्यतिरिक्तच्या शिक्षणात मूल्यशिक्षण हा आता शिक्षणव्यवस्थेतील महत्त्वाचा घटक ठरत आहे. बदललेल्या जीवनशैलीमुळे मूल्यांचा ऱ्हास होतो आहे. व अशा कालावधीत भावे उच्च माध्यमिक विद्यालयात शिक्षणात मूल्यशिक्षणाचा जाणीवपूर्वक केला जाणारा अंतर्भाव हा महत्त्वाचा ठरत आहे.त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये

एक संस्काराचा शिरकाव होताना दिसतो आहे. या संस्काराच्या बळावरच हे विद्यार्थी भावी आयुष्यात आपली यशस्वी वाटचाल करणार असतात, त्यामुळे त्यांना दिले जाणारे हे मूल्यशिक्षण हे महत्त्वाचे ठरत आहे.

एकूणच विविध उपक्रम, शैक्षणिक गुणवत्ता, दर्जेदार शिक्षण, पालक-विद्यार्थी-शिक्षक यांचा योग्य समन्वय या सर्वांमुळे विद्यालय स्थापनेपासूनच लोकप्रियतेच्या शिखरावर पोहचलेले आहे व या सर्वांमध्ये विद्यार्थी, शिक्षक, पालक, शिक्षकेतर कर्मचारी व संस्था यांचे योगदान महत्त्वाचे आहे[११] असे मत विद्यालयाचे पदाधिकारी व्यक्त करतात ते रास्त असल्याचे स्पष्ट होते.

## ५.८ म.ए.सो. आबासाहेब गरवारे महाविद्यालय, पुणे (इ.स. १९४५) :

पुणे परिसरातील कला व शास्त्र शाखेचे उच्च शिक्षण देणारे एक नामवंत महाविद्यालय म्हणून आबासाहेब गरवारे महाविद्यालयाकडे पाहिले जाते. केवळ पुणे परिसरातील नव्हे तर महाराष्ट्रातील हे ख्यातनाम असे महाविद्यालय आहे. 'महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी' ही शिक्षण संस्था संपर्ण महाराष्ट्रातील अग्रगण्य शिक्षण संस्था आहे. सन १८७४ पासून आजतागायत या संस्थेचे काम प्रभावशाली राहिले आहे.

प्रारंभीच्या काळात खूप अडीअडचणींना तोंड देत संस्थेची वाटचाल सुरु होती. संस्थेच्या उभारणीत व विकासात ज्यांचा मोलाचा वाटा आहे त्या वामनराव भावे यांची महाविद्यालय सुरु करण्याची तीव्र इच्छा होती. अडचणी तर खूप होत्या परंतु या अडचणींवर मात करत कायमची सरकारमान्यता मिळाली, युनिव्हर्सिटी परीक्षेत यश मिळाले. सन १८९४ मध्ये व्ही. बी. गोखले हे बी. ए पूर्ण करुन शाळेत आले त्यामुळे शाळेला कॉलेजचे वर्ग जोडून शाळेचा विस्तार करावा असे वाटू लागले. शाळेच्या विद्यार्थ्यांची संख्या ६०० ते ७०० पर्यंत गेली होती.

दिनांक १८ ऑगस्ट १८९५ रोजी युनिव्हर्सिटीकडे परवानगीचा अर्ज दाखल केला गेला. १८९६ साली जानेवारी महिन्यात 'महाराष्ट्र कॉलेज' या नावाने कॉलेजचा पहिला वर्ग सुरु झाला.[१२] या वर्गासाठी तीन वर्षांची मान्यता मिळाली. दुसरे असे की १८९६ साली सुरु झालेल्या गणेशोत्सवात प्रो. शि. म. परांजपे, अच्युतराव साठे यांनी लोकजागृती केली. याविषयीच्या तक्रारी सरकारपर्यंत पोहचल्या. स्टाफ किंवा व्यवस्थापनातील लोकांनी राजकारण करु नये असा तगादा सरकारकडून लावण्यात आला. तशा स्वरुपाची तरतूद असणारी नवीन घटना स्वीकारण्यात आली.

शाळेची मान्यता काढून घेण्याच्या धमक्याही भावेंना देण्यात आल्या सन १८९८ मध्ये युनिव्हर्सिटीची मान्यता संपली. सन १८९८ मध्ये कॉलेजचे वर्ग बंद करतो परंतु शाळेला कोणत्याही प्रकारचा धक्का लागू नये अशी इच्छा वामनराव भावे यांनी व्यक्त केली. तीन वर्षे मोठ्या उभारीने केलेला प्रयत्न १८९८ अखेर बंद करावा लागला. 'महाराष्ट्र कॉलेज' या नावाने सुरु करण्यात आलेला हा प्रयत्न अल्पावधीतच थांबविणे संस्थेला भाग पडले होते. परंतु पुढे १८९६ या वर्षी जानेवारीत महाराष्ट्र कॉलेजची सुरुवात कसबा पेठेत झाली. या परिसरात नानाच्या हौदाजवळ देशमुख यांच्या वाड्यात हे कॉलेज सुरु करण्यात आले. १८९६ ते १८९८ या काळात हे कॉलेज सुरु होते. १८९८ साली महाराष्ट्र कॉलेजचे काम थांबविण्यात आले. प्रारंभी व्ही. बी. गोखले प्रिन्सिपॉल म्हणून कार्यरत होते. शिवाय ते गणित व संस्कृतचे प्रोफेसर होते. विनायक रामचंद्र जालनापूरकर हे गणित तर नरेश आप्पाजी द्रविड हे इंग्रजी म्हणून जबाबदारी पार पाडत होते. कृष्णाजी हरी केळकर हे इतिहास व इंद्रस्वरुप मुनशी हे पर्शियन भाषेचे प्रोफेसर होते. वामनराव प्रभाकर भावे हे लॅटिन व इतिहास हे विषय शिकवित असत.

महाराष्ट्र कॉलेज सुरु झाले तेव्हा पुण्यात डेक्कन कॉलेज व फर्ग्युसन कॉलेज ही दोन कॉलेज होती. या दोन कॉलेजचा विचार करता ही दोन्ही कॉलेज पुण्यातील महत्त्वाची मानली जातात. परंतु तरीसुद्धा महाराष्ट्र कॉलेजमध्ये त्यावेळी ५३ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. आणि त्यातील ३९ विद्यार्थ्यांना परीक्षेस पाठविण्यास आले होते. त्यापैकी सुमारे ३१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले होते. महाराष्ट्र कॉलेजने अल्पावधीतच आपल्या कार्याचा ठसा उमटविला त्यामुळे पुणे परिसरात या कॉलेजची चर्चा होऊ लागली. विद्यार्थ्यांचा ओढा या कॉलेजकडे वाढला शिवाय परीक्षांचा निकालही चांगला लागला होता. या निकालाचा सकारात्मक परिणाम असा झाला की, १८९७ साली प्रिव्हीयसच्या वर्गात १०४ विद्यार्थी आले.

सन १८९६ साली पुण्यात प्लेगची साथ आली. ही साथ पुण्यात मोठ्या प्रमाणावर पसरली. पहिल्या वर्षी त्याचा फारसा परिणाम झाला नाही. परंतु या साथीचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात झाला आणि त्याचा परिणाम मुलांच्या अभ्यासावर होऊ लागला. १८९८ साली फक्त ३० विद्यार्थ्यांचा प्रवेश झाला त्यापैकी २२ विद्यार्थ्यांना परीक्षेस पाठविण्यात आले. त्यापैकी १३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. प्लेगची साथ वाढली त्याचा परिणाम कॉलेजच्या विद्यार्थ्यांवर होऊ लागला. प्लेगच्या जोराच्या प्रभावामुळे या कॉलेजने परवानगी मागितली नाही. पुढे उच्च शिक्षणाची आवश्यकता लक्षात घेऊन

संस्थेने सन १९४५ साली आबासाहेब गरवारे माहाविद्यालयाची स्थापना केली. सन २०१० यावर्षी महाविद्यालयाला नॅकची 'ए' ग्रेड मिळाली यावरुन या महाविद्यालयाचे महत्त्व लक्षात येते. या महाविद्यालयात एकूण २५ विभाग आहेत.[१२]

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय मान्यता असलेले प्राध्यापक या महाविद्यालयात कार्यरत आहे. त्यातील ५३ प्राध्यापकांनी डॉक्टरेट मिळविली आहे. या महाविद्यालयात वेगवेगळी संशोधन केंद्रे ही चालविली जातात. बायो डायव्हर्सिटी विषयातून पदव्युत्तर शिक्षण देण्याचं देशातील एकमेव केंद्र म्हणून महाविद्यालयाला मान मिळाला आहे. मास्टर्स इन कम्युनिकेशन ॲन्ड जर्नालिझम हा अभ्यासक्रमही शिकविला जातो. त्याचबरोबर यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचं केंद्रही या महाविद्यालयात सर्वात प्रथम महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने सुरु केले आहे. जुलै २०११ मध्ये इंडिया टुडेने महाविद्यालयाला भारतातील ३७ वे तर पुण्यातील दुसरे स्थान दिले २०१२ मध्ये पुणे विद्यापीठातील शहरी भागातील सर्वोत्कृष्ट महाविद्यालयाचा पुरस्कार व दीड लाख रुपयांचे अनुदान महाविद्यालयाला प्राप्त झाले. यातून या महाविद्यालयाचे वेगळेपण व महत्त्व समजून येते.

प्रथम भांडारकर रस्त्यावरील प्राथमिक शाळेत या महाविद्यालयाचे वर्ग भरु लागले. १९५५ नंतर कर्वेरोडवरील डेक्कन परिसरातील इमारतीमध्ये वर्ग भरु लागले. सन १९७२ मध्ये गरवारे नॉयलॉन्सचे संस्थापक पद्मभूषण आबासाहेब गरवारे यांनी महाविद्यालयास मोठे आर्थिक सहाय्य केले. त्या कृतज्ञेतून महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी कॉलेजचे नामकरण आबासाहेब गरवारे असे करण्यात आले. महाविद्यालयात पदवीपर्यंतच्या शिक्षणाबरोबरच सेंद्रिय रसायनशास्त्र, पदार्थविज्ञान, पृथक रसायनशास्त्र या विषयातील एम. एस्सी. तसेच हिंदी, अर्थशास्त्र, इतिहास या विषयातील एम. ए. पर्यंतचे पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु आहेत. आबासाहेब गरवारे कॉलेज हे संपूर्ण महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कॉलेज आहे. शास्त्र शाखेच्या अभ्यासक्रमाव्यतिरिक्त संगणकशास्त्राचे बी. सी. एस., एम. सी. एस. पर्यंतचे शिक्षण दिले जाते. या अभ्यासक्रमांसाठी आवश्यक असणारी एक उत्तम अशी संगणक प्रयोगशाळा महाविद्यालयाने विकसित केली आहे.

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या आबासाहेब गरवारे महाविद्यालयाच्या सल्लागार समितीचे अध्यक्ष श्री. र. य. वंजारवाडकर आहेत. आबासाहेब गरवारे महाविद्यालयाची विद्यार्थी संख्या पुढीलप्रमाणे आहे.[१३]

| वर्षे | ज्युनिअर | सिनिअर | विनाअनुदानित | एकूण |
|---|---|---|---|---|
| २०१० | २०८५ | १९७० | १२८१ | ५३३६ |

महाविद्यालयाची विद्यार्थी संख्या पाच हजारापेक्षा जास्त असून कला, विज्ञान या विभागासह कनिष्ठ महाविद्यालय व पदव्युत्तर महाविद्यालय या विभागातही विद्यार्थी मोठ्या प्रमाणात आहेत.

'महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी'च्या आबासाहेब गरवारे कॉलेजच्या अनेक प्राध्यापकांनी आपापल्या विषयात संशोधन केले आहे. काही प्राध्यापकांनी संशोधनात महत्त्वाची कामगिरी केली आहे. संशोधन करणारे हे प्राध्यापक महाविद्यालयाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चर्चासत्रांतून प्राध्यापकांनी विविध विषयावर संशोधनपर शोधनिबंधाचे सादरीकरण केले आहे. एक महत्त्वाची नोंद म्हणजे महाविद्यालयाच्या गणित विभागाचे प्रमुख प्रा. खैरनार यांना सन २००५ साली यंग सायंटिस्टचे ॲवार्ड मिळाले ही महत्त्वाची बाब आहे.

महाविद्यालयात विविध विषयांच्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील चर्चासत्र व परिषदांचे आयोजन करण्यात येते. विद्यार्थीही अशा चर्चासत्र व परिषदांतून सहभागी होतात. सध्या महाविद्यालयात पंचवीस विभाग कार्यरत आहेत. अर्थशास्त्र, इंग्रजी, इतिहास, हिंदी, ग्रंथालय, ग्रंथालय आणि माहितीशास्त्र, राज्यशास्त्र, मानसशास्त्र, समाजशास्त्र, बायोडायव्हर्सिटी, बायोटेक्नॉलॉजी, बॉटनी, रसायनशास्त्र, कॉम्प्युटर सायन्स असोसिएशन, इलेक्ट्रॉनिक सायन्स, भूगोल, गणित, मायक्रोबायॉलॉजी, भौतिकशास्त्र, संख्याशास्त्र, प्राणीशास्त्र, मास कम्युनिकेशन अँड जर्नालिझम, मराठी असे विविध विभाग महाविद्यालयात कार्यरत आहे. प्रत्येक विभागामार्फत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी सातत्याने प्रयत्न केले जातात.

अर्थशास्त्र विभागामार्फत आर्थिक प्रश्नांच्या संदर्भात विविध व्याख्यानाचे आयोजन केले जाते. त्याचबरोबर एकदिवसीय अर्थशास्त्र परिषद, निबंध स्पर्धा, चर्चासत्र हे उपक्रम उल्लेखनीय ठरले आहेत. शिक्षणशास्त्र विभागाच्यावतीने विविध व्याख्याने, चर्चासत्रे यांचे आयोजन करण्यात येते. इंग्रजी विभागामार्फत Poetry, Script, विषयी व्याख्याने व कार्यशाळांचे आयोजन करण्यात येते. इंग्रजी विभागाला पुणे विद्यापीठाकडून 'एम. ए. इंग्लिश' या अभ्यासक्रमासाठी अनुमती मिळाली आहे.

इतिहास विभागही चर्चासत्र, व्याख्याने, परिषदा व विविध उपक्रमांच्या आयोजनात अग्रेसर असतो. Dr.B. R. Ambedkar's Ideology and socio-Political Movements in Asia या विषयावर आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेचे उद्‌घाटन माजी खास. ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्या हस्ते व ज्येष्ठ विचारवंत आनंद तेलतुंबडे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले होते. हिंदी विभागही विविध कार्यक्रमांचे आयोजन करीत असतो. राष्ट्रभाषा व भाषिक कौशल्ये या संदर्भाने विद्यार्थ्यांना विविध माहिती देण्याचा प्रयत्न विभाग करीत असतो.

ग्रंथालय विभाग हा महाविद्यालयाच्या प्रगतीतील महत्त्वाचा टप्पा आहे. १२६९ नवीन ग्रंथांची खरेदी करण्यात आली असून ग्रंथालयात १४७ नियतकालिके घेतली जातात. विद्यार्थी व प्राध्यापकांना या विभागाच्यावतीने जास्तीत जास्त सुविधा पुरविल्या जातात. त्यामध्ये प्रामुख्याने इंटरनेट, झेरॉक्स, एस.डी. आय. या सुविधा पुरविल्या जातात. ग्रंथालय व माहितीशास्त्र विभाग हा अभ्यासक्रम १९९२-९३ पासून विनाअनुदानित तत्त्वावर चालविला जात आहे. २००९-१० पासून एम. लिब. आय. एस्सी. हा अभ्यासक्रम सुरु केला आहे. वर्गात चर्चा, सेमिनार आयोजित करून विद्यार्थ्यांचा विकास करण्याचा प्रयत्न केला जातो. राज्यशास्त्र अभ्यास मंडळातर्फे विविध राजकीय विषयावर राजकारण, राजकारणातील समस्या या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात येते. पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी Challanges Before India 2020. या विषयांतर्गत दोन दिवसीय चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. मानसशास्त्र विभागातर्फे ज्येष्ठ मानसोपचार तज्ज्ञांचे मार्गदर्शन आयोजित करण्यात येते. समाजशास्त्र विभागामार्फत विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. व्याख्याने, चर्चासत्रांच्या आयोजनातून विद्यार्थ्यांच्या क्षमतांना फुलविण्याचा प्रयत्न या विभागात केला जातो.

बायोडायव्हर्सिटी विभागाला संशोधन कार्यासाठी १०.८७ लाख रुपयांचे अनुदान मिळाले आहे. विभागामार्फत राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजनही करण्यात आले होते. फोटोग्राफी व त्याविषयीचे प्रदर्शनही भरविण्यात आले होते. बायोटेक्नॉलॉजी विभागाच्यावतीने राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. बॉटनी व रसायनशास्त्र विभागामार्फत व्याख्याने, चर्चासत्रे, परिषदांचे आयोजन करण्यात येते. कॉम्प्युटर सायन्स विभागातर्फे विभागातील विद्यार्थ्यांसाठी कॅंपस इंटरव्ह्यूचे आयोजन करण्यात येते. त्यामुळे या विभागातील विद्यार्थ्यांना नोकऱ्यांची संधी प्राप्त होते.

इलेक्ट्रॉनिक सायन्स विभागाकडूनही विद्यार्थ्यांना करिअर व संशोधन करावे यासाठी उद्युक्त करणारे उपक्रम राबविण्यात येतात. विविध शैक्षणिक सहलींचे आयोजन करण्यात येते. कार्यशाळा व परिषदांचेही आयोजन केले जाते. भूगोल विभागात Certificate Course in GIS & Remote Sensing  हा अभ्यासक्रम सुरु करण्यात आला. विद्यार्थ्यांसाठी विविध ठिकाणी शैक्षणिक सहलींचे आयोजन करण्यात येते.

गणित विभागाच्यावतीने रामानुजन शिष्यवृत्ती आणि पुरस्कार या नव्या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली आहे. विविध विषयावरील व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले आहे. मायक्रोबायॉलॉजी विभागात निरनिराळ्या चर्चासत्रांचे व व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले आहे. याशिवाय निरनिराळ्या शैक्षणिक भेटी व सहलींचेही विभागाकडून आयोजन करण्यात आले. भौतिकशास्त्र विभागाकडूनही विविध शैक्षणिक सहली व विद्यार्थ्यांना नवी माहिती व ज्ञान देणाऱ्या उपक्रमांचे आयोजन करण्यात येत असते. संख्याशास्त्र व प्राणीशास्त्र विभागामार्फत वेगवेगळ्या उपक्रमांचे आयोजन करण्यात येते.

सन १९४५ साली स्थापन झालेल्या या महाविद्यालयाने आपल्या कार्याचा मोठा विस्तार केला आहे. विविध अधिविभागांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या ज्ञानाच्या कक्षा विकसित करण्याचे काम महाविद्यालय सातत्याने करत आहे. विद्यार्थ्यांना केंद्रबिंदू मानून संस्थेच्या ध्येयधोरणांप्रमाणे शिक्षणप्रसार करण्यासाठी महाविद्यालयाने नेहमीच प्रयत्न केले आहेत. आबासाहेब गरवारे कॉलेजच्या वेगवेगळ्या विभागांनी राबविलेले उपक्रम लक्षात घेता या कॉलेजने विद्यार्थ्यांना काही नवे देण्याचा प्रयत्न केला असल्याचे दिसून येते. व्यावसायिक अभ्यासक्रम सुरु करुन महाविद्यालयाने विद्यार्थ्यांना नव्या संधी उपलब्ध करुन दिल्या आहेत. बदलत्या काळाप्रमाणे शिक्षणव्यवस्थेत काही बदल झाले पाहिजेत या संस्थेच्या धोरणाप्रमाणे महाविद्यालयाने निश्चितच बदल स्वीकारून विद्यार्थ्यांना बदलास सामोरे जाण्यास प्रेरीत केल्याचे दिसून येते

विशेष म्हणजे या महाविद्यालयात अधिकाधिक प्राध्यापकांना संशोधनाला प्रवृत्त केले आहे, ही बाब अतिशय महत्त्वाची आहे. त्याचबरोबर संगणकशास्त्र, पत्रकारिता यासारखेही अभ्यासक्रम शिकवून विद्यार्थ्यांना वर्तमान स्थितीतील नव्या प्रवाहांचा परिचय करुन दिला जातो.

## ५.९ म.ए.सो. गरवारे वाणिज्य महाविद्यालय, पुणे (इ.स. १९६७) :

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे गरवारे वाणिज्य महाविद्यालय हे महत्त्वाचे कॉलेज आहे. या महाविद्यालयाची स्थापना सन १९६७ मध्ये झाली. त्यापूर्वीच आबासाहेब गरवारे कॉलेजमध्येच वाणिज्य विभाग सुरु झालेला होता. केवळ वाणिज्य शाखेचे पदवी व पदव्युत्तर शिक्षण देणारे पुणे शहरातील हे दुसरे महाविद्यालय आहे. पुण्यातील गरवारे वाणिज्य महाविद्यालय हे आघाडीचे व नावाजलेले महाविद्यालय आहे. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे ध्येय धोरणाशी अनुसरुन वाणिज्य महाविद्यालयाची वाटचाल सुरु आहे. वाणिज्य शाखेची शिक्षणाची व्यवस्था करुन विद्यार्थ्यांची व्यवस्था या महाविद्यालयाने केली आहे. सध्या या महाविद्यालयात इंग्रजी माध्यमातून अकरावी कॉमर्सपासून एम. कॉम.पर्यंतचे शिक्षणाची सोय आहे.

महाविद्यालयात विद्यार्थी केंद्रस्थानी ठेवून विविध उपक्रम राबविले जातात. ज्यायोगे विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासासह वाणिज्य शाखेतील नव्या संकल्पना व प्रवाहाचा विद्यार्थ्यांना परिचय होऊ शकेल. विद्यार्थ्यांच्या जाणिवा अधिक विकसित व्हाव्यात, विद्यार्थ्यांच्या प्रगतीत भर पडावी यासाठी सातत्याने विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते. सुसज्ज ग्रंथालय, कॉम्प्युटर लॅबोरेटरी, जिमखाना, क्रीडांगण, वसतिगृह या सुविधा विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करुन दिल्या आहेत. एन सी सी, राष्ट्रीय सेवा योजना, कॉमर्स असोसिएशन सांस्कृतिक मंडळ, श्रीलेखा इ. उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव दिला जातो. या सर्व उपक्रमांचा उद्देश विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा आहे. तज्ज्ञ व अनुभवी प्राध्यापक आणि कार्यक्षम कर्मचारी ही या महाविद्यालयाची वैशिष्ट्ये आहेत. सन १९९२ साली महाविद्यालयाने रौप्यमहोत्सव साजरा केला. अनेक नामवंत माजी विद्यार्थी शैक्षणिक, सामाजिक, कला, साहित्य क्षेत्रात आघाडीवर आहेत. महाविद्यालयाला पुणे विद्यापीठाचे कायम संलग्नीकरण मिळाले आहे.

'महाविद्यालयाच्या वरिष्ठ व कनिष्ठ विभागात मिळून एकूण २६५८ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. महाविद्यालयात एकूण ५० शिक्षक व २९ शिक्षकेतर कर्मचारी आहेत.[१५] महाविद्यालयातील विविध उपक्रम महाविद्यालयाच्या प्रगतीची साक्ष देतात. गरवारे वाणिज्य महाविद्यालयाच्यावतीने Quest हे रिसर्च मासिक सुरु करण्यात आले आहे. या रिसर्च मासिकाला इंटरनॅशनल स्टॅंडर्ड सिरिअल नंबर ISSN प्राप्त झाला आहे. महाविद्यालयाच्या दृष्टीने ही अत्यंत महत्वाची गोष्ट आहे. इकॉनॉमिक्स असोसिएशनने विद्यार्थ्यांच्या सहभागाने रिसर्च प्रोजक्ट राबविला. विशेषत: अर्थशास्त्र

या विषयाशी संबंधित संशोधनाला चालना देण्यासाठी हा उपक्रम पूरक ठरला. लॅंग्वेज असोसिएशन, रसिक मंडळ व श्रीलेखा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने सुप्रसिद्ध संगीत दिग्दर्शक मा. श्री. कौशल इनामदार यांच्या प्रगट मुलाखतीचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या कलाविषयक जाणीवा वृद्धींगत व्हाव्यात यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला.

महाविद्यालयात युनिकोड या विषयावर कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेच्या माध्यमातून सर्वांना मार्गदर्शन करण्यात आले. पब्लिसिटी विभागातर्फे Effective Writing for press Publishing या विषयावर शाळा कार्यशाळा घेण्यात आली. यासारख्या उपक्रमातून विद्यार्थ्यांना नवे ज्ञान नवी माहिती मिळते. कॉस्टिंग विभागामार्फतही वेगवेगळे उपक्रम राबविण्यात येतात. इंटर कॉलेजिएट प्रेझेंटेशनचे आयोजन या विभागाकडून करण्यात आले होते. Techniques of Costing हा या स्पर्धेचा विषय होता.

कॉमर्स असोसिएशनच्या वतीनेही विविध उपक्रम राबविले जातात. गरवारे कॉलेज ऑफ कॉमर्स हे कॉमर्सचे शिक्षण देणारे राज्यातील महत्त्वाचे कॉलेज आहे. महाविद्यालयामध्ये कॉमर्स असोसिएशन आणि कॉमर्स लॅब सुरुवातीपासूनच अस्तित्वात आहे. विविध तज्ज्ञांची भाषणे, प्रेझेंटेशन स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, कॉर्पोरेट स्पर्धा आणि विविध आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांमधील सहभाग यासारखे उपक्रम राबवून कॉमर्स असोसिएशनने विद्यार्थ्यांच्या विकासासाठी हातभार लावला. कॉमर्स असोसिएशनने 'पुणे विद्यापीठ 'कॉमर्सचे २०१२' या स्पर्धेचे आयोजन केले होते.

पुणे विद्यापीठाचे कॉमर्स अँड रिसर्च व गरवारे वाणिज्य महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने 'कॉमर्स ऑलिंपियाड'चे आयोजन करण्यात आले. यामध्ये बिझनेस ॲप्टिट्युड लिडरशिप स्किल, पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन, कम्युनिकेशन स्किल यासारख्या स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या विविध गुणांना वाव देण्यात आला. कॉमर्स असोसिएशन तर्फे विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल नॅशनल स्टॉक एक्स्चेंज आणि सेबी येथे आयोजित करण्यात आली होती. विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडेल अशा ठिकाणी शैक्षणिक सहलींचे आयोजन करण्यात येते.

विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता वृत्ती वाढवून विद्यार्थ्यांना उद्योग व्यवसायामध्ये यशस्वी करणे यासाठी उद्योजकता केंद्राने मोठी कामगिरी बजावली आहे. गरवारे वाणिज्य महाविद्यालयात उद्योजकता विकास केंद्रामार्फत विद्यार्थ्यांना उद्योगधंद्यात यशस्वी होण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले

जातात. त्यामध्ये बिझनेस प्लॅन वर्कशॉप, उद्योजकता गुणगौरव समारंभ इ. कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. यामधून विद्यार्थ्यांना उद्योगाची आवड निर्माण व्हावी. MEN-E-WEEK-INDOVENTION चे आयोजन करण्यात आले होते. उदयोन्मुख व्यावसायिक व उद्योजक यांना एक उत्तम व्यासपीठ उपलब्ध करुन देण्याचा या उपक्रमामागे उद्देश होता. पुणे विद्यापीठाशी संलग्न असणाऱ्या महाविद्यालयांमध्ये अशा प्रकारचा उपक्रम राबविणारे गरवारे कॉलेज ऑफ कॉमर्स हे एक महाविद्यालय आहे.

उद्योजकता केंद्राच्यावतीने याशिवाय उद्योजकता रॅली, मेंटॉरिंग सेशन, आंतरमहाविद्यालयीन बिझनेस आयडियाज स्पर्धा, मोनोपॉली गेम, ट्रेझर हंट इ. उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. याशिवाय दोन दिवसांचे 'बिझनेस फेअर' आयोजित करण्यात आले. त्याचा लाभ निश्चितच विद्यार्थ्यांना झाला. बी.बी.ए. विभाग हा विनाअनुदानित तत्त्वावर चालविला जातो या विभागामार्फत विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शनासाठी तज्ज्ञांची मार्गदर्शनपर व्याख्याने आयोजित केली जातात. त्याचबरोबर गुरुपौर्णिमा उत्सव व रक्तदान शिबिराचे आयोजन केले जाते. शैक्षणिक सहलींचे आयोजन करुन विद्यार्थ्यांना विविध संस्थाच्या व्यवहारांचे दर्शन घडविले जाते. कॅंपस इंटरव्ह्यूच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना नोकऱ्यांची संधी मिळवून दिली जाते. बी.सी.ए. विभागात दरवर्षी विविध उपक्रम राबविले जातात. तीनही वर्षातील विद्यार्थ्यांना सहलींच्या व क्षेत्रभेटींच्या माध्यमातून ज्ञान मिळवून दिले जाते. पुस्तकी ज्ञानाबरोबरच बाहेरच्या जगातील व्यावहारिक ज्ञान मिळावे यासाठी उपक्रमांचे आयोजन केले जाते.

गरवारे कॉलेज ऑफ कॉमर्स मध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे युनिट अतिशय प्रभावीपणे कार्यरत आहे. विद्यार्थ्यांच्या सामाजिक जाणिवा अधिक वृद्धिंगत व्हाव्यात यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून सातत्याने प्रयत्न केले जातात. वर्षभर विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. त्याचबरोबर विशेष शिबिराचे आयोजनही करण्यात येते. ग्रामस्वच्छता, वृक्षारोपण, बंधारा योजना हे या शिबिराचे वैशिष्ट्ये आहे. बहि:शाल विभागामार्फतही विविध उपक्रम राबविले जातात. 'विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक संवेदनशीलता वाढीला लागावी, सामाजिक जाणीव जागृत व्हावी या दृष्टीने बहि:शाल विभागाचे काम महाविद्यालयात चालू आहे.' दरवर्षी जयकर व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात येते. विविध विषयांवर आधारित एक दिवसीय शैक्षणिक कार्यशाळांचे आयोजन केले जाते.

गरवारे कॉलेजमध्ये ई सेल कार्यरत आहे. विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता वृत्ती जागविणे व त्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणे हे ध्येय ई सेल जोपासत आहे दरवर्षी बिझनेस प्लॅन वर्कशॉप उद्योजकता गुणगौरव समारंभ या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. या विभागाचा एक महत्त्वाचा उपक्रम म्हणजे NEN-F-week-INODVENTION चे आयोजन पुणे विद्यापीठाशी संलग्न असणाऱ्या महाविद्यालयांमध्ये अशा प्रकारचा उपक्रम राबविणारे गरवारे कॉलेज ऑफ कॉमर्स हे पहिलेच महाविद्यालय आहे.[१६] यावरून या महाविद्यालयाची प्रगती समजून येते. या विभागामार्फत उद्योजकता रॅली, मेंटॉरिंग सेशन, आंतरमहाविद्यालयीन बिझनेस आयडियाज स्पर्धा, मोनोपॉली गेम आणि ट्रेझर हंट इत्यादींचे आयोजन करण्यात आले. त्याचबरोबर बिझनेस फेअर हा उपक्रमही आकर्षणाचा ठरला.

### ५.१० म.ए.सो. रेणुका स्वरूप ज्युनिअर कॉलेज, पुणे (इ.स. १९७५) :

पुणे शहरातील एक नावाजलेले रेणुका स्वरूप ज्युनिअर कॉलेज आहे. कॉलेजचा निकाल उत्तम असून विविध कार्यक्रम घेतल्याने विद्यार्थ्यांचा व्यक्तीमत्व विकास होत आहे.[१७]

### ५.११ म.ए.सो. विमलाबाई गरवारे ज्युनिअर कॉलेज, पुणे (इ.स. १९७५) :

विमलाबाई गरवारे ज्युनिअर कॉजेल देखिल पुण्यातील एक प्रसिध्द कॉलेज आहे. येथे विद्यार्थी संख्या पाचशेच्यावर गेलेली आहे निकालाचा आलेख दिवसेंदिवस वाढत आहे.[१८]

### ५.१२ म.ए.सो. वाघीरे ज्युनिअर कॉलेज, सासवड, पुणे (इ.स. १९७५) :

पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील प्रसिध्द असणारे सासवड येथील वाघारे ज्युनिअर कॉलेज आहे. सन २०१० मध्ये निकाल ८६ % लागला आहे.[१९]

### ५.१३ म.ए.सो. कै. गजाननराव भिवराव देशपांडे उच्च माध्यमिक विद्यालय, बारामती (इ.स. १९९२) :

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या कै. गजाननराव भिवराव देशपांडे उच्च माध्यमिक विद्यालय, बारामती या शाखेची स्थापना सन १९८३ साली करण्यात आली. या विद्यालयाचा सन २०१० मध्ये निकाल ८० % लागला आहे.[२०]

### ५.१४ म.ए.सो. राणी लक्ष्मीबाई मुलींची सैनिकी शाळा, कासार आंबोली, पुणे (इ.स. १९९७):

स्त्री शिक्षणाची उज्ज्वल परंपरा असलेल्या पुण्यातील महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीची मुलींची सैनिकी शाळा म्हणजे एक वेगळा व विधायक असा उपक्रम आहे. निवासी स्वरुपात ही शाळा कार्यरत आहे. मुलींची सर्वांगीण प्रगती व्हावी यासाठी संस्थेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल म्हणजे ही मुलींची सैनिकी शाळा. मुलींवरही उत्तम संस्कार व्हावेत देशाच्या जडणघडणीत मुलींनी योगदान द्यावे यासाठी या शाळेच्या माध्यमातून प्रयत्न केले जात आहेत. राष्ट्रीय मूल्यांचा मुलींवर संस्कार व्हावा, सैनिकी शिक्षण मिळून मुलींनी मुलांच्यासारखे देशसेवेत सक्रिय व्हावे यासाठी ही शाळा काम करते. मुलींना सैनिकी शिक्षण देण्याचा हा संस्थेचा प्रयत्न निश्चितच महत्त्वपूर्ण आहे. या शाळेत विविध उपक्रमांद्वारे मुलींना नवे ज्ञान देण्याचा प्रयत्न केला जातो. शाळेत उल्लेखनीय व वैशिष्टपूर्ण उपक्रम राबविले जातात. गायन स्पर्धा अशा वेगवेगळ्या स्वरुपाच्या स्पर्धा आयोजित केल्या जातात. त्याचबरोबर कबड्डी, ॲथलेटिक्स, योगासन, आर्चरी, रायफल शूटिंग, कराटे, बॅडमिंटन, टेबलटेनिस, किक बॉक्सिंग, सूर्यनमस्कार या खेळांचे प्रशिक्षण दिले जाते व स्पर्धाही घेतल्या जातात. व्यक्तिमत्व विकास विभागातून विद्यार्थ्यांना वैयक्तिक समुपदेशन केले जाते. शाळा निवासी असल्याने समुपदेशनाची निकड भासते. ती या विभागातर्फे पूर्ण केली जाते.

विद्यार्थ्यांना विविध विषयावरील कार्यशाळेच्या माध्यमातून विकसित करण्याचा प्रयत्न केला जातो. शिस्त, भावनिक बुद्धिमत्ता, अभ्यास कौशल्य, ताणव्यवस्थापन व प्रेरणा इ. विषयांवर कार्यशाळा आयोजित केल्या जातात. 'संवेदना' नावाच्या उपक्रमातून पालकांच्या गटाची स्थापना केली जाते. शिक्षकांसाठी 'संघभावना' तसेच 'वयात येणाऱ्या मुली आणि पालकांची भूमिका' या विषयावर कार्यशाळा घेण्यात येतात. त्याशिवाय मुलींची करिअर निवड आणि पालक या विषयावरही कार्यशाळा घेण्यात येतात. या कार्यशाळेच्या माध्यमातून विद्यार्थी पालक व शिक्षकांसाठी ज्ञान व माहिती उपलब्ध करुन दिली जाते. विद्यार्थ्यांच्या प्रत्येक कुलाच्या हस्तलिखित प्रकाशनाचा उपक्रमही असाच महत्त्वाचा आहे. विविध लेख, कविता, संकलन, चित्रे इ. वापर करुन विद्यार्थी आपले हस्तलिखित तयार करतात.

विद्यार्थिनींच्या अंगी असलेल्या विविध कला कौशल्यांचा विकास व्हावा व व्यावहारिक दृष्टिकोन विकसित व्हावा म्हणून या विद्यालयात उद्योजक मेळावा आयोजित करण्यात येतो. राणी लक्ष्मीबाई मुलींची सैनिकी शाळा, कासार आंबोली ही शाळा महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीची महत्त्वाची शाळा आहे. मुलींना सैनिकी शिक्षण देऊन त्यांना देशसेवेत सक्रिय करणे हे उद्देश ठेवून १९९७ साली ही शाळा सुरु करण्यात आली आहे. मुलींना विविध विषयावरील ज्ञान देऊन त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास करणे हा सैनिकी शाळेच्या स्थापनेमागचा हेतू आहे. मुलींना सैनिकी प्रकारचे शिक्षण देणारी ही देशातील पहिली शाळा आहे. सध्याच्या काळात स्त्री, पुरुष असा भेदभाव केला जात नसल्यामुळे देशाच्या संरक्षण विभागासारखे क्षेत्र मुलींना करिअरसाठी निवडता येत आहेत. आणि याच घटकाचे भान ठेवून संस्थेने उच्च माध्यमिक विभागातील विज्ञानशाखेची शिक्षण देणारी मुलींची सैनिकी शाळा कासार आंबोली येथे सन १९९८ साली सुरु केलेली आहे. सन १९९९ साली निकाल ८८ % लागला आहे.[२१] अतिशय वेगळा विचार, वेगळी उद्दिष्टे ठेवून संरक्षण क्षेत्रातील शिक्षण देण्यासाठी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने ही शाळा स्थापन केलेली आहे. यावरुन असे म्हणता येईल की संस्था केवळ पारंपारिक शिक्षणपद्धतीचा विचार करत नसून, काही कालानुरुप बदल संस्थेने आपल्यामध्ये सामावून घेतलेले आहेत व या बदलांचे श्रेष्ठत्तम उदाहरण म्हणजे उच्च माध्यमिक मुलींची सैनिकी शाळा, कासार आंबोली होय. उच्च माध्यमिक मुलींची सैनिकी शाळा, कासार आंबोली या शाखेची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे:

१. मुलींमध्ये देशसेवेची भावना जागृत करणे.

२. संरक्षण दलातील विविध प्रकारच्या नोकरीसाठी मुलींची तयारी करुन घेणे.

३. मुलींच्या शारीरिक तंदुरुस्तीसाठी मैदानी खेळांचे प्रशिक्षण देणे, खेळास प्रोत्साहन देणे.

४. मुलींमधील विविध कलागुणांना वाव देणे.

५. सैनिकीशाळेमध्ये प्रवेश घेतलेल्या मुलींमध्ये नेतृत्वगुणांचा विकास करणे.

६. सैनिकी शाळेत प्रवेश घेतलेल्या मुलींना संरक्षणदलातील वेगवेगळ्या संधीची माहिती करुन देणे व त्यांची परीक्षाभिमुख तयारी करुन घेणे.

या वैशिष्ट्यांसह शाळेने आतापर्यंत नेत्रदीपक कामगिरी केलेली असून, शाळेने आयोजित केलेल्या विविध उपक्रमाद्वारे केलेल्या प्रयत्नांमुळे अनेक विद्यार्थ्यांनी आता सैनिकी शाळेचा पर्याय निवडताना दिसत आहेत. स्थापनेपासून पूर्ण पटसंख्येने ही शाळा सुरु असून आत्तापर्यंत पटसंख्येच्या मर्यादेपेक्षा कमी कधीही कमी प्रवेश झालेले नाहीत. यावरुन सैनिकी शाळेबद्दल विद्यार्थ्यांचे पालक यांचा सैनिकी शाळेबद्दलचा सन्मान ध्यानात येतो. सी.बी.एस.ई.पद्धतीचे शिक्षण या सैनिकी शाळेच्या माध्यमातून दिले जात आहे. गुणवत्तेसोबत विद्यार्थिनींच्या सर्वांगीण विकासाकडे लक्ष दिले जात असल्याने महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या एकूण सर्व सर्व शाळा महाविद्यालयामध्ये उच्च माध्यमिक मुलींची सैनिकी शाळा, कासार आंबोली वैशिष्ट्येपूर्ण ठरलेली आहे.

## ५.१५ म.ए.सो. इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट अँड करिअर कोर्सेस, पुणे (इ.स. १९८३) :

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या आय. एम. सी. सी. या शाखेची स्थापना सन १९८३ साली करण्यात आली या संस्थेमध्ये एम. सी. ए., एम. पी. एम. हे पुणे विद्यापीठाशी संलग्नित पदव्युत्तर अभ्यासक्रम चालविले जातात. या शाखेच्यावतीने विविध अभ्यासक्रम चालविले जातात. बदलत्या काळाशी सुसंगत भूमिका घेत विद्यार्थ्यांना व्यावसायिक अभ्यासक्रम उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न यामाध्यमातून केला जातो. एम. सी.ए. व एम. सी. एम. हे अभ्यासक्रम या शाखेत शिकविले जातात. तर व्यवस्थापन क्षेत्रातील एम. पी. एम. व एम. एम. एस., पी. जी. डी. बी. एम. हे अभ्यासक्रम शिकविले जातात. या शाखेचा विद्यापीठाचे पातळीवरचा निकाल सतत चांगला लागला आहे. विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत विविध अभ्यासक्रमातून या संस्थेच्या विद्यार्थ्यांनी स्थान मिळवून चांगल्या निकालाची परंपरा निर्माण केली आहे. सन २००९-१० चा निकाल पाहिला तर हे दिसून येते की निकालात या संस्थेच्या विद्यार्थ्यांनी यश मिळाविले आहे.[२२]

| अ.क्र. | संगणक व व्यवस्थापन अभ्यासक्रम | निकाल |
|---|---|---|
| १. | एम. सी. ए. | ९०% |
| २. | एम. सी. एम. | ७३% |
| ३. | एम. पी. एम. | ५५% |
| ४. | एम. एम. एस. | ८३% |

५.	पी.जी.डी.बी.एम.	७६%

वरील सारणीवरुन हे दिसून येते की या शाखेतील संगणक व व्यवस्थापन अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांनी लक्षणीय यश मिळविले आहे.

व्यवस्थापन महाविद्यालयांचे महत्त्व हे शैक्षणिकदृष्ट्या वारंवार अधोरेखीत झालेले आहे. प्रत्येक घटकाचे व्यवस्थापन त्यांचे नियंत्रण आता जगभरात सर्वमान्य झालेले आहे. वाणिज्य विषयक मोठ मोठ्या कंपन्या, व्यापारी कंपन्या, हॉटेल, आरोग्य, पर्यटन इत्यादी घटकांमध्ये व्यवस्थापन करण्यासाठी हे सर्व घटक नेहमी चांगल्या व्यवस्थापकांच्या शोधात असतात. आपले मत पटवून देण्याची क्षमता, सर्वसमावेशक व सर्वमान्य नेतृत्व, आपल्या कामावरची निष्ठा यामुळे व्यवस्थापकांना चांगले प्रशिक्षण मिळणे विद्यार्थीदशेत मिळणे महत्त्वाचे असते, हे आणि हे अभ्यासक्रम उत्कृष्ट प्रकारे या महाविद्यालयामध्ये शिकवले जातात.

एम.सी.ए., एम.सी.एम. सारख्या अभ्यासक्रमांमुळे या महाविद्यालयात शिक्षण घेणारे विद्यार्थी समाधानी आहेत. यासंदर्भात एका विद्यार्थ्यांने मांडलेले मत महत्त्वपूर्ण आहे तो म्हणतो, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट मध्ये घेतल्याने मी समाधानी आहे. या ठिकाणी चांगले शिक्षण मिळाले संगणक लॅब उच्च दर्जाची असून येथील शिक्षक स्टाफ देखील विद्यार्थ्यांमध्ये मिसळणारे आहेत. या महाविद्यालयाचे शैक्षणिक वातावरण अभ्यासासाठी पूरक असून या सर्वाचा फायदा माझ्यासारख्या असंख्य विद्यार्थ्यांना झाला आहे.[२३] यावरुन या महाविद्यालयाबाबत विद्यार्थ्यांचे मत आपल्या ध्यानात येते व महाविद्यालयाच्या एकूण परिस्थितीची जाणीव आपल्याला होते.

महाविद्यालयाच्या सुरवातीपासूनच विद्यार्थ्यांच्या परीक्षाभिमुख निकालाची परंपराही राखली गेलेली दिसते. या निकालामध्ये सातत्य असल्याने या महाविद्यालयाला अल्पावधीत शैक्षणिक क्षेत्रात आपला लौकिक वाढवता आलेला आहे. त्यामुळेच या महाविद्यालयाबाबत डॉ. राधाकृष्ण रानडे यांनी गौरवोद्‌गार काढले आहेत, ते म्हणतात,''हे महाविद्यालय म्हणजे विज्ञान तंत्रज्ञान, व्यवस्थापनाचे शिक्षण देणारे केंद्रच नाहीतर विद्यार्थ्यांच्या भावी आयुष्याला आकार देणारे केंद्र आहे.''[२४] असेच उदगार मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अनिल वळसणकर यांच्या घेतलेल्या मुलाखतीतून व्यक्त झाले. यावरुन या महाविद्यालयाचे महत्त्व आपल्या लक्षात येते. या शाखेची स्थापना होऊन ३० वर्षे

झाली आहेत. संगणक आणि व्यवस्थापन शास्त्रातील पुणे विद्यापीठ स्तरावरील या शाखेत अभ्यासक्रम शिकविला जातो. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने नेहमीच विद्यार्थी हिताचा विचार केला आहे. विद्यार्थ्यांना बदलत्या काळानुसार शिक्षण दिले तरच समाजात पायाभूत बदल दिसून येतील या उद्देशाने महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने नवनवीन व्यावसायिक अभ्यासक्रम सुरु केले आहेत. त्याचाच एक भाग म्हणून १९८३ मध्ये संस्थेने इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट अँड करिअर कोर्सेस ही शाखा सुरु करुन विद्यार्थ्यांना व्यावसायिक स्वरुपाचे संगणक व व्यवस्थापन शाखातील अभ्यासक्रम उपलब्ध करुन दिले आहेत.

या शाखेत विद्यार्थ्यांना उत्तम दर्जाचे शिक्षण तर दिले जातेच शिवाय वेगवेगळया उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना नवी माहिती दिली जाते. सांस्कृतिक विभागामार्फत विद्यार्थ्यांमधील कलागुणांना वाव देण्यासाठी प्रोत्साहित केले जाते. एकांकिका व अभिनय स्पर्धेत विद्यार्थ्यांची तयारी करुन घेतली जाते. columbus the knowledge Explorer या विद्यार्थ्यांनी चालविलेल्या भित्तीपत्रकाचा उपक्रमही विशेष उल्लेखनीय आहे. यात विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाला संधी दिली जाते. आय.एम.सी.सी.तर्फे संगणक व व्यवस्थापन शाखेतील विद्यार्थ्यांसाठी विविध विषयावरील व्याख्यानांचे आयोजन केले जाते. या व्याख्यानांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वेगवेगळया संकल्पना समजावून सांगितल्या जातात. क्रीडा स्पर्धा आयोजित करुन विद्यार्थ्यांमधील क्रीडा कौशल्यांना संधी मिळवून दिली जाते. त्यामुळे या शाखेतील विद्यार्थ्यांची विद्यापीठ संघात निवड केली जाते.

## ५.१६ म.ए.सो. रेणुका स्वरुप इन्स्टिटयूट ऑफ करिअर कोर्सेस, पुणे (इ.स. १९८९):

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने शिक्षण क्षेत्रात नवनवीन प्रयोग करुन ते यशस्वीही करुन दाखविले आहेत. 'योग्य व्यवसाय निवडून स्वत:च्या पायावर उभे राहण्याची जरुरी असू शकते या विचारातून सन १९८९ मध्ये रेणुका स्वरुप व्यवसाय प्रशिक्षण केंद्राची स्थापना झाली.[२५] शिक्षण क्षेत्रातील बदलांना योग्य प्रकारे सामोरे जात विद्यार्थ्यांच्या व्यापक कल्याणाचा विचार करुन नवनवे अभ्यासक्रम सुरु करण्यास महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने नेहमीच प्राधान्य दिले आहे. या विचारातूनच १९८९ मध्ये रेणुका स्वरुप व्यवसाय प्रशिक्षण केंद्राची स्थापना करण्यात आली. या केंद्रात पूर्व प्राथमिक शिक्षिकेसाठीचा प्रशिक्षण अभ्यासक्रम उपलब्ध आहे. महाराष्ट्र शासनाची मान्यता असलेला सहा महिन्यांचा अभ्यासक्रम या केंद्रात शिकविला जातो. आतापर्यंत सुमारे

चाळीसपेक्षा जास्त बॅचेस बाहेर पडलेल्या आहेत. आणि त्यातील बहुतांशी मुलींना नोकऱ्याही मिळालेल्या आहेत. म्हणजेच आजच्या शिक्षणातून नोकऱ्या उपलब्ध न होण्याचा भाग असताना आवश्यकता असणारा अभ्यासक्रम उपलब्ध करुन दिला तर नोकऱ्या मिळू शकतात हे या केंद्रातील सदरच्या अभ्यासक्रमातून दिसून येते.

आधुनिक काळात इंग्रजी माध्यमाच्या शाळांचे प्रमाण लक्षणीय स्वरुपात वाढले आहे. त्याचा अभ्यास करुन इंग्रजी माध्यमातून रेणुका स्वरुप व्यवसाय प्रशिक्षण केंद्राने पूर्व प्राथमिकसाठी Pre-primary Teachers Training Course व प्राथमिकसाठी Teachers Training Course सुरू केला आहे. २०११-१२ या वर्षात या दोन्ही कोर्समधून मिळून ७० विद्यार्थिनी उत्तीर्ण झाल्या. या सर्व मुलींची जबाबदारी संस्थेने घेऊन त्यांच्या प्लेसमेंटसाठी प्रयत्न केले. या प्रयत्नामुळे सर्व मुलींना शाळांमध्ये नोकऱ्या मिळाल्या. संस्थेमार्फत शालेय विद्यार्थ्यांसाठी इंग्रजीचे वर्ग सुरु करण्यात आले. याची विद्यार्थी संख्या ५०० वरुन २५०० इतकी वाढली. हाच कोर्स पेरुगेट भावेस्कूलच्या ५ वी व ९वी च्या विद्यार्थ्यांसाठी चार महिने राबविण्यात आला. समाजात साजऱ्या केल्या जाणाऱ्या विविध सणांसाठी आवश्यक अशा वस्तूंचा पुरवठा या केंद्राच्या माध्यमातून केला जातो. संस्थेतर्फे कथ्थक नृत्याचा वर्ग चालविण्यात येतो. या वर्गाचा ८० मुलींनी लाभ घेतला. यामुळे काही मुलींनी यात प्रावीण्य मिळविले. या मुलींना जाहीर कार्यक्रम करता येणे, क्लास घेता येणे हे शक्य झाले.

संस्थेच्यावतीने संध्याकाळी १ तास शाळेच्याच आवारात बालभवन घेतले जाते. मुलांसाठी छंदवर्ग शिबिर भरविले जातात. मुलींसाठी विविध कोर्स या शाखेत उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. फेशिअल, हेअर कटिंग यांचे शिक्षण घेऊन मुलींना स्वयंरोजगाराच्या दिशेने वाटचाल करता यावी यासाठी हे अभ्यासक्रम सुरु करण्यात आले आहेत. या अभ्यासक्रमांना मुलींचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. त्याचबरोबर शिवणकामाचे वर्गही मुलींसाठी घेण्यात येतात. सध्या या शाखेत फॅशन डिझायनिंगचे विविध कोर्स मुलींसाठी उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. वेगवेगळ्या मुदतीचे कोर्सेस सध्या सुरु आहेत. वेगवेगळ्या अभ्यासक्रमांच्या उपलब्धतेबरोबरच विद्यार्थिनींसाठी काही उपक्रम राबविले जातात. फॅशन शो व प्रदर्शनांचा त्यात समावेश आहे. विद्यार्थिंनींनी अभ्यासक्रमात तयार केलेले कपडे व वस्तूंचे प्रदर्शन मांडले जाते. कॉम्प्युटराईज्ड फॅशन डिझायनिंग

हा नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यात आला आहे. दोन वर्षाचा डिप्लोमा कोर्सही नव्याने सुरु झाला आहे. टेक्सटाईलमध्ये बाटीक व बांधणी हे कोर्स सुरु आहेत.

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या मार्फत विविध व्यावसायिक अभ्यासक्रम राबविले जातात. त्यामध्ये रेणुका स्वरुप इन्स्टिटयूट ऑफ करिअर कोर्सेस, पुणे. या शाखेचे स्थान महत्त्वाचे आहे. फॅशन डिझायनिंग, हेअर कटींग, नृत्य, कंप्युटराइज्ड फॅशन डिझायनिंग अशा स्वरुपाचे विविध कोर्सेस सुरु करुन या शाखेच्या माध्यमातून विद्यार्थिनींना रोजगाराच्या संधी मिळाव्यात यासाठी प्रयत्न केले जात आहेत. या अभ्यासक्रमांना विद्यार्थिनींचा चांगला प्रतिसाद मिळत आहे.

रेणुका स्वरुप इन्स्टिटयूट ऑफ करिअर कोर्सेसचा विद्यार्थ्यांवरील प्रभाव : रेणुका स्वरुप इन्स्टिटयूट ऑफ करिअर कोर्सेस या माध्यमातून जे जे अभ्यासक्रम शिकवले जातात त्याचा विद्यार्थ्यांच्या जडणघडणीवर उत्तम प्रभाव पडल्याचे जाणवते. पूर्व प्राथमिक शिक्षेसाठी प्रशिक्षण अभ्यासक्रम विद्यार्थ्यांसाठी इंग्रजीचे वर्ग, कथ्थक नृत्याचा वर्ग, लहानमुलांसाठी छंदवर्ग, शिबीर, मुलींसाठी सौंदर्य विषयक कोर्स, कॉम्प्युटराईज्ड फॅशन डिझायनिंग कोर्स, असे वेगवेगळे उपक्रम राबविले जातात. निश्चितपणे या सर्व विद्यार्थ्यांच्या जडणघडणीमध्ये महत्त्वाचा वाटा हा रेणुका स्वरुप इन्स्टिटयूट ऑफ करिअर कोर्सेसचा असल्याचे दिसते.

विशेषत: बालभवन येथे मुलांसाठी छंदवर्ग शिबीर भरवले जातात. अर्थातच लहान वयातच किंवा शालेय स्तरावर विद्यार्थ्यांच्या छंदाबाबत वातावरण निर्मिती झाल्यामुळे आवडत्या क्षेत्रातील निरनिराळे छंद जोपासण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रवृत्त केले जाते. या शिबिराचा सर्वात मोठा विद्यार्थ्यांवर पडलेला प्रभाव म्हणजे विद्यार्थ्यांमधील सुप्त गुण व विविध कलागुणांना वाव देण्याचे कार्य, त्या कलागुणांना उत्तेजन देण्याचे कार्य या शिबिरामधून झाले आहे. पूर्व प्राथमिक शिक्षिकेसाठी प्रशिक्षण अभ्यासक्रमाचा लाभ ज्या ज्या विद्यार्थिनींनी घेतला त्यामधून उच्च दर्जाचे ज्ञान प्राप्त झाले. लहान मुलांच्या मानसिक पातळीचा अभ्यास करुन घेतल्याने प्रशिक्षण घेण्याऱ्या विद्यार्थिनींना याचा फायदा झालेला आहे. या प्रशिक्षणाचा त्यांच्यावरील प्रभाव म्हणजे, या प्रशिक्षणार्थी विद्यार्थिनींना लहान मुलांच्या दृष्टीने सकारात्मक विचार करता आला.

विविध करिअर कोर्सेसच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रभावशील करण्यात महत्त्वाची भूमिका बजावणे, विद्यार्थ्यांची जडणघडण, त्यांच्या करिअर निवडीविषयीची आस्था या सर्वांमुळे रेणुका स्वरुप इन्स्टिटय़ूट हे महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या शैक्षणिक संकुलामधील एक अग्रणी संकुल आहे.

## ५.१७ म.ए.सो. कॉलेज ऑफ नर्सिंग, पुणे (इ.स. २०१०) :

एम.इ.एस. इन्स्टिटय़ूट ऑफ हेल्थ सायन्सेस हा आरोग्याच्या क्षेत्रात कार्य करणारा मोठा प्रकल्प आहे. रत्नागिरी जिल्हातील चिपळूणजवळील लोटे घाणेखुंट येथे एम. आय.डी.सी.परिसरातील प्रकल्पामध्ये वेगवेगळे सहा युनिटस् कार्यरत आहेत. त्यातील एक महत्त्वाचे युनिट म्हणजे नर्सिंग कॉलेज होय. एम.इ.एस. नर्सिंग स्कूल अंतर्गत आर. जी. एन.एम. या अभ्यासक्रमास सन २०११-१२ पासून मान्यता मिळाली. ३० विद्यार्थ्यांची प्रवेशक्षमता शासनामार्फत निश्चित करण्यात आली. नर्सिंग प्रोग्रॅम अंतर्गत बी. एस. सी नर्सिंग, आर.जी.एन.एम. हे अभ्यासक्रम सुरु करण्यात आले. या अभ्यासक्रमांसाठी एकूण १०० विद्यार्थ्यांची क्षमता आहे.

विद्यार्थ्यांना रोजगार मिळावा नवे ज्ञान मिळावे या हेतुने या कोर्सेसची व्यवस्था संस्थेने केली आहे. नर्सिंग कॉलेजच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना उपलब्ध असणारे वेगवेगळे अभ्यासक्रम अभ्यासावेत. आज रुग्णांची व रुग्णालयांची वाढती संख्या लक्षात घेता प्रशिक्षित व ज्ञान मिळविलेल्या परिचारक व परिचारिकांची आवश्यकताही वाढत आहे. अशावेळी उत्तम प्रशिक्षण घेतलेल्या परिचारिका व परिचारक असणे रुग्णालयासाठी आवश्यक बनले आहे. याचा विचार करुन महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने नर्सिंग कॉलेजची स्थापना केली आहे. एप्रिल २०११ मध्ये नर्सिंगच्या सर्व कोर्सेस संबंधी आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक मार्फत कॉलेजची स्थापना करण्यात आली व हे तीनही अभ्यासक्रम पुढे चालू ठेवण्यास मान्यता मिळाली.[२६] या कॉलेजमध्ये महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक आणि एम.इ.एस. स्टाफ सिलेक्शन कमिटी या दोहोंच्यामार्फत शिक्षकांची निवड करण्यात आली आहे.

कॉलेज ऑफ नर्सिंग हा महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचा एक वेगळा आणि महत्त्वाचा उपक्रम यासाठी आहे की प्रशिक्षित व कुशल मनुष्यबळाची निर्मिती करणे हे शिक्षण क्षेत्रासमोरील एक आव्हान आहे. हे आव्हान वेगवेगळ्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या माध्यमातून महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने केलेले आहे. त्यातील एक महत्त्वाचे पाऊल म्हणून कॉलेज ऑफ नर्सिंग आहे

असे म्हणता येईल. या शाखेचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ही शाखा कोकणासारखा मागास व विकासाच्या दृष्टीने दुर्लक्षित राहिलेल्या भागात सुरु करण्यात आली आहे. विकासाच्या प्रवाहात पाठीमागे राहिलेल्या भागात जर शैक्षणिक सुधारणा केल्या तर निश्चितच चांगले बदल घडून येतात. त्यामुळे संस्थेने टाकलेले हे पाऊल यादृष्टीने महत्त्वाचे आहे. शिवाय कोकणातल्या विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख शिक्षणाची संधी या शाखेच्या माध्यमातून मिळाली आहे.

कॉलेज ऑफ नर्सिंगची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.

१. औद्योगिक वसाहतीच्या परिसरामध्ये स्थापना होऊन देखील सर्वसामान्य विद्यार्थ्यांकडे विशेष असे लक्ष.

२. कोकणाच्या शैक्षणिक विकासाला हातभार लावण्यात स्कूल ऑफ नर्सिंगची गणना.

३. दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण देणारे महाविद्यालय म्हणून अल्पावधीत नावलौकिकास प्राप्त.

४. विद्यार्थ्यांच्या रोजगाराची हमी घेणारे महाविद्यालय.

५. तज्ज्ञ व अनुभवी शिक्षकांचे माध्यमातून मार्गदर्शन.

प्रामुख्याने हीच कॉलेज ऑफ नर्सिंगची वैशिष्ट्ये आहेत. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने शिक्षण शाखांचा विस्तार करण्याचे धोरण अवलंबिले व या धोरणाचा एक भाग म्हणून स्कूल ऑफ नर्सिंगची स्थापना करण्यात आली. स्थापनेपासून स्कूल ऑफ नर्सिंगला या भागातील विद्यार्थ्यांनी उदंड प्रतिसाद दिलेला आहे. विद्यार्थी हित तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा व वर्तमानकालखंडाशी शिक्षणपद्धतीला जोडण्याची महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीची धारणा या वैशिष्ट्यामुळे स्कूल ऑफ नर्सिंग या भागातील शिक्षणक्षेत्रात अल्पावधीत लोकप्रिय झाले आहे. या लोकप्रियतेमुळे भविष्यात नर्सिंग या घटकाशी संबंधित काही नवे अभ्यासक्रम सुरू करता येतील का? हा विचार देखील संस्था करत आहे.

## ५.१८ म.ए.सो. स्कूल ऑफ पॅरामेडिकल सायन्स, चिपळूण (इ.स. २०१०) :

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी इन्स्टिटयूट ऑफ हेल्थ सायन्सेस लोटे घाणेखुंट ता. खेड येथिल ही शाखा म्हणजे आरोग्य सुविधा व शिक्षण याअनूषंगाने संस्थेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल आहे. कोकणातल्या दुर्गम भागात अशा प्रकारचा हा पहिलाच उपक्रम आहे. आरोग्यविषयक सुविधांची वानवा असलेल्या भागात अशा चांगल्या सुविधा निर्माण करणे या उद्देशातून हे पाऊल उचलण्यात आले आहे. आरोग्याच्या उत्तम सुविधा निर्माण करण्याबरोबरच आरोग्यविषयक रोजगाराच्या संधी निर्माण करुन विद्यार्थ्यांना त्या उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न या उपक्रमाद्वारे महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने केला आहे. या उपक्रमा अंतर्गतच स्कूल ऑफ पॅरामेडिकल सायन्सची स्थापना २०१० मध्ये करण्यात आली आहे. लोटे, चिपळूण येथे सुरु असलेल्या या संस्थेच्या उपक्रमात नर्सिंग कॉलेज, आयुर्वेद महाविद्यालय, आणि स्कूल ऑफ पॅरामेडिकल सायन्स कार्यरत आहेत. २०११-१२ या शैक्षणिक वर्षाचा विचार करता म.ए.सो.स्कूल ऑफ पॅरामेडिकल सायन्स मध्ये ६३ विद्यार्थ्यांचा प्रवेश होतो. म.ए.सो.स्कूल ऑफ पॅरामेडिकल सायन्स मध्ये २१ तर म.ए.सो आयुर्वेद महाविद्यालयात ६५ विद्यार्थ्यांचा प्रवेश होतो.

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने या उपक्रमातून आपला वेगळा व विधायक उद्देश जपला आहे. परशुराम रुग्णालय व संशोधन केंद्रामार्फत कोकणासारख्या मागास भागाचा विकास करण्याचा उद्देश डोळ्यासमोर ठेऊन काम सुरू आहे. ग्रामीण भागाचा विकास करण्याबरोबरच महिला व बालकल्याणाचा विचार प्रत्यक्षात अंमलात आणण्याचा प्रयत्न या माध्यमातून सुरु आहे. कोकणात आरोग्यविषयक सुविधांची कमतरता असल्यामुळे संस्थेचा हा कार्यक्रम उल्लेखनीय ठरला आहे. २०१० पासून महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने हाती हा उपक्रम निश्चितच संस्थेच्या लौकिकात भर टाकणारा आहे. त्याचबरोबर संस्थेच्या कार्यकक्षा विस्तारणारा आहे.

स्कूल ऑफ पॅरामेडिकल या महाविद्यालयाचे वेगळेपण : मुळात ज्या ठिकाणी हे महाविद्यालय आहे तो रत्नागिरी जिल्ह्यातील ता. खेड तालुक्यतील लोटे घाणेखुंट लगतचा भाग आहे. परंतु आजूबाजूचा परिसर अतिशय दुर्गम आहे, आणि या दुर्गम भागात पॅरामेडिकल शिक्षण देणारे महाविद्यालय स्थापन करुन महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने आपल्या शिक्षणातील वेगळेपण जपलेले आहे. या भागातील, या परिसरातील विद्यार्थ्यांना आरोग्यविषयक अभ्यासक्रमांचे शिक्षण घेण्यासाठी अत्यल्प पर्याय होते.

विद्यार्थ्यांची ही आरोग्यविषयक अभ्यासक्रमांची आवश्यकता निश्चितपणे पूर्ण करण्यात महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीला यश मिळालेले आहे.

अल्पावधीत शैक्षणिक विकास साधण्याची किमया करुन या महाविद्यालयाने आपले वेगळेपण जपले आहे. त्यासोबतच अजून एक वेगळेपण या महाविद्यालयाने जपले आहे. ते म्हणजे 'स्कूल ऑफ पॅरामेडिकल'च्या माध्यमतून आरोग्यविषयक कुशल बुध्दी या भागात प्राप्त झाली आहे.[२७] दर्जा व गुणवत्ता यामध्ये कोणत्याही प्रकारची तडजोड न करता संस्थेचा नाविन्यपूर्ण शिक्षण देण्याचा प्रयत्न निश्चितपणे कौतुकास्पद आहे. यावरुन स्कूल ऑफ पॅरामेडिकलचे या भागातील वेगळेपण लक्षात येते. सन २०११ ते २०१४ या कालखंडात मोठमोठ्या रुग्णालयातील नोकरीसाठी स्कूल ऑफ पॅरामेडिकल येथे कॅम्पस इंटरव्ह्यू आयोजित करण्यात आले होते. याद्वारे १४० विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे.[२८] ही संख्या विद्यार्थ्यांच्या विकासाकडे संस्थेच्या धोरणाबाबत प्रकाशझोत टाकणारी आहे. त्यामुळे चिपळूण परिसरातील अनेक विद्यार्थी आता स्कूल ऑफ पॅरामेडिकलच्या प्रवेशाचा पर्याय निवडत असून, प्रतिवर्षी या संस्थेच्या गुणवत्तेसह विकासाचा आलेख वाढत आहे. आणि खऱ्या अर्थाने हेच या महाविद्यालयाचे यश आहे.

## ५.१९ म.ए. सो. कम्युनिटी महाविद्यालय, पुणे (इ.स. २०१०) :

'महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी' ही सर्वार्थाने आपले वेगळेपण जपणारी संस्था आहे. शिक्षणातील वेगवेगळ्या प्रयोगांची प्रयोगभूमी म्हणून या संस्थेकडे पाहिले जाते. कारण संस्थेने विविध प्रयोगांच्या माध्यमातून शिक्षणाची व्यापकता सर्वदूर पोहचवण्याकरता प्रयत्न केलेला आहे. विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून शिक्षणाच्या माध्यमातून नव्या बदलांना सामोरे जात संस्थेने अनेक विश्व उपक्रम राबविलेले आहेत. केवळ पारंपरिक शिक्षण घेऊन चालणार नाही तर बदलत्या काळानुसार नव्या बदलांना सामावून घेणारे कौशल्यपूर्ण शिक्षण घेतले तरच शिक्षणाची प्रस्तुतता कायम राहणार आहे हे ओळखून महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने नवे उपक्रम हाती घेतलेले आहेत. या उपक्रमातील महत्त्वाचा भाग म्हणजे कम्युनिटी कॉलेज होय. या कॉलेजची स्थापना २०१० मध्ये करण्यात आली तर २०१२ मधील विद्यार्थी संख्या ८३० होती.

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने मुक्त उपयोजित शिक्षणाच्या वाटेवर चालण्याचा सातत्याने प्रयत्न केलेला आहे. 'पारंपरिक शिक्षणाच्या प्रवाहातून बाहेर फेकलेल्या अर्धशिक्षित, अकुशल

बेरोजगार अशा समाजातील मनुष्यबळाचे रुपांतर कुशल व व्यावसायिक मनुष्यबळात करणे हे या महाविद्यालयाचे उद्दिष्ट आहे.[२१] पारंपरिक शिक्षण घेत असलेल्या किंवा पूर्ण असलेल्या विद्यार्थ्यांनाही स्वत:च्या पायावर उभे राहण्यासाठी व स्वत:चे व्यक्तिमत्व घडविण्यासाठी कम्युनिटी कॉलेजचा लाभ घेता येतो. कम्युनिटी कॉलेजचे उपक्रम हे व्यावसायभिमुख, कौशल्य व क्षमतांचा विकास करणारे आणि माफक दरात समाजापर्यंत उपयोजित शिक्षण देणारे आहेत. कम्युनिटी महाविद्यालयामध्ये विविध अभ्यासक्रम विद्यार्थ्यांसाठी राबवले जातात. अस्तित्व लाईफ सेव्हिंग ॲन्ड एच. आर. एस. प्रा. लिमिटेड यांच्या सहकार्याने खालीलप्रमाणे अभ्यासक्रम राबविले जातात.

## ५.२० इतर कार्य:

### ५.२०.१ प्रथमोपचार अभ्यासक्रम :

सध्याच्या धावपळीच्या युगामध्ये संपूर्ण जग गतिमान झाले आहे. परंतु त्यासोबतच आरोग्याचे प्रश्न अधिक मोठ्या प्रमाणात समोर येत आहेत. छोटेमोठे अपघात, वेगवेगळे आजार निभावण्यासाठी प्रत्येक ठिकाणी आरोग्याच्या सुविधा उपलब्ध होतीलच असे नाही. परंतु प्रथमोपचाराने मात्र या समस्येवर एक पर्याय निघू शकतो व रुग्णाच्या जिवीताची हानी टाळता येऊ शकते. असा महत्त्वाचा असणारा व प्रत्येकाला उपयोगी ठरेल असा हा अभ्यासक्रम संस्थेने लौटे घाणेखुंट येथे सन २०१० साली सुरु केला आहे.

### ५.२०.२ आपत्ती व्यवस्थापन :

नजीकच्या काळात अनेक प्रकारच्या नैसर्गिक आपत्तीमध्ये जिवीतहानीसह, पुनर्वसनाचे प्रश्न निर्माण झाले आहेत. भूकंप, पूर, वादळ यांच्यासारख्या आपत्तीमध्ये योग्य व कुशल मनुष्यबळ प्राप्त व्हावे यासाठी हा अभ्यासक्रम संस्थेने पुणे येथे सन २०१० पासून सुरू केलेला आहे.

### ५.२०.३ जीवनरक्षण :

निर्मनुष्य वस्तीमध्ये अडकलेले मनुष्य, वाट चुकलेले पर्यटक, आपत्तीसाठी ढिगाऱ्याखाली गाडलेले जिवंत लोक, पुरात घेरलेले प्राणी मानव यासारख्या ठिकाणी जीवरक्षक स्वत:चा जीव धोक्यात घालून अशांची सुटका करतात त्यांच्या कौशल्यानिर्मितीसाठी कम्युनिटी महाविद्यालयातील हा प्रमाणपत्र अभ्यासक्रम महत्त्वाचा ठरला आहे.

### ५.२०.४ कृत्रिम श्वसन :

प्राणवायु न मिळाल्याने अनेकांना आपले प्राण गमवावे लागतात कृत्रिम प्राणवायू देण्याची अचूक पद्धती माहिती नसल्याने इच्छा असून अनेकजण देऊ शकत नाहीत, त्यामुळे कृत्रिम श्वसनाचा अभ्यास तो देण्याची पद्धती इत्यादीची माहिती या अभ्यासक्रमामध्ये देण्यात येते. याशिवाय सर्टिफिकेट इन इन्शुरन्स, जपानी भाषा प्रमाणपत्र अशा प्रकारचे अभ्यासक्रमही या महाविद्यालयाच्या वतीने चालविण्यात येतात. सामाजिक कार्यकर्ता पदविका अभ्यासक्रम, वयोवृद्ध नागरिक समुपदेशन प्रशिक्षण, स्पोकन इंग्लिश, व्यक्तिमत्त्व विकास प्रशिक्षण, प्लंबिंग, इलेक्ट्रिशियन, कारपेंटरी, इत्यादींचे औद्योगिक प्रशिक्षण अभ्यासक्रम सुरु करण्याचा संस्थेचा मानस आहे. म्हणजेच काय तर, समाजातील गरज लक्षात घेऊन कम्युनिटी कॉलेज अभ्यासक्रमाची रचना करुन स्वावलंबी समाजाचे स्वप्न साकार करण्याचा प्रयत्न करत असल्याचे दिसून येते. कम्युनिटी महाविद्यालयात उपलब्ध असणारे हे विविध प्रकारचे अभ्यासक्रम हे समाजाच्या दृष्टीने अतिशय अत्यावश्यक आहेत. व ते अभ्यासक्रम शिकवून विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करुन त्यांच्या व्यवसायासाठी कँपस इंटरव्ह्यूचे आयोजन करुन आजवर अनेकांना रोजगार उपलब्ध झाले आहेत तसेच समाजाच्या योग्य प्रकारे गरजा भागवल्या गेल्या आहेत. एक प्रकारे समाजात सुसंवाद निर्माण करुन सामाजिक संतुलन अबाधित राखण्याचे महत्तचे कार्य या कम्युनिटी महाविद्यालयाने केले आहे.

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या एकूण शाखांपैकी कम्युनिटी कॉलेज म्हणजे शिरपेचातील मानाचा तुरा ठरला आहे. प्रथमोपचार, आपत्ती व्यवस्थापन, कृत्रिम श्वसन, जीवनरक्षण हे प्रमाणपत्र अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना व्यवसायाच्या संधी कम्युनिटी महाविद्यालय देत असते त्यासाठी कॅम्पस इंटरव्ह्यू सारखा पर्याय देखील महाविद्यालयाने निर्माण केला आहे. त्यामुळे प्रतिवर्षी विद्यार्थी संख्या वाढल्याचे आपल्या निदर्शनास येते. २०१२ मध्ये या अभ्यासक्रमात पुढीलप्रमाणे विद्यार्थी सहभागी झाले होते.[३०]

| अ.क्र. | अभ्यासक्रम | प्रशिक्षणार्थी संख्या |
|---|---|---|
| १. | प्रथमोपचार | ११६ |
| २. | सी.पी.आर | ५५५ |

कम्युनिटी कॉलेजच्या वतीने चालवला जाणारा अजून एक महत्त्वपूर्ण अभ्यासक्रम म्हणून वैवाहिक समुपदेशन प्रमाणपत्र या अभ्यासक्रमाची नोंद घ्यावी लागेल. बदलेल्या जीवनशैलीमुळे सुसंवादी एकात्म दांपत्यजीवन लोप पावत चाललेले आहे. खरेतर स्वस्थ, निरामय, आनंदी कुटुंबजीवन हा समाज जीवनाचा पाया मानला जातो. वैवाहिक जीवनात अनेक दांपत्यांना काही समस्या उद्‌भवतात अशा दांपत्यांना समुपदेशाची आवश्यकता असते आणि ही आवश्यकता ध्यानात घेऊन कम्युनिटी कॉलेजने वैवाहिक समुपदेशक तयार करण्यासाठी हा अभ्यासक्रम सुरु केला आहे.

**समारोप :**

'महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी' ही महाराष्ट्रातील इतर शैक्षणिक संस्थेप्रमाणेच प्रयोगशील शिक्षण देणारी शिक्षण संस्था म्हणून ओळखली जाते. पूर्व प्राथमिक शाळेपासून ते पदव्युत्तर शिक्षणापर्यंत शिक्षणाची सोय या संस्थेच्या माध्यमातून करण्यात आली. पुणे शहर, जिल्हा व सातारा, नगर, रायगड, रत्नागिरी, नवी मुंबई या परिसरातही संस्थेने आपल्या शाखांचा विस्तार केला आहे. प्राथमिक, माध्यमिक शाळांबरोबरच उच्च माध्यमिक विद्यालये, पदवी आणि पदव्युत्तर महाविद्यालये संस्थेच्या वतीने सुरु करण्यात आली असून व्यावसायिक रोजगाराभिमुख शिक्षण देण्यात येत आहे. उच्च माध्यमिक, पदवी, पदव्युत्तर महाविद्यालयातून संस्थेच्या ध्येय धोरणानुसार राष्ट्रीय शिक्षण देण्यात येत आहे.

'महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी' संस्थेच्या कार्याचा अभ्यास केल्यानंतर हे लक्षात येते की, कुशल, मनुष्यबळ निर्माण करुन त्यांची क्रियाशीलता थेट देशाच्या विकासासाठी उपयोजित करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या संस्थेच्या महाविद्यालयांच्यामार्फत केले जात आहे. मूल्याधिष्ठीत शिक्षण प्रणालीचा आदर्श म्हणून या संस्थेकडे पाहवे लागते. विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेचा वापर देशाच्या कल्याणासाठी करणे हे उद्दिष्ट ठेवून संस्थेची वाटचाल सुरु आहे, असे दिसून येते. उच्च शिक्षणाकडे अतिशय काळजीपूर्वक लक्ष देऊन संस्थेने विविध महाविद्यालयांचा विकास केला आहे. या महाविद्यालयांचा आढावा घेतल्यानंतर ही गोष्ट स्पष्ट होते की, या महाविद्यालयांनी पारंपरिक शिक्षणाबरोबरच कौशल्यावर आधारित रोजगारभिमुख अशा अभ्यासक्रमांना प्रोत्साहित केले आहे.

संस्थेचे आबासाहेब गरवारे महाविद्यालय, पुणे हे महत्त्वाचे कॉलेज आहे. कला व शास्त्र शाखेचे उच्च शिक्षण देणारे हे प्रथितयश कॉलेज आहे. सन १८९६ मध्ये संस्थेने कॉलेज सुरु केले होते. परंतु काही काळात हे कॉलेज बंद पडले. त्यानंतरच्या काळात महाविद्यालयीन शिक्षणाची निकड लक्षात घेऊन १९४५ मध्ये या कॉलेजची स्थापना करण्यात आली. पुढे हे कॉलेज गरवारे कॉलेज म्हणून ओळखले जाऊ लागले. नॅकची 'ए' ग्रेड या कॉलेजला मिळाली आहे. ५३ प्राध्यापकांनी डॉक्टरेट मिळविली आहे. भारतातील ३७ वे व पुण्यातील दुसऱ्या क्रमांकाचे स्थान मिळविणारे कॉलेज आहे. साडेपाच हजार विद्यार्थी या कॉलेजमध्ये शिक्षण घेत आहेत. महाविद्यालयात प्रत्येक विभागामार्फत विविध विद्यार्थी हिताचे कार्यक्रम राबविले जातात. विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चर्चासत्रे, परिषदांचे आयोजन या कॉलेजमध्ये केले जाते. वेगवेगळे व्यावसायिक अभ्यासक्रमही या कॉलेजमध्ये शिकविले जातात.

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे गरवारे वाणिज्य महाविद्यालय हे केवळ वाणिज्य शाखेचे पदवी व पदव्युत्तर शिक्षण देणारे पुण्यातील दुसरे कॉलेज आहे. अकरावीपासून एम. कॉम. पर्यंतचे शिक्षण या महाविद्यालयात दिले जाते. या महाविद्यालयातील वरिष्ठ व कनिष्ठ विभागात मिळून तीन हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. विविध विभागांमार्फत व्यापार, वाणिज्य या संदर्भाने विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर टाकणारे उपक्रम राबविले जात आहेत. भावे उच्च माध्यमिक विद्यालयातून विद्यार्थ्यांना घडविण्याचे काम सुरु आहे. विद्यार्थ्यांचे ज्ञान, परीक्षांचा निकाल, विद्यालयात राबविले जाणारे उपक्रम यातून हे विद्यालय वेगळे व वैशिष्ट्यपूर्ण असल्याचे स्पष्ट होते. निकालाची चांगली आहे.

कासार आंबोली येथील उच्च माध्यमिक मुलींची सैनिकी शाळा हा महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचा एक स्तुत्य, वेगळा व अभिनव प्रयोग आहे. मुलींनी पारंपरिक ज्ञानाबरोबरच सैनिकी प्रशिक्षण घेऊन देशसेवा करावी हा मुख्य हेतू ठेवून हे विद्यालय कार्यरत आहे. सैनिकी शिक्षणाबरोबरच मुलींच्या सर्वांगीण उन्नतीसाठी या विद्यालयात उपक्रम राबविले जातात.

इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड करिअर कोर्सेस पुणे या शाखेची स्थापना १९८३ साली करण्यात आली आहे. एम. सी. ए. व एम. पी. एम. हे अभ्यासक्रम या ठिकाणी शिकविले जातात. निकालाची चांगली परंपरा, विद्यार्थ्यांसाठी चांगले उपक्रम यामुळे ही शाखा विद्यार्थ्यांमध्ये प्रिय ठरली आहे. विद्यार्थ्यांचा प्रतिसाद वाढला आहे.

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने रेणुका स्वरुप इन्स्टिटट्यूट ऑफ करिअर कोर्सेस पुणे या शाखेच्या माध्यमातून विविध करिअर कोर्सेस उपलब्ध करून दिले आहेत. पूर्व प्राथमिक शिक्षिका, नृत्य, छंदवर्ग, फॅशन शो, ड्रेस डिझायनिंग असे रोजगाराभिमुख उपक्रम या शाखेत राबविले जात आहेत. लोटे घाणेखुंट येथे नर्सिंग कॉलेज व पॅरामेडिकल सायन्स कॉलेजची स्थापना केली आहे. कोकणासारख्या मागास भागात आरोग्यविषयक सुविधा निर्माण करण्याचा हेतुही साध्य होत आहे.

पुणे येथील कम्युनिटी कॉलेजच्या माध्यमातून महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने एक वेगळे परंतु महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. शिक्षणाच्या प्रवाहातून बाहेर फेकलेल्या विद्यार्थ्यांना स्वत:च्या पायावर उभे करण्याचे काम हे महाविद्यालय करत आहे. प्रथमोपचार, आपत्ती व्यवस्थापन, कृत्रिम श्वसन व जीवरक्षण विषयाचे प्रमाणपत्र अभ्यासक्रम या महाविद्यालयात सुरु आहेत. या अभ्यासक्रमांना विद्यार्थ्यांचा प्रतिसादही चांगला मिळतो आहे. अकुशल मनुष्यबळाचे रुपांतर कुशल मनुष्यबळात निर्माण करण्यामध्ये हे महाविद्यालय यशस्वी ठरत आहे. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीची उच्च माध्यमिक विद्यालये, पदवी, पदव्युत्तर व व्यावसायिक महाविद्यालये संस्थेच्या ध्येयधोरणाप्रमाणे वाटचाल करीत असून बदलत्या काळानूसार नव्या संकल्पना राबवित आहेत.

## संदर्भ आणि टिपा


१. आपटे श्री. ग., महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी प्रासंगिक, **दै. सकाळ**, पुणे, दि. २६.९.२००१, पृ. ६.

२. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी, **माहिती पुस्तिका**, पुणे, १९९९, पृ. १२.

३. पाटील म. ग., **भारतातील उच्च शिक्षणाची स्थिती**, अस्मिता प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती, २००८ पृ. २२.

४. गरवारे महाविद्यालय, माजी विद्यार्थी संघ, **अहवाल**, २०१०, पुणे, पृ. ४.

५. वानखेडे सं. भा., **पुण्यातील शैक्षणिक प्रवेशांची समस्या व उपाय**, जागर प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, १५ ऑगस्ट २०११, पृ. ३७.

६. जाधव नितीन, **पुणे शहरातील कमवा व शिका योजना - एक अभ्यास**, शिक्षणशास्त्र पदवीकरता लघुप्रबंध, अरण्येश्वर महाविद्यालय, पुणे, २०१२, पृ. ९०.

७. गिरमे शांताराम (संपा.), **जे. पे. नाईक यांची निवडक भाषणे**, रूट फौंडेशन, १९९९, पृ.६१.

८. कुलकर्णी अमृता, **शैक्षणिक समस्या**, पंचवटी प्रकाशन, पुणे, २०१२, पृ. ५७.

९. वार्षिक अहवाल, **महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी**, २०१०-११, पृ. ३०.

१०. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी, पूर्वोक्त, पृ. २४.

११. भावबंध स्मरणिका, म.ए.सो. भावे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, पुणे, २००९, पृ. ७.

१२. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी, **अमृतमहोत्सव स्मारक ग्रंथ**, पुणे, १९६०, पृ. २८.

१३. वार्षिक अहवाल, **महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी**, पुणे, २०१०-११, पृ. १९.

१४. वार्षिक अहवाल, **महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी**, पुणे, २०११-१२, पृ. २२.

१५. कित्ता, पृ. ३५.

१६. कित्ता, पृ. ३६.

१७. वार्षिक अहवाल, **महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी**, पुणे, २०१०-११, पृ. १३.

१८. कित्ता, पृ. २२.

१९. कित्ता, पृ. ३५.

२०. कित्ता, पृ. ३८.

२१. वार्षिक अहवाल, **महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी**, पुणे, १९९९-२०००, पृ. ४२.

२२. वार्षिक अहवाल, **महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी**, पुणे, २०१०-११, पृ. ४८.

२३. इन्स्टिटट्यूट ऑफ मॅनेजमेंट ॲन्ड करिअर कोर्सेस, **माजी विद्यार्थी अहवाल,** पुणे, २०११, पृ.११.

२४. कित्ता, पृ. २५.

२५. वार्षिक अहवाल, **महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी**, पुणे, १९८९-९०, पृ. ३६.

२६. वार्षिक अहवाल, **महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी**, पुणे, २०११-१२, पृ. ४७.

२७. स्कूल ऑफ पॅरामेडिकल, विद्यार्थी पालक संवाद भेट, **अहवाल**, २०१३, पृ. ५.

२८. स्कूल ऑफ पॅरामेडिकल, **प्लेसमेंट अहवाल**, पुणे, २०१३, पृ. १०.

२९. माहितीपत्रक, **महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी कम्युनिटी कॉलेज**, पुणे, २०१०, पृ. ३.

३०. वार्षिक अहवाल, **महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी**, पुणे, २०११-१२, पृ. ३९.

***************

## प्रकरण ६

# महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे उल्लेखनीय उपक्रम व योगदान

६.१ म.ए.सो. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे वसतिगृह, पुणे (१९५८) :

६.२ म.ए.सो. शक्ती जिम्नॅशिअम, पुणे (१९९६) :

६.३ म.ए.सो. शिक्षण प्रबोधिनी, पुणे (२०००)

६.४ म.ए.सो. व्यक्तिमत्त्व विकास केंद्र, पुणे (२००६) :

६.५ म.ए.सो. ॲकॅडमी ऑफ करिअर एक्सलंस, पुणे (२०१०) :

६.६ म.ए.सो. सरस्वती निवास वसतिगृह :

६.७ महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी क्रीडावर्धिनी :

६.८ महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी राबविलेले उपक्रम:

६.९ महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे माजी विद्यार्थी :

६.१० महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे शिक्षक :

६.११ महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांचे अभिप्राय :

**प्रस्तावना :**

'महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी' ही मोठा कार्यविस्तार असणारी महाराष्ट्रातील अग्रगण्य शिक्षण संस्था आहे. या संस्थेने गेल्या दीडशे वर्षात महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्रात महत्त्वाचे योगदान दिले आहे. पुण्यात स्थापन झालेल्या महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीची वाढ पुण्याबाहेरही झाली आहे. नवी मुंबई, सातारा, अहमदनगर या जिल्ह्यातही संस्थेने आपला शाखाविस्तार केला आहे. विविध शाखांच्या माध्यमातून महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचे काम केले आहे. पूर्वप्राथमिक शिक्षणापासून ते पदव्युत्तर शिक्षणापर्यंत त्याचबरोबर व्यावसायिक शिक्षणापर्यंत संस्थेने सुविधा उपलब्ध करून दिली आहे. शिक्षण हे माणसाच्या विकासाचे साधन आहे. मानवी समाजाचा सर्वांगीण विकास होण्यासाठी शिक्षणाची आवश्यकता आहे. कोणत्याही समाजाची अथवा राष्ट्राची प्रगती शिक्षणातूनच मोजली जाते. आपल्या देशात शिक्षणाकडे विशेषत्त्वाने लक्ष देण्यात आले नाही, त्यामुळेच आपल्या देशाचा विकासाचा आलेख समाधानकारकरित्या उंचावू शकला नाही. त्यामुळेच भारतात शिक्षण प्रसाराची चळवळ महत्त्वाची ठरते. या अनूषंगाने विचार करता महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे शिक्षणक्षेत्रातील हे कार्य किती महत्त्वाचे आहे हे दिसून येते.

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने पूर्वप्राथमिक शाळा, प्राथमिक, माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिक विद्यालये, उच्च महाविद्यालये, व्यावसायिक अभ्यासक्रम देणारी महाविद्यालये या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचे महत्त्वाचे काम केले आहे. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने समाजात जो शिक्षणप्रसार केला आहे त्याचे परिणाम नोंद घेण्यासारखे आहेत. समाजात घडणारी कोणतीही गोष्ट समाजापासून अलिप्त राहू शकत नाही. घडणाऱ्या घटनेचा समाजावर आणि समाजाचा त्या घटनेवर कोणत्या ना कोणत्या स्वरूपात परिणाम होत असतो. समाज आणि समाजातील प्रत्येक घटनेचा परस्परांशी संबंध असतो.

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या पूर्व प्राथमिक ते महाविद्यालयांपर्यंतचा कारभार बघितल्यानंतर या सर्व कार्याचा समाजावर कोणता परिणाम झाला, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने कोणते सामाजिक उपक्रम राबविले आहेत, कोणकोणत्या सामाजिक उपक्रमात सहभाग घेतलेला आहे याची माहिती घेणे आवश्यक आहे. प्रस्तुत प्रकरणात महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या विविध सामाजिक उपक्रमांची माहिती तसेच संस्थेने शहरी भागातील शाळा, महाविद्यालयाप्रमाणे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी कोणते नाविण्यपूर्ण उपक्रम ह्यांची माहिती घेतली जाणार आहे. त्याचबरोबर संस्थेने राबविलेल्या उल्लेखनीय उपक्रमांचा अभ्यास या ठिकाणी मांडण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे

संस्थेच्या माजी विद्यार्थ्यांचा देशाला समाजाला कोणता उपयोग झाला याचाही परामर्श या प्रकरणात घेतला जाणार आहे व प्रसिध्द अशा माजी विद्यार्थ्यांच्या मुलाखतीव्दारे संस्थेच्या विकासाचा आढावा घेतला जाणार आहे. शिवाय संस्थेच्या वाटचालीविषयी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या प्रतिक्रिया व मतांचा आढावाही घेण्यात येणार आहे.

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी नेहमीच विद्यार्थीहिताला प्राधान्य देणाऱ्या उपक्रमांच्या माध्यमातून कार्यरत राहिली आहे. अशा विद्यार्थ्यांना उपयोगी ठरणाऱ्या शक्ती जिम्नॅशियम पुणे, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे वसतिगृह, शिक्षण प्रबोधिनी, व्यक्तिमत्त्व विकास केंद्र, ॲकॅडमी ऑफ करिअर एक्सलंस, सरस्वती निवास वसतिगृह, क्रीडावर्धिनी या वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमांची माहिती प्रस्तुत प्रकरणात घेतली जाणार आहे. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने आपल्या संस्थात्मक कार्याला नेहमीच समाजहिताची दिशा दिली आहे. उपरोक्त उपक्रम हे समाजातील विविध स्तरातील विद्यार्थ्यांच्या कल्याणाचे आहेत.

## ६.१ म.ए.सो. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे वसतिगृह, पुणे (१९५८) :

विद्यार्थ्यांना शिक्षण देत असताना कालानुरुप नव्या संकल्पना राबविण्याचे धोरण महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने राबविले आहे. विद्यार्थ्यांना सर्वांगीण प्रगतीच्या दिशेने नेण्यात महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने मोठा वाटा उचलला आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या वसतिगृहाचा उपक्रमही असाच महत्त्वाचा आहे. गरवारे महाविद्यालयाच्या परिसरात विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र वसतिगृहाची स्थापना महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्यावतीने करण्यात आली आहे.

पुणे हे स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच शैक्षणिक केंद्र आहे. पुण्यासारख्या शहरात महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागातून विद्यार्थी येत असतात. या विद्यार्थ्यांची निवासाची व्यवस्था हा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न असतो. त्यामुळेच महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे विद्यार्थी कल्याणाची भूमिका घेत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या वसतिगृह स्थापन करण्याचा निर्णय घेतला. १९५८ साली या विद्यार्थी वसतिगृहाची स्थापना करण्यात आली. विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यामध्ये वसतिगृह हा सुद्धा महत्त्वाचा भाग आहे. मोठ्या शहरांमध्ये बाहेरून शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांना निवासाची व्यवस्था होण्यात खूप अडचणी येतात. अशा विद्यार्थ्यांना निवासव्यवस्थेच्या अडचणीतून मुक्त करण्यासाठी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने पाऊल उचलले. गरवारे महाविद्यालयाच्या आवारात वसतिगृहाची स्थापना केली. विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र वसतिगृह

स्थापन करून उच्च शिक्षणासाठी पुण्यात येणाऱ्या विद्यार्थ्यांना एक महत्त्वाच्या प्रश्नातून मुक्त करण्याचे काम महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने केले आहे.

उत्तम निवासव्यवस्था, सर्वंकष सुविधा, स्वच्छता व टापटीप आणि विविधरंगी फुलझाडांनी बहरलेली बागही या वसतिगृहाची खास वैशिष्टये आहेत. या वसतिगृहाच्या माध्यमातून पुण्याबाहेरून पुण्यात शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांची मोठी सोय झाली आहे. घरापासून दूर असलेल्या विद्यार्थ्यांची योग्य ती काळजी घेऊन त्यांच्या अभ्यास, आरोग्य, जेवण यादृष्टीने चांगली व्यवस्था करण्याची जबाबदारी वसतिगृहाच्या माध्यमातून पार पाडली जात असल्याचे वसतिगृह माहिती पत्रकावरून दिसून येते. दररोज सकाळी ६.०० वा. व्यायामासाठी वसतिगृहातील सर्व विद्यार्थी गणवेशात सहभागी होतात ही या वसतिगृहाच्या दृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण बाब आहे. विद्यार्थ्यांना शिस्त व संस्काराचे धडे दिले जातात.

वसतिगृहाच्या सर्व इमारतींवर पाणी तापविण्यासाठी सौर ऊर्जा संयंत्रे बसविण्यात आली आहेत. मुलामुलींसाठी स्वतंत्र करमणुक कक्ष आहे. त्यामध्ये रंगीत दूरचित्रवाणी संच, वृत्तपत्रे, नियतकालिके, टेबलटेनिस, कॅरमबोर्ड व भारतीय वाद्यांची सोय आहे. अभ्यासाव्यतिरिक्त विद्यार्थ्यांनी इतरही छंद जोपासावेत व विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला झळाळी प्राप्त व्हावी असा यामागचा उद्देश आहे. वसतिगृहातील सर्व विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यात वसतिगृह प्रशासन कसूर करत नाही. दरवर्षी सर्व विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी होते. व नियमित उपचारासाठी स्वतंत्र, पूर्णवेळ वैद्यकीय अधिकाऱ्यांची नेमणूक केली गेली आहे. वसतिगृहात असताना अगदी व्यवस्थितपणे विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेतली जाते. वसतिगृहात विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा, परिसंवाद, कार्यक्रम, सूर्यनमस्कार वर्ग, सहली, आरोग्य तपासणी यांचे आयोजन केले जाते. विद्यार्थ्यांनी शारीरिक, मानसिक स्वास्थ्य टिकून राहावे, त्यांचा उत्साह कायम राहवा आणि विद्यार्थ्यांकडून उत्तम अभ्यास होऊन त्यांनी देदिप्यमान यश मिळवावे या हेतूने अशा उपक्रमांचे आयोजन केले जाते. त्याचबरोबर दरवर्षी वसतिगृहातील ‘सर्वोत्तम विद्यार्थी’ व ‘सर्वोत्तम विद्यार्थिनी’ हा पुरस्कार एका विद्यार्थ्याला व विद्यार्थिनीला देऊन गौरविण्यात येते. विद्यार्थ्यांमधील चांगल्या गुणांना अधिक वाव देण्यासाठी विद्यार्थ्यांमधील विधायक विचारांचा गौरव करण्यासाठी हा पुरस्कार दिला जातो.

वसतिगृहाच्या आवारामध्ये गांडूळशेती प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला आहे. वसतिगृहाच्या मेसमधील वाया जाणारा कचरा, उरलेले अन्न यांचा या प्रकल्पामध्ये वापर केला जातो.

या प्रकल्पावर आधारित अभ्यास व संशोधन सूक्ष्मजीवशास्त्र व वनस्पतीशास्त्र विभागामार्फत करण्यात येते.[१]

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने जे उल्लेखनीय व वैशिष्टयपूर्ण उपक्रम राबविले आहेत त्यामधील अत्यंत महत्त्वाचा असा हा उपक्रम आहे. पुणे हे शैक्षणिकदृष्ट्या महत्त्वाचे केंद्र म्हणून विकसित झाले असताना उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी व विद्यार्थिनींना निवासाची अत्यंत चांगल्या पद्धतीने व्यवस्था करण्यासाठी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने वसतिगृहाची स्थापना केली ही खूप महत्त्वाची बाब वाटते. कारण उच्च शिक्षण घेणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांना या वसतिगृहाचा मोठा आधार मिळतो.

ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थ्यांना केवळ आर्थिक समस्येमुळे शिक्षण घेणे दुरापास्त होते. अनेक विद्यार्थी शिक्षणासाठी शहरामध्ये येतात मात्र त्यांच्या निवासाचा प्रश्न उभा राहतो. निवासाची सोय नसल्याने अनेक विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित राहवे लागते. आता नव्याने स्थापन होणाऱ्या माध्यमिक उच्च माध्यमिक तसेच महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांकरिता वसतिगृहाची बांधणी करणे शिक्षणखात्याने अनिवार्य केलेले आहे. म्हणजेच शैक्षणिक धोरण राबवणाऱ्या विभागांना देखील विद्यार्थी वसतिगृहाचे महत्त्व समजू लागले आहे. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने १९५९ साली विद्यार्थी वसतिगृह स्थापन केले.

## ६.२ म.ए.सो. शक्ती जिम्नॅशिअम, पुणे (१९९६) :

संस्थेच्या दीडशे वर्षांच्या इतिहासाचा आढावा घेतल्यानंतर या गोष्टी सहज लक्षात येतात. शक्ती जिम्नॅशिअम हा सुध्दा संस्थेचा असाच वेगळा परंतु महत्त्वाचा उपक्रम आहे. विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाचा हेतू डोळ्यासमोर ठेवून संस्थेने आपली वाटचाल ठेवली आहे. विद्यार्थी हाच केंद्रबिंदू मानून शिक्षण क्षेत्रातील नव्या वाटा महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने चोखाळल्या आहेत. त्यामागे विद्यार्थ्यांचे सर्वांगीण कल्याण हाच हेतू आहे. विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाबरोबरच शारीरिक विकासाची आवश्यकताही तितकीच असते. ही बाब लक्षात घेऊन महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने शक्ती जिम्नॅशिअमची स्थापना १९९६ साली केली.[२] या ठिकाणी विद्यार्थ्यांना विविध व्यायाम प्रकारांबद्दल शास्त्रीय स्वरूपाचे मार्गदर्शन करण्यात येते.

आबासाहेब गरवारे महाविद्यालयाच्या प्रांगणात शक्ती जिम्नॅशिअमची उभारणी करण्यात आली आहे. इ. स. १९९७ मध्ये स्थापन झालेल्या या जिम्नॅशिअमच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या शारीरिक विकासासाठी प्रयत्न करण्यात येतात. जिम्नॅशिअमसाठी लागणाऱ्या सर्व आधुनिक

सामुग्रीने सुसज्ज असलेले हे दालन विद्यार्थ्यांच्या शारीरिक विकासासाठी महत्त्वाची भूमिका बजावित आहे. जिम्नॅशिअमच्या विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमधून देदीप्यमान यश मिळविले आहे. १९९१ साली मुंबई येथे झालेल्या पश्चिम विभागीय शालेय क्रीडा स्पर्धेमध्ये संस्थेचा विद्यार्थी मकरंद सानप याने वैयक्तिक क्रीडा प्रकारात सुवर्ण पदक मिळविले व पुढे २०१० पर्यंत राज्यस्तरीय पातळीवर संस्थेच्या १२२ खेळाडूंनी पदके मिळवली आहेत. म्हणजेच महाविद्यालयातील अभ्यासक्रमांच्या माध्यमातून बौद्धिक उंची वाढविण्याचा प्रयत्न करून हे विद्यार्थी शक्ती जिम्नॅशिअममध्ये शरीरसंपदेचा विकास करून घेतात. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचा हा अतिशय स्तुत्य असा उपक्रम आहे. कारण विद्यार्थ्यांच्या हितासाठी संस्था जे विविध उपक्रम राबविते त्यामधील हा महत्त्वाचा उपक्रम आहे. बौद्धिक विकासाबरोबरच विद्यार्थ्यांना अत्याधुनिक सामग्रीच्या आधारे व्यायाम करता यावा, शरीर स्वास्थ्य टिकवण्यासाठी उत्तम दर्जाची प्रशिक्षकांकडून प्रशिक्षण मिळावे यासाठीच शक्ती जिम्नॅशियमची स्थापना महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या वतीने करण्यात आली.

अत्याधुनिक सामग्री, तज्ज्ञ परीक्षक उपलब्ध करून महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने शक्ती जिम्नॅशियमची उभारणी केली. उत्तम आरोग्यप्राप्तीसाठी व शरीरस्वास्थ्यासाठी संस्थेने टाकलेले हे पाऊल अतिशय महत्त्वाचे आहे. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या विविध उल्लेखनीय उपक्रमातील हा एक महत्त्वाचा उपक्रम ठरतो. या उपक्रमाअंतर्गत महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने शक्ती जिम्नॅशियममध्ये अत्याधुनिक व्यायाम साहित्य उपलब्ध करून दिलेले आहे. या व्यायाम शाळेत अनेकांनी व्यायाम करून राष्ट्रीय पातळीवर अनेकांनी शरीरसौष्ठव सारख्या क्रीडाप्रकारामध्ये आजवर यश मिळवलेले आहे यामध्ये शरद अनगळ, तुषार खटावकर, ओमकार तांबे यांसारख्या खेळाडूंची नावे घेता येतील.

पुणे शहरामध्ये अत्याधुनिक साधन सामग्रीने युक्त अशा ज्या व्यायामशाळा आहेत त्यामध्ये महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या शक्ती जीमचा क्रमांक हा निश्चितच श्रेष्ठत्तम दर्जाचा आहे. यामध्ये तिळमात्र शंका नाही. एका शैक्षणिक संस्थेने विद्यार्थ्यांमध्ये पालक व नागरिकांमध्ये व्यायामाची आवड निर्माण करण्याचा हा प्रयत्न केवळ स्तुत्य नव्हे तर समाजामध्ये आरोग्याविषयी आस्था निर्माण करणारा एका वेगळ्या प्रकारचा आहे. यामुळेच शक्ती जिम्नॅशिअमच्या दशकपूर्ती सोहळ्यानिमित्त बोलताना डॉ. संजय जोशी म्हणाले की, 'शैक्षणिक सुधारणेसाठी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने शक्ती जिमची स्थापना करून सर्वसामान्यांना आरोग्यपूर्ण जीवन जगण्याचा मंत्र दिलेला

आहे. भावी पिढीच्या मानसिक व शारीरिक सदृढतेचे गमक अशा व्यायामशाळांमध्ये दडलेले असते.'[३] यावरून शक्ती जिमच्या कार्याविषयीची माहिती समजून घेण्यास सहाय्य होते.

डॉ. आनंद नामजोशी यांनी आरोग्यशास्त्र या ग्रंथामध्ये उत्तम आरोग्यासाठी खालीलप्रमाणे नोंद करून ठेवलेली आहे. 'व्यक्तीचे चांगले आरोग्य स्वत:सह देशाला घडवत असते, त्यामुळे आरोग्यपूर्ण जिवनासाठी प्रत्येकाने आग्रही असायला हवे व चांगली आरोग्यसंपदा मिळवण्यासाठी महत्त्वाच्या गोष्टींचा अंगीकार करायला हवा. त्यानुसार

१. जेवणाच्या वेळा ठरलेल्या असाव्यात.

२. आहार पौष्टिक असावा.

३. मैदानी खेळ खेळावेत.

४. पोहणे, सायकल चालवणे, वेगात चालणे यांसारखे प्रकार करावेत.

५. नियमितपणे व्यायाम करावा.[४] यावरून व्यायामाचे महत्त्व माणसाच्या जीवनामध्ये किती आहे हे आपल्या ध्यानात येते. भारतीय केंद्र सरकारच्या आरोग्य विभागाने २००५ मध्ये भारतीय नागरिकांच्या आरोग्याचा अभ्यास करून 'इंडियन हेल्थग्राफ' या नावाने अहवाल प्रसिद्ध केला व यामध्ये स्पष्ट शब्दात लिहिले आहे 'भारतीय लोकांचा पुढील वीस वर्षांमध्ये सर्वाधिक पैसा हा आरोग्यविषयक समस्यांसाठी खर्च होणार आहे याकरिता आत्तापासून धोरण राबवणे आवश्यक असून भारतीय नागरिकांनी नियमित व्यायामाला प्राधान्य देणे गरजेचे आहे.[५] याचाच अर्थ असा की, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने शक्ती जिमची स्थापना केल्याने अनेकांना आरोग्याच्या चांगल्या सवयी लागल्या व जिममध्ये सहभागी झालेल्या लोकांपासून प्रेरणा घेऊन अनेकजण आपल्या स्वत:च्या आरोग्याविषयी काळजी करू लागले. हाच संस्थेच्या यशाचा अर्थ समजला पाहिजे.

## ६.३ म.ए.सो. शिक्षण प्रबोधिनी, पुणे (२०००)

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने महाराष्ट्राच्या शैक्षणिक विकासात भरीव योगदान दिले आहे. केजी टू पीजी पर्यंतच्या शिक्षणाची संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्याबरोबर दर्जेदार व सकस शिक्षण आणि व्यक्तिमत्त्व विकासाच्या संधी विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने विविध उपक्रम राबविले आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने शक्ती जिम्नॅशियम, विद्यार्थी वसतिगृह यांचा उल्लेख करावा लागतो. संस्थेच्या महत्त्वाच्या उपक्रमांमधील एक महत्त्वाची शिक्षण क्षेत्राला विधायक दिशा देणारी कृती म्हणजे शिक्षण प्रबोधिनी कार्यान्वित करणे. महाराष्ट्र

एज्युकेशन सोसायटीच्या सर्व शाळांबरोबर शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या इतर संस्थानाही शैक्षणिक बाबतीत मार्गदर्शन करणारी ही शिक्षण प्रबोधिनी म्हणजे महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचा अत्यंत उल्लेखनीय स्वरूपाचा व विशेष नोंद घेण्यासारखा उपक्रम आहे.

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या सर्व शाळांना गुणवत्ता वाढीसाठी मदत करणे, शिक्षण क्षेत्रातील नवीन संकल्पना, तंत्र व कौशल्ये शिक्षकांपर्यंत पोहचविणे समुपदेशनाच्या मार्गाने शाळांमधील विद्यार्थी-वर्तनाच्या समस्या सोडविण्यास मदत करणे, अभ्यासक्रमाव्यतिरिक्त आपल्या विषयांचे अधिक व्यापक व सखोल ज्ञान मिळेल अशा उपक्रमांचे शिक्षकांसाठी आयोजन करणे, नियोजित अभ्यासक्रम अधिक प्रभावीपणे शिकवता यावा यासाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळवून देणे ही उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून संस्थेने शिक्षण प्रबोधिनीची स्थापना केली.[६] यातून महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीची दृष्टी अभ्यासकांच्या लक्षात येते. आजच्या काळात शाळांच्या गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. शिक्षणाचा फायदा खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी वेगळ्या उपाययोजनांची अंमलबजावणी करण्याची आवश्यकता आहे. त्याचबरोबर बदलत्या काळात विद्यार्थी वर्तनाच्या समस्या पुढे येत आहेत. त्या सोडविण्याची आवश्यकता आहे. या आवश्यकतेतूनच महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने शिक्षण प्रबोधिनीची स्थापना केली. इ. स. २००० मध्ये शिक्षण प्रबोधिनीची स्थापना करून शिक्षण क्षेत्रातील नव्या आव्हानांना सामोरे जाण्याची भूमिका महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने घेतली.

आजच्या काळात सर्वच क्षेत्रात स्पर्धा मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. अशा या स्पर्धेच्या जगात गुणवत्ता वाढवणे आणि टिकवणे हे खूप महत्त्वाचे आहे. यासाठीच शिक्षण प्रबोधिनी प्रत्येक शाळेला गुणवत्ता वाढविण्यासाठी मदत करत असते. शिक्षण क्षेत्रात नवनवीन संकल्पना येत आहेत. या नवनवीन संकल्पना त्यातील तंत्र आणि कौशल्ये शिक्षकांपर्यंत पोहचविण्यासाठी शिक्षण प्रबोधिनीच्या माध्यमातून प्रयत्न महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने केला आहे. माहिती-तंत्रज्ञानाच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांना विविध प्रश्न भेडसावत असतात. अशा विद्यार्थ्यांचे प्रश्न समुपदेशनाच्या मार्गाने सोडविण्याचे कार्य शिक्षण प्रबोधिनी करत असते. शैक्षणिक क्षेत्रातील आणखी एक नोंदवले जाणारे महत्त्वाचे निरीक्षण म्हणजे शिक्षकांच्या जाणिवा, ज्ञान विस्तारण्यात येणाऱ्या अडचणी. त्यामुळे अगदी जाणीवपूर्वक अभ्यासक्रमाव्यतिरिक्त आपापल्या विषयांचे अधिकाधिक ज्ञान कसे मिळेल याविषयी उपक्रम राबविण्याच्या दृष्टीने शिक्षण प्रबोधिनी काम करते.

नियोजित अभ्यासक्रम अधिक प्रभावीपणे शिकवता यावा यासाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळवून देण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून शिक्षण प्रबोधिनी काम करते.

अशाप्रकारे अत्यंत विधायक दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून शिक्षण प्रबोधिनीचे काम चालू असते. शिक्षण प्रबोधिनीचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या शाळांपुरते आपले काम मर्यादित न ठेवता शैक्षणिक परिवर्तनासाठी आणि शिक्षण क्षेत्रात विधायक मूल्यांची रुजवणूक करण्यासाठी अन्य शिक्षण संस्थानाही ही प्रबोधिनी मदत करते. यासाठी आवश्यक असणारे उत्कृष्ट, सुसज्ज ग्रंथालय, संगणक विभाग, संशोधिका हे शिक्षण प्रबोधिनीने विकसित करून आपला संपर्क अधिकाधिक संस्थांशी ठेवून शिक्षण क्षेत्रात परिवर्तन करावे या दृष्टीने महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीची वाटचाल सुरू आहे. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या वतीने चालविण्यात येणारे शिक्षण प्रबोधिनी हे केंद्र संस्थेच्या पौड रस्त्यावरील सरस्वतीभवन या शैक्षणिक संकुलात कार्यरत आहे.

उपरोक्त विवेचनावरुन हे स्पष्ट होते की, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी ही शिक्षणाच्या प्रसारासाठी, शिक्षण क्षेत्रातील विधायक बदलांसाठी काम करणारी एक अग्रणी संस्था आहे. या संस्थेच्या माध्यमातून विविध उल्लेखनीय उपक्रम राबविले जातात. संपूर्ण महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्राला दिशा दिग्दर्शन करण्याच्या कामात महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी ही शिक्षण संस्था कशी कार्यरत आहे याची माहिती शिक्षण प्रबोधिनीच्या अभ्यासातून मिळते. शिक्षण प्रबोधिनीचा हा उपक्रम एक वैशिष्ट्यपूर्ण आहे शिवाय शिक्षण क्षेत्रातील एक नवा प्रयोग म्हणून अभ्यासकांना याकडे पाहवे लागेल.

संस्थेच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व शाळांच्या गुणवत्ता वाढीसाठी, विद्यार्थ्यांचे अभ्यास आणि वयपरत्वे निर्माण होणाऱ्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी शिक्षण प्रबोधिनी काम करते. शिक्षकांनी आपले ज्ञान वाढविणे अतिशय आवश्यक असते. यासाठी शिक्षकांच्याही ज्ञानाच्या कक्षा रुंदावण्यासाठी शिक्षण प्रबोधिनी कार्यरत आहे. त्याचबरोबर महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी अंतर्गत शाळांना याचा उपयोग व्हावा पण त्यासोबत इतर शाळा, संस्थानाही त्याचा लाभ व्हावा अशी भूमिका या प्रबोधिनीच्या माध्यमातून घेण्यात आली आहे. आपल्या विचारांचे एवढे व्यापकत्व महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने घेतले आहे.

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या शिक्षण प्रबोधिनी मार्फत विविध उपक्रम राबविले जातात. चर्चात्मक, निरीक्षणात्मक, कार्यशाळा आणि मार्गदर्शनात्मक असे विविध कार्यक्रम घेतले जातात.

प्रस्तुत ठिकाणी उदाहरणादाखल काही उपक्रमांची नोंद घेतली आहे. सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन ही पद्धत पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी अंमलात आणली गेली आहे. ही पद्धत परिणामकारकतेने शिक्षक व पालकांपर्यंत पोहचविण्यासाठी प्राथमिक व माध्यमिक शाळांसाठी सहा कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले होते.

पुणे परिसरातील शैक्षणिक संस्थांना शिक्षण प्रबोधिनीच्या कार्यक्रमांचा परिचय व्हावा यासाठी अनौपचारिक कार्यक्रम घेण्यात आला होता. बदलत्या अभ्यासक्रमासंदर्भात शिक्षकांसाठी प्रबोधन वर्ग घेण्यात आला होता. शाळांमध्ये काम करणाऱ्या आजीव सदस्यांसाठी प्रबोधिनीच्या वतीने चर्चात्मक कार्यक्रम राबविला गेला. मुलींचे शिक्षण आणि पालक सुसंवाद या अनुषंगाने शाळांच्या पदाधिकाऱ्यांचा प्रबोधनात्मक व चर्चात्मक कार्यक्रमही शिक्षण प्रबोधिनीच्या मार्फत घेण्यात आला. इयत्ता १० वीच्या शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी निकालवाढ व अभ्यास कौशल्यांचा विकास या विषयांवर सुरुवात करून नवनियुक्त शिक्षकांसाठी संस्था परिचय, भूमिका व नवनियुक्तांच्या समस्या या बाबींवर लक्षवेधी कार्यक्रमांचे आयोजन शिक्षणप्रबोधिनीच्या वतीने करण्यात आले होते.

इतिहास शिक्षकांसाठी अध्यापन मार्गदर्शन करण्यासाठी 'सर्व शाळांना भेट' हा कार्यक्रम राबविण्यात आला. शालेय सेवकांसाठी शिक्षण प्रबोधिनीच्या माध्यमातून कार्यशाळा घेण्यात आली. संकल्पना व कार्यवाहीची कल्पना देण्यासाठी कृतीसंशोधन प्रकल्पांचे सादरीकरण करण्यात आले. पॉवर पॉइंट तयार करण्याचे तंत्र व मंत्र यासाठी अनेक कार्यशाळा घेण्यात आल्या. पूर्व प्राथमिक शिक्षणासाठी प्रबोधिनीने काम करण्याचे ठरविले. त्याअनुषंगाने विविध वक्त्यांच्या व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले. प्राथमिक स्तरावरील इंग्रजी भाषेच्या अध्यापनाचा दर्जा उंचावण्यासाठी कार्यशाळाही प्रबोधिनीने आयोजित केल्या होत्या.

### ६.४ म.ए.सो. व्यक्तिमत्त्व विकास केंद्र, पुणे (२००६) :

सध्या समाजातील सर्वच क्षेत्रांमध्ये प्रचंड मोठ्या प्रमाणावर स्पर्धा निर्माण झाली. म्हणूनच सध्याच्या युगाला स्पर्धेचे युग असे म्हटले जाते. या स्पर्धेच्या काळात प्रत्येक विद्यार्थ्याने अधिकाधिक ज्ञान मिळवून आपली प्रतिभा सिद्ध करणे आवश्यक असते. यासाठी आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासाचा विचार करणे ही काळाची गरज आहे. या गरजेतूनच महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने व्यक्तिमत्त्व विकास केंद्राची स्थापना केली आहे. विद्यार्थी आणि शिक्षकांच्या व्यक्तिमत्त्व विकासात भर पडावी यासाठी संस्थेने हा उपक्रम हाती घेतला आहे. हा उपक्रम विद्यार्थी व शिक्षकांच्या विकासाला हातभार लावणारा असल्यामुळे निश्चितच महत्त्वाचा आहे. व्यक्तिमत्त्वाचा

विकास म्हणजे व्यक्तिच्या जाणिवांचा व विचारांचा विकास असतो. सकारात्मक विचारांच्या कक्षा रुंदावणे आत्मविश्वासाने परिस्थितीला सामोरे जाणे, ही चांगल्या व्यक्तिमत्त्वाची लक्षणे आहेत. अशा व्यक्तिमत्त्वांची माणसे घडविण्याचे काम शाळा महाविद्यालये व शिक्षणसंस्थांना करावे लागत असते. म्हणूनच महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने व्यक्तिमत्त्व विकास केंद्राची स्थापना करून विविध उपक्रम राबविले आहेत. त्याचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी संचलित व्यक्तिमत्त्व विकास केंद्रातर्फे समुपदेशकांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्यामार्फत शाळेतील विद्यार्थ्यांना समुपदेशन केले जाते. केंद्राच्या सर्व शाखांमधील कामाचे संचालन करण्यासाठी तसेच संस्थेच्या परिघाबाहेरील क्षेत्रात काम करण्यासाठी संस्थेच्या 'सरस्वती भवन' मध्ये केंद्राचे मुख्य कार्यालय सुरु आहे.[७] या केंद्राचे सल्लागार म्हणून आरोग्यतज्ज्ञ डॉ. ह. वि. सरदेसाई, साहित्यिक मंगला गोडबोले, ज्येष्ठ मानसतज्ज्ञ डॉ. सु. वा. देशपांडे, विख्यात मनोविकारतज्ज्ञ डॉ. विद्याधर वाटवे, डॉ. भरत देसाई हे मान्यवर कार्यरत आहेत. व्यक्तिमत्त्व विकास केंद्राच्या माध्यमातून शिक्षकांच्या प्रशिक्षण कार्यशाळा घेण्यात येतात. अभ्यासकौशल्य कार्यशाळांचेही आयोजन केले जाते. अभिक्षमता मापनाद्वारे संस्थेच्या सर्व शाळांमध्ये समुपदेशन केले जाते. विद्यार्थ्यांचे बुद्धिमापन करण्यात येते.

इयत्ता १०वी पर्यंतचे शिक्षण सरळमार्गी असते. त्यानंतरचे उच्च शिक्षण हे वेगवेगळ्या पातळीवरचे असते. त्यामुळे १०वी नंतरच्या शिक्षणाबाबत विद्यार्थी व पालक संभ्रमित असतात. पुढील उच्चशिक्षण आपल्या पाल्यास कोणत्या प्रकारे द्यायचे याचा निर्णय पालकांना घ्यायचा असतो. शहरी भागातील पालकांना याबाबतची माहिती मिळते. मात्र ग्रामीण भागातील मुलांना व त्यांच्या पालकांना याबाबतची पुरेशी माहिती नसते. अशा ग्रामीण भागातील मुलांसाठी व पालकांसाठी आणि शहरी विद्यार्थी व पालकांच्या वेळ, पैसा यांचा अपव्यय टाळून त्यांनाही योग्य ती माहिती मिळावी या हेतुने या केंद्राच्या माध्यमातून 'वेध भविष्याचा, मार्ग यशाचा' हा उपक्रम सुरु करण्यात आला. विद्यार्थ्यांना बदलत्या परिस्थितीची जाणीव करून देऊन स्वत:च्या करिअरसंबंधीचे निर्णय अधिक नेमकेपणाने घेण्यासाठी मदत करण्याचे काम या उपक्रमाच्या माध्यमातून केले जाते.

सर्वसाधारण मानसिक क्षमता ही व्यक्तिच्या एकूण विकासाची आधारभूत क्षमता मानली जाते. विकासाच्या प्राथमिक टप्प्यावर तिचे प्रमाण केल्यास पुढच्या दीर्घकालीन शिक्षणाचे सुयोग्य नियोजन करता येते. व्यक्तिगत पातळीवर पालक आपल्या पाल्याबाबत हे करू शकतात. अशाच प्रकारचा उपक्रम संस्था पातळीवर राबविला जातो व संस्थेतील विद्यार्थ्यांचे बुध्दिमापन करण्यात येते.

व्यक्तिमत्त्व विकास केंद्राच्या माध्यमातून विशिष्ट बौद्धिक दर्जा असणाऱ्या विद्यार्थ्यांना मदत केली जाते. संस्था पातळीवर ही योजना राबविण्यात आली. केंद्राच्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या शालेय वर्तनात सुधारणा झाली. शाळा चुकविण्याचे प्रमाण कमी झाले. शिक्षकांशी संवाद वाढला. त्याचबरोबर शालेय परीक्षांमधील निकालात सुधारणा झाली. आंतरशालेय स्पर्धांमध्ये सहभाग वाढला. सर्व शाळांचे मुख्याध्यापक व शिक्षक यांच्या सहकार्यामुळे हे शक्य झाले आहे. या उपक्रमाचे चांगले परिणाम दिसून आल्यामुळे हा उपक्रम केंद्राच्यावतीने दरवर्षी राबविला जाणार आहे.

समस्याग्रस्त विद्यार्थ्यांना मानसशास्त्रीयदृष्ट्या समुपदेशन करणे हा केंद्राच्या कामाचा गाभा आहे. याला अनुसरुनच विद्यार्थ्यांच्या विविध मानसिक समस्यांना संपविण्यासाठी व्यक्तिमत्त्व विकास केंद्र काम करते. गैरहजेरी, चोऱ्यामाऱ्या, तोडफोड, खोटे बोलणे, अशा वर्तनात्मक समस्या विद्यार्थ्यांमध्ये आढळतात. शिवाय भयगंड, वैफल्य, नैराश्य, एकलकोंडेपणा इ. भावनिक विकासाशी संबंधित समस्याही विद्यार्थ्यांमध्ये दिसून येतात. त्याचबरोबर अभ्यासाच्या चुकीच्या पद्धती, प्रेरणेचा अभाव अध्ययन अक्षमता अशा बौद्धिक विकासाशी संबंधितदेखील समस्या असतात. शिक्षकांच्या मदतीने अशा प्रकारचे विद्यार्थी शोधून काढून त्यांच्याशी व त्यांच्या पालकांशी व्यक्तिगतरित्या बोलून त्यांचे समुपदेशन करून त्यांना पुन्हा निकोप व्यक्तिमत्त्वाकडे वळविण्याचे काम व्यक्तिमत्त्व विकास केंद्राच्या माध्यमातून केले जाते.

एकेरी पालकत्त्व ही एक समस्या आहे. अकाली निधन किंवा घटस्फोट अशा कारणांमुळे आई अथवा वडील नसणाऱ्या पाल्यांची संख्या हल्ली मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. कोणत्या वयात हा आघात झाला त्याप्रमाणे कमी जास्त गंभीर परिणाम त्या पाल्याच्या एकूणच व्यक्तिमत्त्वावर होत असतो. त्यांच्या विचारांची अथवा प्रगतीची वाट यामुळे खुंटत असते. म्हणून सप्टेंबर २००९ पासून महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या सर्व माध्यमिक शाळांतील मुलामुलींचा आणि त्यांच्या पालकांचीही सर्व प्रकारची माहिती

व्यक्तिमत्त्व विकास केंद्राद्वारे संकलित केली जाते. अशा विद्यार्थ्यांचा व पालकांचा वर्तनाचा अभ्यास करून त्यांचे समुपदेशन करून त्यांच्या समस्या मिटविण्याचे काम केंद्राच्या माध्यमातून केले जाते. संस्थेच्या एकूण आठ शाळांमध्ये एकेरी पालकांचे स्वमदत गट स्थापन करण्यात आले आहेत.

अलिकडच्या काळात काही सामाजिक समस्या गंभीर होत चालल्या आहेत. कुटुंबव्यवस्थेतील, समाजातील ताणतणाव वाढत आहेत. अशा परिस्थितीत कुटुंब आणि

बालसमुपदेशनाचा पदव्युत्तर पदविकेचा स्वायत्त अभ्यासक्रम सुरु करण्यात आला आहे. ११ वर्षापूर्वी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीतर्फे व्यावसायिक शालेय समुपदेशक तयार करणारा हा अभ्यासक्रम आहे. या केंद्रातर्फे वैवाहिक व कौटुंबिक समुपदेशन केंद्र 'स्वीकार' या नावाने सुरु करण्यात आले आहे.

व्यक्तिमत्त्व विकास केंद्र हा महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचा एक वैशिष्ट्यपूर्ण असा उपक्रम आहे. 'मएसो'सारखी शिक्षण संस्था या केंद्राच्या माध्यमातून व विद्यार्थी पालकांसाठी जे काम करत आहे ते अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. विद्यार्थ्यांचे जे मानसिक प्रश्न आहेत त्या प्रश्नांची सोडवणूक करण्याची भूमिका घेऊन हे केंद्र काम करत आहे. अभ्यासक्रम, करिअर या अनुषंगाने विद्यार्थ्यांच्या मनातील प्रश्नांची योग्य तऱ्हेने सोडवणूक व्हावी, यासाठी व्यक्तिमत्त्व विकास केंद्र काम करते. त्याचबरोबर विद्यार्थ्यांच्या पालकांचेही काही प्रश्न असतात असे संस्थेच्या लक्षात आले. त्यातूनच विद्यार्थी व पालकांच्या मानसिक प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी व्यक्तिमत्त्व विकास केंद्राची स्थापना करण्यात आली. या केंद्राच्या माध्यमातून जे निरनिराळे प्रयोग राबविण्यात येतात ते उल्लेखनीय व महत्त्वाचे आहे. अभ्यासक्रमातील अडचणीबरोबरच विद्यार्थ्यांच्या भावनिक समस्यांचा निपटारा करण्यासाठी या केंद्राच्या माध्यमातून मदत केली जाते. शैक्षणिक विकासासाठी मानसिक पातळीवरच्या प्रश्नांचा योग्य त्या पद्धतीने विचार करण्याची अत्यंत आवश्यकता असते. या आवश्यकतेतूनच या केंद्राची निर्मिती झाली.

विद्यार्थी आणि पालक यांच्या मानसिक समस्यांचा निपटारा व्हावा, त्याचप्रमाणे विद्यार्थी आणि शिक्षकांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास व्हावा यासाठी हे व्यक्तिमत्त्व विकास केंद्र काम करीत असते. अभ्यासाच्या दृष्टीने विद्यार्थ्यांचे काही प्रश्न निर्माण होतात त्या प्रश्नांचा संदर्भ त्यांच्या व्यक्तिगत आयुष्यातील घटनांशी असतो. त्याचबरोबर काही विद्यार्थ्यांना चुकीच्या सवयी लागतात. त्यालाही काही वेगवेगळ्या गोष्टी कारणीभूत असतात. अशा गोष्टींविषयी विद्यार्थी व पालकांशी बोलून त्यांचे समुपदेशन करणे आवश्यक असते. ते महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी संचलित व्यक्तिमत्त्व विकास केंद्रामार्फत केले जाते.

या केंद्राच्यावतीने चालविला जाणारा आणखी एक महत्त्वाचा उपक्रम म्हणजे एक पालक असणाऱ्या विद्यार्थ्यांचे समुपदेशन होय. घटस्फोट अथवा अकाली मृत्यू या कारणाने विद्यार्थ्यांचे एकच पालक असतात. अशा विद्यार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढताना दिसत आहे. एक पालक असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वात काही समस्या निर्माण होताना दिसतात, या समस्यांचे

निराकरण व्हावे याकरिता व्यक्तिमत्त्व विकास केंद्राने विद्यार्थी व पालकांसाठी खास समुपदेशनाची सुविधा निर्माण करून दिली आहे. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी अंतर्गत कार्यरत असणाऱ्या विविध शाळांतील अशा प्रकारच्या विद्यार्थी व पालकांसाठी ही समुपदेशनाची व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली आहे.

याशिवाय महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीत कार्यरत असणाऱ्या शिक्षकांसाठीही व्यक्तिमत्त्व विकास केंद्राच्यावतीने विविध उपक्रम राबविले जातात. शिक्षकांच्या व्यक्तिमत्त्वाला एक नवा आयाम मिळावा यासाठी केंद्राच्यामार्फत विशेष प्रयत्न केले जातात. बदलत्या अभ्यासक्रमाला बदलत्या परिस्थितीला अनुसरून शिक्षकांनी आपल्या अध्यापनाच्या तंत्रात बदल करावे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा यासाठीही व्यक्तिमत्त्व विकास केंद्र कार्यरत आहे. त्याचबरोबर महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीसह इतर संस्थांतील शिक्षक व विद्यार्थ्यांनाही या केंद्राचा उपयोग व्हावा यासाठी प्रयत्न केले जातात हे सुद्धा या केंद्राचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी राबवित असलेल्या अनेक उपक्रमांपैकी हा एक अत्यंत महत्त्वाचा व उल्लेखनीय उपक्रम आहे. विद्यार्थी, पालक व शिक्षक यांच्या उन्नतीसाठी व त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला नवे परिमाण लाभण्यासाठी व्यक्तिमत्त्व विकास केंद्राने चालविले प्रयत्न शिक्षणक्षेत्राला नवी दिशा देणारे आहेत. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने जे वैशिष्ट्यपूर्ण व उल्लेखनीय उपक्रम हाती घेतले आहेत त्यातील हा एक महत्त्वाचा उपक्रम आहे. व्यक्तिमत्त्व विकासकेंद्राचे अध्यक्ष म्हणून श्री. रा. सं. डिंबळे यांनी तर मानव संचालक प्रा. भरत देसाई यांनी काम पाहिले आहे.

### ६.५ म.ए.सो. ॲकॅडमी ऑफ करिअर एक्सलंस, पुणे (२०१०) :

सध्याचे युग हे स्पर्धेचे युग म्हणून समजले जाते. करिअरमध्ये प्रचंड स्पर्धा वाढलेली असताना अनेकवेळा विद्यार्थी गोंधळलेल्या सारखे वाटतात. त्यांच्या या गोंधळलेल्या मानसिकतेचा विचार करून, त्यांच्या संभ्रमाचा अभ्यास करून 'महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने ॲकॅडमी ऑफ करिअर एक्सलंस'ची स्थापना २०१० साली केली.[८]

ॲकॅडमी ऑफ करिअर एक्सलंसच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना करिअर निवडीविषयी वेगवेगळ्या प्रकारचे मार्गदर्शन केले जाते. विद्यार्थ्यांचा कल, त्यांची बौद्धिक क्षमता पाहून त्यांना संबंधित क्षेत्रातील करिअरच्या संधी, त्यामधील आव्हाने इत्यादी विषयांचे सखोल मार्गदर्शन करून संबंधित करिअर निवडी संदर्भात सहकार्य केले जाते. याचाच एक भाग म्हणून विविध प्रकारचे व्यावसायिक प्रमाणपत्र अभ्यासक्रम शिकवले जातात. आतापर्यंत करिअर एक्सलंस चा आधार घेऊन

अनेक विद्यार्थी घडले असल्याने संस्थेचा करिअर विषयक हा कक्ष नावारूपास आला आहे.[९] यावरून असे म्हणता येईल की, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी ॲकॅडमी ऑफ करिअर एक्सलंस हा एक नवा प्रयोग निश्चितच दखलपात्र असून विद्यार्थ्यांच्या दृष्टीने हितकारक अशा स्वरूपाचा आहे. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या या उपक्रमाचा आदर्श घेऊन अनेक शाळा महाविद्यालयांनी हा उपक्रम आपल्या शैक्षणिक समूहात राबवलेला आहे. या नव प्रयोगाने शिक्षणसंस्थेच्या नावलौकिकात भर पडली आहे.

## ६.६ म.ए.सो. सरस्वती निवास वसतिगृह :

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी मार्फत जे विविध उपक्रम राबविले जातात त्यापैकी वेगळा परंतु तितकाच महत्त्वाचा उपक्रम म्हणजे सरस्वती निवारा वसतिगृह होय. संपूर्ण महाराष्ट्र व देशात पुणे हे ज्ञानकेंद्र म्हणून मान्यता पावले आहे. देशविदेशातून शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांची व अभ्यासकांची संख्या लक्षणीय स्वरूपाची आहे. पुणे शहरात खूप मोठ्या संख्येने स्वदेशी व विदेशी विद्यार्थी येत असतात. हिंदूधर्म, बौद्धधर्म, संस्कृत, पाली, अर्धमागधी या भाषा आणि त्या भाषांतील साहित्य यांचा अभ्यास करण्यासाठी परदेशी विद्यार्थीही मोठ्या प्रमाणावर सहभागी असतात. या देशातून परदेशातून येणाऱ्या अभ्यासक विद्यार्थ्यांची चांगल्या वातावरणात राहण्याची सोय व्हावी व त्यांना आपल्या देशातील समाज, साहित्य, संस्कृती, परंपरा यांचे दर्शन घडावे या उद्देशाने महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने पुण्यातील पौड रस्त्यावर सरस्वतीभवन या इमारतीमध्ये विश्वभारत सांस्कृतिक केंद्र हा प्रकल्प सुरु केला आहे.[१०]

पुणे शहर विद्येचे माहेरघर म्हणून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर ख्यातकीर्त झाले आहे. अशा पुणे शहरात पुणे विद्यापीठ, भांडारकर प्राच्य विद्या संशोधन केंद्र, डेक्कन कॉलेज, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ यांसारख्या नामवंत शिक्षण संस्था आहे. या संस्थांकडे अत्यंत समृद्ध ग्रंथालये आहेत. प्राचीन भाषा, संस्कृती व धर्म या अनुषंगाने अधिकाधिक दुर्मीळ ग्रंथसंग्रह या संस्थांकडे आहे. वरील विषयांचा अभ्यास करणाऱ्या महान विद्वानांची परंपरा या ठिकाणी असल्याचे दिसून येते. या कारणामुळे परदेशातील खूप असे अभ्यासक काही महिन्यांपासून ते ३/४ वर्षांपर्यंत कमीअधिक कालावधीसाठी येथे येऊन आपला अभ्यास करतात व आपापल्या परीने अभ्यास करून आपापल्या विद्यापीठात परत जातात. जगभरातील विविध देशातील विद्यापीठांचे हे विद्यार्थी असतात. जर्मनी, अमेरिका इतर युरोपीय देश, जपान व अन्य आशियाई देश यातील विद्वान अभ्यासक व विद्यार्थ्यांचा समावेश असतो.

या अभ्यासक विद्यार्थ्यांना पुण्यात आल्यानंतर या ठिकाणच्या संस्थांची ग्रंथालये व विद्वानांचे सहकार्य मिळत असते. परंतु त्यांची राहण्याची व्यवस्था मात्र होत नाही. त्यांना आवश्यक असणाऱ्या इतर सोयीसुविधाही उपलब्ध होताना अडचणी निर्माण होतात. राहण्याची व्यवस्था विद्यापीठ किंवा इतर संस्था करू शकत नाही. त्यामुळे परदेशी अभ्यासकांना खाजगी जागेत भाड्याने जागा घेऊन रहावे लागते. खाजगी जागेत भाड्याने राहत असताना येणारे बरे वाईट अनुभव ते बरोबर घेऊन जातात. परदेशातून पुण्यात येणाऱ्या अभ्यासकाला अभ्यासकाळात योग्य व चांगल्या वातावरणात राहण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने विश्वभारत सांस्कृतिक केंद्र सरस्वती भवनची स्थापना केली. या केंद्राच्या माध्यमातून परदेशी अभ्यासकांना चांगल्या वातावरणात राहण्याची सुविधा तर मिळावी या शिवाय आपल्या देशातील समाज, संस्कृती, परंपरा यांचेही उत्तम रीतीने दर्शन घडावे असा त्यापाठीमागचा उद्देश आहे. या उद्देशातून विश्वभरात सांस्कृतिक केंद्र सरस्वती भवनची महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी मार्फत स्थापना करण्यात आली. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचा हा एक अत्यंत महत्त्वाचा व उल्लेखनीय असा उपक्रम आहे.

विश्वभरात सास्कृतिक केंद्रात परदेशी अभ्यासकांची सर्व सुविधांसह निवासाची व्यवस्था करण्यात आली आहे पुण्यात येणाऱ्या परदेशी अभ्यासकांनी चांगल्या वातावरणासह उत्तम दर्जाची निवास व्यवस्था उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न या केंद्रामार्फत केला जातो. विश्वभारत सांस्कृतिक केंद्राद्वारे परदेशी अभ्यासकांशी चांगले संबंध प्रस्थापित करण्यावर भर दिला जात आहे. ज्यायोगे परदेशी अभ्यासक व महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी यांच्यात समन्वय निर्माण होऊन संपूर्ण भारतीय संस्कृती भारतीय समाज यांचे दर्शन त्यांच्यासमोर मांडता येईल. विश्वभारत सांस्कृतिक केंद्राच्या माध्यमातून परदेशातील विद्वान अभ्यासकांशी सुसंबंध प्रस्थापित करून त्यांच्या ज्ञानाचा, संशोधनाचा वापर करून घेता येऊ शकेल का? याचाही विचार भविष्यात अधिक प्रभावीपणे होऊ शकतो.

एकूणच 'विश्वभारत सांस्कृतिक केंद्र सरस्वती भवन' हा महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचा अत्यंत महत्त्वाचा, उल्लेखनीय उपक्रम आहे. याद्वारे महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी परदेशी विद्यार्थ्यांशी जोडली गेली आहे. निश्चितच परदेशी विद्यार्थ्यांशी जोडल्यामुळे महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या कार्याच्या कक्षा रुंदावल्या आहेत व त्यामुळे संस्थेला आर्थिक फायदा ही झालेला आहे. विश्वभारत सांस्कृतिक केंद्र सरस्वती भवनच्या माध्यमातून परदेशी विद्यार्थ्यांमध्ये एक

चांगला संदेश गेला आहे. भारतातील पुण्यासारख्या शहरात परदेशी विद्यार्थ्यांना निवासाची कोणतीही अडचण न येता संशोधन व अभ्यास करता येतो हा संदेश या उपक्रमाच्या माध्यमातून दिला जातो. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी स्थानिक पातळीपासून ते आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंत विधायक अंगाने क्रियाशील आहे हे सुद्धा सिद्ध होते. स्थानिक विद्यार्थ्यांना सर्व सुविधा देण्याबरोबरच विदेशी विद्यार्थ्यांच्या सुविधांचा विचार करून त्यांना सुविधा पुरविण्याच्या या उल्लेखनीय उपक्रमातून महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे.

## ६.७ महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी क्रीडावर्धिनी :

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने निरनिराळे वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम राबविले आहेत. त्यामुळे या उपक्रमांची चर्चा शिक्षणक्षेत्रात होते. त्याचबरोबर या उपक्रमांची दखलही घेतली जाते. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीमार्फत राबविल्या जाणाऱ्या सर्वच उपक्रमांमधील समान सूत्र म्हणजे त्यामध्ये विद्यार्थी हिताचा विचार केंद्रवर्ती आहे. परिस्थिती बदलत आहे काळ बदलत आहे अशा बदलत्या काळात विद्यार्थ्यांना सर्वांगीण उन्नतीची दिशा दाखविण्याच्या भूमिकेतून या उपक्रमांची निर्मिती करण्यात आल्याचे दिसून येते. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचा एक अत्यंत महत्त्वाचा व वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम म्हणून क्रीडावर्धिनीचा निर्देश करावा लागतो.

विद्यार्थ्यांच्या मनामध्ये बलसंवर्धनाची आवड रुजावी त्याचबरोबर विद्यार्थ्यांना आरोग्यविषयी चांगल्या सवयी लागाव्यात या व्यापक हेतूने 'क्रीडावर्धिनी'च्या माध्यमातून प्रयत्न केले जातात. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या मार्फत राबविण्यात येणारा 'क्रीडावर्धिनी' हा उपक्रम वेगवेगळ्या कारणांनी महत्त्वाचा ठरतो.[११] 'क्रीडावर्धिनी' या उपक्रमांतर्गत करण्यात आलेल्या प्रयत्नांचा आढावा घेतल्यानंतर यामध्ये अधिक स्पष्टता येईल. प्रत्येक वर्षी माध्यमिक व प्राथमिक शाळांतील ६५ क्रीडा शिक्षकांसाठी राणी लक्ष्मीबाई मुलींची सैनिकी शाळा येथे ३ दिवसांचे निवासी शिबीर घेण्यात येते. त्यामध्ये क्रीडा क्षेत्रातील नामवंत तज्ज्ञांची व्याख्याने व प्रात्यक्षिके होतात. विशेषतः प्राणायाम व सूर्यनमस्कार या संदर्भात मार्गदर्शन करण्यात येते.

असाच क्रीडावर्धिनी व बालविकास मंदिर सासवड यांनी एकत्रितपणे प्राथमिक शालेय विद्यार्थ्यांसाठी क्रीडा महोत्सव २१ व २२ जानेवारी २०१२ रोजी आयोजित केला होता. खोखो, लंगडी, डॉजबॉल इ. सांघिक क्रीडाप्रकारांचा या महोत्सवात समावेश होता. यामध्ये एकूण १५ शाळांच्या संघांचा समावेश होता. विजेत्या संघांना चषक व प्रशस्तिपत्रके प्रमुख पाहुणे ॲड. मिहीर प्रभूदेसाई यांच्या हस्ते देण्यात आली. लंगडी, कबड्डी, मल्लखांब, बास्केटबॉल, स्केटींग इ. क्रीडा

प्रकारांमध्ये प्रशिक्षण शिबीर विविध संस्थेतील शाळांमध्ये आयोजित करण्यात आली होती. सुमारे १००० विद्यार्थ्यांनी या प्रशिक्षण शिबिरात सहभाग नोंदवला. या प्रशिक्षण शिबिरातील विद्यार्थ्यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळांडूंनी मार्गदर्शन केले. रेणुका स्वरूप शाळेच्या परिसरात असलेली शूटींग रेंज ही एक अद्ययावत शूटींग रेंज आहे. येथे प्रशिक्षण घेतलेल्या नेमबाजांनी महाराष्ट्र एअर वेपन स्पर्धेमध्ये सहभाग घेऊन विविध प्रकारांमध्ये सुवर्ण, रौप्य व कांस्य पदके मिळविली आहेत. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे समन्वयक प्रा. शैलेश आपटे व त्यांचा सहकाऱ्यांच्या प्रयत्नातून क्रीडावर्धिनी काम उत्तम प्रकारे सुरू आहे.

विद्यार्थीदशेतच मुलामुलींना चांगल्या सवयी लागल्या तर त्याचा अत्यंत चांगला परिणाम त्यांच्या आयुष्यावर होतो. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी ही विद्यार्थ्यांचा संपूर्ण आयुष्याच्या कल्याणासाठी एका विधायक भूमिकेने कार्यरत आहे. म्हणजे विद्यार्थ्यांना जेजे चांगले देता येईल तेते देण्याची भूमिका महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी घेते. या भूमिकेतूनच विद्यार्थ्यांना अभ्यासाच्यादृष्टीने चांगल्यातील चांगली माहिती ज्ञान व कौशल्ये आत्मसात करता यावी याकरता महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून प्रयत्न केले जातात. वेगवेगळे उपक्रम राबविले जातात. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचा 'क्रीडावर्धिनी' हा अशाच प्रकारचा एक महत्त्वाचा उपक्रम आहे की, ज्यामध्ये विद्यार्थ्यांच्या क्रीडाकौशल्यांना विकसित करण्याचा प्रयत्न केला जातो.

विद्यार्थ्यांच्या मनामध्ये बलसंवर्धनाचे महत्त्व वाढीस लागले, त्यांना आरोग्यविषयक चांगल्या सवयी लागल्या तर त्यांच्या भविष्यातील काळात उत्तम आरोग्य तर लाभेलच शिवाय त्यांच्यातील क्रीडा कौशल्यांनाही चांगला वाव मिळेल. ही महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीची भूमिका सर्वच शिक्षण संस्थांनी अनुकरण करण्यायोग्य आहे.

विद्यार्थ्यांना क्रीडाक्षेत्रातील नवी माहिती व बारकावे द्यायचे असतील तर क्रीडाशिक्षकही तितक्याच चांगल्या दर्जाचे व सर्व कौशल्ये आत्मसात केलेले आवश्यक असतात. त्यामुळे महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीमार्फत चालविल्या जाणाऱ्या 'क्रीडावर्धिनी' मार्फत शिक्षकांसाठी निवासी शिबिरे आयोजित केली जातात. त्यांना क्रीडाक्षेत्रातील घडामोडी विद्यार्थ्यांना द्यावयाचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांच्या क्रीडाविकासासाठी करावे लागणारे प्रयत्न यासंदर्भाने माहिती दिली जाते. विद्यार्थ्यांचे हीत डोळ्यासमोर ठेऊनच महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या क्रीडा शिक्षकांना विशेष प्रशिक्षण दिले जाते, ही बाब अत्यंत महत्त्वाची आहे. विद्यार्थ्यांच्या क्रीडाविकासात भर टाकणारी आहे.

विद्यार्थ्यांचा क्रीडाविकास ही एकूण विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण अशी गोष्ट आहे. भारतासारख्या लोकसंख्येने खूप मोठ्या असणाऱ्या देशात आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रतिनिधित्व करणाऱ्या खेळाडूंची संख्या खूपच कमी आहे. ऑलिम्पिकसारख्या स्पर्धेत पदक मिळविणाऱ्या खेळाडूंची संख्याही खूपच कमी आहे. भारतापेक्षा लोकसंख्येने कमी असणाऱ्या देशांची क्रीडा क्षेत्रातील प्रगती थक्क करणारी आहे. याउलट भारताची क्रीडाक्षेत्रातील कामगिरी मात्र आजपर्यंत सुमारच राहिली आहे. या गोष्टीचा विचार करता महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचा 'क्रीडावर्धिनी' हा उपक्रम किती महत्त्वाचा आहे ते लक्षात येते. आपल्या संस्थेंतर्गत असणाऱ्या सर्व शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या क्रीडा विकासासाठी करण्यात येणारे हे प्रयत्न लक्षणीय व नोंद घेण्यासारखे आहेत.

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी संचलित क्रीडावर्धिनी या उपक्रमामध्ये जे प्रयोग केले जातात ते लक्षात घेण्यासारखे आहेत. म्हणजे क्रीडाविकासासाठी क्रीडाशिक्षकांना प्रशिक्षण देणे, त्यांना त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून देणे हे जितके महत्त्वाचे आहे तितकेच विद्यार्थ्यांच्या मनामध्येही तशा प्रकारची जाणीव निर्माण करणे महत्त्वाचे आहे. म्हणून महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी संचलित 'क्रीडावर्धिनी' या उपक्रमांतर्गत शिक्षकांच्या प्रशिक्षणासह विद्यार्थ्यांच्या जाणीव जागृती व त्यांच्या प्रशिक्षणालाही तितकेच महत्त्व असते. म्हणूनच क्रिडावर्धिनीमार्फत शालेय विद्यार्थ्यांसाठी क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. खोखो, लंगडी, डॉजबॉल इ. सांघिक क्रीडा प्रकारांचे विद्यार्थ्यांना योग्य ते आकलन व्हावे व त्यांना खेळातील बारकावे समजावे यासाठी प्राथमिक व माध्यमिक शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी क्रीडा महोत्सव भरविण्यात येतो. त्याचबरोबर लंगडी, कबड्डी, मल्लखांब, बास्केटबॉल, स्केटिंग या क्रीडा प्रकारांमध्ये विद्यार्थ्यांना निपुणता प्राप्त करावी यासाठी विविध शाळांमध्ये प्रशिक्षण शिबिरे आयोजित करण्यात येतात. शाळेत असतानाच विद्यार्थ्यांना खेळाची आवड निर्माण होऊन त्यांच्यातून भविष्यात अव्वल दर्जाचे खेळाडू निर्माण व्हावेत हा दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेऊन क्रीडावर्धिनीचे काम चालते.

विद्यार्थ्यांना अद्ययावत अशा प्रकारची मैदाने व खेळाचे साहित्य उपलब्ध निर्माण करून देणे आवश्यक आहे. तरच क्रीडासंस्कृतीचा विकास होऊ शकतो व उत्तम खेळाडू घडू शकतात. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी यासंदर्भात अतिशय सजगपणे काम करते. त्यामुळे चांगली मैदाने व चांगले खेळाचे साहित्य खेळाडूंना उपलब्ध करून देण्यासाठी क्रीडावर्धिनीच्या माध्यमातून प्रयत्न केले जातात. 'क्रीडावर्धिनी' जे खेळाच्या व खेळाडूंच्या विकासासाठी प्रयत्न करते त्या प्रयत्नांना चांगलेच

यश मिळत असल्याचे दिसून येत आहे. क्रीडावर्धिनीच्या उपक्रमांचा व प्रयत्नांचा लाभ घेतलेले असंख्य खेळाडू वैयक्तिक व सांघिक स्तरावर चांगले यश प्राप्त करीत असल्याचे दिसून येते.

## ६.८ महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी राबविलेले उपक्रम:

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या सर्व शाळा व महाविद्यालयात सर्व जाती जमातीच्या विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जाते. तसेच शहरात चालविणाऱ्या शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे पालक हे नोकरी व व्यवसायानिमित्त शहरात स्थायिक झालेले असतात. अशा पाल्यांच्या मुलांसाठी संस्थेने चालविलेले चांगले उपक्रम खालील प्रमाणे-

१. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी या संस्थेच्या सर्व शाखा या मुख्य शाखेशी जोडल्या गेलेल्या असल्यामूळे मुख्य शाखेत मुख्य कार्यक्रम किंवा तज्ज्ञ व्यक्तीची व्याख्याने सुरू असेल तर ते एकाच वेळेस संस्थेच्या सर्व शाखांमध्ये व्हिडीओ कॉन्फरन्सव्दारे थेट लाईव प्रक्षेपण होते. त्यामूळे तज्ज्ञ व्यक्तीचे विचार ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना ऐकण्यास व पाहण्यास मिळतात. विद्यार्थी आपले प्रश्न विचारता त्यांच्या प्रश्नांचे निरसण केले जाते थोडक्यात विचारांची अदान प्रदान केली जाते.

२. संस्थेच्या प्रत्येक शाखेमध्ये संगणक प्रयोग शाळा असल्याने विद्यार्थ्यांना आधुनिक विज्ञान तंत्रज्ञान मिळत आहे.

३. शहरी भागाप्रमाणे ग्रामीण भागातील सर्व शाखांमध्ये प्रयोगशाळा व आधुनिक ग्रंथालयाची सोय करून दिलेली आहे. त्यामूळे विद्यार्थी विज्ञानाकडे अकर्षित तर होतात पण वाचन संस्कृती वाढण्यास मोठी मदत होत आहे.

४. अर्थिकदृष्ट्या दुर्बल असणाऱ्या विद्यार्थ्यांना देणगीव्दारे मदत मिळवून दिली जाते. त्यासाठी शिक्षक व देणगीदारांची मोठी मदत होत असते.

५. संस्थेच्या ग्राणीण भागातील शाळांमध्ये इ. ८ वी ते १० वीपर्यंच्या वर्गांसाठी तांत्रिक शिक्षणाची सोय केली आहे.

६. मुलांच्यामधील नैराश्यता व पालकांमधील व्यसनाधिता दूर करण्यासाठी प्रत्येक शाळेसाठी समुपदेकाची नियुक्ती केलेली आहे.

७. खेळाची आवड होण्यासाठी वर्षातून एकदा क्रीडावर्धिनी व्दारे पुणे शहरात निवासी शिबिर आयोजित केले जाते.

८. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा कल ओळखून वेध भविष्याचा मार्ग यशाचा या उपक्रमा अंतर्गत त्यांना करिअर विषयक मार्गदर्शन केले जाते.

## ६.९ महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे माजी विद्यार्थी :

माजी विद्यार्थ्यांच्या मुलाखती मधून त्यांना संस्थेबद्दल प्रेम जिव्हाळा अत्मीयता असल्याचे दिसून आले आहे. त्याचे काही प्रतिनिधीक उदाहरणे म्हणजे आचार्य अत्रे यांनी दिलेल्या मुलखतीत असे म्हटले आहे की, ' मी जर भावे हायस्कूलचा विद्यार्थी नसतो तर आयुष्यात विनोदी लेखक कधीच होऊ शकलो नसतो.' अशाच प्रकारची मते अनेक शाळेतील नावाजलेल्या माजी विद्यार्थ्यांनी व्यक्त केलेली आहेत. संस्थेप्रमाणे येथील शिक्षकवृंदांनी आम्हाला दिलेले संस्कार हे आमच्या वर्तमान व भविष्यकाळासाठी फार मोठी मौलिक देणगी ठरत आहे त्यामूळे त्यांचे आजही सततत्याने स्मरण होते. असे प्रसिध्द सर्जन डॉ. विरेंद्र घैसास यांनी आपल्या मुलाखतीत सांगितले.

शाळेमध्ये पुस्तक पेढी असल्यामूळे आमची वाचन संस्कृती वाढली त्यामूळे आजही कित्येक पुस्तकांचे वाचन केले जाते अशी भावना बँक ऑफ इंडियाचे व्यवस्थापक श्री. आनंद श्राफ यांच्या घेतेलेल्या मुलाखतीतून व्यक्त केले. महाविद्यालयात एन.एन.एस. व एन.सी.सी. सारख्या उपक्रमाधून व्यक्तीमत्व व देशप्रेमाबद्दल अधिक प्रेम निर्माण झाले असे प्रा. युवराज जगतान यांनी सांगितले. माझ्यासारख्या मुस्लिम विद्यार्थ्यावरही कॉलेजमध्ये चांगले संस्कार झाले असे ग्रंथपाल श्री. सिंकदर इस्माईल शेख सांगतात. मराठी चित्रपट सृष्टीतील अभिनेत्री अमृता सुभाष हीने ही आपल्या मुलाखतीतून रेणूका स्वरूप शाळेमध्ये बाईंनी आमच्यावर वाचनाचे चांगले संस्कार केले म्हणूनच मी अभिनेत्री बनू शकले. अशी भावना व्यक्त केली. तर मराठी साहित्य परिषदेचे अध्यक्ष माधवी वैद्य यांनीही आपल्या यशाचे श्रेय आई वडिलांबरोबरच शाळेवतील शिक्षीकांनाही दिले. अशा स्वरूपाच्या अनेक प्रतिक्रिया इतर माजी विद्यार्थ्यांनीही आपल्या मुलाखतीतून व्यक्त केल्या. तसेच अनेक माजी विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी या संस्थेच्या विकासाठी आर्थिक देणगी देऊन आपले ऋण फेडलेले आहे. उदा. सासवडमधील विद्यार्थ्यांनी येथिल शाळेसाठी मोठया क्रिडांगणासाठी जागा दिलेली आहे.

एकंदरीत महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी या संस्थेच्या बद्दल सर्वच विद्यार्थ्यांनी चांगले मत व्यक्त करताना संस्था व शिक्षक हेच आमचे आदर्श आहेत असे नमूद केलेले आहे.

जर चिकित्सक विचार केला तर असे निदर्शनास येते की, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी ही महाराष्ट्रातील अत्यंत महत्त्वाची शिक्षण संस्था आहे. संपूर्ण महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्रातील

प्रभावशाली, कार्यक्षम व प्रयोगशील अशा प्रकारची संस्था म्हणून महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे नाव अग्रक्रमावर आहे. यात दुमत असण्याचे कारण नाही. सुमारे सव्वाशे वर्षांपूर्वी राष्ट्रवादी जाणीवेतून आकाराला आलेली ही संस्था प्रथितयश शिक्षण संस्था आहे. प्रथितयश या अर्थाने आहे की, कोणत्याही शिक्षण संस्थेचे यश हे तिच्या आर्थिक नफ्यात नसून संस्थेने समाजाला किती मोठ्या प्रमाणावर योगदान दिले यात असते. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने समाजाला जे योगदान दिले आहे ते निश्चितच अत्यंत महत्त्वाचे आहे. सव्वाशे वर्षांच्या काळात महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने विद्यार्थ्यांच्या कित्येक पिढ्या घडविल्या. संस्थेने घडविलेल्या विद्यार्थ्यांनी समाज आणि देशाला घडविण्याचे महत्त्वपूर्ण काम केले आहे. या अर्थाने महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी ही एक प्रतिथयश शिक्षणसंस्था आहे. अशा या महाराष्ट्रीयन समाजावर व शैक्षणिक क्षेत्रावर प्रभाव टाकणाऱ्या शिक्षण संस्थेच्या माजी विद्यार्थ्यांची माहिती प्रस्तुत ठिकाणी घेतली जाणार आहे.

सव्वाशे वर्षांच्या काळात महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने हजारो विद्यार्थ्यांना प्रखर राष्ट्रवाद शिकविला नैतिक मूल्यांचे संस्कार दिले. या संस्थेच्या अनेक माजी विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी येथिल स्वातंत्र्य आंदोलनात सहभाग घेतला आहे. त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे शि.म. परांजपे व अच्युतराव साठे ह्यांनी विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रवादाचे विचार रूजवले होते. या विद्यार्थ्यांनी पालकांमध्येही काही प्रमाणात वरील विचार रूजविले आहेत. ब्रिटिशांचा रोष आपल्या संस्थेवर येऊ नये म्हणून संस्थेने वरील कार्य केलेल्या विद्यार्थ्यांचे रेकॉर्ड ठेवलेले नाही.

बदलत्या कालानुरूप ज्ञान, माहिती संस्थेने विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न केला. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचा हा प्रगतीचा खूप मोठा टप्पा आहे. याला अनुसरून विचार करताना विद्यार्थ्यांनी शिक्षणानंतर समाजाला किती योगदान दिले आपल्या क्षेत्रात किती प्रगती केली याचे मोजमाप करणे आवश्यक आहे. याविषयी नेमकी माहिती घेतल्यानंतर आपल्याला हे दिसून येते की महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने खूप मोठी मजल मारली आहे.

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे माजी विद्यार्थी हा अभ्यासाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा असा विषय आहे. संस्थेच्या आतापर्यंतच्या काळात विद्यार्थ्यांनी जे योगदान दिले आहे ते अनन्यसाधारण महत्त्वाचे आहे. माजी विद्यार्थ्यांच्या योगदानाचा अभ्यास मांडल्यानंतर महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या विविधांगी प्रगतीवर प्रकाशझोत टाकता येऊ शकेल. संस्थेचे माजी विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या क्षेत्रात प्रंचड मोठ्या प्रमाणावर प्रगती केली आहे. राजकीय सामाजिक,

सांस्कृतिक शैक्षणिक, कला, साहित्य, संगीत, क्रीडा आदी विविध क्षेत्रात महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या माजी विद्यार्थ्यांनी कर्तृत्व गाजविले आहे.

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या विद्यार्थी श्रेष्ठ मालिकांची परंपरा फार मोठी व संस्थेला अमर्याद आनंद देणारी आहे.[१२] संस्थेच्या माजी विद्यार्थ्यांच्या कार्यकर्तृत्त्वाचा आढावा घेतल्यानंतर हे लक्षात येते की महाराष्ट्र आणि भारताच्या राजकीय, सामाजिक सांस्कृतिक आर्थिक क्षेत्रांवर मोठा परिणाम आणि प्रभाव टाकणाऱ्या विद्यार्थ्यांना महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने घडविण्यात योगदान दिले.

मराठी रंगभूमीला नाव आयाम देणारे नारायण श्रीपाद राजहंस ऊर्फ 'बालगंधर्व' हे महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे माजी विद्यार्थी आहेत. मराठी नाट्यसृष्टी आपल्या सकस व अभिजात अभिनयाने गाजवून टाकणारे बालगंधर्व महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटचे विद्यार्थी होते. ही गोष्ट संस्थेच्या दृष्टीने अत्यंत गौरवास्पद आहे. मराठी रंगभूमीवर आपल्या अभिनयाचा ठसा उमटविणारे बालगंधर्व इतिहासात अजरामर झाले आहे. ज्या काळात रंगभूमीवर काम करण्यासाठी स्त्रिया उपलब्ध होत नव्हत्या, त्या काळात बालगंधर्वांनी स्त्रीपात्रे रंगवून मराठी रंगभूमीवर आपले कर्तृत्त्व गाजवून रसिकांच्या हृदयसिंहासनावर अढळस्थान प्राप्त केले. असे हरहुन्नरी प्रतिभासंपन्न अभिनेते बालगंधर्व हे महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे माजी विद्यार्थी होते. हा संस्थेचा गौरव आहेच शिवाय त्यांच्या जडणघडणीत संस्थेचा वाटाही असल्याचे सिद्ध होते.

तसेच डॉ. श्रीराम लागू हे मराठी चित्रपट-नाट्यसृष्टीतील महत्त्वाचे कलावंत मानले जातात. त्याच्या नाट्य-चित्रपटसृष्टीतील काही भूमिका अक्षरश: अजरामर ठरल्या आहे. वि. वा शिरवाडकरांच्या 'नटसम्राट' या नाटकातील आप्पा बेलवणकराची भूमिका व्ही. शांताराम यांच्या 'पिंजरा, सामना' या चित्रपटातील 'मास्तरची' भूमिका अमर ठरल्या आहेत. कसदार सकस अशा अभिनयामुळे नाट्य-चित्रपटसृष्टीत त्यांची विशेषत्त्वाने दखल घेतली जाते. शरद तळवळकर हे सुद्धा महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या माजी विद्यार्थ्यांपैकी महत्त्वाचे नाव आहे. मराठी चित्रपटसृष्टी त्यांनी आपल्या भूमिकांनी गाजवली आहे. त्याचबरोबर प्रसिद्ध अभिनेत्री रोहिणी हट्टंगडी, स्मिता पाटील, नृत्यसम्राज्ञी प्रसिद्ध अभिनेत्री रोहिणी भाटे अश्विनी एकबोटे, मृन्मयी देशपांडे, विक्रम गोखले, रविंद्र महाजनी, प्रसाद ओक हे सर्वजण महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे माजी विद्यार्थी आहेत.

प्रल्हाद केशव अत्रे हे सुद्धा महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे माजी विद्यार्थी होते. मराठी साहित्यसृष्टीतील महत्त्वाचे साहित्यिक म्हणून त्यांची कामगिरी नजरेत भरण्याइतपत आहे. नाटककार, कवी, विनोदी लेखक, कर्डे व घणाघाती वक्ते म्हणून आचार्य अत्रे महाराष्ट्राला सुपरिचित होते. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील अग्रणी नेते म्हणून आचार्य अत्रे मराठी माणसाच्या आठवणीत आहे. 'मराठा'चे संपादक म्हणून त्यांनी गाजविलेले कर्तृत्त्व अनन्यसाधारण आहे. म्हणजेच संपादक, लेखक, वक्ते, नेते म्हणून आचार्य अत्रे यांनी आपल्या काळावर जो ठसा उमटविला तो विशेष महत्त्वाचा आहे. 'मी जर भावे स्कूलचा विद्यार्थी नसतो तर आयुष्यात विनोदी लेखक कधीच होऊ शकलो नसतो.'असे स्पष्टपणे प्र. के. अत्रे यांनी म्हटले आहे. त्यांच्या या विधानातून महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे त्यांच्या जडणघडणीतील योगदान आहे.

महाराष्ट्र शासनाने 'महाराष्ट्रभूषण' म्हणून ज्यांना गौरविले ते ज्येष्ठ इतिहासकार बाबासाहेब पुरंदरे, मराठी साहित्यीक माधवी वैद्य हे सुद्धा महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे माजी विद्यार्थी होते. गेली कित्येक वर्षे त्यांच्या साहित्याला संपूर्ण महाराष्ट्रातून मागणी आहे. त्यांनी शिवाजी महाराजांच्या संदर्भात केलेल्या लेखनाला इतिहासात तोड नाही. त्याचबरोबर 'जाणता राजा' हे नाटक त्यांनी लिहिलेले आहे. महाराष्ट्रभर त्यांच्या साहित्याला व कार्यकर्तृत्त्वाला प्रसिद्धी मिळाली आहे. अशी समाजात प्रसिद्ध असलेली एक मोठी व्यक्ती महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीची माजी विद्यार्थी आहे. मराठीतील ज्येष्ठ लघुकथाकार व. पु. काळे हेही महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे माजी विद्यार्थी आहेत. त्यांची साहित्यसृष्टीत एक वेगळी ओळख आहे. अत्यंत लोकप्रिय साहित्यिक म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांच्या पुस्तकांच्या विक्रीच्या बाबतीत अनेक विक्रम केले आहे. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या कर्तृत्त्ववान व प्रसिद्ध माजी विद्यार्थ्यांपैकी ते एक महत्त्वाचे माजी विद्यार्थी आहेत.

न्यायमूर्ती व्ही. एम. तारकुंडे, न्यायमूर्ती बी. ए. देशमुख, न्यायमूर्ती आर. एम. बापट हे संस्थेचे माजी विद्यार्थी आहेत. माजी कुलगुरू राम ताकवले, डॉ. पा. वा. सुखात्मे, हे दिग्गज महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे माजी विद्यार्थी आहेत की ज्यांनी आपापल्या क्षेत्रात सर्वोच्च योगदान दिले आहे. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचा विस्तार एवढा प्रचंड आहे की, सध्या महाराष्ट्रात असणाऱ्या उच्च पदावरील खूप अशा व्यक्ती संस्थेच्या माजी विद्यार्थी आहेत. उद्योग क्षेत्रात ज्यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक नाव व यश मिळविले असे मोठे उद्योजक महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे माजी

विद्यार्थी आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने अरुण फिरोदिया, डी. एस. कुलकर्णी, प्रतापराव पवार, नरेंद्र करमरकर यांचा समावेश होतो.

वैद्यकीय क्षेत्रात ज्यांनी उल्लेखनिय कार्य केलेले डॉ. नितू मांडके, डॉ. विरेंद्र घैसास, डॉ. श्रीधर गद्रे, डॉ. जगदीश हिरेमठ, डॉ. प्रमोद जोग हे सर्व जण महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे माजी विद्यार्थी होते.

राजकीय क्षेत्रात गेली पन्नास वर्षे ज्यांचा महाराष्ट्राच्या आणि देशाच्या राजकारणावर प्रभाव राहिला त्या शरद पवारांचे नाव महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या माजी विद्यार्थ्यांच्या अनुषंगाने अग्रक्रमाने घ्यावे लागते. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदासोबतच देशाच्या कृषीमंत्रिपदाची व संरक्षणमंत्रिपदाची जबाबदारी सांभाळणारे, सहकार, कृषी, उद्योग, समाजकारण व साहित्यातील भान व जाण असणारे नेते म्हणून शरद पवार अजूनही कार्यरत आहेत. संपूर्ण महाराष्ट्राच्या राजकारणावर मोठा प्रभाव असणारे नेतृत्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. आयसीसी सारख्या क्रिकेटच्या जागतिक संस्थेच्या अध्यक्षपदाची जबाबदारीही त्यांनी समर्थपणे पेलली. शरद पवार हे महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे माजी विद्यार्थी असणाऱ्या त्यांनाही अभिमान आहे.

त्याचबरोबर दिवंगत नेते, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री माजी केंद्रीय मंत्री विलासराव देशमुख हे पण महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे माजी विद्यार्थी होते. मराठवाड्यातील लातूर जिल्ह्याच्या ग्रामीण भागातून पुढे आलेल्या विलासराव देशमुख हे पण महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे माजी विद्यार्थी होते. मराठवाड्यातील लातूर जिल्ह्याच्या ग्रामीण भागातून पुढे आलेल्या विलासराव देशमुखांचा महाराष्ट्राच्या राजकारणावर चांगलाच प्रभाव होता. दोन वेळा महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद भूषविलेल्या विलासराव देशमुखांनी केंद्रीय अवजड उद्योग, व विज्ञान मंत्रिपदाचा कार्यभारही सांभाळला होता. तसेच

भारतीय जनता पार्टीचे नेते व विद्यमान केंद्रीयमंत्री असणारे प्रकाश जावडेकर, पंतगराव कदम, अजितदादा पवार, रामकृष्ण मोरे, अशोक मोहळ, अंकुश काकडे हे महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे माजी विद्यार्थी आहेत. त्याचबरोबर एअरमार्शल भूषण गोखले, मेजर विनायक पाटणकर, बालसुब्रम्हण्यम, कवयित्री संजीवनी बोकील, संजीव अभ्यंकर, कीर्ती शिलेदार, संदिप खरे, डॉ. सलील कुलकर्णी, चारूदत्त आफळे सदानंद दाते, अरविंद इनामदार यांच्यासारखे दिग्गज लोक महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे माजी विद्यार्थी आहेत.

ज्येष्ठ शास्त्रज्ञ पद्मभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी तर संस्थेचे अध्यक्षपदही भूषविले आहे. यातच त्यांची संस्थेविषयी वाटणारी आपुलकी दिसते. याशिवाय ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. राम ताकवले, डॉ. प्र. ल. गावडे हे सर्व संस्थेचे माजी विद्यार्थी आहेत.

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या माजी विद्यार्थ्यांची नावे प्रातिनिधिक स्वरूपात घेतल्यानंतर हा निष्कर्ष हाती येतो की, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या माजी विद्यार्थ्यांनी संस्थेचे नाव उज्ज्वल केले आहे. कला, साहित्य, क्रीडा, विज्ञान, उद्योग, राजकारण या सर्वच क्षेत्रात त्यांनी आपल्या कर्तृत्वाचा अनमोल ठसा उमटविला आहे. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या माजी विद्यार्थ्यांनी समाजाप्रती आपले महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या माजी विद्यार्थ्यांमध्ये अनेक नामवंत आहेत. संस्थेच्या विविध शाखांत शिक्षण घेऊन त्यांनी व्यक्तिगत आयुष्यात मोठे यश मिळविलेच त्याबरोबरच देशाच्या आणि समाजाच्या जडणघडणीत महत्त्वाचे योगदान दिले आहे.

## ६.१० महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे शिक्षक :

राष्ट्रवादाच्या विचारांनी प्रेरित होऊन सुसंस्कारित, उच्चशिक्षित, देशप्रेमी विद्यार्थी घडविण्यासाठी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीची स्थापना करण्यात आली होती. दीडशे वर्षांची परंपरा असलेली महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी या संस्थेच्या माध्यमातून लक्षावधी विद्यार्थ्यांना ज्ञानदानाचे पवित्र कार्य झाले आहे. यामध्ये शिक्षकांचा वाटा खूप महत्त्वाचा आहे. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या जडणघडणीत ज्या शिक्षकांचे खूप महत्त्वाचे योगदान आहे. संस्थेचे संस्थापक वामन प्रभाकर भावे, लक्ष्मणराव इंदापूरकर यांचे नाव घ्यावेच लागेल, त्या शिक्षकांमध्ये त्यांच्या नंतरही हा ध्येयवादी समर्पित कार्यकर्तृत्वाचा वारसा आजतागायत सुरू आहे. शिक्षकांनी व्यक्तिगत लाभाचा विचार न करता प्रखर सामाजिक जाणिवेतून संस्थेसाठी योगदान दिले. आज महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने एवढी मोठी जी प्रगतीची झेप घेतली आहे. त्यामध्ये शिक्षकांचे योगदान लक्षणीय स्वरूपाचे आहे.

प्राचार्य न. श. जमदग्नी, श्री. बी. जी. घारे, श्री. म. बा. शाळिग्राम, श्री. चिं. रा. आठले, प्राचार्य शरश्चंद्र चिरमुले, प्रा. श्री. के. क्षीरसागर, ज्येष्ठ कवी माधव ज्युलियन, उंब्राणीकर, ग. स. शुक्ल, ज्येष्ठ साहित्यिक द. मा. मिरासदार इ. अनेकांचा आदरपूर्वक उल्लेख करावा लागतो. यांच्यासह दीडशे वर्षांच्या काळात शेकडो शिक्षकांनी विद्यार्थ्यांना घडविण्याचे काम केले. त्यामुळेच महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचा नावलौकिक निर्माण झाला आहे.

## ६.११ महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांचे अभिप्राय :

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या शिक्षणचळवळीला प्रारंभ होऊन दीडशे वर्षे पूर्ण झाली आहेत. या काळात संस्थेने सर्वच बाबतीत वेगाने प्रगती केली आहे. पुणे शहरासह सातारा, नवी मुंबई, नगर, रत्नागिरी या परिसरात महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने आपल्या शाखांचा विस्तार केला आहे. बदलत्या काळानुसार नवनवे अभ्यासक्रम संस्थेने सुरु केले आहेत. नवनवे विद्यार्थीभिमुख उपक्रम सुरू केले आहेत. दीडशे वर्षांच्या या कालावधीत महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने शाखाविस्तारासोबत स्वमालकीच्या इमारती बांधल्या. नवे अभ्यासक्रम सुरू केले. या प्रवासात संस्थेने आपली विशिष्ट विचारधारा जपली आहे.

पूर्व प्राथमिक ते उच्च शिक्षणापर्यंत संस्थेने विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाच्या दर्जेदार सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी वेगवेगळे उपक्रम राबविले आहेत. 'पूर्व प्राथमिक शाळांमधून आनंददायी, कृतिशील, शिक्षण संस्थेने दिले आहे. याशिवाय प्राथमिक शाळांमधून क्षमताधिष्ठित, दर्जेदार शिक्षण तर माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावर गुणवत्तापूर्ण व्यवसायाभिमुख व सामाजिक, राष्ट्रीय जाणीवा जागृत करणारे शिक्षणही दिले आहे. महाविद्यालयीन स्तरावर विद्याशाखांमध्ये प्रगत, प्रगल्भ अभ्यासक्रम सुरू केला आहे. या व्यतिरिक्त नारीशक्तीच्या जागरासाठी मुलींना सैनिकी शाळेत प्रशिक्षण दिले आहे रेणूकास्वरूप इन्स्टियुटमधून महिलांना आत्मनिर्भर करणारं व्यवसाय प्रशिक्षण दिले आहे. बलसंवर्धनासाठी शक्ति जिम, तर मानसिक सुदृढतेसाठी योगकेंद्र, मुलींसाठी वसतिगृह, आरोग्यम् धनसंपदा' हा संदेश देणारं परशुराम मेडिकल कॉलेज व रुग्णालय, इन्शुरन्स क्षेत्रासाठी मार्गदर्शन हेही उपक्रम महत्त्वाचे आहेत. तसेच शिक्षण हा संस्थेचा कणा असतो हे लक्षात घेऊन संस्थेन शिक्षण प्रबोधिनीची केलेली स्थापना अशा विविध आयामांमधून संस्थेच्या प्रगतीचा चढता आलेख प्रत्ययास येत आहे.

अनेक प्रज्ञावंत, व्यासंगी व्यक्तिमत्त्वांनी संस्थेचे अध्यक्षस्थान भूषविले आहे. मोठ्या व्यक्तिमत्त्वांनी संस्थेच्या कार्यकारिणीवर पदाधिकारी म्हणून काम केले आहे. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांचा संस्थेच्या विकासात मोलाचा वाटा आहे. संस्थेच्या वाढ, विकास आणि विस्तारासाठी संस्था पदाधिकाऱ्यांचे योगदान आपल्याला लक्षात घ्यावे लागते. प्रस्तुत ठिकाणी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या काही प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या मुलाखती घेऊन त्यांच्या विचारांचा आढावा घेण्यात आला आहे.

शिक्षणाचे सामर्थ्य त्याकाळातील समाजसुधारकांना खऱ्या अर्थाने कळले होते. म्हणूनच देशभक्त असणाऱ्या विवेकानंद, चिपळूणकर, रानडे, टिळक, आगरकर, फडके, महात्मा गांधी, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, कर्मवीर भाऊराव पाटील या सर्वांनी शिक्षणव्यवस्थेकडे महत्त्वाचे लक्ष पुरविले होते. त्यादृष्टीने या सर्वांनी काही कृती केली होती. शिक्षणाकडे समाजपरिवर्तनाचे एक प्रभावी साधन किंबहुना त्याच्या हातातील एक अस्त्र या दृष्टीने पाहात होते असे दिसते. तत्कालीन प्रचलित ब्रिटिशप्रणित शिक्षणपद्धती बद्दलच्या असमाधानामुळे या सर्वांना राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या शाळा, संस्था यांची निकड भासली. आणि पुढे मग या विचारातूनच शैक्षणिक संस्थांची निर्मिती झाली असावी. वासुदेव बळवंत फडके, वामन प्रभाकर भावे आणि ल. न. इंदापूरकर यांच्या दृष्टीतून साकारलेल्या राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या, 'क्रियेवीण वाचाळता व्यर्थ' हे घोषवाक्य असणाऱ्या 'महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी'च्या स्थापनेच्या मुळाशी हाच विचार होता असे संस्थेचे सचिव श्री. विनायक शुक्ल यांनी आपल्या मुलाखतीतून सांगितले.

'राष्ट्रीय शिक्षण' ही संकल्पना वापरत असताना देशीय परंपरेच्या मजबूत पोलादी पायावर उभे राहिलेल्या आणि नवीन जगाचे स्वागत करणाऱ्या भारताचे चित्र संस्थेच्या संस्थापकांच्या मनात होते. राष्ट्रीय शिक्षण म्हणत असताना फक्त देशापुरते सिमीत असे त्यांचे विचार नसणार तर आधुनिक काळातील चांगल्या गोष्टींचा स्वीकार करावा लागणार आहे. त्यांच्या लक्षात होते. परंपरा आणि नवनिर्मिती यांचा सुयोग्य विचार त्यांच्या मनात होतो. त्या विचारामुळेच नवनवीन विषयांचे शिक्षण देणाऱ्या शाखाही विकसित होत आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळात राष्ट्रीय विचारांचे शिक्षण देणे व चारित्र्यसंपन्न विद्यार्थ्यांची पिढी तयार करणे या हेतुने वामन प्रभाकर भावे, लक्ष्मण नरहर इंदापूरकर, वासुदेव बळवंत फडके यांनी १८६० मध्ये सुरू केलेल्या खाजगी शिकवणीचे रूपांतर 'दी पूना नेटीव्ह इन्स्टिटय़ूशन' मध्ये केले. सन १९२२ पासून महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या नावाने ही शिक्षण संस्था ओळखली जाते. या संस्थेला दीडशे वर्षे पूर्ण झाली आहेत. बालशिक्षणापासून महाविद्यालयीन उच्च व्यावसायिक शिक्षणापर्यंत पन्नास हजारांहून अधिक विद्यार्थी या संस्थेत शिक्षण घेत आहेत. गुणात्मक गोष्टींना संस्थेने प्राधान्य दिले जाते. विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून संस्थेची वाटचाल सुरू आहे. भविष्यातही आधुनिकतेचा स्वीकार करत विद्यार्थ्यांना घडविण्याचे काम अविरत सुरू ठेवण्यात येणार आहे असे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अनिल वळसणकर यांनी आपल्या मुलाखतीतून सांगितले. यावरून असे वाटते की शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे कार्यकौशल्य,

संस्थापदाधिकाऱ्यांचे नियोजन यामुळे संस्था भविष्यात अधिकाधिक प्रगती करत राहिल असा ठाम विश्वास वाटतो.

शिक्षणाचा आणि समाजाच्या प्रगतीचा अनन्यसाधारण असा संबंध असतो. जनतेच्या आशाआकांक्षा आणि स्वप्न पूर्ण करण्यासाठी शिक्षणाचे माध्यम उपयुक्त ठरते. त्यामुळेच महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीची वाटचाल ही देशातील जनतेच्या इच्छा आकांक्षाच्या पूर्ततेसाठीच सुरू आहे. म्हणूनच राष्ट्रीय शिक्षणाची संकल्पना मांडत आधुनिक शिक्षणाचीही कास धरली आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवरचे संशोधनही संस्थेच्या महाविद्यालयात होत असते. यावरून संस्थेची प्रगती लक्षात येते. संस्थेच्या वाढ आणि विस्ताराचा केंद्रबिंदू विद्यार्थीच असतो. त्यामुळे सध्याच्या काळात विद्यार्थ्यांना जे जे आवश्यक आहे ते ते देण्याचा प्रयत्न संस्थेने केला आहे. मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण वाढले नाही तर देशाची प्रगती होणार नाही म्हणून मुलींच्या उच्चशिक्षणाच्या बाबतीत व त्यांच्या संशोधनातील सहभागाबाबत संस्थेने सकारात्मक पावले उचलली आहेत असे राणी लक्ष्मीबाई शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. पुजा जोग यांनी सांगितले आहे.

संस्थेच्या मूळ ध्येयधोरणाशी कोणतीही तडजोड न करता आधुनिक साधने, ज्ञान यांची उपलब्धता विद्यार्थ्यांना व्हायला पाहिजे या हेतुने संस्थेने विविध उपक्रम हाती घेतले आहेत. शिक्षणातून समाजाचा आणि देशाचा विकास होऊ शकतो हे सूत्र अंगिकारून सुशिक्षित आणि सुसंस्कृत नागरिकांच्या पिढ्या घडविण्याचे काम महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीत कार्यरत आहे असे वाटते.

**समारोप :**

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या विविध उल्लेखनीय उपक्रमांचा अभ्यास या प्रकरणात मांडण्यात आला आहे. त्याचबरोबर संस्थेच्या माजी विद्यार्थ्यांसंदर्भात मांडणी करून त्यांनी समाजाला कोणत्या प्रकारचे योगदान दिले. याविषयीची चर्चा करण्यात आली आहे. शिवाय संस्थेच्या अध्यक्षांचा तसेच शिक्षकांच्या कामगिरीचा आढावा घेण्यात आला आहे. तसेच विद्यमान पदाधिकाऱ्यांच्या व माजी विद्यार्थ्यांच्या मुलाखतीतून व्यक्त होणारे विचार येथे मांडण्यात आली आहे.

या सर्व अभ्यासाअंती समोर आलेले निष्कर्ष या ठिकाणी मांडण्यात येत आहेत.

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या विविध उल्लेखनीय उपक्रमांपैकी 'शक्ती जिम्नॅशिअम' हा महत्त्वाचा उपक्रम आहे. बौद्धिक विकासाबरोबरच शारिरीक विकासाच्या हेतूने हा उपक्रम सुरू

करण्यात आला आहे. या ठिकाणी विद्यार्थ्यांना विविध व्यायाम प्रकारांचे शिक्षण देण्यात येते. आधुनिक सुविधा व सामग्रीने परिपूर्ण असे हे जिम्नॅशिअम आहे.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे वसतिगृह हे सुद्धा विद्यार्थ्यांना केंद्रबिंदू मानुनच उपक्रम राबविला आहे. पुण्यासारख्या शैक्षणिक केंद्र असलेल्या शहरात शिक्षणासाठी मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी येतात. परंतु त्यांच्या राहण्याची व्यवस्था होत नाही. परिणामी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या विद्यार्थ्यांना प्रचंड मन:स्ताप सहन करावा लागतो. आर्थिक त्रास होतो. यासाठी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी उत्तम दर्जाचे सर्व सोयीनीयुक्तअसे वसतिगृह बांधले. याचा फायदा सर्वच विद्यार्थी व विद्यार्थिनींना मोठ्या प्रमाणावर झाला आहे.

'शिक्षण प्रबोधिनी' हा महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचा एक चांगला उपक्रम आहे. संस्थेच्या सर्व शाळा तसेच इतर संस्थेतील शाळांनाही शैक्षणिक क्षेत्रातील समस्या येऊ नयेत. शिक्षणाची प्रक्रिया चांगल्या तऱ्हेने चालावी व अंतिमत: विद्यार्थ्यांचे कल्याण व्हावे यासाठी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने शिक्षण प्रबोधिनीचा उपक्रम हाती घेतला आहे. आजच्या स्पर्धेच्या काळात गुणवत्ता वाढविणे, शिक्षकांचे ज्ञान व जाणिवा वाढविणे यासाठी संस्थेने हाती घेतलेला हा उपक्रम अत्यंत आदर्शवत अशा स्वरूपाचा आहे.

विद्यार्थी व शिक्षकांच्या व्यक्तिमत्त्वात विधायक बदल घडवून आणण्यासाठी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने व्यक्तिमत्त्व विकास केंद्राची स्थापना केली आहे. विद्यार्थ्यांचे मानसशास्त्रीय समुपदेशन करून त्यांच्या मानसिक समस्या सोडविणे यासाठी सुरू झालेला उपक्रम बालमानसशास्त्राच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. म्हणूनच शासनाने सर्वच शाळा महाविद्यालयांत हा उपक्रम राबविणे आवश्यक आहे. परदेशी विद्यार्थ्यांच्या निवासाची व्यवस्था करण्याच्या हेतुने सरस्वती निवास वसतिगृह हा उपक्रम महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या वतीने राबविण्यात येतो. परदेशी विद्यार्थ्यांनाही आपल्या भारतीय समाजाचे व संस्कृतीचे दर्शन घडावे असाही त्यामागचा उद्देश आहे. विश्वभारत सांस्कृतिक केंद्र, सरस्वती निवास हा उपक्रम परदेशी विद्यार्थ्यांच्या दृष्टीने महत्त्वाचा वाटतो.

क्रीडावर्धिनीतील सर्व क्रीडाशिक्षक व विद्यार्थी यांच्यासाठी विविध प्रशिक्षण शिबीर व कार्यशाळा आयोजित करून त्यांच्यात क्रीडा कौशल्य विकसित करण्यासाठी नियोजनबद्ध प्रयत्न केले जातात. त्याचे परिणाम चांगले दिसत असून क्रीडा क्षेत्रात संस्थेच्या विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धेमध्ये घवघवीत यश संपादन केले आहे. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या माजी विद्यार्थ्यांच्या

कर्तृत्त्वाचा आढावा घेतल्यानंतर हे सिद्ध होते की, या माजी विद्यार्थ्यांनी राजकारण, साहित्य, समाजकारण, प्रशासन, क्रीडा, कला, विज्ञान शिक्षण अशा विविध क्षेत्रांत देदीप्यमान यश मिळविले आहे. आपल्या कर्तृत्त्वाचा फायदा समाजाला व देशाला होईल अशा पद्धतीने त्यांच्या कामाची दिशा राहिली आहे. शरद पवार, प्रकाश जावडेकर, विलासराव देशमुख, बाबासाहेब पुरंदरे, प्र. के. अत्रे, अरूण फिरोदिया यांसारखे दिग्गज व्यक्तीमत्व हे महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे माजी विद्यार्थी आहेत. राष्ट्रीय, राष्ट्रवादी शिक्षणाचा प्रसार करण्याच्या हेतुने स्थापन झालेल्या संस्थेच्या वाटचालीचा प्रवास संघर्षमय राहिला आहे. तरीसुद्धा सर्व घटकांच्या योगदानामुळे संस्थेने प्रगती केली आहे. विद्यार्थीहित डोळ्यासमोर ठेवून आधुनिकतेचा अंगिकार करत राष्ट्र व समाज उभारणीच्या कृतीकार्यक्रमात संस्था आपले योगदान देत राहील असे विचार पदाधिकाऱ्यांच्या मुलाखतीतून व्यक्त होताना दिसतात. विभागप्रमुखांच्या मुलाखतीतून दिवसेदिवस शाळेची, महाविद्यालयाची गुणवत्ता वाढताना दिसते तर माजी विद्यार्थ्यांच्या मुलाखतीतून संस्थेबद्दल आदर वाढत असून त्यांच्यामध्ये संस्थेबद्दल काहीना काही कदण्याची उर्मी दिसून येत आहे.

## संदर्भ आणि टिपा

१. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी, **माहीती पुस्तिका**, पुणे, १९९९, पृ. ११.

२. म.ए.सो. शक्ती जिम्नॅशिअम दशकपूर्ती गौरव सोहळा अंक, पुणे, २००६, पृ. १८.

३. कित्ता, पृ. १८.

४. डॉ. नामजोशी आनंद, **आरोग्यशास्त्र**, वसंत बुक एजन्सी, पुणे, प्रथमावृत्ती २००४, पृ. २७.

५. **नागरिकांच्या आरोग्याचा जाहीरनामा** (इंडियन हेल्थग्राफ), आरोग्य मंत्रालय, भारत सरकार, २००५, पृ. १०१.

६. शिक्षण संवाद, **शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी वर्ष विशेषांक**, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी, पुणे, २०१०, पृ. ४२.

७. वार्षिक अहवाल, **महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी**, पुणे, २०११-१२, पृ. ७१.

८. कित्ता, पृ. २१.

९. कित्ता, पृ. २२.

१०. कित्ता, पृ. १५.

११. कित्ता, पृ. ७३.

१२. शिक्षण संवाद, शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी वर्ष विशेषांक, पूर्वोक्त, पृ. ३४.

# प्रकरण ७

# उपसंहार

ब्रिटिशांच्या आगमनानंतर बदलत्या सामाजिक परिस्थितीचे भान ठेवून राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या संस्थांच्या माध्यमांतून शैक्षणिक क्षेत्रात पायाभूत काम करण्यात आले आहे. अशा संस्थांमध्ये महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, पुणे विद्यार्थीगृह डेक्कन एज्युकेशन सोसायटी या संस्था आहेत. राष्ट्रप्रेमाने भारलेले तरूण तयार करून देशाच्या व समाजाच्या विकासात त्यांनी महत्त्वाचे योगदान द्यावे यासाठी त्यांच्यावर संस्कार करणाऱ्या त्या संस्था होत्या. त्याचबरोबर शिक्षणप्रसारक मंडळी, विद्या प्रसारिणी सभा, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, मॉडर्न एज्युकेशन सोसायटी अशा विविध संस्थांनी शैक्षणिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण कार्याची नोंद केली आहे. पुणे शहरातून उपरोक्त संस्थांनी केलेले कार्य अतिशय महत्त्वाचे होते.

महात्मा फुले यांच्या परिवर्तनाच्या विचारसूत्रांचा आदर्श घेत दलित, अस्पृष्य व मागासवर्गियांसाठीही संस्था निर्माण झाल्या. त्यामध्ये डिप्रेस्ड क्लासेस मिशन, कँप एज्युकेशन सोसायटी, रास्तापेठ एज्युकेशन सोसायटी, हरिजन विद्यार्थी सहायक मंडळ या संस्थांचा समावेश होतो. लष्करी शिक्षण देण्यासाठी शिवाजी प्रिपरेटरी स्कूल, एन. डी. ए. या संस्थांची स्थापना झाली आहे. अपंग व मूकबधिर यांच्यासाठी कामायनी, विनयकुमार रूईया मूकबधिर विद्यालय यासारख्या संसथा आहेत. वैद्यकीय शिक्षणासाठी बी. जे. मेडिकल कॉलेज व इतर संस्था, इंजिनिअरिंग शिक्षणासाठी एम. आय. टी, ज्ञानेश्वर विद्यापीठाची स्थापना झाली आहे. कृषी शिक्षणासाठी शेतकी कॉलेजही कार्यरत आहेत. राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार पुणे विद्यापीठाची स्थापना करण्यात आली.

पुणे हे शैक्षणिकदृष्ट्या महत्त्वाचे केंद्र असून या शहरात विविध शिक्षण संस्थांची स्थापना झाली आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच या शहराला शिक्षणविषयक कार्याची पार्श्वभूमी लाभली आहे. पुण्यातील या सर्व शिक्षण संस्थांमध्ये महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी ही संस्था महत्त्वाची आहे. वामन प्रभाकर भावे, वासुदेव बळवंत फडके यांनी या संस्थेची स्थापना केली आहे. पुणे शहर व जिल्हा, अहमदनगर, सातारा, नवी मुंबई, पनवेल या परिसरात महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या शाखा कार्यरत आहेत. गुणवत्तापूर्ण शिक्षण, ज्ञान, शिस्त, नैतिकता हे संस्कार यांच्या एकत्रीकरणातून या संस्थेच्या सर्व शाखातून शिक्षण दिले जाते. स्वच्छ चारित्र्य, देशाभिमान, लोकशिक्षण आणि

लोकसामर्थ्य निर्माण करणाऱ्या राष्ट्रीय शिक्षणाची गरज महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून भागविली जाते.

'महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी' या शिक्षण संस्थेचा समग्र आढावा प्रस्तुत संशोधनात घेण्यात आला आहे. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी व्यतिरिक्त पुणे शहरात स्थापन झालेल्या इतर शिक्षण संस्थांचाही अभ्यासही या ठिकाणी मांडण्यात आला आहे. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचा सांगोपांग अभ्यास करून या संस्थेच्या एकूण वाटचालीचा आढावा या संशोधनात घेण्यात आला आहे. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून ज्या विविध शाळा, महाविद्यालये चालविली जातात त्यांचाही अभ्यास या ठिकाणी मांडण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. त्याचबरोबर महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या शैक्षणिक कार्याचा समाजाला व देशाला कसा फायदा झाला याचीही मांडणी या ठिकाणी करण्यात आली आहे. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या विविध वेगवेगळ्या उपक्रमांची माहिती घेऊन त्या संदर्भाने हाती आलेले निष्कर्ष नोंदविण्याचा प्रयत्न काण्यात आला आहे.

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचा प्रारंभापासूनचा इतिहास या ठिकाणी मांडण्यात आला आहे. संस्थेचे नेतृत्व करणाऱ्या महनीय व्यक्तिंच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा घेऊन त्यांच्या कामाचा संस्थेला कसा पाठिंबा मिळाला याची सखोल मांडणी प्रस्तुत संशोधनात करण्यात आली आहे. त्याशिवाय महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या माजी विद्यार्थ्यांचीही माहिती नोंदविण्यात आली. संस्थेच्या माजी विद्यार्थ्यांनी कोणकोणत्या क्षेत्रात लौकिक संपादन करून समाजाच्या व देशाच्या विकासासाठी कोणते योगदान दिले या विषयीची माहिती या ठिकाणी नोंदविण्यात आली आहे.

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीची ध्येय धोरणे व उद्देश यांची चर्चा करून संस्थेच्या वाटचालीचा आढावाही घेण्यात आला आहे. संस्थेला आलेल्या अडचणी व संस्थेने त्या अडचणींवर केलेली मात या विषयीची मांडणी करून संस्थेच्या प्रत्येक शाखानिहाय अभ्यास या संशोधनात मांडण्यात आला आहे.

'महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी' या महाराष्ट्रातील महत्त्वाच्या असणाऱ्या व देशपातळीवर लौकिक प्राप्त करणाऱ्या शिक्षण संस्थेच्या अनुषंगाने अभ्यास करून अभ्यासाअंती आलेले निष्कर्ष प्रस्तुत उपसंहार या प्रकरणात मांडले जाणार आहेत. महाराष्ट्रातच नव्हे तर देशाच्या शैक्षणिक क्षेत्राच्या दृष्टीने पुणे शहर अतिशय महत्त्वाचे आहे. पुण्यातील शिक्षण संस्थांना परिवर्तनवादी विचारांची परंपरा लाभली आहे. महात्मा ज्योतिराव फुले, सावित्रीबाई फुले यांच्या विचारकार्याने दलित, शोषित, कष्टकरी बहुजन समाजाला शिक्षण देण्यासाठी काही संस्था स्थापन करण्यात आल्या

आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने महाराष्ट्र गर्ल्स एज्युकेशन सोसायटी, शारदा सदन, अनाथ बालिकाश्रम, पुणे सेवासदन सोसायटी या स्त्रियांच्या शैक्षणिक विकासासाठी कार्यरत असणाऱ्या संस्थांचा समावेश होतो.

मुलींचे शिक्षण हा विषय भारतात प्रारंभापासूनच संवेदनशील आहे. परंतु महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने या प्रश्नाकडे सुरूवातीपासून अत्यंत आस्थेने पाहिल्याचे दिसते. त्यामुळेच महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या सर्व शाळांमध्ये मुलींची संख्या लक्षणीय स्वरूपाची आहे. मुलीनी केवळ परंपरिक शिक्षण घेऊन चालणार नाही तर चाकोरीबाहेरचे शिक्षण घेऊन स्वत:चा व देशाचा विकास केला पाहिजे ही भूमिका महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने घेतली आहे. या भूमिकेतूनच मुलींना सैनिकी शिक्षण देणारी शाळा महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने कासार आंबोली येथे सुरू केली आहे.

सन १८६० साली महागावकरांनी सुरू केलेल्या खाजगी क्लासचे रूपांतर १८७४ साली 'दी पूना नेटिव्ह इन्स्टिटट्यूशन'मध्ये झाले. श्री. वामनराव भावे, वासुदेव बळवंत फडके, लक्ष्मणराव इंदापूरकर यांनी तत्कालीन परिस्थितीत विद्यार्थ्यांना उत्तम प्रतीचे शिक्षण देण्यासाठी 'पूना नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी'ची स्थापना केली. पुस्तकी ज्ञानाबरोबरच समाजावर होणाऱ्या अन्यायाविरूद्ध चीड निर्माण करणारे व विद्यार्थ्यांना कृतीप्रवृत्त करण्यामध्ये महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे योगदान मोठे आहे. टिळक, आगरकर व चिपळूणकर यांनी डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना करण्यापूर्वी दी पूना नेटिव्ह इन्स्टिटट्युशनची स्थापना झाल्यामुळे ही संस्था राष्ट्रीय शिक्षण देणारी पहिली संस्था ठरते. वेगवेगळ्या अडचणींना तोंड देत संस्थेने आपली सातत्यपूर्ण वाटचाल ठेवली आहे. दर्जा व गुणवत्ता यात कोणतीही कसूर न करता संस्था वाटचाल करत आहे. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या सुमारे ३६ शाखा कार्यरत आहेत.

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रात यश मिळविले आहे. राजकारण, क्रीडा, कला, साहित्य,उद्योग, प्रशासन, प्रसारमाध्यमे अशा वेगवेगळ्या क्षेत्रात संस्थेचे माजी विद्यार्थी उच्च स्थानावर कार्यरत आहेत. त्या ठिकाणी संस्थेच्या माजी विद्यार्थ्यांनी उज्ज्वल यश मिळविले आहे. सन २०१० पर्यंत संस्थेची विद्यार्थी संख्या ३७,५१६ इतकी होती केवळ १० विद्यार्थी संख्येवर सुरू झालेला संस्थेचा हा प्रवास आज इतक्या मोठ्या स्तरापर्यंत येऊन पोहोचला आहे.

आबासाहेब गरवारे महाविद्यालय पुणे हे महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे कला व शास्त्र शाखेचे उच्च शिक्षण देणारे हे प्रथितयश महाविद्यालय आहे. संस्थेच्या वतीने १८९६ मध्ये उच्च शिक्षणासाठी महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली. परंतु वेगवेगळ्या अडचणींमुळे हे

महाविद्यालय बंद पडले. त्यानंतरच्या काळात महाविद्यालयीन शिक्षणाची निकड लक्षात घेऊन १९४५ मध्ये या कॉलेजची स्थापना करण्यात आली. भारतातील ३७० व्या क्रमांकाचे हे महाविद्यालय आहे. पुण्यातील दुसऱ्या क्रमांकाचे स्थान मिळविणारे हे महाविद्यालय आहे. साडेपाच हजार विद्यार्थी या कॉलेजात शिक्षण घेत आहेत. वेगवेगळे व्यावसायिक अभ्यासक्रमही या कॉलेजात शिकविले जातात. विविध राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय चर्चा सत्रे, परिषदांचे आयोजन येथे केले जाते.

गरवारे वाणिज्य महाविद्यालय हे केवळ वाणिज्य शाखेचे पदवी व पदव्युत्तर शिक्षण देणारे पुण्यातील दुसरे कॉलेज आहे. अकरावीपासून ते एम. कॉम पर्यंतचे शिक्षण या महाविद्यालयात दिले जाते. या महाविद्यालयात वरिष्ठ व कनिष्ठ विभागात मिळून तीन हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

भावे उच्च माध्यमिक विद्यालय हे सुद्धा महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण देणारे विद्यालय आहे. या विद्यालयात दर्जेदार शिक्षण दिले जाते. निकालाची चांगली परंपरा या विद्यालयात आहे. कासार आंबोली येथील उच्च माध्यमिक मुलींची सैनिकी शाळा हे महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीची वैशिष्ट्यपूर्ण शाळा आहे. मुलींना पारंपरिक शिक्षणाबरोबरच उत्तम दर्जाचे सैनिकी शिक्षण मिळाले पाहिजे या हेतुने या शाळेची स्थापना करण्यात आली. या विद्यालयात मुलींना सैनिकी शिक्षण दिले जाते. सैनिकी शिक्षणाबरोबरच मुलींच्या सर्वांगीण उन्नतीसाठी उपक्रम राबविले जातात.

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्यावतीने इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड करिअर कोर्सेस ही शाखा १९८३ साली करण्यात आली आहे. या ठिकाणी एमसीए व एमपीएम हे अभ्यासक्रम शिकविले जातात. विद्यार्थ्यांच्यासाठी चांगले उपक्रम, निकालाची चांगली परंपरा यामुळे विद्यार्थ्यांमध्ये ही शाखा लोकप्रिय ठरली आहे. रेणुका स्वरूप इन्स्टिट्यूट ऑप करिअर कोर्सेस पुणे या शाखेच्या माध्यमातून विविध करिअर कोर्सेस विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून दिले जात आहेत. पूर्व प्राथमिक शिक्षिका नृत्य, छंदवर्ग, फॅशन शो, ड्रेस डिझायनिंग असे रोजगाराभिमुख उपक्रम या शाखेत राबविले जात आहेत. संस्थेने लोटे घाणेखुंट येथे नर्सिंग कॉलेज व पॅरामेडिकल सायन्स कॉलेजची स्थापना केली आहे. रुग्णालयातून प्रशिक्षित व कुशल मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी संस्थेने पावले उचलली आहेत. कोकणासारख्या शैक्षणिकदृष्ट्या मागास भागात आरोग्यविषयक सुविधा निर्माण करण्याचा हेतू यातून साध्य होत आहे.

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने कम्युनिटी कॉलेजच्या माध्यमातून एक वेगळे परंतु महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. शिक्षणाच्या प्रवाहातून वंचित राहिलेल्यासाठी स्वत:च्या पायावर उभे

करण्याचे काम कम्युनिटी कॉलेज करत आहे. प्रथमोपचार, आपत्ती व्यवस्थापन, कृत्रिम श्वसन, जीवरक्षण विषयाचे प्रमाणपत्र अभ्यासक्रम या महाविद्यालयात सुरू आहेत. अकुशल मनुष्य बळाचे रूपांतर कुशल मनुष्य बळात निर्माण करण्यामध्ये हे महाविद्यालय यशस्वी ठरले आहे.

'महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी' आज संपूर्ण महाराष्ट्रात व देशात नावारूपास आली आहे. त्यामागे संस्थेच्या नेतृत्वाचाही मोलाचा वाटा आहे. नेतृत्व करणाऱ्या कर्तृत्वन व्यक्तिंच्या योगदानामुळेच महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी आज प्रगतीच्या शिखरावर पोहोचली आहे. संस्थेच्या विकासात संस्थेचे नेतृत्व करणाऱ्या सर्वच महनीय व्यक्तिंचा मोठा वाटा असल्याचे दिसून येते.

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या यशापयशाची जेव्हा समीक्षा केली जाते. तेव्हा विद्यार्थी हा घटक विचारात घेतला जातो. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीची स्थापना विद्यार्थ्यांना केंद्रवर्ती ठेवूनच केली गेली आहे, विद्यार्थ्यांना राष्ट्रवादी, राष्ट्रीय विचारांच्या सहाय्याने देशाच्या आणि समाजाच्या विकासात सक्रिय करणे हा महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचा महत्त्वाचा कृतीकार्यक्रम आहे. त्यामुळेच या संस्थेच्या विविध शाखांतून शिक्षण घेणारे विद्यार्थी राष्ट्रप्रेम व देशसेवेच्या विचारांनी तयार झाले. त्यानी आपल्या क्षेत्रात मोठा नावलौकिक मिळविला. समाजाला व राष्ट्रासाठी त्यांनी भरीव योगदान दिले. या विद्यार्थ्यांना घडविण्यात महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचा वाटा आहे. असा कर्तृत्ववान व उच्चपदावर जाऊन देशसेवा व समाजसेवा करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये नटश्रेष्ठ बालगंधर्व, आचार्य प्र. के. अत्रे, शरद पवार, विलासराव देशमुख, प्रकाश जावडेकर, न्या. व्ही. एम. तारकुंडे, न्या. आर. एम. बापट, डॉ. राम ताकवले, डॉ. पां. वा. सुखात्मे, डॉ. नितू मांडके, डॉ. नरेंद्र करमरकर, डॉ. श्रीधर गद्रे, डॉ. श्रीराम लागू, शरद तळवलकर, कीर्ती शिलेदार, रोहिणी भाटे, रोहिणी हट्टंगडी, स्मिता पाटील, व. पु. काळे, मेजर जनरल विनायक पाटणकर, एअर मार्शल भूषण गोखले, अरूण फिरोदिया, बाबासाहेब पुरंदरे, डॉ. वसंत गोवारीकर, डॉ. प्र. ल. गावडे, प्रतापराव पवार व माधवी वैद्य यांसारख्या मान्यवर व कर्तृत्ववान व्यक्तिंचा समावेश होतो.

उपरोक्त विद्यार्थ्यांची नावे अर्थातच प्रातिनिधिक स्वरूपाची आहेत. संस्थेच्या विद्यार्थ्यांनी देशासाठी व समाजासाठी मोठे योगदान दिल्याचे दिसून येते. वरील विद्यार्थ्यांच्या नावावरून ही गोष्ट स्पष्ट होते की, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या अनेक विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या क्षेत्रात मोठी प्रगती केली आहे. राजकीय, प्रशासकीय, साहित्यिक, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, कला, क्रीडा, संगीत, नाट्य, चित्रपट, इतिहास, उद्योग अशा वेगवेगळ्या क्षेत्रात महाराष्ट्र एज्युकेशन

सोसायटीच्या विद्यार्थ्यांनी लौकिक मिळवून त्या क्षेत्रातील आपल्या ज्ञानाचा व कौशल्याचा वापर देशसेवेसाठी केला आहे असे दिसून येते.

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने महाराष्ट्रात आणि देशात जो लौकिक प्राप्त करण्यात वामन प्रभाकर भावे यांचा मोलाचा वाटा असल्याचे दिसून येते. त्यांच्या तळमळीमुळे व त्यागामुळेच संस्थेने पुणे शहरासह महाराष्ट्रात स्वत:ची एक ओळख निर्माण केली आहे. या संस्थेच्या आयुष्यात वेगवेगळे चढउतार आले संस्थेच्या नेतृत्वाने, नियामक मंडळाच्या संचालकांनी न डगमगता त्या अडचणींना तोंड दिले. त्यामुळे अडचणींवर मात करून ही संस्था टिकून राहिल्याचे दिसून येते.

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या दीडशे वर्षाच्या काळातील कार्याचा उपयोग समाजाला व देशाला मोठ्या प्रमाणावर झाल्याचे दिसून येते. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीची स्थापना समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी शिक्षणाचा प्रसार करण्याच्या विचारातून झाली आहे. समाजाभिमुख व राष्ट्राभिमुख शिक्षणप्रणाली, विज्ञाननिष्ठा, उज्ज्वल चारित्र्यनिर्मिती, विवेक संपन्न सांस्कृतिक पर्यावरण या चतु:सूत्रीवर असलेल्या श्रद्धेमधून माणूस घडवायचा आहे. हे ध्येय समोर ठेवून महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीची स्थापना झाली आहे. या संस्थेच्या माध्यमातून समाजाला व राष्ट्राला निश्चितच चांगला उपयोग झाला आहे. पुणे, नगर, रायगड, रत्नागिरी या जिल्ह्यात संस्थेने विविध अभ्यासक्रम सुरू केल्यामुळे त्या भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळाली आहे. त्यामुळे समाजाचा शैक्षणिक विकास झाला आहे.

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून ज्ञानाचे भांडार खुले झाले आहे. इंग्रजी शिक्षणाची आवश्यकता महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने इंग्रजी शाळांची स्थापना केली आहे. सर्वसामान्य व मध्यमवर्गीय पालकांच्या मुलामुलींना कमी फी मध्ये इंग्रजी माध्यमातील शिक्षण उपलब्ध करून देण्याच्या संस्थेच्या धोरणामुळे बदलत्या काळात विद्यार्थ्यांना त्याचा फायदा झाला आहे. त्याचबरोबर संस्थेच्या कार्याचा आढावा घेता हे सुद्धा लक्षात येते की, संस्थेच्या माध्यमातून जे शैक्षणिक कार्य झाले आहे. त्यामुळे सामान्य माणसांच्या मनात ग्रामीण भागातील कष्टकरी लोकांच्या मनात एक प्रकारचा आत्मविश्वास निर्माण झाला. संस्थेने शिक्षणाची जी संधी निर्माण करून दिली आहे, त्या संधीचा योग्य तो वापर करून आपण चांगल्या दर्जाचे,गुणवत्तापूर्ण शिक्षण घेऊ शकतो व समाजाप्रती आपले योगदान देऊ शकतो हा आत्मविश्वास संस्थेमुळे समाजात रूजल्याचे दिसून येत आहे.

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या कार्यासंदर्भात अभ्यास केल्यानंतर आणखी एक महत्त्वाचा निष्कर्ष हाती येतो तो म्हणजे ब्रिटिशांच्या राजवटीला उलथून टाकण्यासाठी देशप्रेमाची व स्वातंत्र्यप्रेमाची शिकवण विद्यार्थ्यांना देण्यात या संस्थेची निर्णायक भूमिका आहे. संस्थेची स्थापना ब्रिटिश काळात झाली. सन १९४७ पर्यंतचा काळ स्वातंत्र्य चळवळीचा काळ होता. या भारावलेल्या काळात स्वातंत्र्यासाठी समाजजागृती करण्यासाठी संस्थेच्या माध्यमातून प्रयत्न झाल्याचे दिसून येते. विद्यार्थ्यांना शिक्षण देत असताना स्वातंत्र्याविषयी गोष्टी सांगितल्यामुळे ते आपल्या घरी जाऊन पालकांना सांगत असत. परिणामी विद्यार्थ्यांच्या माध्यमातून स्वातंत्र्यासंदर्भात लोकांच्यामध्ये जागृती होत असे. भारतीय स्वातंत्र्याची वातावरणनिर्मिती करण्याचे कार्य संस्थेच्या माध्यमातून झाले आहे. त्याचा समाजावर व देशावर सकारात्मक परिणाम झाल्याचे सिद्ध होते. स्वातंत्र्याभिमानी समाजसेवक,जाज्वल्य देशाभिमानी नागरिक घडविण्यात संस्थेने वाटा उचलला असल्याचे दिसून येते.

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या पूर्व प्राथमिक ते पदव्युत्तर महाविद्यालयांपर्यंत सर्वच शाखांमध्ये सकस व गुणवत्तापूर्ण शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली आहे.त्यामुळे समाजाच्या शिक्षणाच्या विकासासाठी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीची भूमिका महत्वाची ठरली आहे. संस्थेने सर्वच प्रकारच्या शैक्षणिक सुविधा निर्माण करून आपली सामाजिक बांधिलकी जपली आहे. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या ध्येयधोरणांचा अभ्यास केल्यानंतर काही गोष्टी प्रामुख्याने लक्षात येतात. त्यातील महत्त्वाच्या बाबी पुढील प्रमाणे सांगता येतात.

जात, धर्म, वर्ण, लिंग या आधारे शिक्षणाची विभागणी न करता सर्वांसाठी शिक्षण खुले करण्याची भूमिका संस्थेने घेतली आहे. मराठीसह इंग्रजी भाषेचाही अंगिकार केला पाहिजे. विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासासह शारीरिक व मानसिक विकास साधण्यासाठी विविध आव्हाने पेलण्यास विद्यार्थ्यांना सक्षम करण्याची भूमिका संस्थेने घेतली आहे. विद्यार्थ्यांच्या नागरिकीकरण प्रक्रियेला सम्यक दृष्टीने प्रभावित करणे, विद्यार्थ्यांना आधुनिक शैक्षणिक पर्याय उपलब्ध करून देणे, समकालाशी सुसंगत, उपयुक्त, सामाजिक बांधिलकी जपणारे अभ्यासक्रम राबविणे, परंपरेला आधुनिकतेची जोड देऊन देशाला बलशाली व संपन्न करण्यासाठी प्रयत्न करणे ही संस्थेची भूमिका आहे.

विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नयेत म्हणून महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने विशेष प्रयत्न केल्याचे दिसून येते. नवनवीन कालसुसंगत असे व्यावसायिक अभ्यासक्रम संस्थेने सुरू

केले आहेत. विद्यार्थ्यांच्या करिअरसाठी मार्गदर्शन, जागतिकीकरण, आधुनिकीकरण इत्यादींना सामावून घेणारे विविध उपक्रम चालविले जातात. विद्यार्थ्यांमध्ये आत्मनिर्भरता व स्वावलंबन निर्माण व्हावे यासाठी प्रयत्न केले जातात. उच्च शिक्षण हे माणसाला घडविते, ध्येय प्राप्त करून देते. या दृष्टीने उच्च शिक्षणातून समाजाला घडविताना संस्थेची भूमिका निर्णायक ठरली आहे.

या शिवाय काही महत्त्वाचे व उल्लेखनीय निष्कर्ष पुढीलप्रमाणे -

१. महात्मा फुले यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन पुणे शहरात महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील, वामनराव भावे, रा. गो. देव, महादेव बल्लाळ नामजोशी, रा. गो. भांडारकर, न्यायमूर्ती रानडे, राजन्ना लिंगू, पंडिता रमाबाई, रमाबाई रानडे, बाबुराव जेधे, बाबुराव जगताप व शंकरराव कानिटकर यांसारख्या सुधारक्रांती ज्ञानगंगेचा प्रवाह जनसामान्यांपर्यंत पोहचविला.

२. पुणे शहरात मुलींच्या शिक्षणासाठी स्वतंत्र शााळेचा पहिला प्रयोग सावित्रीबाईनी राबविला तसाच पुढे महाराष्ट्र गर्ल एज्युकेशन सोसायटी, शारदासदन, अनाथ बालिकाश्रम, पुणे सेवा सदन सोसायटी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी या शैक्षणिक संस्थानी मुलींच्या शिक्षणाला प्राधान्य दिल्याने मुलींचे शिक्षणाचे प्रमाण वाढले.

३. काही शैक्षणिक संस्थानी आपल्या शैक्षणिक प्रगतीद्वारे पुणे शहराचे जागतिकस्तरावर उच्च शिक्षणाबाबत पगडा निर्माण केला आहे. उदा. टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे विद्यापीठ, प्रोगेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, भारती विद्यापीठ, महाराष्ट्र इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी (एम. आय. टी.) इत्यादी.

४. एका शाळेच्या १० विद्यार्थ्यांना घेऊन ही संस्था सुरू झाली. तिची यशस्वी वाटचाल होत असताना इ.स. २०१० मध्ये ३६ शाखा असून ३७,५१६ एवढे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. यावरून संस्थेच्या विकासाची वाटचाल  दिसून येत आहे.

५. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी संस्थेचे संस्थापक हे वासुदेव बळवंत फडके, वामनराव भावे, लक्ष्मणराव इंदापूरकर हे राष्ट्रीय विचाराने भारावलेले होते. वासुदेव बळवंत फडके हे संस्थेचे कोषाध्यक्ष असताना देशहित, देशप्रेम, प्रखर राष्ट्रनिष्ठा असलेल्या विद्यार्थ्यांना निर्माण करणारी संस्था असली पाहिजे ही भूमिका घेतली होती. तशी वाटचालही सुरू केली. त्यामुळेच दी पूना नेटिव्ह एज्युकेशन ही पुणे शहरातील राष्ट्रीय शिक्षण देणारी पहिली संस्था आहे. तिचे राष्ट्रीयत्वाचे बीज पुढे महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने वाढविले आहे. यात वामनराव भावे यांचे योगदान महत्त्वाचे आहे.

६. वामनराव भावे, लक्ष्मणराव इंदापूरकर यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेली दी पूना नेटिव्ह इन्स्टिटयूशनची यशस्वी वाटचाल पाहिली तर १८८० मध्ये ख्रिश्चन मिशनरी स्कूलमध्ये २१२ विद्यार्थी होते तर भावेंच्या संस्थेत २१३ विद्यार्थी होते. त्याचवर्षी चिपळूणकर, आगरकर, टिळक यांनी न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना केली. वेगळी संस्था काढण्याऐवजी याच संस्थेत चिपळूणकरांनी कार्य करावे अशी भावेंची अपेक्षा होती पण ती सफल झाली नाही कारण संस्थेला सरकारी अनुदानासंदर्भात भावेंचे मत घेण्यासंदर्भातील होते, तर चिपळूणकरांचे मात्र अनुदान न घेणे चांगले, यावरून दोघांमध्ये जरी वैचारिक मतभेद निर्माण झाले असले तरी त्या दोघांमध्ये विरोधाभास झाला नाही. २१ व्या शतका भावेंची पेरूगेट भावे स्कूल व चिपळूणकरांची न्यू इंग्लिश स्कूल या दोन्ही शाळा नामांकित शाळा म्हणून प्रसिध्दीस आल्या आहेत.

७. सन १८६० मध्ये ना. रा. महागावकर यांनी खाजगी स्वरूपातील शाळेचा पहिला वर्ग सुरू केला. तो पुढे पूना नेटिव्ह इन्स्टिटयूशनला जोडला. त्याचे नामाभिधान १९२२ साली महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी असे झाले. म्हणजे पुणे शहरात एका वर्गापासून शाळेची सुरूवात झाली ती टप्प्या टप्प्याने विस्तारत जाऊन पुण्याबरोबरच अहमदनगर, मुंबई, रायगड व सातारा या जिल्ह्यांमध्ये तिचा विस्तार झालेला आहे. हा विस्तार नुसता संख्यात्मक विस्तार नसून तो गुणात्मक विस्तार होता हे दिसते.

८. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीतील पदाधिकाऱ्यांमध्ये राजघराण्यातील श्रीमंत राजेरजवाडेंपासून ते शिक्षण तज्ज्ञापर्यंतच्या अनेकांचा सहभाग होता. पदाधिकाऱ्यां- मध्ये सर्व जातीधर्माच्या लोकांचा सहभाग असल्याने व शाळेतील विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी वर्गांमध्येही तशीच स्थिती होती. त्यामुळे ही संस्था सर्वधर्मसमभाव तत्वप्रणाली स्वीकारणारी ठरली आहे.

९. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीद्वारे पूर्व प्राथमिक शाळेपासून ते महाविद्यालयीन उच्च शिक्षणापर्यंतची शैक्षणिक संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिलेली होती, त्यामध्ये पारंपरिक शिक्षणाबरोबरच व्यावसायिक, सैनिकी शिक्षण देण्यावर भर दिला.

१०. सामाजिक कृतज्ञता जागृत ठेवत असताना संस्थेने राबविलेले उपक्रम उल्लेखनीय आहेत. उदा. विद्यार्थी दत्तक योजना.

११. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीला आर्थिक द्रव्याची गरज भासली असताना समाजातील अनेक देणगीदारांनी व माजी विद्यार्थ्यांनी निस्वार्थी वृत्तीने मदत केल्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासात, शाळेच्या इमारती निर्मितीमध्ये कमतरता पडू दिली नाही. उदा. मुंबईचे शेठ विठ्ठल सायण्णा यांनी ५१००० हजार रूपयांची देणगी दिली तिच्यामुळेच सध्याच्या पेरूगेट भावे स्कूलच्या

इमारतीचे बांधकाम झाले. सासवड येथील हरिभाऊ वाघिरे यांच्या उदार देणगी मुळेच सासवडच्या हायस्कूलची इमारत निर्माण झाली.

१२. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीद्वारे सुरू केलेल्या शाळा, कॉलेजमधून विविधतेतून एकता निर्माण झालेली होती. मराठी माध्यम, इंग्रजी माध्यम, मुलींसाठी स्वतंत्र शाळा, मुलींची सैनिकी शाळा, पारंपरिक व व्यावसायिक महाविद्यालये अशी जरी विविधता असली तरी त्यांच्यातील संस्थेचे ध्येय आणि उद्दिष्ट मात्र एकच होते.

१३. महात्मा फुलेंनी पुण्यात पहिली मुलींची शाळा काढली. तसाच मुलींच्या शिक्षणाचा पुढचा टप्पा म्हणजे स्वतंत्र मुलींसाठी सैनिकी शाळा सुरू करण्याचा पहिला मान महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीला मिळाला आहे. ही शाळा सुरू केल्यामुळे मुलींना शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच राष्ट्रभक्ती व चारित्र्यसंवर्धन यासारख्या मूल्यांची जाणीवपूर्वक शिकवण दिली जात आहे. तसेच सैनिकी शिक्षण दिल्यामुळे मुलींची सैनिकी दलामध्ये भरती होण्याची मानसिकता प्रबळ झाली असल्याचे दिसून येते.

१४. पुणे शहरात डेक्कन कॉलेज (पहिले १८५१), इंजिनिअरिंग कॉलेज ( १८५४), फर्ग्युसन कॉलेज (१८८५ ) व त्यानंतर महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने सुरू केलेले महाराष्ट्र कॉलेज (१८९६) वरीलपैकी तिन्ही कॉलेज टिकून राहिली पण महाराष्ट्र कॉलेज बंद झाल्याने संस्थेचे व उच्च शिक्षणासंदर्भात राहिलेले अर्धवट ध्येय मात्र पुढे आबासाहेब गरवारे महाविद्यालय (१९४५) व गरवारे वाणिज्य कॉलेज यांनी पूर्ण केले.

१५. वरील दोन्ही महाविद्यालयात पदवी बरोबरच पदव्युत्तर शिक्षण देऊन संशोधन केंद्राद्वारे नाविन्यपूर्ण संशोधनाला चालना दिली जात आहे.

१५. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने चिपळून जवळील लौटे घाणेखुंट येथे कॉलेज ऑफ नर्सिंग, स्कूल ऑफ पॅरामेडिकल सायन्स हे कॉलेज सुरू करून मेडिकल सायन्सच्या क्षेत्रातही पदार्पण केले आहे.

१६. गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना स्वकष्टाने शिकण्यासाठी कमवा आणि शिका योजना सुरू केली. याशिवाय अल्पदरात वसतिगृहाची उपलब्धता निर्माण करून दिल्यामुळे ग्रामीण भागातील अनेक मुलांना शिक्षणासाठी आधार मिळाला.

१७. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या सर्व शाळांची गुणवत्ता वाढवण्यासाठी व शिक्षण क्षेत्रातील नविन संकल्पना समजण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर इत्यादींसाठी शिक्षकांसाठी उद्‌बोधन वर्ग घेण्याचे कार्य शिक्षण प्रबोधिनीद्वारे केले जाते. हे कार्य शिक्षकांसाठी उल्लेखनीय ठरले आहे.

१८. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या माजी विद्यार्थ्यांनी राजकीय, सामाजिक, प्रशासकीय व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याचे दिसून आले.

१९. 'पूना नेटिव्ह इन्स्टिटयूशन असोसिएशन' या शैक्षणिक संस्थेत विद्यार्थी असताना ज्ञानसंपन्न शिक्षण घेतल्यानंतर पुन्हा त्यांनी निस्वार्थी वृत्तीने याच संस्थेच्या शाळा, कॉलेजमध्ये प्रभावी अध्यापनाचे कार्य केले आहे. काही जण तर या संस्थेचे लाईफ मेंबर व सेक्रेटरी देखील झालेले आहेत. अशा सर्वांच्या प्रभावी व नेतृत्वकुशल कतृत्वामुळेच पूना नेटिव्ह इन्स्टिटयूशन असोसिएशन ही संस्था ज्ञानदान देणारी गुणसंपन्न संस्था म्हणून पुढे आलेली आहे. अशा काही प्रतिनिधीक विद्यार्थ्यांची नावे पुढीलप्रमाणे -

१. विनायक रामचंद्र जालनापूरकर, विष्णु बळवंत गोखले, विष्णु गणेश गोखले, चिंतामण प्रभाकर भावे, गोविंद हरी थोरात, आप्पाजी कशिनाथ खेर, वासुदेव रंगनाथ शिरोळकर, लक्ष्मण बळवंत पेठकर, महादेव काशिनाथ कारखानीस असे अनेक माजी विद्यार्थी संस्थेच्या शाळेत अध्यापनाच्या कार्यात सातत्याने सहभागी होऊन दिलेली जबाबदारी पार पाडत.

२. 'पूना नेटिव्ह इन्स्टिटयूशन असोसिएशन' या शैक्षणिक संस्थेतील विद्यार्थी, शिक्षक व प्राध्यापक ह्यांनी स्वातंत्र्य आंदोलनात सक्रिय सहभाग घेतलेला आहे. उदा.

१. शिवराम महादेव परांजपे हे महाराष्ट्र कॉलेजमध्ये संस्कृत विषयाचे प्रोफेसर होते. पुण्यामध्ये आलेली प्लेगची साथ आटोक्यात आणण्यासाठी मि. डब्ल्यू. सी. रँड या अधिकाऱ्याची नेमणूक केली होती. त्याने सुरू केलेल्या जुलमी अत्याचारा विरूध्द पुण्यातील लकडी पुलाजवळील विठ्ठल मंदिरात लोकमान्य टिळकांच्या अध्यक्षतेखाली दोन दिवस सभा भरलेली होती. सभेच्या पहिल्याच दिवशी प्रो. शिवराम महादेव परांजपे यांनी सरकारच्या जुलमी राजवटीबद्दल जहाल भाषेत भाषण केले. त्याचा परिणाम होऊन चापेकरबंधूनी मि. रँडचा वध केला.

२. श्री. वि. गो. लिमये हे भावे स्कूलमध्ये शिक्षक होते. त्यांनी महात्मा गांधीजींनी सुरू केलेल्या असहकार आंदोलनात सहभाग घेतला.

३. मोरेश्वर गोपाळ सुतार हे भावे स्कूलमध्ये विद्यार्थी होते. त्यांनी महात्मा गांधीजींनी सुरू केलेल्या असहकार आंदोलनात व सविनय आंदोलनात सहभाग घेतला.

२०. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या यशस्वी वाटचालीबद्दल शिक्षण खात्यातील अधिकारी, प्रशासकीय अधिकारी, संस्थाचे स्थानिक पदाधिकारी, २० व्या व २१ व्या शतकात भारतातील मान्यवरांनी दिलेले अभिप्राय हे संस्थेच्या यशस्वी वाटचालीचे साक्षीदार आहेत.

२१. संस्थेच्या सर्व शाळांचा अभ्यास केल्या नंतर उच्च वर्णीय समाजातील विद्यार्थ्यांच्या तुलनेत मागास वर्गीय विद्यार्थ्यांचे प्रमाण कमी आहे असे निर्दशनात येते तरी संस्थेने भविष्यात मागास वर्गीय विद्यार्थ्यांचे प्रमाण वाढवावे

२२. एम. आय. टी. सारख्या संस्थेने राजकिय क्षेत्रात कार्य करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एक राजकिय क्षेत्रातला वेगळा अभ्यासक्रम सुरू केला आहे. तसाच अभ्यासक्रम संस्थेने आपल्या येथेही सुरू करायला हवा म्हणजे भविष्यात देशाला सर्व गुण संपन्न चांगले नेते मिळतील.

२३. संस्थेने ग्रामीण भागात शाळा, कनिष्ठ महाविद्यालय सुरू करून शिक्षणाची गंगा ग्रामिण भागापर्यंत पोहचविण्याचे कार्य केले. हे चांगलेच आहे. परुंतु संस्थेने मेडिकल (एम.बी.बी.एस.), अभियांत्रिकी या क्षेत्रातील अभ्यासक्रम सुरू करावेत.

# निवडक संदर्भ सूची

## मूळ अस्सल साधने :

## अ. प्रकाशित प्राथमिक साधने :

### 1. English:


1. Agremment and Constitution, **The Poona Native Institution**, Pune, 12 Dec. 1885.
2. Chinpunkar V.K., **Annual Report of New English School**, Pune, 1880.
3. Mumbai Archives, **Education Department**, Volum No. 22, Bombay, 1876.
4. The Poona Native Institution, **Annual Report**, Pune, 1881-1882, 1885-1886,1896-1897,1908-1909,1916-1917,1917-1918, 1921-1922.


### २. मराठी :


१. गोगटे एस.बी., सचिव, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी, **प्रेस नोट**, १९७१.

२. भावे ल. वा. (संपा.), महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी, **हिरक महोत्सव स्मारक ग्रंथ,** पुणे, १९३५.

३.**महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी वार्षिक अहवाल**, पुणे, १९२-२३, १९२४-२५, १९२९-३०,१९३०,१९३५-३६,१९५०,१९५१,१९७२-१९७३,१९७५-७६,१९७९-१९८०, १९८६-१९८७,१९८९-९० १९९०-१९९१, १९९६-९७,१९९७-९८,१९९९-२००० २००१-२, २००२-३,२००५-६, २०१०-११,२०११-१२.

४. **महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी स्मारक ग्रंथ**, पुणे, १९५०.

५. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी, **अमृतमहोत्सव स्मारक ग्रंथ**, पुणे, १९६०.

**क. दुय्यम साधने :**

**अ मराठी :**

१. करपे मधुकर, **पुण्यातील प्राथमिक शिक्षण**, सर्वसमावेशक अभ्यास, एज्युमॅप समूह, पुणे, २०१२.

२. काळे सोपान, **अहिल्याश्रम वारसा व वाटचाल**, संस्कार प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २००१.

३. कांबळे वा. ना., **आठवणीतले बाबासाहेब**, अमेय प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती, २००६.

४. कुलकर्णी अमृता, **शैक्षणिक समस्या**, पंचवटी प्रकाशन, पुणे, २०१२.

५. कुलकर्णी बा. ना., **दादा केतकर**, प्रस्तावना, पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे, २००२.

६. कोठेकर, डॉ. शांता, **इतिहास : तंत्र आणि तत्त्वज्ञान**, नागपूर, २००५.

७. कोसंबी मीरा, **पंडिता रमाबाई,** गंधर्व वेद प्रकाशन, पुणे, २०१०.

८. खिलारे कैलास(संपा), **शतकोत्तर रजतरंग**, वालचंद संचेती, पुणे, २०१२.

९. खोले विलास, **महर्षी धोंडो केशव कर्वे**, श्री गंधर्व वेद प्रकाशन, पुणे, २०१३.

१०. गरमे शांताराम (संपा.), **जे. पे. नाईक यांची निवडक भाषणे**, रूट फौंडेशन, १९९९.

११. जाधव मोहन, **भारतीय शिक्षणाचा विकास**, मुद्रक- जयभारत, पुणे, २००१.

१२. जावडेकर, आचार्य शं. द., **आधुनिक भारत**, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९७९.

१३. जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री (संपा.), **मराठी विश्वकोश**, खंड १२, महाराष्ट्र राज्य साहित्य मंडळ, मुंबई, १९८५.

१४. जोशी विष्णु श्रीधर, **आद्यक्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांचे चरित्र**, विशेष प्रकाशन अनुज्ञा, मुंबई, १९४७.

**१५.** टिकेकर अरूण (संपा.), **शहर पुणे - एका सांस्कृतिक संचिताचा मागोवा,** निळूभाऊ लिमये फौंडेशन, पुणे, २०००.

१६. दीक्षीत राजा, **पुणे विद्यापीठाचा इतिहास**, पुणे विद्यापीठ मुद्रणालय, पुणे, १९९९.

१७. देऊसकर चिंतामणी (संपा.), **नारायण महाराज स्मृती विशेषांक**, १९५१.

१८. नामजोशी डॉ. आनंद, **आरोग्यशास्त्र**, वसंत बुक एजन्सी, पुणे, २००४.

१९. निकुंभे रमेश, **महात्मा फुलेंचे शैक्षणिक कार्य**, शब्दवेध प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९९८.

२०. पाटील गंगाधर, **भारतीय शिक्षणाचा इतिहास व समस्या**, स्वरूप प्रकाशन, पुणे, १९९९.

२१. पाटील म. ग., **भारतातील उच्च शिक्षणाची स्थिती**, अस्मिता प्रकाशन, पुणे, २००८.

२२. फडतरे भूषण गोविंद, **स्वातंत्र्यलढ्याचे पाईक**, अथर्व प्रकाशन, पुणे, २०१५.

२३. फडतरे भूषण गोविंद, **भारतीय स्वातंत्र्यलढ्यात पुणे जिल्ह्याचे योगदान** (इ. स. १९२० - १९४७), डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २०१३.

२४. फुलंब्रीकर प्रा. माणिक व इतर (संपा.), **शिक्षण संवाद,** शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी वर्ष शुभारंभ विशेषांक, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी, पुणे, २०१०.

२५. बापट माधव, **आचार्य**, भारत प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९८१.

२६. वानखेडे सं. भा., **पुण्यातील शैक्षणिक प्रवेशांची समस्या व उपाय**, जागर प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, १५ ऑगस्ट २०११.

२७. शेख गफूर, **आधुनिक भारताचा इतिहास**, अरूण प्रकाशन, नांदेड, २००७.

२८. साखरे चिंतामणी, **समकालीन पुणे**, स्वानंद प्रकाशन, कोथरुड, पुणे, १९९१.

२९. साखरे द. मा., **भारतीय शिक्षणाचा इतिहास**, सुमित प्रकाशन, औरंगाबाद, २००४.

**ब. स्मरणिका :**

१. अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद शतक महोत्सवी वर्ष**, स्मरणिका**, पुणे, २००७.

२. एकबोटे गजानन (संपा), **मॉडर्न हायस्कूल, अमृत स्मरणिका**, प्रस्तावना, पुणे, २००५.

३. टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, **विशेष पुरवणी**, पुणे, २०१५-२०१६.

४. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे मुलांचे विद्यालय,**आकांक्षा**, शतकोत्तर रौप्य महोत्सवी स्मरणिका, पुणे, २०००.

५. म.ए.सो. मुलांचे विद्यालय आणि उच्च माध्यमिक विद्यालय, **भावबंध**, पुणे, २००४.

६. म.ए.सो. कै. गजाननराव भिवराव देशपांडे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, **शतक महोत्सवी वर्ष**, सासवड, २०१०-११.

७. महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था गाथा शतकाची, **गौरव ग्रंथ**, पुणे, २००८.

८. **स्मृतीग्रंथ शतक महोत्सव स्मरणिका**, विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे, २००९.

९. श्री शिवाजी मराठा सोसायटी, **९५ वा वार्षिक अहवाल**, पुणे, २०१२-१३.

**क. अहवाल :**

१. इन्स्टिटट्यूट ऑफ मॅनेजमेंट ॲन्ड करिअर कोर्सेस, **माजी विद्यार्थी अहवाल**, पुणे, २०११.

२. गरवारे महाविद्यालय**, माजी विद्यार्थी संघ**, अहवाल, पुणे, २०१०.

३. पुणे मुख्याध्यापक संघ, **वार्षिक अहवाल**, पुणे, २००५.

**ड. वृत्तपत्र :**

१. **दैनिक केसरी**, पुणे, दिनांक २६ फेब्रुवारी १८९५, २३ जुलै १८९५, २६ डिसेंबर १८९९, ४ मे १९०२, ९ मे १९१७.

२. **ज्ञानचक्षू**, पुणे, दिनांक ४ नोव्हेंबर १८७४.

**अ. निवडक मुलाखती**

१. **श्री. अनिल वळसणकर, मुख्य कार्यकारी अधिकारी** महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी, पुणे, दिनांक २.२.२०१०.

२. **सौ. अमृता सुभाष**, माजी विद्यार्थी, पुणे, दिनांक १६.०२.२००९.

३. **सौ. पुजा जोग**, मुख्याध्यापिका, राणी लक्ष्मीबाई मुलींची सैनिकी शाळा, कासार अंबोली, दिनांक २३.१२.२००९.

४. **सौ. माधवी वैद्य**, माजी विद्यार्थी, पुणे, दिनांक ०९ .०१.२००९.

५. **डॉ. विरेंद्र घैसास**, माजी विद्यार्थी, पुणे, दिनांक २८.०१.२०१०.

६. **श्री. शुक्ला विनायक**, सचिव, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी, पुणे, दिनांक १०.१.२०१०.

# परिशिष्ट

पृष्ठ क्र

परिशिष्ट क्रमांक १ : पूना नेटिव्ह इन्स्टिटयूशनची घटना .. २१६

परिशिष्ट क्रमांक २ : समकालीन वर्तमानपत्रातील संस्थेच्या संदर्भातील बातमी. .. २२२

परिशिष्ट क्रमांक ३ : महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष .. २२३

परिशिष्ट क्रमांक ४ : महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे चिटणीस .. २२४

परिशिष्ट क्रमांक ५ : 'पूना नेटिव्ह इन्स्टिटयूशन असोसिएशन' या शैक्षणिक संस्थेच्या प्रारंभी विविध मान्यवरांनी दिलेले उल्लेखनीय अभिप्राय .. २२५

परिशिष्ट क्रमांक ६ : महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीची स्थापन झालेली पहिली शाळा भावे शाळेचे मुख्याध्यापक .. २२८

परिशिष्ट क्रमांक ७ : निवडक फोटो - .. २३०

# परिशिष्ट क्रमांक : १

## पूना नेटिव्ह इन्स्टिट्यूशनची घटना

**This Indenture** made the twelfth day of December in the Christian year one thousand eight hundred and eighty five **Between Dinshajee Maneckjee Petit** and **Jamsetjee Nasarvanji Petit** both of Bombay Parsee Esquires hereinafter unless otherwise designated referred to as the said **Donors** of the one part and **Khan Bahadoor Dustoor Hoshang Jamasp** of Poona High Priest of the Parsees, and **Ganapatrao Vinayak** Esquire alias **Shrimant Babasaheb Sanglikar**, First class Sirdar, **Rao Bahadoor Gopalrao Hari Deshmukh**, **Madhavarao Moreshvar Kunte** Esquire, Principal Poona Government High School, **Vithalrao Narayan Nathu** Esquire alias **Shrimant Baba Saheb of Poona**, **Vaman Prabhakar Bhave** Esquire Principal Poona Native Institution and **Lakshman Narhar Indapurkar** Esquire, Secretary Poona Native Institution all of Poona Hindu Inhabitants hereinafter unless otherwise designated, referred to as the said Trustees of the other part. **Whereas** a High School for the Education of Natives of India has been conducted in Poona for many years last past and has been commonly called or known by the name of the **Poona Native Institution**. And **Whereas** one of the objects of the said Institution is to admit as many free students as possible to receive Education in the said Institution along with students paying fees. And **Whereas** the said Donors being desirous of setting apart sums of Rupees One thousand and Rupees Five hundred respectively upon Trust for the benefit of the said Institution, and to be called ~~[illegible]~~ "the Poona Native Institution Endowment Fund" have agreed to assign the said sums of Rupees one thousand and Rupees Five hundred respectively, the former in a Bombay Port Trust Bond No 10429, consolidated No 1562, dated the thirty first August one thousand eight hundred and eighty two, Interest on which Bond accrues from the First day of October one thousand eight hundred and eighty five and which said Bond is deposited by the said Trustees in their own names with the Bank of Bombay, and the latter also in a Bombay Port Trust Bond No 11233, consolidation No 7240 dated the sixth October one thousand eight hundred and eighty five. Interest on which Bond accrues from the first day of October one thousand eight hundred & eighty five and which said Bond is deposited by the Donor in the names of the said Trustees with the Bank of Bombay, to the said Trustees upon the Trusts and subject to the provisoes and conditions hereinafter declared and contained and have requested the said Khan Bahadur Dustur Hoshang Jamasp, Ganapatrao Vinayek Esquire alias Shrimant Baba Saheb Sanglikar, Rao Bahadur Gopalrao Hari Deshmukh, Madhavrao Moreshvar Kunte Esquire, ~~Vithalrao Narayan [illegible] Esquire, alias [illegible]~~ Poona Vaman Prabhakar Bhave Esquire and Lakshman Narhar Indapurkar Esquire, to become and act as Trustees in the Execution of the said Trusts which they have consented to do. **Now This Indenture Witnesseth** that for the purpose of carrying into Effect the said recited arrangements and agreements and in consideration of the sums of Rupees one thousand and Rupees Five hundred respectively by the said Donors paid to the said Trustees in manner aforesaid the receipt of which said sums of Rupees one thousand and Rupees Five hundred respectively is hereby acknowledged they the said Khan Bahadur Dustoor Hoshang Jamasp, Ganpatrao Vinayak Esquire alias Shrimant Baba Saheb Sanglikar, Rao Bahadur Gopalrao Hari Deshmukh Madhavrao Moreshvar Kunte Esquire, Vithalrao Narayan Nathu Esquire alias

R. 1500

R. 1880

for the time being of these presents shall open an account in the said Bank in the names of any one or more of them and shall cause to be credited to such account all sums received as interest or income of the said Fund or Securities or any portion of the same or otherwise howsoever as soon as the same shall from time to time be received and shall keep regular accounts of all moneys received and expended by them under and by virtue of the Trusts of these presents and shall publish full and particular accounts of such receipts and expenditure at least once in every year on or before the Thirtieth of June following and shall furnish Printed Copies of such accounts to the said donors and to all Donors to the said Fund of Rupees Five hundred and upwards and to the Donors during the last preceding years and to Subscribers whose annual subscriptions amount to Rupees Twenty five and upwards – Provided always and It is hereby also Agreed and Declared that if the said Trustees or Trustee of the time being of these Presents or any of them or any new Trustee appointed as hereinafter mentioned, shall die or go to reside permanently out of British India for more than twelve months or desire to be discharged or refuse or decline or become incapable or unfit to act in the Trusts hereby in them or him respectively reposed as aforesaid, then and in every such case it shall be lawful for the continuing Trustees or Trustee for the time being of these presents to appoint some one or more person or persons to be selected in the first instance from the Donors of Rupees Five hundred or upwards to the said fund and failing these from among the rest of the Donors or Subscribers & other gentlemen whether European or Native residing in British India as the said continuing Trustees or Trustee for the time being of these presents may deem proper to be a Trustee or Trustees in the place of the Trustee or Trustees so dying or going to reside permanently out of British India for more than twelve months or desiring to be discharged or refusing or declining or becoming incapable or unfit to act as aforesaid so that the number of Trustees shall not at any time be reduced below two and shall not exceed seven # Provided always that in case there shall be no Trustee capable or willing to act in the appointment of a New Trustee or New Trustees as aforesaid, the Donors to the said Fund to the amount of Rupees Five hundred or upwards each, for the time being alive & failing these, the rest of the Donors or Subscribers and failing these the heirs, Executors or administrators, of the Donors, Subscribers, or Donors for that year, and the year before that, shall elect & appoint New Trustee or Trustees by a majority of their votes, and upon every such appointment of a New Trustee or New Trustees the said Fund shall, if and so far as the nature of the same or the Securities in which the same or any part thereof shall be invested and other circumstances shall require or admit, be transferred, so that the same may be vested in the Trustees or Trustee for the time being of these presents and every new Trustee appointed as aforesaid may as well before as after such transfer of the said Fund or the Securities in which the same or any part thereof may be vested, act or assist in the execution of the Trust and powers of these Presents as fully and effectually as if he had been constituted or named a Trustee by these Presents – Provided always and it is hereby agreed and declared that the Trustees for the time being of these presents shall respectively be chargeable only for such moneys, Stocks, Funds, and Securities as they shall respectively actually receive notwithstanding their signing any receipt or receipts or other discharges for the sake of conformity and shall be answerable and accountable only for their own acts receipts neglects or defaults and not for those of one another or for any Banks or Bankers, broker or brokers, or other person or persons, with whom or into whose hands any Trust monies, or Securities may be deposited or may come, nor for the insufficiency or deficiency of any Stocks, Funds, or Securities, nor for any other loss unless the same shall happen through his or their own wilful default respectively – And It is hereby further Agreed and declared that the said Trustees or Trustee for the time being of these Presents may from time to time make such rules and regulations for and in relation to the conduct & management

of

alias Shrimant Baba Saheb of Poona, Vaman Prabhakar Bhave Esquire and Lakshman Parhar Indapurkar Esquire do hereby for themselves their respective heirs Executors and administrators agree with the said Donors their heirs Executors and administrators, that they the said Trustees and the Survivor of them and the Executors & administrators of such Survivor shall hold and stand possessed of the said Sums of Rupees one thousand and Rupees Five hundred and the securities in which the same or any part thereof are, is or shall be invested and the income thereof and all the additions accretions and augmentations that may hereafter be made to the same by additional Donations or Subscriptions thereto from the said Donors and other persons or otherwise howsoever upon the Trusts and for the Ends and purposes hereinafter contained viz upon trust to continue the investment of the said Sums of Rupees one thousand and Rupees Five hundred respectively in Bombay Port Trust Bonds as aforesaid and to invest all and every the additions accretions and augmentations that may hereafter be made to the same by way of additional donations or subscriptions in Securities of the Government of India or upon securities guaranteed by the Government of India or the Government of Bombay or upon Bonds or Securities of the Bombay Port Trust or Bonds Debentures or Securities of the Municipality of Bombay with liberty to vary the same into others of a like nature as the Trustee or Trustees for the time being of these presents shall think proper and expedient and upon Trust that they the said Trustees or Trustee for the time being of these presents shall from time to time recover and receive the income and interest which shall accrue due on and from the said principal sums and the said additional donations and subscriptions (if any) as aforesaid or the investments thereof as aforesaid opening and keeping in the books of the said Institution and otherwise two separate accounts of the said Sums of Rupees one thousand and Rupees Five hundred respectively to be styled respectively "The Dinsha Maneckji Petit Endowment Fund" and "The Jamsetji Nassarwanjee Petit Prize Fund" and of the annual interest accrued due on and from the said Sums of Rupees one thousand and Rupees Five hundred respectively invested in Bombay Port Trust Bonds as aforesaid and shall apply the interest accrued due on Rupees Five hundred towards the giving of an annual Prize or Prizes in the name of the said Donor Jamsetji Nassarwanji Petit, always keeping intact the said principal sum of Rupees Five hundred Provided always that it shall be at the discretion of the managers of the said Institution to give one or two Prizes out of the said Interest but that on no account shall any prize of a value of less than Ten Rupees be given at any time. Provided also that if in any year the managers of the said Institution do not deem it advisable to give any Prize or Prizes out of the said Interest, the amount of Interest due accrued during such year shall be credited to the said "Jamsetji Nassarwanji Petit Prize Fund," as an addition to the principal sum of Rupees Five hundred and shall not be applied towards giving one or more Prizes during any of the following years but shall be converted into Principal, such items of Interest not appropriated towards the giving of prizes when aggregating to Rupees one hundred or upwards being invested in Loans of the Government of India, Bombay Port Trust Bonds, or Municipal Loans, or such other securities guaranteed by the Government of India as they the said Trustees or Trustee for the time being of these Presents may deem advisable and the Interest of such new Investments being added to the interest of the said original Sum of Rupees Five hundred in Bombay Port Trust Bonds and applied along with it towards the giving of one or more Prizes upon the same terms conditions and stipulations as hereinbefore mentioned. Provided also that the managers of the said Institution shall in their Reports of the Institution whenever published give an account of how the interest on the said Sum of Rupees Five hundred has been utilised and applied And upon Trust that they the said Trustees or Trustee for the time being of these Presents shall always keep intact the said principal Sum of Rupees one thousand so invested as aforesaid and shall out of the income and interest accrued due on and from the said principal Sum of Rupees

Rupees one thousand and all and every the additions, accretions and augmentations that may hereafter be made to the same by way of additional donations or subscriptions and recovered and received by them the said Trustees or Trustee for the time being of these Presents Expend from time to time such sum or sums of money as the said Trustees or Trustee for the time being of these presents shall deem proper and expedient towards defraying the general expenses of carrying on the School and the surplus towards awarding Scholarships and Prizes to such of the students of the said Poona Native Institution as shall by them in his or their discretion be deemed deserving of the same and also in or towards the purchase of such furniture for the use of the masters or scholars of the said Institution or otherwise for the purposes of the said Institution by way of addition to the existing stock belonging to the said Institution and also in or towards the purchase or hire of such chemical, electrical, magnetical or other scientific or other apparatus or instruments and also in or towards the purchase of books, maps and stationery or otherwise as may be necessary or conducive to the satisfactory maintenance and progress of the said Institution and towards the payment of such contingent charges of and incidental to the conduct and maintenance of the said Institution as the said Trustees or Trustee for the time being of these Presents shall from time to time deem necessary or expedient and shall also out of such income inter alia pay and discharge or reimburse themselves all the expenses incurred in or about the execution of the Trusts of these presents or incidental thereto including the expenses of appointing New Trustees under the power hereinafter contained and transferring from time to time the said Trust Fund or the securities in which the same or any part thereof may be invested to the names of such New Trustees as occasion shall require and all such other expenses for printing, advertising or other purposes as the said Trustees or Trustee for the time being of these presents shall approve and deem to be conducive to the purposes of these Trusts. Provided always that in the annual Reports of the Institution an account of the said "Dinshaw Maneckji Petit Endowment Fund" shall be exhibited showing the annual interest received and the [illegible] in the shape of Prizes or for the current expenses of the Institution or otherwise howsoever for the purposes of these Trusts. And that in the event of the Trustees for the Port of Bombay at any time hereafter paying up the amount of the said Port Trust Bond for Rupees one thousand the monies so paid shall be invested in securities of or guaranteed by the Government of India or the Government of Bombay or in Bombay Port Trust or Municipal Bonds or in Bonds or Notes of other Corporations issued under the sanction of the Government of India or the Government of Bombay. And Provided always and it is hereby agreed that if in any year after making provision for all the purposes aforesaid out of the income or interest accrued on the said Fund excluding the "Jamsetjee Nasarwanjee Petit Prize Fund of Rupees Five hundred aforesaid and its accumulations but including the subsequent additions, accretions, and augmentations to the rest of the Fund in the shape of additional donations and subscriptions, if any, as aforesaid or the securities in which the same or any part thereof may be invested as herein before provided, there may be any surplus, it shall be lawful for the said Trustees or Trustee for the time being of these presents to deposit the same at interest in any local Bank as the said Trustees or Trustee for the time being of these presents shall deem proper. Provided always and it is hereby further agreed and declared that the said Trustees or Trustee for the time being of these presents shall deposit for safe custody the whole of the said Fund and all additions, accretions and augmentations thereto and the securities in which the same or any part thereof may be invested in the Bank of Bombay or the Branch of the same in Poona with power for the said Trustees or Trustee for the time being of these Presents to nominate and constitute the said Bank or its said Branch with which the said Fund or securities or any portion or portions of the same is or are deposited the attorneys of the Trustee or Trustees for the time being of these presents for the purpose of collecting the income and interest thereof and that the said Trustees or Trustee

for

of the said Trust Fund not inconsistent with these presents or with the main objects thereof as they may think necessary and proper. Provided always and It is hereby agreed that the Trustees or Trustee for the time being of these presents shall be at liberty to receive donations of Rupees Five hundred and upwards subject to the interest or income thereof being set apart for particular objects of the Institution and subject to the directions of the Donors in that behalf. Provided also and It is hereby agreed and declared that in the event of the said Institution being at any time hereafter not carried on for want of funds or for any other cause whatsoever then and in that case the said Dinshaji Maneckji Petit Endowment Fund of Rupees One thousand [illegible] and the said "Jamsetjee Nasserwanjee Petit Prize Fund" of Rs 500 [illegible] invested in Bombay Govt Trust Bond as aforesaid or otherwise as herein before provided shall be handed over by the said Trustees or Trustee for the time being of these Presents to and for the benefit of any other similar Institutions at Poona as may be decided under the sanction of the Court [illegible] upon the same trusts and subject to the same provisos conditions as are herein [illegible]. In Witness whereof the parties to these presents have hereunto set and subscribed their respective hands and seals the day and year first above written:-

Signed Sealed & delivered by the within named Dinshaji Maneckji Petit & Jamsetjee Nassarwanji Petit in the presence of

Witness for Sir Dinshawji Maneckji Petit Knight
Rustomji Nasarwanji Langrana

Dinshaw Maneckjee Petit

Signed Sealed & Delivered by the within named Khan Bahadur Dastur Hoshang Jamasp, Ganpatrav Vinayak alias Babasaheb Sanglikar, Rav Bahadur Gopalrav Hari Deshmukh, Madhavrao Moreshwar Kunte, Vithalrav Narayan Natu alias Shrimant Babasaheb of Poona, Vaman Prabhakar Bhave, and Lakshman Narhar Indapurkar in the presence of

Hoshang Jamasp Dastoor
Ganpatrao Vinayak Sanglikar
Mahadev Moreshwar Kunte
Gopal Rao Hari Deshmukh
Vithalrao Narayan Natu
Vaman Prabhakar Bhave
Lakshman Narhar Indapurkar

Vinayak Ramchandra Jalnapurkar

Dated the 12th day of [illegible] 1885

Dinshaw Maneckjee Petit Bart

To

Khan Bahadur Dastur Hoshang Jamasp & others

# Trust Deed

Messrs Payne Gilbert & Sayani

Attorneys at Law

# परिशिष्ट क्रमांक : २

**समकालीन वर्तमानपत्रातील संस्थेच्या संदर्भातील बातमी.**

दै. ज्ञानचक्षू, तारीख ४ नोव्हेंबर १८७४.

## जाहिरात

संस्कृत, ल्याटीन, पर्शियन, आणि मराठी यांपैकीं एक व दुसरी इंग्रजी, म्याट्रिक्युलेशनच्या परिक्षेपर्यंत शिकणाऱ्या मुलांकरितां, या शाळेंत मोठे अनुभविक शिक्षक असून बहुत काळपर्यंत सुरक्षित चालावी व ज्या शाळेचे तिमाही रिपोर्टावरून लोकांची खात्री व्हावी व मुलांचे अभ्यासाकडे लक्ष आहे किंवा नाहीं, आईबापांच्या परवानगीशिवाय मुलें विनाकारण घरीं राहतात कीं काम व धंदा करितात किंवा नाहीं वगैरेबद्दलची तजवीज या शाळेंत चांगले प्रकारची ठेविली आहे. हल्लीं ही शाळा जुने तपकीर गल्लींत भिडे यांचे वाड्यांत आहे. कित्येक मास्तर लोक मुलांस नानाप्रकार सांगून या शाळेंत येऊं नये, म्हणून त्यांचे मनावर ठसे उठवीत आहेत. परंतु हे त्यांचें करणें बरोबर नाहीं.

वासुदेव बळवंत फडके

सेक्रेटरी आणि ट्रेझरर पुना नेटिव्ह इन्स्टीट्यूशन *

दै. केसरी, मंगळवार तारीख ९ ऑक्टोबर १९१७.

## पुणें नेटिव्ह इन्स्टिटयूशन

या संस्थेचा १९१६–१७ सालचा वार्षिक रिपोर्ट छापून प्रसिद्ध झाला आहे. रिपोर्टावरून पाहतां ही संस्था प्रथमतः १८६० सालीं स्थापन झाली. जसे मनुष्याच्या जीवनक्रमांत कांहीं दिवस अत्यंत वाईट येऊन जातात तसे ह्या संस्थेस मध्यंतरी वाईट दिवस आले होते. शाळेची सांपत्तिक स्थिति दिवसानुदिवस असमाधानकारक होऊन ही संस्था लवकरच लयास जाणार अशी भीति पुष्कळांना वाटत होती. परंतु हल्लींच्या उत्साही मंडळींनीं ती भीति बरीचशी दूर केली आहे असें मानण्यास हरकत नाहीं. ह्या संस्थेस गेले सालीं ९८०० रुपये कर्ज होतें. हल्लींचे चालकांनीं खटपट करून माजी विद्यार्थ्यांच्या मदतीनें त्यांतील ७३०० रुपये कर्ज फेडलें व शाळेची गहाण पडलेली इमारत सोडविली, हें त्यांस भूषणावह आहे.

ह्या संस्थेच्या एकंदर ७ शाळा आहेत. त्यांपैकीं पुणें शहरांत एक हायस्कूल व चार प्राथमिक शाळा असून सासवड व बारामती येथें अँग्लो-व्हर्न्याक्युलर स्कूल्स आहेत. येथील हायस्कुलांत ७५० मुलें असून ३१ शिक्षक आहेत. त्यांपैकीं दोन एम. ए. व ५ बी. ए. आहेत. बहुतेक शिक्षक माजी विद्यार्थ्यांपैकींच आहेत. राहिलेलें कर्ज ह्या वर्षाअखेर फेडून मंडळी इमारतफंडाचे उद्योगास लागणार आहेत. तरी लोक ह्या जुन्या संस्थेस हस्तेंपरहस्तें मदत करून तिचे अभ्युदयाचे वाटेकरी होतील अशी आम्हास उमेद आहे.

# परिशिष्ट क्रमांक : ३

## महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष

| अ.क्र. | अध्यक्ष | कार्यकाल |
|---|---|---|
| १ | श्री. सर जमशेटजी जिजिभॉय बॅरोनेट | इ. स. १८८७ ते १९२५ |
| २ | श्रीमंत बाबासाहेब घोरपडे, इचलकरंजी | इ. स. १९२६ ते १९४३ |
| ३ | श्रीमंत रघुनाथराव शंकरराव तथा बाबासाहेब पंडित पंत सचिव, राजेसाहेब, भोर | इ. स. १९४४ ते १९४८ |
| ४ | मेजर श्रीमंत राजाबहाद्दूर सर मालोजीराव मुधोजीराव नाईक निंबाळकर, फलटण | इ. स. १९४८ ते १९६६ |
| ५ | न्यायमूर्ती यज्ञेश्वर वासुदेव दीक्षित | इ. स. १९६६ ते १९७८ |
| ६ | पद्मभूषण भालचंद्र दिगंबर तथा आबासाहेब गरवारे | इ. स. १९७८ ते १९८४ |
| ७ | डॉ. पांडुरंग वासुदेव सुखात्मे | इ. स. १९८४ ते १९९७ |
| ८ | डॉ. वि. गो. भिडे | इ. स. १९९८ ते २००३ |
| ९ | डॉ. वसंतराव गोवारीकर | इ. स. २००३ ते २०१२ |

स्त्रोत: भावबंध, म.ए.सो. मुलांचे विद्यालय आणि उच्च माध्यमिक विद्यालय, पुणे, २००४, पृ. ६.

# परिशिष्ट क्रमांक : ४

## महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे चिटणीस

| अ.क्र. | चिटणीस नाव | कार्यकाल |
|---|---|---|
| १ | श्री. दि. ब. गोखले | इ. स. १९०० ते १९०३ |
| २ | श्री. दि. रा. जालनापूरकर | इ. स. १९०४ ते १९१० |
| ३ | श्री. शं. ब. गोळे | इ. स. १९१० ते १९१४ |
| ४ | श्री. पी. व्ही. जोगदंड | इ. स. १९१४ ते १९१६ |
| ५ | श्री. दि. ग. गोखले | इ. स. १९१६ ते १९१८ |
| ६ | श्री. ल. वा. भावे | इ. स. १९१८ ते १९२० |
| ७ | श्री. गो. ग. मालशे | इ. स. १९२० ते १९३० |
| ८ | श्री. डी. व्ही. बापट | इ. स. १९३० ते १९३२ |
| ९ | श्री. नी. वा. किंकर | इ. स. १९३२ ते १९४१ |
| १० | श्री. ल. रा. मोडक | इ. स. १९४१ ते १९४४ |
| ११ | श्री. एस. एन. भट | इ. स. १९४४ ते १९४८ |
| १२ | श्री. म. वा. शाळीग्राम | इ. स. १९४८ ते १९६९ |
| १३ | डॉ. श्री. ब. गोगटे | इ. स. १९६९ ते १९७७ |
| १४ | श्री. न. शं. जमदग्नी | इ. स. १९७७ ते १९७८ |
| १५ | डॉ. द. धो. वाणी | इ. स. १९७८ ते १९८३ |
| १६ | डॉ. प्र. ल. गावडे | इ. स. १९८३ ते १९८५ |
| १७ | प्रा. दा. चिं. गोखले | इ. स. १९८५ ते १९९४ |
| १८ | प्रा. प्र. ग. कुलकर्णी | इ. स. १९९४ ते २००१ |
| १९ | श्री. र. वि. कुलकर्णी | इ. स. २००१ ते २००८ |
| २० | श्री. वि. ना. शुक्ला | इ. स. २००८ ते २०१२ |

स्त्रोत : महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी, आकांक्षा, स्मरणिका, पुणे, २०००, पृ. ४२.

# परिशिष्ट क्रमांक : ५

'पूना नेटिव्ह इन्स्टिटट्यूशन असोसिएशन' या शैक्षणिक संस्थेच्या प्रारंभी विविध मान्यवरांनी दिलेले उल्लेखनीय अभिप्राय.

1. " I have visited this school this morning and heard the candidates's class read. The reading was good and Engilsh, Persian, and Sanskrit ware read."

W. H. Nuham

24.8.1875. Addistional Jag.

2. " I only made a cursory inspection, but was satisfied with what I saw and heard."

Mr. R. G. Oxzenham

22.9.1875. Principal Deccan College.

3. I have had pleasure in visiting this school and wish it every success."

Mery Carpaenter,

29.11.1875. England.

4. " I visited this school this afternoon and heard several classes read and write which they did creditable and they appeared to be well taught."

Sir Mangaldas Nathubai

1876. K.C.S.I.

5. "The Committee visited this school on $4^{th}$ and $5^{th}$ January 1877, examined all classes and ware highly pleased with their proficiency. The masters deserve every credit for the excellent system they have with the boys and the trouble they take in their education."

W. HICKS, LT.- COL.

C. F. KEYS,

J. DAVIDSON, M.D.

Member of the Inspection Committee,

4th and – 5th . 1. 1877. Poona Netiv Institution.

6.This school has for good reasons been hitherto denied the privileges of registration, although application has been made several time, but having carefully perused all the former proceedings in the case and considered the educational wants of the locality, and having also personally visited the school on more than one occasion, I am of opinion that the time has now arrived when the privilege asked for, may with propriety, be granted and threfor recommend that the school be registered in your office. Much of the work done appeared to me to be excellent; while the fact that the school has been in independent existence for four years, proves conclusively that it supplies an educational want in the city."

Mr. T. B.Carkham

18.7.1878. Acting education Inspector.

7. " I belive it is the only Private school in Poona which has not been conducted according to the convenience of the teacher but IN THE REAL INTERESTS OF THE PUPILS.

Narayan B. Dandekar

22.7.1879. Director of Public Instr., Berar.

8. " A school which had borne the brunt of battle with the gallantry of the Poona Native Institution would always be entitled to the special respects of the successive Govts. Governors, he was afraid, ware not allowed to cherish such a feeling as personal sympathy, but ware looked upon as akind of good providence to everybody …… What had impressed him however was the grant wealth of the school; for in all his experiences in England and

Scotland, His Excellency consequently could not but compliment and congratulate the supporters of an Institution which had been so successful and in which more than $1/4^{th}$ and less than $1/3^{rd}$ scholars ware receiving a free secondary education. His Excellency was however aware that they ware acting in accordance with the tradition of their race in showing hospitality to so called beggars."

Annorebal Mr. Lord Re

15.7.1885. Governar, Bombay

9. " I was pleased with the fair progress and the general order of the Institution. The efficient management reflects credit on its worthy Principal Mr. Bhave."

Shrimant Jaswantsigh

8.9.1885 Limidi.

10. " The Poona Native Institution is one entitled to considered under recognized management."

Mr. Lee Warnar

17.11.1885. Diractor of public Instraction.

11. " I am desired by H. E. The Marquis of Lansdowne to request you to express to the member of the Institution which you respresent the full appreciation felt by His Excellency and also by Lady Lansdowne."

3.12.1888. Private H. E. the G. G.

12. " I hope as the Poona Netive Institution has flourished in the past, so it may continue to flourish in the future; and yhat it may spread its sphere of usefulness throughout the country."

H. R. H. The Duke of CANNOUGHT.

# परिशिष्ट क्रमांक : ६

## महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीची स्थापन झालेली पहिली शाळा भावे शाळेचे मुख्याध्यापक


| अ.क्र. | मुख्याध्यापक नाव | कार्यकाल |
|---|---|---|
| १ | श्री. वा. प्र. भावे | इ. स. १७४ ते १८९९ |
| २ | श्री. वि. रा. जालनापूरकर | इ. स. १८९९ ते १९१० |
| ३ | श्री. ज. र. दांडेकर | इ. स. १९१० ते १९११ |
| ४ | श्री. शं. ब. गोळे | इ. स. १९११ ते १९१२ |
| ५ | श्री. पी. व्ही. जोगदंड | इ. स. १९१२ ते १९१४ |
| ६ | श्री. वि. रा. जोशी | इ. स. १९१४ ते १९१६ |
| ७ | श्री. द. वि. बापट | इ. स. १९१६ ते १९१८ |
| ८ | श्री. त्रिं. ग. भोपटकर | इ. स. १९१८ ते १९२० |
| ९ | श्री. गो. ग. मालशे | इ. स. १९२० ते १९२२ |
| १० | श्री. गो. वा. पटवर्धन | इ. स. १९२२ ते १९२४ |
| ११ | श्री. गो. ग. मालशे | इ. स. १९२४ ते १९३६ |
| १२ | श्री. नी. वा. किंकर | इ. स. १९३६ ते १९४३ |
| १३ | श्री. त्रिं. ग. भोपटकर | इ. स. १९४३ ते १९४५ |
| १४ | श्री. गो. जि. लिमये | इ. स. १९४५ ते १९४७ |
| १५ | श्री. शं. र. गोडबोले | इ. स. १९४७ ते १९४९ |
| १६ | श्री. न. शं. जमदग्नी | इ. स. १९४९ ते १९५० |
| १७ | श्री. नी. वा. किंकर | इ. स. १९५० ते १९५२ |
| १८ | श्री. शं. र. गोडबोले | इ. स. १९५२ ते १९५५ |

| | | |
|---|---|---|
| १९ | श्री. चिं. रा. आठले | इ. स. १९५५ ते १९७५ |
| २० | श्री. पु. ह. वाघ | इ. स. १९७५ ते १९७९ |
| २१ | श्री. भा. दि. पारखी | इ. स. १९७९ ते १९८० |
| २२ | श्री. श्री. वि. मुळे | इ. स. १९८० ते १९८१ |
| २३ | सौ. मंगला उकिडवे | इ. स. १९८१ ते १९८६ |
| २४ | श्री. कि. मा. बळी | इ. स. १९८६ ते १९९४ |
| २५ | श्री. मे. गो. गोसावी | इ. स. १९९४ ते २००९ |
| २६ | श्री. संजय मेत्रे | इ. स. २००९ ते २०१० |

स्त्रोत : महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी, आकांक्षा, स्मरणिका, पुणे, २०००, पृ. ११७.

## परिशिष्ट क्रमांक : ७

❖ निवडक फोटो



पूना नेटिव्ह इन्स्टिट्यूशन असोसिएशन संस्थेचे संस्थापक वासुदेव बळवंत फडके



श्री. वामनराव प्रभाकर भावे



श्री. लक्ष्मणराव रामचंद्र इंदापूरकर




भावे प्राथमिक शाळा, पुणे(इ.स.१९३५).



भावे प्राथमिक शाळेचे शिक्षक वर्ग - इ.स. १९११.



टग ऑफ वॉर विजयी संघ.(इ.स.१९११)



**प्राथमिक शाळा - इ.स. १९२२.**



**विजयी क्रिकेट संघ - इ.स. १९३१.**



**भावे हायस्कूल विद्यार्थी - इ.स. १९३५.**



भावे हायस्कूल विद्यार्थिनी - इ.स. १९३५.



स्काऊट पथक (इ.स.१९३६).



ए.व्ही. स्कूल सासवड (इ.स.१९२६)



बारामती हायस्कूल, बारामती (इ.स.१९२२)



बारामती हायस्कूल विद्यार्थिनी - इ.स. १९३४.



डेक्कन जिमखाना शाळा - इ.स. १९३५.




आबासाहेब गरवारे महाविद्यालय इमारत, पुणे.(इ.स. १९४५)



भावे हायस्कूल माजी विद्यार्थी मेळावा - २००२



भावे हायस्कूल एन.सी.सी विद्यार्थी -२००३

## दिनांक २९.११.२०११




**शतकोत्तर सुवर्णमहोत्सव कृतज्ञता सोहळा प्रसंगी स्मरणिका प्रकाशन - १९९९**




**कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी मा. डॉ. मुरली मनोहर जोशी व इतर मान्यवर १९९९.**




**मा. मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांचे मनोगत**

# सर्व्हे मुलाखत फॉर्म

## टिळक महाराष्ट्र विद्यापीठ,

## गुलटेकडी, पुणे-४११०३७

इतिहास विषयांतर्गत पीएच्.डी पदवीसाठी मुलाखत अनुसूची

सन २०१३-१५.

विषय : 'पुणे शहरातील शैक्षणिक विकासात महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे योगदान'

| मार्गदर्शक | संशोधक |
|---|---|
| डॉ. स्वाती काळभोर | श्री. दाते ज्ञानेश्वर आनंदराव |
| ९४२३५७२२१४ | ९८५०८९७८६६ |

मुलखत देणाऱ्याचे नाव -

संस्थेत भूषवित असलेले पद -

प्र.१) आपल्या संस्थेची स्थापना करण्यामागील उद्दिष्ट्ये कोणती आहेत?

१)

२)

३)

४)

प्र.२) आपल्या संस्थेची स्थापना करण्यामागील हेतू कोणता होता?

१)

२)

३)

४)

प्र.३) आपल्या संस्थेचा कार्यकाल हा १५० वर्षाचा पूर्ण झालेला आहे. ही बाब नक्कीच गौरवास्पद आहे. म्हणून इतर संस्थेच्या तुलनेत आपल्या संस्थेचे वेगळेपण नेमके कोणते आहे?

१)

२)

३)

४)

प्र.४) आपल्या संस्थेचे काही माजी विद्यार्थी देशाच्या स्वातंत्र्यलढ्याशी संबंधित अथवा सक्रिय होते का?

अ) ब) नाही

असल्यास त्यांची नावे सांगा? व त्यांची स्वातंत्र्यलढ्यातील कामगिरी सांगा.

| अ. क्र. | नाव | कामगिरी |
|---|---|---|
| १) | | |
| २) | | |
| ३) | | |

प्र.५) आपल्या संस्थेच्या कोणत्या माजी विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रात कोणती कामगिरी केली?

| अ. क्र. | नाव | कामगिरी |
|---|---|---|
| १) | | |
| २) | | |

प्र.६) आपल्या संस्थेचे सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय व शैक्षणिक दृष्ट्या यशस्वी विद्यार्थ्यांची नावे सांगा.

| अ.क्र. | सामाजिक | सांस्कृतिक | राजकीय | शैक्षणिक |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |

प्र.७) आतापर्यंत आपल्या संस्थेला पुरस्कार मिळाले आहेत का?

अ) होय  ब) नाही

असल्यास कोणते व कोणत्या कारणांसाठी -

पुरस्काराचे नाव  पुरस्काराचे कारण

१)

२)

प्र.८) आपल्या संस्थेच्या सर्व शाखा मिळून २०१० मध्ये कार्यरत असलेल्या विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची संख्या किती आहे?

| अ.क्र. | हुद्दा | एकूण संख्या |
|---|---|---|
| १ | विद्यार्थी | |
| २ | शिक्षक | |
| ३ | शिक्षकेतर कर्मचारी | |

प्र.९) २१ व्या शतकात संस्थेने आपल्या धोरणात अथवा उद्दिष्टांमध्ये काही बदल स्वीकारला आहे का?

अ) होय  ब) नाही

असल्यास कोणता -

१)

२)

प्र.१०) आपल्या संस्थेच्या भविष्यातील कोणत्या योजना आहेत?

१)

२)

३)

प्र.११) आपल्या संस्थेत तंत्रज्ञानाचा वापर कशा प्रकारे केला जातो?

१)

२)

३)

प्र.१२) माध्यमिक, उच्चमाध्यमिक व उच्च शिक्षणाच्या अनुषंगाने जागतिकीकरण, स्पर्धात्मकतेच्या वातावरणात आपल्या संस्थेची भूमिका कोणती आहे?

१)

२)

३)

प्र.१३) आपली संस्था प्लेसमेंटसाठी कोणते प्रयत्न करते?

१)

२)

३)

मुलाखत देणाऱ्याचे नाव -

मुलाखत देणाऱ्याची सही

## टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, गुलटेकडी, पुणे-४११०३७

इतिहास विषयांतर्गत पीएच्.डी पदवीसाठी निवडलेल्या 'पुणे शहरातील शैक्षणिक विकासात महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे योगदान' या विषयासाठी 'महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी' माजी विद्यार्थी सर्व्हे मुलाखत फॉर्म -

दिनांक :

१. माजी विद्यार्थ्याचे नांव : ______________________

२. सध्याचा पत्ता : ______________________

______________________

______________________

फोन नंबर : ........................

३. जन्मतारीख : ...........................

४. 'महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी'तील कोणत्या शाळा किंवा महाविद्यालयामध्ये शिक्षण घेतलेले आहे. : ______________________

______________________

५. आपण कोणते शिक्षण घेतलेले आहे?

______________________

६. आपले शिक्षण कोणत्या वर्षी पूर्ण झाले? ______________________

७. आपण कोणते शिक्षण घेतलेले आहे? ______________________

८. आपण शिक्षण घेतलेल्या शाळा किंवा महाविद्यालयाबद्दल आपले मत काय आहे. ?

______________________

______________________

९. आपण शिक्षण घेतलेल्या शाळा किंवा महाविद्यालयात नाविण्यपूर्ण राबविलेल्या उपक्रमांची माहिती सांगा.?

१०. आपण शिक्षण घेतलेल्या 'महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी' या शैक्षणिक संस्थेबद्दल आपले मत काय आहे.?

११. आपण सध्या कोणते नविन शिक्षण पूर्ण केले आहे?

१२. आपण सध्या कोणत्या ठिकाणी कार्य करत आहात?

१३. आपण शिक्षण घेतलेल्या 'महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी' या शैक्षणिक संस्थेसाठी कोणते योगदान देऊ शकता?

माजी विद्यार्थ्याचे नाव व सही

***************